S P E A K | R E A D | W R I T E



# माय मराठी ४
# My Marathi 4

पाठ्यपुस्तक | TEXTBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI



दृकश्राव्य डीव्हीडी सहित
INCLUDING AUIDO-VISUAL DVD


SUHAS LIMAYE
MADHURI PURANDARE



UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

सुहास लिमये / SUHAS LIMAYE
माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE

# माय मराठी ४
# My Marathi 4

पाठ्यपुस्तक / Textbook for Communicative Marathi

**संपादक / EDITORS**
विभा सुराणा / VIBHA SURANA
आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

**संकल्पना आणि निर्मिती / CONCEPT & PRODUCTION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

ISBN No.: 978-93-5361-726-4

FIRST EDITION 2020
पहिली आवृत्ती २०२०

क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन - शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध
Published under Creative Commons Attribution - ShareAlike license (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE, माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE, जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR, कृत्तिका भोसले / KRUTTIKA BHOSALE
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK, सायली थारळी / SAYALI THARALI

- **संपादक / EDITORS**
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  प्र. ना. परांजपे / P.N. PARANJAPE

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / TECHNICAL SUPPORT FOR MARATHI**
  वूडस्टॉक स्टुडिओ / WOODSTOCK STUDIO, कन्फ्युशिअस इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ / CONFUCIUS INSTITUTE, UNIVERSITY OF MUMBAI
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / GURUNATH KALAMKAR (DEPARTMENT OF MARATHI, UNIVERSITY OF MUMBAI), पूजा चितळे / POOJA CHITALE, सौरभ भोसले / SAURABH BHOSALE

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  दत्तात्रय पाडेकर / DATTATRAYA PADEKAR
  प्राची जाधव / PRACHI JADHAV
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI,
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com
  deptofgerman@mu.ac.in

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com, www.mu.ac.in
  www.rmvs.marathi.gov.in

Online access link: https://mu.ac.in/mymarathi4

**TEXTBOOK, WORKBOOK AND 1 FREE DVD ₹ 1250 | $ 25 | € 20**

# प्रस्तावना

भारतीय अन्यभाषक, त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी 'माय मराठी' हे चौथ्या पातळीचे पाठ्यपुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतिशील आणि निर्मितिक्षम अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्ययन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेतून योग्य रीतीने आणि परिणामकारक संवाद कसा साधावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्ययन सामग्रीत प्रामुख्याने दोन पुस्तके आहेत, १) डीव्हीडी, ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर आणि मराठी - इंग्रजी आणि हिंदी, अशा शब्दसंग्रहासहित पाठ्यपुस्तक आणि २) सराव, चाचणी आणि उत्तरसंच असणारे अभ्यासपुस्तक.

'माय मराठी पातळी ४' च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, साचेबद्ध सराव, 'करा आणि शिका' स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणी, समर्पक अर्कचित्रे, विषयानुसार येणारी अतिरिक्त शब्दसंपदा आणि दृष्टिक्षेप, सराव करण्यास उपयुक्त श्राव्य आणि दृक्श्राव्य चित्रफिती आहेत. तसेच सर्वच धड्यांची रचना विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे. सोबत विनामूल्य दिल्या गेलेल्या दृक्श्राव्य डीव्हीडीसह हे पाठ्यपुस्तक वापरायचे आहे.

'माय मराठी पातळी ४'च्या अभ्यासपुस्तकात १) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्यासाठी स्वाध्याय आहेत. त्यासोबतच २) पातळी ३च्या उजळणीसाठी 'मागील भागात' हा सरावाचा धडा, ३) प्रत्येक दोन धड्यांसाठी चाचणी प्रश्नावली, शेवटी ४) संपूर्ण पातळी ४च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी, आणि ५) उत्तरे यांचा समावेश आहे.

शब्दसंग्रहात (ग्लॉसरी) किंवा शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, तिन्ही वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे.

संवादात्मक मराठी - पातळी ४चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १२० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्ययन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक धड्यासाठी साधारणपणे १२ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

सोबत जोडलेली दृक्श्राव्य डीव्हीडी ह्या अध्ययन सामग्रीसोबत विनामूल्य देण्यात येणार आहे कारण हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक हेतूने राबवला जात आहे. परिपूर्णपणे भाषा शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने ह्या सीडीमध्ये श्राव्य ध्वनीफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी सुचवलेल्या उत्तरांसहची प्रश्नावली घेताना तसेच इतर प्रश्नोत्तरांच्या वेळी ह्या डीव्हीडीची मदत घेणे अपेक्षित आहे.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी शिक्षकांसाठी असणाऱ्या भाषा-प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे; तसेच, ह्या संदर्भात त्यांनी संपादक वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्ययन सामग्री तयार करण्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपियन भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान सहा पातळ्यांची म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे. उर्वरित दोन पातळ्यांसाठी यथायोग्य सामग्री तयार करणे हे आमचे पुढील उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाअंतर्गत स्वयं-अध्ययन करणाऱ्यांसाठी संगणक आणि सहध्वनीद्वारे वापरली जाणारी मोबाईल ॲप्लिकेशन्सही बनवली जाणार आहेत.

त्या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या सुपर्णा कुलकर्णी यांचेही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली कार्यशील अशा मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे आम्ही आभारी आहोत. हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विभा सुराणा आणि आनन्द काटीकर
संपादक

# प्रस्तावना | Preface

My Marathi Level 4 is a Marathi course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, task and production based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of the Marathi language systematically and effectively. It teaches the learners how to communicate correctly and effectively in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of two books, namely 1) a Textbook with transcripts, a Marathi Glossary in English and Hindi and a *DVD* 2) a Workbook with exercises, tests and answer keys.

This particular Textbook of 'My Marathi Level 4' consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, pattern drills (saraav), 'do and learn' exercises, learning games, cartoons, audios and audio-visual components with their transcripts and exercises, vocabulary as per chapters (*drishtikshep*), as well as learner self-evaluation in all chapters. The textbook is to be used along with the free audio-visual *DVD* attached to it.

The Workbook of 'My Marathi Level 4' consists of 1) exercises for each chapter as well as the following regular tests 2) a comprehensive test for level 3 after mageel bhagat, 3) a test after every two chapters 4) a comprehensive test for level 2 and 5) answerkeys.

The Glossary or *shabdasangraha* gives a detailled list of difficult words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms. English and Hindi word meanings are given.

The entire Communicative Marathi Level 4 Course is designed for approximately 120 teaching hours. Thus, the teacher may take about 12 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only regular dictations but also more exercises as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to learn to speak correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the comprehensive glossary.

The audio-visual DVD at the end comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media

which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editor or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. We are extremely thankful to the entire team for making this level happen.

Like English and German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approx. 800 hours for near native language proficiency. Preparing standardized material for remaining 2 levels for learning Marathi is a daunting task ahead of us and requires resources. Computer and Mobile applications (Apps) for self learners are also being prepared under this project. Such enterprises require expert inputs from diverse domains.

We are extremely thankful to Suparna Kulkarni from Rajya Marathi Vikas Sanstha for her valuable inputs.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

Vibha Surana and Anand Katikar
Editors

# आभार | Acknowledgement

Abhijeet Ranadive
Aditya Badle
Amit Varandekar
Amruta Sudame
Anagha Mandavkar
Anil Sakpal
Ashish Sawant
Bharati Chhatre
Bharati Nirgudkar
Devendra Kalap
Gauri Bramhe
Gurudutt Kamath
Kamala Ganesh
Manasi Sawant
Manish Bawkar
Mihir Kulkarni
Neha Thombare
Nirupama Joshi
Prachi Vaidya
Pradnya Dalvi
Prathmesh Jagtap
Ravindra Kulkarni
Sammati Balgi
Sandeep Avhad
Shrikant Pathak
Shruti Limaye
Suhas Pednekar
Vidya Pingle

**Permission from copyright holders**

Girish Kuber
Loksatta
Mehta Publishing House
Resident Deputy Collector, Nagpur
Setu Prakashan
Snehavardhan Prakashan
Sumitra Madgulkar
thinkmaharashtra.com
Uttam Kolgaonkar
Vasanti Brahme

**Text / Excerpt acknowledgement**

Anil Jhankar
Bhalchandra Nemade
Charuhas Pandit / Prabhakar Wadekar
Fountain Music Company
https://nashik.gov.in/mr/जिल्ह्याबद्दल
Maharashtra Times
majhapaper.com
marathisrushti.com
misalpav.com
Sudha Bhatt
Tanuja Mohite
YHAI Kandivali Unit

**External Review Expert**

Sujata Mahajan

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| | मागील भागात | मराठी भाषेत बोलण्याच्या आपल्या क्षमता आणि अडचणी<br>चांगल्या सवयी<br>उद्याची बात<br>नकाशा समजावून सांगणे<br>अपेक्षा व्यक्त करणे | परिमाणवाचक विशेषणे<br>सामान्यरूप<br>काळ<br>शब्दयोगी पदे<br>धातुसाधिते, धातुसाधित विशेषणे<br>स्थलवाचक विशेषणे व त्यांची साधित रूपे<br>भाववाचक नामे<br>वाक्यांची जोडणी सर्वनामांच्या वापराने<br>पुरता, पुरेसा<br>प्रयोजक क्रियापदे<br>शक्य क्रियापदे<br>क्रियापद-नामाची षष्ठी | फार, पुष्कळ, थोडा, किंचित, निम्मा, दुप्पट, दुपदरी, चौपट इ.<br>खालून, वरून, पुढून, आतून, जवळून इ.<br>हा-असा, असला, इतकासा, एवढासा, अमुक, अमका, तो-तसा, तसला, छोटासा, लहानसा इ.<br>असलेला, करणारा इ.<br>जितके-तितके, जेवढे-तेवढे इ.<br>खालची पायरी, मधली भिंत, जिथली वस्तू<br>दाखवण्याची गरज, चालण्याचा कंटाळा... | १३ |
| १ | चित्रपट<br>व्यक्तिमत्त्व : दादासाहेब फाळके | चित्रपट या विषयावर बोलणे, वाचणे, लिहिणे<br>चित्रपट परीक्षणे<br>चित्रपटाविषयी अभिप्राय देणे<br>कलाविश्वातील घडामोडींविषयी बोलणे / स्वतःचे मत व्यक्त करणे<br>चित्रपटविश्वातील बदलते ट्रेंडस् | संयुक्त क्रियापदे | चित्रपटक्षेत्रातील संज्ञा<br>करू शकणे / लागणे..., करून पाहणे / ठेवणे..., करता येणे..., करावे लागणे...<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ३६ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| २ | विरंगुळा<br>व्यक्तिमत्त्व : शिल्पकार म्हात्रे | सवड, विरंगुळा यांची गरज व महत्त्व यांविषयी चर्चा करणे<br>फावल्या वेळात काय करू शकतो - विविध पर्याय सुचवणे<br>फावल्या वेळात काय करायला आवडेल - इच्छा व्यक्त करणे | ‘लागणे’चे विविध प्रयोग<br>क्रियापद + सप्तमी - करणे-करण्यात<br>‘तर’चे विविध उपयोग<br>नामसाधित कालवाचक विशेषणे व क्रियाविशेषणे<br>उद्देशार्थक काळ | सवड मिळणे, सवड काढणे<br>तर, तरच, तरी, तरीही, असेल / नसेल तर...<br>आलास मोठा, लागून गेला मोठा...<br>सकाळी / सकाळचा, संध्याकाळी / संध्याकाळचा<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ६० |
| ३ | भेटीगाठी | भेटीगाठींचे महत्त्व<br>लक्षात राहिलेली भेट<br>औपचारिक / अनौपचारिक भेट<br>पत्रांद्वारे होणाऱ्या भेटी ते आजच्या आभासी भेटी | क्रियापद + द्वितीया प्रयोग- (कर्तरी, कर्मणी, भावे - फक्त मुख्य प्रकार)<br>परिणामबोधक उभयान्वयी अव्यये<br>कालवाचक क्रियाविशेषणे | पहिली भेट<br>भेटू लवकरच<br>कधी भेटायचं?<br>भेट देणे<br>भेट घडवून आणणे<br>म्हणून, त्यामुळे इ॰<br>आता, अजून, आजही, गेल्याच आठवड्यात इ॰<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | ८३ |
| ४ | 'श' शिक्षणाचा<br>व्यक्तिमत्त्व : महात्मा फुले सावित्रीबाई फुले | महाराष्ट्रातील शैक्षणिक व्यवस्था<br>चालू घडामोडींविषयी बोलणे<br>उपलब्ध संधी<br>शालेय शिक्षणाचे माध्यम<br>विविध प्रकल्प : नवनवीन प्रयोगांविषयी माहिती मिळवणे व स्वतःला आवडलेल्या प्रयोगावर सादरीकरण करणे | आत्मवाचक सर्वनामे व त्यांची विभक्तिरूपे<br>संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये<br>पेक्षा, हून- तुलनात्मक शब्द<br>‘असो’, ‘असोत’चे विविध उपयोग<br>विशेषणांचा नामांसारखा वापर | शिक्षण, संशोधन - विविध क्षेत्रे<br>आपण, स्वत: इ॰<br>म्हणजे, तर, की<br>-पेक्षा, -हून<br>मध्ये, सर्वांत<br>स्पर्धा, स्पर्धापरीक्षा<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १०६ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अतुल्य भारत<br>व्यक्तिमत्त्व : महात्मा गांधी | प्रसिद्ध भारतीय कला, परंपरा यांबद्दल जाणून घेणे<br>भारत आणि जग परस्परसंबंध, सांस्कृतिक देवाणघेवाण - चर्चा करणे | उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये<br>‘म्हणून’चे विविध उपयोग<br>क्रमवाचक संख्याविशेषणे<br>शब्दयोगी पदे – -भर, -आधी, -पूर्वी | भारतीय नृत्य, संगीत, प्रसिद्ध साहित्यिक व त्यांच्या कलाकृती, प्रसिद्ध पर्यटनस्थळे, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम, अध्यात्म<br>म्हणून, यासाठी, याकरिता, यास्तव<br>अठरावे शतक इ॰<br>अठराव्या शतकात इ॰<br>जन्मभर इ॰<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १२८ |
| ६ | घरकुल | कुटुंबपद्धतीबद्दल चर्चा करणे (एकत्र, विभक्त) - फायदे, तोटे<br>बदलत्या काळातील घरे<br>राजवाडा, वाडा, बंगला, इमारत, चाळ<br>घरातील खोल्या | समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये<br>प्रयोजक क्रियापदे | घर पाहावे बांधून<br>व, आणि, शिवाय, अन्, न, नि, आणखी, आणिक<br>घराचे भाग आणि घरसजावटीच्या वस्तू<br>आधीच ... तशात त्यात<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १४८ |
| ७ | दगडांच्या देशा<br>व्यक्तिमत्त्व : शिवाजी महाराज | महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांविषयी जाणून घेणे<br>किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांचे संवर्धन<br>किल्ला कसा पाहावा?<br>महाराष्ट्रातील लेणी | विरोधसूचक उभयान्वयी अव्यये<br>‘म्हणजे’चे विविध उपयोग<br>चढतो / चढून जातो<br>चढला / चढून गेला<br>तृतीयेचा प्रत्यय ‘-ने’, शब्दयोगी पद ‘-मुळे’<br>क्रियापद+ने, -मुळे<br>नाम+ने, -मुळे | पण, परंतु, परि<br>किल्ल्यांचे प्रकार- गिरीदुर्ग, भुईकोट, जलदुर्ग<br>किल्ला - संरचना<br>केल्याने, केल्यामुळे<br>कष्टाने, आपुलकीने, घाईघाईने इ॰<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १६९ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ८ | खाद्यसंस्कृती<br>व्यक्तिमत्त्व : विठ्ठल कामत | महाराष्ट्रातील खाद्यसंस्कृतीतील विविधता<br>प्रांतिक पदार्थ व स्वभाववैशिष्ट्ये<br>म्हणी व वाक्प्रचार यांच्यावर चर्चा करणे<br>कशात काय येते | नामसाधित विशेषणे<br>धातुसाधित विशेषणे<br>ध्वन्यानुकारी, नादानुकारी विशेषणे<br>विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये<br>चतुर्थी-क्रियापद समजणे, आवडणे इ. | तऱ्हेतऱ्हेचे प्रांतिक पदार्थ<br>पिकलेला आंबा, तळलेले पदार्थ इ.<br>झणझणीत, कुरकुरीत इ.<br>स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे<br>कशाबरोबर काय खातात<br>की, किंवा, अथवा, अगर, नाहीतर<br>खाद्यसंस्कृतीवर आधारित म्हणी व वाक्प्रचार<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | १८६ |
| ९ | नागपूर आणि नाशिक<br>व्यक्तिमत्त्व : आमटे कुटुंबीय | नागपूर आणि नाशिक या महाराष्ट्रातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे<br>या दोन जिल्ह्यांच्या बोलीभाषांबद्दल बोलणे | -तील, -तले<br>पूरक केवलप्रयोगी अव्यये<br>'की'चे विविध उपयोग | म्हणे, आपला / आपली, बेटे / बेटा, बापडा / बापडी, असं का!, होऽका!, आत्ता!, जळलं मेलं!, काय कळलं!<br>इतका ... की इ.<br>तसा ... पण इ.<br>चालणार नाही, चालवून घेणार नाही<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द<br>बोलीभाषा | २०७ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १० | बोधकथा<br>व्यक्तिमत्त्व : गौतम बुद्ध | मराठीतील निवडक बोधकथा<br>बोधकथा ऐकून घडलेल्या पिढ्या<br>जातककथा<br>पंचतंत्र<br>इसापनीती<br>परदेशी बोधकथा | जोडशब्द<br>कालवाचक क्रियाविशेषणे<br>एकाच केवलप्रयोगी अव्ययाचा वेगवेगळे भाव दर्शवण्यासाठी वापर<br>मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यये<br>शक्य क्रियापदे: भूतकाळ, भविष्यकाळ<br>तीव्रतादर्शक विशेषणे<br>संख्यावाचक विशेषणे<br>अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे | बोधकथांचे प्रकार<br>जडणघडण, फुलेबिले<br>लगेच, एकदम इ.<br>चूप, गप<br>चालवते-चालवत नाही - चालवले-चालवले नाही / चालवेना - चालवेल-चालवणार नाही<br>निळाशार, काळाभोर इ.<br>सर्व, एकेक इ.<br>उजाडणे, अंधारणे इ.<br>नाम + क्रियापद जोड्या<br>समानार्थी, विरुद्धार्थी शब्द | २२२ |
| ११ | ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे अनुलेखन | | | | २४१ |
| १२ | शब्दसंग्रह | | | | २५५ |
| १३ | व्याकरण आराखडा | | | | ३०० |

# मागील भागात




## उजळणी करू या...

- परिमाणवाचक विशेषणे : फार, पुष्कळ, थोडा, किंचित, निम्मा, दुप्पट, दुपदरी, चौपट इ॰
- सामान्यरूप
- काळ
- शब्दयोगी पदे
- धातुसाधिते, धातुसाधित विशेषणे
- स्थलवाचक विशेषणे व त्यांची साधित रूपे
- भाववाचक नामे
- वाक्यांची जोडणी : जितके-तितके, जेवढे-तेवढे इ॰
- प्रयोजक क्रियापदे
- शक्य क्रियापदे
- क्रियापद-नामाची षष्ठी

## १ थोडेफार, पुष्कळ काही ...

**करा आणि शिका**

विद्यार्थ्यांच्या जोड्या करू या. एक चित्र निवडून त्याच्याशी संबंधित एक गोष्ट किंवा एक संवाद लिहू या आणि वर्गासमोर सादर करू या.








**क.** **मराठी भाषा शिकताना तुमची कोणकोणती भाषाकौशल्ये वाढली आहेत? तुम्हाला अजूनही कोणत्या गोष्टी अवघड जातात? खालील मुद्द्यांच्या मदतीने आधी आपली टिपणे लिहू या आणि मग वर्गात सांगू या.**

उच्चार, वाचन आणि आकलन, संभाषणकौशल्य

लेखनकौशल्य, श्रवणकौशल्य, व्याकरण

मराठी संस्कृतीबद्दलची समज

उदा. मला आता वृत्तपत्रातील छोट्या बातम्या वाचता येतात ... मला अजूनही नामांची लिंगं, वचनं आणि सामान्यरूपं ओळखता येत नाहीत... मला महत्त्वाचे सांस्कृतिक संदर्भ समजतात...

**अ. खालील यादीतून विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधू या. एकच शब्द आपण अनेक वेळा वापरू शकतो.**

**फार, थोडाफार, पुष्कळ, काही प्रमाणात, खूप, जास्त, किंचित, भरपूर, नेहमी, थोड्या अंतराने, सातत्याने, थोडे, अधूनमधून, काही, कमी, कधी कधी, खूप प्रमाणात, निम्मे, दुप्पट, कित्येक पटींनी, काही अंशी**

**आ. ह्यांतील किमान तीन जोड्या वापरून मराठी भाषेतील आपल्या क्षमता आणि अडचणींबद्दल बोलू या.**

उदा. - फार ≠ थोडे   मला मराठी वाक्प्रचार फार आवडतात.
मला व्याकरणातील ‘काळ’ हा विषय अजूनही थोडा अवघड जातो.

**इ. खालील वाक्यांतील विशेषणांची जागा बदलून वाक्य पुन्हा लिहू या.**

उदा.
शाळेतील पुष्कळ मुले चॉकलेट खातात.
पुष्कळ शाळांतील मुले चॉकलेट खातात.
शाळेतील मुले पुष्कळ चॉकलेट खातात.

१. लोकांचे काम थोडे बाकी आहे.
२. काही विद्यार्थ्यांनी शिक्षकांना आपल्या समस्या सांगितल्या.
३. राज्यातील बरेच लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत.
४. चालून आलेल्या संधींचा फायदा घेत समीरने आपला व्यापार भरपूर वाढवला.
५. वाचनाचा मुलांना जास्त फायदा होतो.





**ई. योग्य उत्तर निवडू या.**

उदा.
मला वाटतं, आमच्या कॅन्टीनमध्ये रोज खूप चांगले / ~~खूप चांगली~~ / ~~खूप चांगल्या~~ खाद्यपदार्थ मिळतात.

१. हा आदेश सगळे नव्या / सगळ्या नव्या / सगळ्या नवे कर्मचाऱ्यांसाठी आहे.
२. कंपनीतले काही मोजके / काही मोजक्या / काही मोजकी इंजिनिअर स्वतंत्र व्यवसायही करतात.
ख. ‘वेगन’ असल्यामुळे इथे तुम्हाला खाण्यासारखे फार थोड्या / फार थोडे / फार थोडी पदार्थ असतील ना?
ग. मोसमी पावसानंतर अन्नधान्य उत्पादन २ टक्क्यांपेक्षा थोडा जास्त / थोडी जास्त / थोड्या जास्त वेगाने वाढले.

## २ सामान्यरूप

**क. वाक्यांतील नामांना योग्य प्रत्यय जोडून वाक्य पूर्ण करू या.**

उदा. परीक्षा, तुम्ही, तारखा – तुमच्या परीक्षेच्या तारखांचे वेळापत्रक कळले का?

अ. मुले, आपण, वर्ग

........................ नी ........................ ल्या ........................ ची चांगली रंगरंगोटी केलीय.

आ. खिडकी, वर्ग, पाऊस

........................ च्या ........................ तून ........................ चे थेंब आत येत होते.

इ. घर, अंगण, मी

........................ झ्या ........................ च्या ........................ त बरेच पक्षी येतात.

ई. पदर, साडी, तू

........................ झ्या ........................ च्या ........................ ला डाग लागलाय.

उ. लोक, बातमी, सकाळ

........................ च्या ........................ मुळे ........................ ना खूप राग आला होता.

**ख. अ. शब्द साखळी**

- प्रत्येक गटात चार विद्यार्थी याप्रमाणे वर्गातील विद्यार्थ्यांचे सहा गट करावेत.
- प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांनी एका रांगेत उभे राहावे.
- प्रथम पहिल्या विद्यार्थ्याला शिक्षक हिरव्या रंगाचे शब्द असलेली एक चिठ्ठी देतील.
- दुसऱ्या विद्यार्थ्याला पुढील शब्द व त्या शब्दाला लागणारा प्रत्यय असलेली चिठ्ठी दिली जाईल. तो विद्यार्थी दिलेल्या शब्दाला दिलेला प्रत्यय जोडून त्या शब्दाचे सामान्यरूप करेल.
- तिसरा विद्यार्थी पुढच्या शब्दाचे सामान्यरूप करून, त्याला दिलेला प्रत्यय जोडून आधीच्या शब्दाला जोडेल.
- चौथा विद्यार्थी शेवटच्या शब्दाचे सामान्यरूप करून आधीच्या दोन्ही शब्दांना ते जोडेल आणि वाक्य पूर्ण करेल.
- हिरव्या रंगातील शब्द तसेच ठेवायचे आहेत.
- जो विद्यार्थी चुकेल तो रांगेत शेवटी जाऊन उभा राहील. जे विद्यार्थी अचूक उत्तर देतील ते ह्या शब्द साखळीतून मुक्त होतील.



उदा. विद्यार्थी १ - (खिसा) पैसे हरवले : खिशातले पैसे हरवले.
विद्यार्थी २ - (कुर्ता) : कुर्त्याच्या खिशातले पैसे हरवले.
विद्यार्थी ३ - (तुम्ही) : तुमच्या कुर्त्याच्या खिशातले पैसे हरवले.

१. पार्टी मागितली : वाढदिवस (ची) - मी (ला) - मित्र (ने)
२. सराव केला : विद्यार्थी (नी) - स्वाध्याय (चा) - पाठ्यपुस्तक (त + ला)
३. पत्ता विचारला : विमानतळ (चा) - एक माणूस (ने) - ट्राफिक हवालदार (ला)



४. संप पुकारला : विक्रेते (नी) - दुकान (त + ले) - मॉल (च्या)
५. फलक दिसतात : नेहमी जाहिराती (चे) - वाट (त) - काम (ला) जाताना
६. पिशवी असेल : एक पिवळा रंग (ची) - कप्पा (त) - शेवट(चा) - कपाट (आतला)

**आ. साखळी खेळ**

उदा. विद्यार्थी १ : कुर्ता
विद्यार्थी २ : कुर्त्याचा खिसा
विद्यार्थी ३ : कुर्त्याच्या खिशातले पैसे ...

• वर्गातील सर्व विद्यार्थी गोल करून उभे राहतील. एक विद्यार्थी एक शब्द म्हणून खेळ सुरू करेल.
• पुढील विद्यार्थी त्या शब्दाशी निगडित दुसरा शब्द (त्याला आवश्यक प्रत्यय लावून) म्हणेल. अशाच प्रकारे खेळ पुढे चालू राहील.

**ग. खालील वाक्यांमध्ये काही प्रत्ययांची अदलाबदल झाली आहे, ते दुरुस्त करू या.**

उदा. ही आमची शेजारच्या म्हात्रेकाकांच्या छत्री आहे.
ही आमच्या शेजारच्या म्हात्रेकाकांची छत्री आहे.

अ. मंगेशचा फुफ्फुसाला कॅन्सर आहे. दुर्दैवाने त्याला एकच फुफ्फुस आहे.
आ. “मी कधीला अक्काची सांगते आहे, की उन्हाची बाहेर पडू नकोस!"
इ. तुषारने मला सकाळी फोन केला. त्याला माझ्याने महत्त्वाचे बोलायचे होते. पेपरमधल्या लेखाशी त्याची झोप उडाली आहे.
ई. विकासमुळे त्याच्या मित्राचे भांडण झाल्याशी आता दोघे एकमेकांशी बोलत नाहीयेत.
उ. आदित्य आजारी आहे. काल त्याशी आंबा खाल्ला, तो बाधला असेल. त्याने आई रात्रभर त्याच्या उशाची बसून होती.

**घ. खाली काही छोटे परिच्छेद दिले आहेत. त्यांत एक शब्द – म्हणजे नाम – पुन्हा पुन्हा आला आहे. तो शोधून त्याऐवजी योग्य तिथे योग्य ते सर्वनाम वापरून परिच्छेद पुन्हा लिहू या.**

अ. आजोबांनी काठीचा आधार घेत पाऊल पुढे टाकले. **आजोबांचा** हात थरथरत होता. **आजोबा** काही क्षण जागेवरच थांबले. डोळे किलकिले करत **आजोबांनी** इकडेतिकडे पाहण्याचा प्रयत्न केला, पण उन्हाच्या कडाक्याने **आजोबांना** भोवळ आल्यासारखे झाले आणि **आजोबांनी** डोळे मिटून घेतले.

आ. ताई : "रेवती, इकडे ये. **रेवती,** काल कुठे होतीस? ताईंनी सात वाजेपर्यंत **रेवतीची** वाट पाहिली. वर्गप्रमुख म्हणून **रेवतीला** आपली जबाबदारी कळते ना? कपाटाच्या किल्ल्या **रेवतीकडे** आहेत हे **रेवतीच्या** लक्षात कसं आलं नाही? पुन्हा अशी चूक झाली, तर **रेवतीकडून** प्रमुखपद काढून ते शर्वरीला द्यावं लागेल, कळलं?"

इ. वाड्याच्या मागल्या चौकात एक भलीमोठी विहीर आहे. वाडा बांधण्याच्या आधीपासून **विहीर** तिथे होती म्हणे. **विहिरीला** बाराही महिने पाणी असते. **विहिरीच्या** कठड्याचे बांधकाम दगडी आहे. आत उतरायला पायऱ्या आहेत. कितीतरी लोकांच्या सुखदु:खांच्या गप्पा **विहिरीने** ऐकल्या आहेत.

**च. विशेषणांचे सामान्यरूप**

उदा॰ बंगला (मोठा, शांत) : मोठा, शांत बंगला
माझ्या मोठ्या आणि शांत बंगल्याचं इंटीरियर तुम्हाला खूप आवडेल.



**अ.** मित्र (लठ्ठ, चपळ) : ..................., ................... मित्र
तुझ्या त्या ................... परंतु ................... मित्राचे कौतुक केले पाहिजे. धावण्याच्या शर्यतीत प्रथम आला!




**आ.** माती (मऊ, काळीभोर) : ..................., ................... माती
नदीकाठच्या ..................., ................... मातीत चालायला छान वाटते.

**इ.** इमारती (उंच, भलेमोठे) : ..................., ................... इमारती
आम्ही पाहिलेल्या त्या ................... आणि ................... इमारतींना २० मजले होते.

**ई.** पुस्तक (जुने, प्रसिद्ध) : ..................., ................... पुस्तक
"त्या लेखकाच्या एका ................... परंतु खूप ...................
पुस्तकाचे नाव आठवत नाही आता!"



**छ. विद्यार्थ्यांच्या जोड्या करू या. पहिल्या विद्यार्थ्याने केवळ निळी तर दुसऱ्याने केवळ पांढरी घरे चालवायची आहेत. वाक्यांतील नामांना कंसातील प्रत्यय / शब्दयोगी पद लावून नामांचे योग्य सामान्यरूप करून वाक्य वाचू या. जोडीदार उत्तरसंचाच्या मदतीने आपले उत्तर तपासेल. एकमेकांना गुण देऊ या.**

| | | | |
|---|---|---|---|
| आरंभ<br>१<br>तुझा तुझ्या मित्र (वर) विश्वास आहे? | ६<br>माझ्या दोन्ही मैत्रिणी (सोबत) मी फिरायला गेलो होतो. | ७<br>"माझं माझ्या काम (वर) प्रेम आहे." | १२<br>माझ्या वाढदिवस (ला) आईने मला सायकल दिली. |
| १<br>मी एका पोलिश शिक्षिका (ला) ओळखतो. | ६<br>ही गाडी आमच्या शेजारी (ची) आहे. | ७<br>"तुम्ही कृपया पुढच्या आठवडा (त) येता का?" | १२<br>प्रज्ञा आठवडा (त + ऊन) दोन दिवस बसने शाळेत जाते. |
| २<br>तू गरीब (ना) मदत केली पाहिजेस. | ५<br>त्या बाग (त) तर एकही झाड नाही. | ८<br>साहेबांचा निरोप हेमंत (ला) दुसऱ्या दिवशी मिळाला. | ११<br>गेल्या बुधवारी मी बाजार (त) गेलो होतो. |
| २<br>तो महाबळेश्वर (मध्ये) राहतो. | ५<br>"तुझ्या बॉस (ला) उत्तर दिलंस का?" | ८<br>जोशी (च्या) घरातला रेडिओ दिवसभर चालू असतो. | ११<br>हरीण आणि हत्ती तळे (पाशी) गेले. |
| ३<br>"उपस्थित मान्यवर (चे) मी स्वागत करतो." | ४<br>"मुलं आता आम्ही (चं) ऐकत नाहीत." | ९<br>"मुलांच्या अभ्यास (त) तुम्ही फारच लक्ष घालता बुवा!" | १०<br>"किती दंगा करताय?" असं म्हणत ती त्या दोघे (वर) ओरडली. |
| ३<br>"त्या अंध मुलगी (ला) रस्ता ओलांडायला मदत कर, जा." | ४<br>मी त्या रस्ता (जवळ) राहतो. | ९<br>अंगावर जबाबदारी पडली, की मुले आपोआप शहाणे (सारखे) वागतात. | १०<br>समोरच्या बाल्कनीत साखरे आजी-आजोबा झोपाळा (वर) बसून झोके घेत होते. |

## ३ काळ

क. खालील वाक्यांमधील कंसातील क्रियापदाचे योग्य रूप निवडू या. योग्य उत्तर ज्या बाणावर असेल त्या बाणाच्या दिशेने पुढे जाऊ या. तुम्ही निवडलेल्या उत्तरापुढे कंसात दिलेले अक्षर खाली तक्त्यात भरू या. पाहू या कोणते शब्द तयार होतात.

(अ) आनाचा जन्म मिशिगनमध्ये झाला आणि ती तिथेच रसायनशास्त्र (शिकणे – साधा भूत.)

शिकत होती (स्थ)

शिकली (छं)

(आ) कालांतराने त्या शहराचा कंटाळा आल्यामुळे ती न्यूयॉर्कला जायचं ठरवते.

ठरवते (लां)

घेत होती (लां)

(इ) पुढे शिक्षण संपल्यावर तिने न्यूयॉर्कला जायचं (ठरवणे – साधा भूत.)

ठरवलं (द)

(ई) शेवटी तिने तिथल्या एका नामवंत संस्थेत कथालेखनाचं शिक्षण (घेणे – साधा भूत.)

वाटत होतं (आ)

घेतलं (णि)

(उ) न्यूयॉर्कमध्ये तिला काहीतरी वेगळं करावंसं (वाटणे – अपूर्ण भूत.)

वाटत राहील (व)

लिहील (लं)

(ए) संस्थेत शिकत असताना ती सातत्याने जागतिक स्तरावर नावाजलेल्या चित्रपटांचा अभ्यास (करणे – रीती भूत.)

(ऊ) आता आना हॉलीवूडमध्ये पटकथा (लिहिणे – साधा वर्त.)

करायची (व्य)

करत असते (ब)

लिहिते (व)

(ऐ) काही वर्षांतच तिने ऑस्कर पारितोषिकही पटकावले असेल.

(ओ) तिच्या पटकथाही आता जागतिक स्तरावर नावाजल्या (जाणे – अपूर्ण वर्त.)

जाणार असेल (ल)

करणार आहे (य)

जात आहेत (सा)

(औ) पुढे काही वर्षांनंतर ती स्वतःचा चित्रपट दिग्दर्शित (करणे – साधा भविष्य)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | | | | | | | |
| छं | | | | | | | |

**ख. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे क्रियापद कर्त्याप्रमाणे की कर्माप्रमाणे चालते ते दाखवू या.**

| | | |
|---|---|---|
| उदा॰ गौरी खूप शिकली. | गौरीने डबा आणला. | गौरीने मित्राला एक भेट दिली. |

अ. विद्यार्थी आज लवकर आले आणि त्यांनी गृहपाठ केला.



आ. रोमिओ जुलियटच्या प्रेमात पडला, तिनेही त्याच्यावर खूप प्रेम केले, परंतु दोघांना एकमेकांची सोबत नाही मिळाली.

इ. “तू काल शाळेला गेला होतास की नाही? तुझ्या शिक्षिकेचा फोन आला होता, त्या सांगत होत्या, तू काल अनुपस्थित होतास म्हणून.”



ई. त्याने माझी फसवणूक केली म्हणून मी त्याला चांगलाच धडा शिकवला.

उ. रात्री इतका पाऊस होता, की सगळ्या घरात पाणी शिरलं.

**ग. कंसातील क्रियापदाचे भूतकाळातील योग्य रूप वापरून वाक्य पूर्ण करू या.**

उदा॰ मी दिलेलं पुस्तक तू (वाचणे) वाचलंस का?

अ. सनत महाआळशी आहे. आज तो अकरा वाजता (उठणे) .................. .

आ. “काल मी स्वतःसाठी गाण्याची एक सीडी विकत (घेणे) .................. .................., ती (ऐकणे) .................. का?”

इ. नेहमी फालतू विनोद करणाऱ्या मित्राला तिने (बजावणे) .................. .................., पण तरीही त्याचे विनोद काही (न संपणे) .................. .................. .

ई. “छे! मला तर सिनेमाची कथा फारच कंटाळवाणी (वाटणे) .................. . तुला इतका का (आवडणे) .................. सिनेमा?”

उ. “दोन महिन्यांपासून भावाची काहीच बातमी न कळल्यामुळे आम्ही (घाबरणे) .................. .................. .”

ऊ. आधी तो सरकारी नोकरी (करणे) .................. .................., तेव्हा त्याने खूप जणांना नोकरी मिळवून (देणे) .................. .................. .

**घ. उदाहरणाप्रमाणे छोटी आत्मकथने लिहू या.**



उदा॰ पूर्वी मी फावल्या वेळात बाहेर फिरायला जायचो. मित्रांना भेटायचो. खूप गप्पा मारायचो, खेळायचो. पण मग घरात टीव्ही आला. आता मी नेहमी घरीच असतो. मी फक्त टीव्ही पाहतो. बाकी काही करत नाही. म्हणून आता माझं पोटही सुटलंय.







**च. वर्गमित्रांची नावे वापरून उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहू या, बोलू या.**








उदा॰ मोहित लहान असताना खूप बर्गर खात असे.
उदा॰ पूर्वी लता दिवसभर टीव्ही पाहायची; आता नाही पाहत.







**छ. वर्गमित्रांची नावे वापरून चांगल्या सवयींबद्दल लिहू या, बोलू या.**





उदा. विहान रोज पहाटे पाच वाजता उठायचा, आजही उठतो आणि पुढेही उठत राहील.
उदा. विकास लहान असताना खूप पुस्तकं वाचत असे, आजही वाचतो आणि पुढेही वाचत जाईल.





**ज. उद्याची बात...**
**अ. खाली दिलेल्या शब्दांपैकी पाच शब्द निवडू या, उदाहरणाप्रमाणे भविष्यात वर्गातील कोणती व्यक्ती काय काय करत असेल ते लिहू या आणि वर्गात वाचून दाखवू या.**

उदा. दहा वर्षांनंतर चिन्मय नक्कीच एका मोठ्या हुद्द्यावर नोकरी करत असेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नाटक | जगप्रवास | व्यवसाय | प्राणी | टेकड्या | कादंबरी |
| नृत्य शिकणे | नवीन प्रयोग | संगीत | नोकरी | अभिनय | नवीन उपक्रम |

**आ. शंभर वर्षांनंतर...**
**पुढील संवाद पूर्ण करू या.**

**अतुल :** रमेश, पन्नासाव्या वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा, मित्रा! तुला भेट म्हणून भारतीय अभिनेत्री जोहरा सेहगल यांच्या शंभराव्या वाढदिवसाचा फोटो पाठवतोय. शतायुषी भव! एक गंमत करू या. कल्पना कर, तू शंभर वर्षांचा झाला आहेस. शंभराव्या वर्षापर्यंत तू काय काय केलेले असेल?



**रमेश :** मी? मी...हं... मी भरपूर पुस्तकं वाचलेली असतील, ...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जग पाहणे | एक शेत विकत घेणे | संगीत ऐकणे | नवीन भाषा शिकणे | पुष्कळ झाडे लावणे | भरपूर काम करणे |
| नृत्य शिकणे | नवीन प्रयोग | भरपूर पुस्तकं वाचणे | संगीत शिकणे | अभिनय | नवीन उपक्रम |

**इ. आता हीच वाक्ये कंसातील एखादे सर्वनाम वापरून पुन्हा वाचू या.**

(आम्ही / आपण, तुम्ही / आपण, तो – ती – ते, ते – त्या – ती)

## ४ वचन

**क. खालील नामांचे एकवचनी / अनेकवचनी रूप लिहू या.**

| | |
|---|---|
| अ. तो तज्ज्ञ, ------------------ | उ. तो अर्ज, ------------------ |
| आ. ------------------, ते मजूर | ऊ. तो ग्राहक, ------------------ |
| इ. ------------------, त्या समस्या | इ. तो लेख, ------------------ |
| ई. ------------------, त्या वनस्पती | ई. ती बोलीभाषा, ------------------ |




**ख. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्य तयार करू या.**

उदा॰ आजच्या सादरीकरणाला फक्त एक भाषातज्ज्ञ उपस्थित होता.
आजच्या सादरीकरणाला अनेक भाषातज्ज्ञ उपस्थित होते.

अ. तुमचा अर्ज आज स्वीकारला जाणार नाही.

आ. त्या प्रकल्पावर काम करणारा मजूर आजारी आहे.

इ. माझ्या स्टॉलवर आतापर्यंत अनेक ग्राहक येऊन गेले.

ई. ही समस्या मला सोडवता येणार नाही.

उ. झाला का तुझा लेख लिहून?

ऊ. माझ्या अंगणात एक औषधी वनस्पती आहे.

ए. तुला एखादी बोलीभाषा येते का?

**ग. कंसातील शब्दांना 'सा / से / शी / शा' प्रत्यय लावून रिकाम्या जागा भरू या.**



अ. .................... होतीस, तेव्हा तुला पाहिलं होतं. आता केवढी मोठी झालीस! (एवढी)

आ. .................... आहे ही साखर ! दहा माणसांच्या चहाला कशी पुरेल? (केवढी)

इ. लहानपणी माझ्याकडे एक .................... बाहुली होती. काय माहीत कुठे हरवली! (नाजुक)

ई. किती .................... गोष्ट आहे! तिच्यावर एवढा विचार करू नकोस. (छोटी)



उ. .................... चिमणाचिमणी त्यांच्या .................... घरट्यात खूष होते. (छोटं)

ऊ. हे सामान कमी आहे. .................... पिशवीत मावेल. (लहान)



ए. तान्ही बाळे गोड असतात. .................... जिवणी आणि .................... हातपाय! (इवली)

ऐ. आपल्या वर्गात एक .................... मुलगी होती. काय बरं नाव तिचं? (बारीक)

ओ. .................... गोष्टीचं अवडंबर माजवू नकोस. (एवढी)

औ. सारा तिच्या वयाइतकी मोठी दिसत नाही. .................... दिसते. (लहान)

## ५ शब्दयोगी पदे

**क. कोणती वस्तू कुठे आहे? सांगू या.**



उदा. टीव्ही एका खोक्यावर आहे. ...

**~~टीव्ही / खोके~~, कॉम्प्यूटर / टेबल, सायकल / खिडकी, स्वेटर / भिंत, कुंडी / टीव्ही, बाहुली / कार्पेट, भांडे / पलंग, बाटली / खुर्ची, कागद / कचरापेटी, स्वेटर / टीव्ही, कार्पेट / टीव्ही, कचरापेटी / टेबल**

**ख. खालील वाक्यांमधील शब्दयोगी पदांसाठी योग्य नाम किंवा क्रियापद निवडू या आणि रिकाम्या जागा भरू या. आवश्यक तिथे नामांचे आणि क्रियापदांचे सामान्यरूप होईल, त्याकडेही लक्ष देऊ या.**







उदा. मुलांच्या अभिव्यक्तीला वाव मिळावा यासाठी त्यांना चित्रावरून गोष्ट तयार करण्याचा सराव द्यावा.

अ. एका परदेशी टुरिस्ट ..................कडून काही जणांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी सायबर गुन्हे शाखेकडे आल्या आहेत.

आ. साहित्य क्षेत्रातल्या मोठ्या लेखकांच्या ..................खालून आपलं लिखाण जाईल या कल्पनेनं ती फार खूष झाली.

इ. ..................नंतर लगेच पाणी पिऊ नये.

ई. काही लोकांना टीका ..................व्यतिरिक्त दुसरे काही काम नसते.

उ. नुसत्या ऐकीव ..................वरून लगेच मत बनवू नये.

ऊ. शिक्षा म्हणून सर्व ..................समक्ष एखाद्याला फाशी देणे, हे आजही काही ठिकाणी घडते.

इ. पोटापाण्यासाठी नोकरी आणि ..................पुरती जागा मिळावी, एवढीच अपेक्षा आहे माझी.

ई. नुसतेच ..................ऐवजी कृतीवर भर द्यावा.

उ. तो अधिकारी जरा काळजीत पडला, कारण त्याच्या ..................विरुद्ध तो खोटी साक्ष देणार होता.

ऊ. ..................आधी एखादं पुस्तक वाचण्याची तिला सवयच आहे.

**ग. विद्यार्थ्यांच्या जोड्या करू या आणि पुढे दिलेल्या चित्रांच्या मदतीने एका काल्पनिक शहराचा नकाशा तयार करू या. नकाशा समजण्यासाठी नाम आणि शब्दयोगी पदे जोडून वाक्ये लिहू या आणि तो नकाशा वर्गासमोर समजावून सांगू या.**












(नदी, चर्च, बँक, किल्ला, बाग, दफनभूमी, मंदिर, थिएटर, मॉल, उंच इमारत, मेट्रो, दुकाने, झाडे, टेकड्या...)
(अलीकडे, ~~पलीकडे~~, आसपास, भोवती, पाशी, शेजारी, मागे, पुढे, मधून, आतून, बाहेरून, बाजूला, बाजूने...)

उदा. आमच्या शहरातून एक नदी वाहते. नदीपलीकडे दर रविवारी बाजार भरतो.

**घ. गाळलेल्या जागांमध्ये पैकी / ऐवजी लिहू या.**

असेही म्हणतात :
अरे वा! हे काम छानच केलंस तू. शाब्बास. तुला पैकीच्या पैकी मार्क!

अ. यंदा मी शाळेत हिंदी .................... संस्कृत घेतले आहे आणि मला १०० .................... ८५ मार्क मिळाले आहेत.

आ. या रेसिपीमध्ये साखरे .................... गूळ वापरून बघ. अगदी खमंग होते.

इ. समीरचे लग्न लांब बाहेरगावी झाले.
त्यामुळे त्याच्या नातेवाइकां .................... फार कोणी लग्नाला गेले नाही.

ई. त्या तिघा भावां .................... एक जण पायाने थोडासा अधू आहे.

उ. पंतप्रधान आजारी असल्याने चीनच्या शिष्टमंडळाचे स्वागत त्यांच्या .................... परराष्ट्रमंत्र्यांनी केले.



ऊ. आज पोळी .................... भाकरी खा. गव्हाचं पीठ नाहीये घरात.

ए. तुमच्या .................... कोणाला गाता येते का? त्यांनी या स्पर्धेत भाग घ्यावा.

ऐ. आज माझा घसा थोडासा खराब आहे. माझ्या .................... माझी मुलगी गाईल.

ओ. मोठ्या पिशव्यां .................... एकच राहिली आहे. बाकी सगळ्या विकल्या गेल्या आहेत.

## ६ धातुसाधिते, धातुसाधित विशेषणे

**क. खालील उतारा वाचू या आणि त्यातील धातुसाधिते अधोरेखित करू या. मग त्यांची पुढील तक्त्यात उदाहरणाप्रमाणे यादी तयार करू या.**

टीप :
धातुसाधित
(तो) वर्त॰ - ...णारा
भूत॰ - ...लेला



तो नेहमीसारखाच इच्छा नसताना कसाबसा उठला. खरे तर आयुष्य म्हणजे फक्त खाणे, पिणे आणि झोपणे, असेच त्याचे मत. पण काय करणार! शेवटी माणूस हा नोकरी करणारा असतो, शिवाय त्याला एक नेहमी रागावणारा बॉस असतो. म्हणून आयुष्याचा अर्थ आपल्याला वाटतो तिथे न शोधता शेवटी मन मारून, नशिबाला शिव्या देत देत सकाळी लवकर उठावेच लागते, नेहमीसारखे.

मग उशीर झाला आहे असे लक्षात येताच त्याने ऑफिसला जाण्याची घाई करायला सुरुवात केली. आरशात स्वतःला पाहताना त्याच्या काहीही लक्षात आलं नाही, परंतु बायकोने आठवण करून दिली, तेव्हा समजले की आज त्याचा चाळिसावा वाढदिवस आहे. वाढदिवस आहे म्हणून आज काही खास दिवस आहे असे त्याला मुळीच वाटले नाही. कारण येणारा प्रत्येक दिवस 'चला, कामाला लागा!' अशीच हाक देणारा. आणि आपण उगवत्या सूर्याचे गुलाम. त्याने सांगितलेले काम चोख पार पाडणारे. त्याला आपल्या वाढदिवशी स्वतःमध्ये असा कोणताही फरक जाणवला नाही. सगळे होते तसेच तर आहे! अपवाद फक्त आपल्याभोवती बदललेले जग.

| धातुसाधित | मूळ धातू | प्रत्यय |
|---|---|---|
| नसताना | नस | ताना |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

| धातुसाधित | मूळ धातू | प्रत्यय |
|---|---|---|
| खाणे | खा | णे |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**ख. खालील वाक्यांत कंसातील प्रत्ययांना योग्य धातू जोडून या आणि रिकाम्या जागा भरून या.**







उदा. “आज खूप धुकं आहे. धुकं असताना (अस + ताना) आवश्यक असेल तरच गाडी बाहेर काढ. नाही तर शक्य असल्यास (अस + ला / ली / ले + स) सरळ प्रवासाचा बेत पुढे ढकल.”

अ. “आधी खूप बेकायदेशीर कृत्ये केली आणि आता गोरगरिबांच्या मदतीसाठी त्याने एक स्वयंसेवी संस्था सुरू केलीये, म्हणे. .................... (.................... + ऊन) सवरून भागला अन् देवपूजेला लागला, तशातला प्रकार!”

आ. सागर बायकोच्या .................... (.................... + ला) फारच घाबरतो.

इ. .................... (.................... + ता) .................... (.................... + ता) त्या अंधाऱ्या खोलीत मृण्मयी आली, तेवढ्यात दिवे आले आणि पाहते तर काय, तिच्या मित्रांनी तिच्यासाठी एक सरप्राईज पार्टी ठेवली होती.

ई. फार धांदरट मुलगी आहे शिबा. .................... (.................... + त) टेबलावरच्या वस्तू पाडत असते!

उ. “मी ....................प्रमाणे (सांगितले + प्रमाणे) घर साफ केलंस का? साफ केल्यासारखं दिसत नाही, म्हणून विचारलं.”

ऊ. “तुझ्या मुलाला शिक्षक व्हायचंय ना, तर मग .................... (.................... + ऊ) देत की.”

ए. माझ्या मित्रांना माझे नेहमी उशिरा .................... (.................... + णे) असह्य झाले आहे.

ग. योग्य धातुसाधित विशेषण लिहू या.

| | | | |
|---|---|---|---|
|  | उदा. (उकडणे) अंडी<br>उकडलेली अंडी |  | उदा. कपडे (शिवणे) शिंपी<br>कपडे शिवणारा शिंपी |
|  | (उरणे) अन्न |  | (जळणे) सिगरेट |
|  | (रडणे) बाळ |  | (हसणे) मुलगी |
|  | (टाकणे) कचरा |  | (होणे) गजर |

७ क. चित्रांच्या मदतीने योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरू या.



**(आत / बाहेर)**

अ. घराची किल्ली ऋषी पुन्हा आतच विसरला. पण दार ------------------------ बंद झाल्यामुळे शेवटी तो खिडकीतून ------------------------ शिरला.



**(वर / खाली)**

आ. ------------------------ एका मुलीला ------------------------ पडताना दिसताच स्टीव्हने तिच्याकडे धाव घेतली आणि तिला झेलले.



(बाहेर)

इ. त्या कोठडीचं दार कुलूप लावून .................... बंद केलेलं होतं, पण त्या दाराला एक छोटीशी खिडकी होती, त्या खिडकीतून एक हात .................... काढलेला दिसे.



(समोर)

ई. "त्या दिवशी मी मरता मरता वाचलो. आम्ही आगगाडीच्या रुळावर खेळत होतो. नेमका माझा पाय रुळांमध्ये अडकला .................... एक आगगाडी भरधाव वेगाने येत होती आणि ती आमच्या .................... येऊन थांबली नं!"



(समोर / वर / खाली)

उ. "आयफेल टॉवरच्या अगदी .................... उभं राहून .................... .................... बघ कधी. निराळंच दिसतं!



(इथे / तिथे)

ऊ. "तुम्ही सांगताय तो रस्ता लांब वाटतोय. .................... .................... पोचायला साधारण किती वेळ लागेल मला? आणि .................... एखादी खूण सांगा ना मला, म्हणजे मला ते लवकर सापडेल."

**ख. योग्य प्रतिक्रिया देऊ या. दिलेल्या प्रसंगानुसार अनौप. भाषा वापरून वर्गासमोर उत्स्फूर्त संवाद करू या.**

अ. तुम्ही पहिल्यांदाच विमानप्रवास करत आहात. तुम्ही खिडकीजवळचे तिकीट घेतले आहे. परंतु तुमच्या जागी दुसरेच कोणीतरी बसले आहे.

आ. नोकरीचा कंटाळा आला म्हणून तुमच्या मैत्रिणीने वर्षभरासाठी नोकरी सोडली आहे. परंतु आता तिला काही काम नसल्यामुळे पुन्हा कंटाळा येऊ लागला आहे.

इ. तुमचे सर्व पाहुणे घरी गेले, परंतु एक पाहुणा अजून थांबला आहे. तुम्ही खूप दमला आहात आणि तो काहीतरी खायला मागतोय.

ई. तुम्ही रस्त्यात एखाद्या माणसाला भेटता, तुम्ही त्याला ओळखता, पण तुम्हाला त्याचं नाव-गाव आठवत नाहीये.

## ८ भाववाचक नामे

**क. चित्रांमधील व्यक्तींसाठी योग्य विशेषणे निवडू या. ह्या विशेषणांची भाववाचक नामे लिंगासहित लिहू या.**

उदा. क. कल्पक – ती कल्पकता



**विशेषणे:**
कल्पक, दयाळू, हुशार, गोड, उदार, श्रीमंत




**ख. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरू या. अनेक उत्तरे शक्य.**

उदा. **(एवढं / तेवढं) (इतकं / तितकं) (केवढं / किती)**

केवढी / किती गंभीर आहे नाही तुझी मैत्रीण? तिला सांग, एवढं / इतकं गंभीर नसावं.

अ. **(असला / तसला) (असा / तसा) (अशा / तशा)**

माझे बाबा खूप दयाळू आहेत. गरीब, वंचित .................. सर्व लोकांना ते जमेल .................. मदत करतात. .................. दयाळूपणा माझ्यात मात्र नाही.

आ. **(असला / केवढी / एवढी / असली)**

.................. मोठी सोसायटी बांधून ठेवलीये, पण पार्किंगची सोयच नाही. .................. सोसायटी काय कामाची?

इ. **(किती / एवढं / इतकं / केवढं)**

.................. गोड गातेस गं! .................. छान गायला कुठे शिकलीस?

ई. **(कसले / असले / कसे / असे)**

"त्यांना गरज असते तेव्हा निर्लज्जपणे मदत मागतात, पण तुम्हाला काही हवं असेल तर .................. साफ नकार देतात! .................. .................. मित्र तुमचे?

**ग. उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करू या आणि वर्गात एकत्र वाचू या.**

उदा. जेवढी तू प्रामाणिक आहेस ना, तेवढीच तू गंभीर आहेस. (जितका...)
जितका तुझ्यात प्रामाणिकपणा आहे ना, तितकाच तुझ्यात गंभीरपणाही आहे.

अ. जो कल्पक असेल, त्यानेच हे काम करावे. (ज्याच्याकडे...)

आ. ज्याला ही गोष्ट गंभीर वाटते, त्याने तिच्या विरोधात काही तरी करावे. (ज्याला ह्या गोष्टीचे...)

इ. जितका तू समजूतदार आहेस, तितकाच तू उदार आहेस. (जितका...)

ई. जो इतका दयाळू आहे, तो हे नक्कीच समजून घेईल. (ज्याच्या अंगी...)

उ. जी हुशार आहे, तिला हे गणित नक्की सोडवता येईल. (जिच्या अंगी...)

## ९ प्रयोजक क्रियापद

**क. चित्रे आणि क्रियापदे यांच्या जोड्यांची अदलाबदल झाली आहे. चित्रे आणि क्रियापदांच्या योग्य जोड्या जुळवू या.**


अ. चढणे


आ. शिकवणे


इ. उडणे


ई. समजावणे


उ. चढवणे


ऊ. उडवणे


ए. शिकणे


ऐ. समजणे

उदा. क. – चढवणे

## १० शक्य क्रियापद

**क. शक्य क्रियापदांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करू या.**

| | |
|---|---|
| धातू + व + णे | (चांगले, राहणे, करणे, बोलणे, वाकणे, चढणे, ऐकणे)<br>उदा. (चालवणे) चालवते / चालवतं, चालवत नाही |
| (एकाक्षरी) धातू + वव + णे | (खाणे, नेणे, घेणे, येणे, जाणे, पिणे)<br>उदा. (खाववणे) खाववते / खाववतं, खाववत नाही |

**टीप :**
प्रयोजक क्रियापद : मला आई सकाळी पाच वाजता उठवते.
शक्य क्रियापद : पण मला थंडीत उठवत नाही.

**ख. चित्रांच्या मदतीने शक्य क्रियापद वापरून उदाहरणाप्रमाणे वाक्य लिहू या.**



उदा. ती – घसा दुखणे – बोलता न येणे
तिचा घसा इतका दुखतोय, की तिला बोलवत नाहीये.



अ. ते – म्हातारे होणे – जिना चढता न येणे



आ. त्या – गुडघे दुखणे – खाली बसता न येणे



इ. तो – हात दुखणे – सामान उचलता न येणे



ई. ते – वय होणे – चालता न येणे



उ. ती – औषध कडू लागणे – ते पिता न येणे

## ११ क्रियापद-नामाची षष्ठी

**क. क्रियापद-नामाच्या षष्ठीचे रूप कोणते? चुकीचे पर्याय अधोरेखित करू या.**

उदा॰ नाटकाची आवड, अभिनयाची आवड, फिरण्याची आवड

अ. बोलण्याचे तंत्र, लिहिण्याचे तंत्र, दिग्दर्शनाचे तंत्र

आ. कामाचा व्याप, राजकारणाचा व्याप, आठवण्याचा व्याप

इ. अभ्यासाची पद्धत, करण्याची पद्धत, संशोधनाची पद्धत

ई. प्रवासाची हौस, शिकण्याची हौस, गाण्याची हौस

उ. जगण्याचा कंटाळा, व्यायामाचा कंटाळा, स्वच्छतेचा कंटाळा

ऊ. जिंकण्याची सवय, एकटेपणाची सवय, बसप्रवासाची सवय

**ख. पातळी ४ च्या वर्गाकडून तुमच्या कोणत्या अपेक्षा आहेत? क्रियापद-नामाच्या षष्ठीचे रूप वापरून वाक्ये लिहू या. कंसातील नामांची मदत घेऊ या.**

(गरज, अपेक्षा, व्याप, आवश्यकता, सराव, पद्धत, कंटाळा, सवय, हौस, तंत्र)

उदा॰ मला लिहिण्याची जास्त गरज वाटते.
मला उतारे वाचण्याचा कंटाळा येतो.
बोलण्याचा जास्तीत जास्त सराव झाला पाहिजे.

# १ चित्रपट



## चला, शिकू या...

- चित्रपट ह्या विषयावर बोलणे, वाचणे, लिहिणे
- चित्रपट परीक्षणे वाचणे, लिहिणे
- चित्रपटाविषयी अभिप्राय देणे
- संयुक्त क्रियापदे

## १ चित्रपटक्षेत्र

क. आठवतं तेव्हापासूनच मला दुसरं कुणी तरी असायला आवडत असे. म्हणजे मी जशी आहे तशी आणि तेवढीच असणं मला पुरेसं वाटत नसे. सकाळी झोपेतून उठले, की 'आज मी मुंगी आहे' किंवा 'मी आज पेरू आहे', असं मी जाहीर करत असे. मग मला कंटाळा येईपर्यंत घरातल्या सगळ्यांना माझ्याशी त्यानुसार वागावं लागे. एक दिवस मी तबला होते. आता मात्र माझा भाऊ वैतागला. त्यानं मला पालथं पाडलं आणि माझे कुल्ले लाल होईपर्यंत त्यांच्यावर सगळे ताल वाजवले. मी खदाखदा हसत होते.

ख. मी खूप वाचतो. आसपास घडणाऱ्या गोष्टींचं निरीक्षण करतो. एखादी साधीशी घटना किंवा वाचलेला प्रसंग मी नकळत माझ्या पद्धतीनं पुन्हा माझ्या मनात घडवतो. त्यातल्या माणसांना वेगवेगळ्या पद्धतींनी वागायला, बोलायला, चालायला लावतो; त्याचं नेपथ्यही हवं तसं रचतो... असं डोक्यात सतत चालू राहतं. मला वाटतं, माझ्या कामात त्याची मदत होते.



ग. चित्रपटाच्या भाषेत ज्याला 'तिसरा डोळा' म्हणतात, त्या तिसऱ्या डोळ्यानं पाहणं हे माझं काम आहे. हा डोळा यांत्रिक आहे. तो जे आणि जसं पाहतो तेच प्रेक्षकाला दिसतं किंवा पाहावं लागतं. तो डोळा काय पाहील, कसं आणि कुठून पाहील, त्यात छायाप्रकाशाचा उपयोग कसा असेल वगैरे सगळं मी ठरवतो.

घ. समजा, एखाद्या प्रसिद्ध कथेवर किंवा कादंबरीवर आधारित चित्रपट करायचा असेल, तर ती कथा किंवा कादंबरी जशीच्या तशी वापरता येत नाही. चित्रपटासाठी योग्य ठरेल अशा प्रकारे तिची पुन्हा रचना करावी लागते. काही भाग वगळावा लागतो, काही भागाचा विस्तार करावा लागतो, शब्दांची भाषा प्रतिमांच्या भाषेत बदलून घ्यावी लागते. वाटतं तितकं माझं हे काम सोपं नसतं.

च. शेवटी, चित्रपट ही कला असली तरी तिचाही बाजाराशी संबंध असतोच. इतर कलांपेक्षा खूप जास्त, कारण तिच्यात खूप जास्त पैसे गुंतवावे लागतात. चित्रपट चांगला व्हायला हवा, कलाकारांना आपल्या मनासारखं काम करता यायला हवं, धोका पत्करण्याची तयारी मी ठेवायला हवी हे सगळं खरं; पण गुंतवलेले पैसेही परत मिळवायला हवेत. त्यामुळे कला आणि बाजार ह्या दोन्ही गोष्टींना योग्य ते महत्त्व देताना मला बरीच कसरत करावी लागते.

**क. वरील व्यक्तींची स्वगते वाचून त्यांचे व्यवसाय ओळखू या.**

अ. दिग्दर्शक आ. चित्रपट निर्माता इ. अभिनेत्री ई. छायाचित्रकार उ. पटकथाकार

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**ख. या स्वगतांमध्ये खालील माहिती मिळते का ते शोधू या.**

| | व्यवसाय | कामाचे स्वरूप | कामातील अडचणी |
|---|---|---|---|
| अ. | | उदा॰ 'तिसऱ्या डोळयानं' पाहणं | |
| आ. | | | |
| इ. | | | |
| ई. | | | |
| उ. | | | |



**ग. चित्रपटक्षेत्रातील कोणत्या विभागात काम करायला तुम्हाला आवडेल? त्याचे कारण लिहू या. त्या व्यवसायातील कामाचे स्वरूप व त्यातील अडचणींबद्दल लिहू या व बोलू या.**

उदा॰ मला अभिनेता व्हायला आवडेल, कारण ...

एका अभिनेत्याला ... करावं लागतं ...

त्याला ... करता येत नाही ... / तो ... करू शकत नाही.

**घ. खालील प्रश्नांच्या मदतीने आपापली टिपणे लिहून आणि मग वर्गात सर्व जण एकत्र येऊन चर्चा करू या.**



अ. तुमच्यासाठी 'चित्रपट' म्हणजे काय?

आ. चित्रपट तयार करण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक असतात?

इ. कोणत्या गोष्टींशिवाय चित्रपट असू शकत नाही असे तुम्हाला वाटते?

**कथा, चित्रपटगृह, पडदा, ध्वनी, अभिनेते, छायाचित्रण, संगीत, दृश्य, पार्श्वसंगीत, गाणी, संवाद, खेळ, कॅमेरा, प्रेम, प्रकाशयोजना, मानवी नातेसंबंध, नृत्य, पटकथा, अवकाश, रंग, गती, ॲक्शन, थरार, रहस्य, विनोद, दुःख**

**च. चित्रपट निर्मितिप्रक्रियेशी संबंधित काही मराठी शब्द आणि त्यांतील काही शब्दांचे वापरात असलेले इंग्रजी प्रतिशब्द खाली दिले आहेत. मराठी व इंग्रजी शब्दांच्या योग्य जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. छायाचित्रण | १. इमेज |
| आ. कृष्णधवल | २. कम्युनिकेशन |
| इ. प्रतिमा | ३. फोटोग्राफी |
| ई. संज्ञापन | ४. क्लोजअप |
| उ. भिंग | ५. ब्लॅक अँड व्हाईट |
| ऊ. समीपदृश्य | ६. प्रोड्यूसर |
| ए. संकलन / दृश्यसंकलन | ७. एडिटिंग |
| ऐ. निर्माता | ८. लेन्स |

उदा॰ अ. – ३. ...

| | |
|---|---|
| अ. विस्तृतकोन भिंग | १. सीन |
| आ. कोन | २. थीम |
| इ. दृश्य / प्रसंग | ३. अँगल |
| ई. स्थिर छायाचित्रण | ४. स्टिल फोटोग्राफी |
| उ. चलच्चित्रण | ५. वाइड अँगल लेन्स |
| ऊ. दिग्दर्शक | ६. स्क्रिप्ट |
| ए. आशयसूत्र | ७. मोशन फोटोग्राफी |
| ऐ. संहिता | ८. डिरेक्टर |

| | |
|---|---|
| अ. कथा | १. सायलेंट मूव्ही |
| आ. चलच्चित्र | २. फिल्म प्रॉडक्शन |
| इ. बोलपट | ३. स्टोरी |
| ई. मूकपट | ४. फिल्म स्क्रिप्ट |
| उ. चित्रनिर्मिती | ५. टॉकी |
| ऊ. दृश्य चमत्कृती | ६. स्क्रिप्ट रायटर |
| ए. पटकथा | ७. मूव्ही |
| ऐ. पटकथाकार / संहिताकार | ८. स्पेशल इफेक्ट्स |

| | |
|---|---|
| अ. छेद | १. डिस्ट्रिब्यूटर |
| आ. दूरदृश्य | २. सेट |
| इ. वितरक | ३. साऊंड डिझाईन |
| ई. ध्वनिसंकल्पन | ४. कट |
| उ. नेपथ्य | ५. शूटिंग |
| ऊ. चित्रीकरण / चित्रण | ६. लाँग शॉट |
| ए. उपशीर्षक | ७. स्लो मोशन |
| ऐ. मंदगती | ८. सबटायटल |



### करा आणि शिका

छ. 'लिटल हँड्स' नावाचा एक लघुपट पाहू या.



अ. चार ते पाच विद्यार्थ्यांचा गट करू या. लघुपटातील प्रसंगांचे सविस्तर वर्णन लिहू या.
आ. विद्यार्थ्यांचे दोन गट करून या लघुपटात दाखवलेल्या प्रसंगाच्या बाजूने किंवा त्याविरुद्ध भूमिका घेऊन वादविवाद करू या.

**ज. दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करून खालीलपैकी एक उद्धरण वाचू या. पुढे दिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधून ती वर्गासमोर मांडू या.**

'चित्रपटकला ही राष्ट्राच्या दृष्टीने फार उपयुक्त कला आहे. लोकजागृतीच्या कार्यात हिचा उपयोग फार मोठ्या प्रमाणात करून घेता येईल. तुम्ही जालियनवालाबाग हत्याकांडाचे चित्र (चित्रपट) काढा. त्यात काम करण्यासाठी ओडवायरसाहेबासारखा दिसणारा एखादा इसम मात्र शोधला पाहिजे. लोकजागृतीच्या दृष्टीने आमच्या शेकडो व्याख्यानांपेक्षा व लेखांपेक्षा चित्रपटाचे साधन किती तरी पटींनी अधिक प्रभावी आहे.' **– लोकमान्य बाळ गंगाधर टिळक**

'हे एवढेसे, किरकिरणारे हँडलवाले यंत्र लेखकांच्या आयुष्यात क्रांती घडवून आणणार आहे. साहित्यकलेच्या जुन्यापुराण्या तंत्रावरचा हा एक थेट आघात आहे. सावल्यांचा खेळ दाखवणाऱ्या ह्या पडद्याशी आम्हाला जुळवून घ्यावेच लागेल. एका नवीन प्रकारच्या लेखनाची आता आवश्यकता भासेल.' **– ल्योव तलस्तोय**

'प्रतिमांचा प्रवाह हा चित्रपटाचा मुख्य घटक आहे. हे माध्यम शब्दांवर अवलंबून राहू नये अशा प्रकारे त्याचे सौंदर्य आणि भव्यता सादर झाली पाहिजे.' **– रवीन्द्रनाथ टागोर**

'गांधीजींना चित्रपटात जेवढा रस आहे तेवढाच मला राजकारणात आहे. ते सिनेमा बघत नाहीत, मी वृत्तपत्र वाचत नाही. खरं म्हणजे आम्ही दोघंही चूक करतो आहोत. त्यांनी सिनेमा अवश्य पाहिला पाहिजे आणि मी वृत्तपत्र अवश्य वाचलं पाहिजे.' **– सादत हसन मंटो**

'चित्रपट म्हणजे चित्र, चित्रपट म्हणजे शब्द, चित्रपट म्हणजे गतिमानता, चित्रपट म्हणजे नाट्य, चित्रपट म्हणजे संगीत, चित्रपट म्हणजे कथा, चित्रपट म्हणजे हजारो भावमय आणि दृश्य तपशील.' **– सत्यजित राय**

'ज्याप्रमाणे साहित्य, संगीत आणि चित्र ह्या कलांनी अनेक शतकांपासून जटिल मानवी समस्यांचा शोध घेतला, त्याप्रमाणे सिनेमानेही घ्यावा आणि ते सतत नवनवीन वाटा शोधण्याचे साधन व्हावे.' **– आंद्रे तर्कोवस्की**

**तुम्ही वाचलेल्या उद्धरणांत...**

**अ.** चित्रपटाची व्याख्या काय सांगितली आहे? **आ.** चित्रपटाची कोणती वैशिष्ट्ये मांडली आहेत? **इ.** चित्रपट या माध्यमामुळे त्या काळात झालेले कोणते बदल लक्षात येतात? **ई.** चित्रपट या माध्यमाने समाजात कोणती भूमिका बजावली पाहिजे असे सांगितले आहे? **उ.** चित्रपट या माध्यमाचा इतर कलांवर कोणता परिणाम होतो असं म्हटलं आहे? **ऊ.** आपण वाचलेल्या उद्धरणांमधील एक उद्धरण निवडू या व त्याबद्दल आपापले मत मांडू या.



'ज्याप्रमाणे सकाळी उठल्यावर दात घासण्याला पर्याय नसतो, त्याप्रमाणे भारतात चित्रपटालाही पर्याय नसतो.' – शाहरूख खान

**इ. खालील उतारा वाचू या आणि त्याला योग्य शीर्षक देऊ या.**

---

चित्रपट आणि भारतीय प्रेक्षक किंवा एकंदर भारतीय समाज ह्यांच्यातील नाते, ह्या विषयावर जेव्हा चर्चा होते, तेव्हा मला माझ्या आईची आठवण होते. ती आणि चित्रपट ह्यांच्यातले नाते नेहमीच मजेशीर होते; धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशा प्रकारचे.

आईचा जन्म एका लहान शहरात झाला. जन्मापासून मुक्यानेच पब्लिकचे मनोरंजन करणाऱ्या भारतीय चित्रपटाने आणि माझ्या आईने एकाच वर्षी 'ट्याहाँऽऽ' केले. यथावकाश आई बोबडे शब्द बोलू लागली. चित्रपट मात्र त्यापूर्वीच तुफान बडबड करू लागला होता आणि त्याहीपेक्षा तुफान गात सुटला होता. लहानपणी आईला चित्रपट पाहायला मिळाले किंवा नाही ते माहीत नाही; पण चित्रपटगीते नक्कीच तिच्या कानावर पडत होती. एका बेसावध क्षणी 'रतन सिनेमातली गाणी छान होती', असे ती म्हणाल्याचे मला आठवते.

मॅट्रिकच्या* परीक्षेचा निकाल लागण्याआधीच तिचे लग्न झाले आणि ती पुण्याला आली. पुण्यात तिने चित्रपट पाहिले हे नक्की, कारण माझ्या आयुष्यातला पहिला चित्रपट मी तिच्याच मांडीवर बसून पाहिला. अधूनमधून बाबा आणि ती हॉलीवूडचे अमेरिकन किंवा कँपात* क्वचित रविवारी सकाळी दाखवले जाणारे बंगाली चित्रपट पाहायला जात असत; पण जाताना आईवर अपराधीपणाचे एक चमत्कारिक दडपण असे. 'आपल्यासारख्या' लोकांनी जे करायचे नसते असे काहीतरी आपण करत आहोत, ह्या विचाराचे ते दडपण असे. त्यामुळे चित्रपट पाहणे आवडत असूनही आई ते मान्य करत नव्हती. बाबांना चित्रपटाचे वेड वगैरे नव्हते, पण पाहिलेल्या चित्रपटाबद्दल ते बोलत, आम्हाला गोष्ट सांगत, आमच्या प्रश्नांना उत्तरे देत. त्यांना मध्येच थांबवून आई म्हणे, "पुरे झालं आता. दुसरे विषय नाहीत का मुलांशी बोलायला?" आमचा अगदी हिरमोड होई. चित्रपट – विशेषतः भारतीय चित्रपट – हा गांभीर्याने चर्चा करण्याच्या लायकीचा विषयच नाही, असे ती स्वतःला हट्टाने बजावत होती. तशी तिला वाचनाची, संगीताची आवड होती. ती अरसिक नक्कीच नव्हती. मग चित्रपटाबद्दल तिच्या मनात असलेली अढी कशामुळे होती, हे आम्हाला तेव्हा कळत नव्हते. आमच्यासाठी चित्रपट हा जगण्याचा स्वाभाविक आणि अविभाज्य भाग होता.

घरी एखाद्या निमित्ताने पाहुणे किंवा नातेवाईक जमले, की एक दिवस चित्रपट पाहायला जाण्याचा कार्यक्रम असे. आजीसकट सर्व जण त्यात उत्साहाने सामील होत. आम्हा मुलांना पाहुणे एवढ्या एकाच कारणासाठी आवडत. अनेकदा आई मात्र काही ना काही कारण सांगून घरीच थांबत असे. चित्रपट पाहण्याचा मोह निग्रहाने टाळणारी आदर्श सून, आदर्श आई, आदर्श गृहिणी. स्वतः चित्रपट पाहण्याची एकही संधी न सोडणारे लोक तिचे मात्र कौतुक करत.

मी आणि माझी धाकटी बहीण मोठ्या शाळेत जायला लागलो. तोपर्यंत आईनेही आपले पुढचे शिक्षण पूर्ण केले होते. तिला शिक्षिकेची नोकरी मिळाली आणि 'आदर्श शिक्षिका' ह्या नव्या भूमिकेत ती शिरली. शिरली म्हणजे ती भूमिका पार नाकातोंडात जाईल इतकी त्यात

बुडाली. 'लोक काय म्हणतील?... शाळेत मुलांना कळलं तर?... इतर शिक्षक माझ्या पाठीमागे नावं ठेवतील', असे विचार मनाच्या कोपऱ्यात सतत वळवळत असल्यामुळे मोकळ्या मनाने काही करणे तिला जमेनासेच झाले. बाबांच्या कामाचाही व्याप वाढला होता, पण अधूनमधून एखादा चित्रपट पाहण्याची त्यांना हुक्की येई. आई त्यांना 'नाही' म्हणू शकत नसे, पण तयार होऊन निघायची वेळ झाली, की तिला घरातले एखादे काम आठवे, किंवा एखादा फोन आत्ताच करायला हवा अशी जाणीव होई. "झाला थोडा उशीर तर काय बिघडणार आहे हो? सिनेमा म्हटलं की जिवाची एवढी कसली उलघाल होते!" असा तिचा युक्तिवाद असे. तिच्या दृष्टीने चित्रपटाला वेळेवर जाणे, तो सुरुवातीपासून शेवटपर्यंत लक्षपूर्वक पाहणे म्हणजे तुच्छ आणि उथळ मनोरंजनाला नको तेवढे महत्त्व देणे होते.

अखेर बाबांनी तिचा नादच सोडला. त्यांच्या मनात आले, की ते कधी मित्रांबरोबर तर कधी एकटेच चित्रपट बघून येत. आम्ही मुले मोठी होत होतो. आमचे मार्ग स्वतःच शोधायला शिकत होतो. आईचा नाद तर आम्ही कधीचाच सोडला होता. आईला हे कळत नव्हते असे नाही. ती हट्टी होती, बुद्दू नव्हती. ज्या समाजाचे दडपण घेऊन तिने स्वतःभोवती एक भिंत उभी केली होती, तो समाज काळाबरोबर बदलत होता आणि चित्रपटही बदलत होता. एके काळी आईच्या पिढीचा त्याला धाक होता. आता त्यानेही तो धाक झुगारून त्या पिढीचा नाद सोडला होता आणि सर्व वयाच्या भारतीयांचे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन सर्व बाजूंनी वेढून टाकले होते. त्यात आईचे काय होत होते हे बघण्याची सवडच आमच्याकडे नव्हती. आज मागे वळून पाहताना लक्षात येते, की चित्रपटाच्या जबरदस्त सामर्थ्याची आमच्यापैकी कोणालाही नव्हती अशी जाणीव तिला होती. त्या सामर्थ्याचाच तिने धसका घेतला होता.

अशी वर्षांमागून वर्षे सरली. आजी कधीच गेली. दोन वर्षांपूर्वी बाबा गेले. आईने आता पंचाहत्तरी ओलांडली आहे. ती माझ्या बहिणीकडे असते. मी परदेशी असतो. बाबा गेले तेव्हा धावतपळत आलो होतो, त्यानंतर एकदम गेल्या आठवड्यातच काही दिवस राहण्याच्या तयारीने आलो. विमानतळावरून थेट बहिणीकडे गेलो.

"कशी आहे आई?"

"छान आहे. तिच्या खोलीत टीव्ही बघतेय."

"वा! जाऊ ना?"

"जा की! पण सांभाळून..."

"का? मला बघून तिला धक्का बसेल म्हणून?"

"अं हं! तिला बघून तुलाच धक्का बसेल म्हणून," बहीण गालात हसत म्हणाली.



मी आईच्या खोलीच्या दरवाजातून हळूच डोकावून पाहिलं. आईनं कानांना हेडफोन लावला होता आणि पायानं हलके हलके ताल देत ती टीव्हीकडे एकटक पाहत होती. पडद्यावर सनी लिओनेचा झिंगाट आयटम डान्स चालू होता.

***मॅट्रिक :** जुनी शालान्त परीक्षा. सध्या तिला 'एस.एस.सी.ई.' असेही म्हणतात.

***कँप :** पुण्यात ब्रिटिशांनी वसवलेली कॅन्टोन्मेंट ऊर्फ कँप अशी पेठ आजही आहे. तिथे मुख्यतः इंग्रजी / अमेरिकन चित्रपट दाखवणारी चित्रगृहे होती. साठच्या दशकांत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेले भारतीय चित्रपटही तिथे क्वचित दाखवले जात.

**अ. पुढे दिलेल्या अर्थांचे शब्द किंवा वाक्प्रचार उताऱ्यामध्ये आहेत, ते शोधू या आणि रिकाम्या जागेत लिहू या. माहीत असलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्दही लिहू या.**

उदा॰ जन्मानंतरचे बाळाचे पहिले रडणे = ट्याहाँऽऽ करणे

योग्य वेळी; काही काळानंतर = यथावकाश ≠ घाईघाईने, त्वरित, ताबडतोब, तत्काळ

**१.** लहान बाळ अगदी सुरुवातीला जसे बोलते तसे **२.** स्वतःच्या नकळत, भान विसरून **३.** आपण चूक केल्याची बोचणारी भावना किंवा जाणीव **४.** निराशा होई **५.** गंभीरपणे, विचार करून **६.** लक्षात राहावे म्हणून ठासून पुन्हा पुन्हा सांगत होती **७.** वेगळे काढता येत नाही असे **८.** पसारा **९.** तीव्र इच्छा **१०.** बेचैनी, अस्वस्थता **११.** स्वतःचे म्हणणे पटवून देण्यासाठी मांडलेला मुद्दा **१२.** ज्यातून निसटून / सुटून जाता येणार नाही अशा प्रकारे सर्व बाजूंनी घेरले होते **१३.** भीती, धास्ती **१४.** भान विसरून केलेला; बेभान **१५.** एखाद्या गोष्टीचा आग्रह धरण्याचे किंवा तिच्या मागे लागण्याचे थांबवणे. **१६.** इतर कशाचाही विचार मनात येऊ नये इतके एखाद्या गोष्टीत गुंतणे.

**आ. पुढील उताऱ्यात अधोरेखित केलेल्या शब्दांच्याच अर्थाचे वेगळे शब्द रिकाम्या जागेत भरू या. हे शब्द तुम्हाला वरील उताऱ्यात सापडतील.**



वसुधाताई नव्या सुनेला सांगत होत्या, "लहानपणापासून मी ऐकलं होतं, की जन्माला आल्यावर मूल पहिल्यांदा .................... असा आवाज काढून रडतं. ते म्हणे ओरडून 'मी आलोय!' असं जगाला सांगत असतं. ते ऐकायची मला फार उत्सुकता होती. माझ्या पहिल्या बाळंतपणाचा दबाव / .................... माझ्यापेक्षा घरातल्या इतरांवरच जास्त होतं. त्यांना मुलगीच हवी होती. त्यासाठी सोनोग्राफी वगैरे करायला मी हट्टानं / .................... नकार दिला होता. "मुलगाच आहे असं कळलं, तर तुम्हाला धक्का बसेल; आणि त्यामुळे माझ्या तब्येतीवर परिणाम झाला, तर?" हे माझं म्हणणं / .................... .................... .................... ऐकून ते गप्प झाले; पण दवाखान्यात सासूबाईंचा जीव घाबराघुबरा झाला होता / .................... .......... .................... ..................... मग जन्माला आला तो तुझा नवरा. रडला नाहीच, उलट तोंड पसरून हसला. माझी अगदी निराशा झाली / .................... .......... .................... .................... .................... . तिकडे घरातल्या मुलग्यांना कंटाळलेल्या सासूबाईही नाराज झाल्या. अजूनही त्यांच्या मनात माझ्याबद्दल राग / .................... आहे."

**इ. उताऱ्यानुसार चूक (✗) की बरोबर (✓) ते लिहू या.**

१. माझी आई आणि चित्रपट ह्यांच्यामध्ये नातेच नव्हते. (✗)

२. मुंबईसारख्या महानगरात आईचा जन्म झाला.

३. आईला लहान वयात चित्रपट पाहायला मिळाले की नाही ते मला सांगता येणार नाही.

४. लग्न झाल्यानंतर ती पुण्याला आली.

५. आईला चित्रपट पाहण्याची आवड होती, पण बाबांनी तिला कधीही चित्रपट पाहायला नेले नाही.

६. चित्रपटाबद्दल गंभीर चर्चा करता येते हे तिला पटतच नव्हते.
७. आईमुळे आमच्याही मनात चित्रपटाबद्दल नावड निर्माण झाली.
८. आपण आदर्श सून, आदर्श आई, आदर्श गृहिणी आहोत हे तिला सर्वांना दाखवायचे असे.
९. मॅट्रिकनंतरचे शिक्षण आईने लग्नानंतर पूर्ण केले.
१०. 'लोक काय म्हणतील?' हा विचार आईने कधीच केला नाही.
११. बाबांना कधी कधी चित्रपट पाहण्याची इच्छा होत असे.
१२. चित्रपट अगदी सुरुवातीपासून पाहिला पाहिजे असा आईचा आग्रह असे.
१३. ज्याचे दडपण आईने घेतले होते तो समाज बदलत होता, पण त्याबरोबर चित्रपट मात्र बदलत नव्हता.
१४. जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर आपला प्रभाव टाकणाऱ्या चित्रपटाच्या ताकदीमुळे आई घाबरून गेली होती.
१५. अखेर आईलाही चित्रपटाच्या प्रभावाला शरण जावे लागलेच.



**ई. अर्थ न बदलता एखादे वाक्य वेगळ्या पद्धतीने लिहायचे असेल, तर त्यात किती प्रकारे बदल करता येतात ते पाहू या.**

**जन्मापासून मुक्यानेच पब्लिकचे मनोरंजन करणाऱ्या भारतीय चित्रपटाने आणि माझ्या आईने एकाच वर्षी 'ट्याहाँऽऽ' केले.**

| समानार्थी शब्द | | समानार्थी शब्द | |
|---|---|---|---|
| मुक्याने | न बोलता / आवाज न करता | पब्लिक | प्रेक्षक / रसिक |
| मनोरंजन | करमणूक | 'ट्याहाँऽऽ' करणे | बाळाने पहिल्यांदा रडणे |

उदा. **जन्मापासून न बोलता प्रेक्षकांची करमणूक करणाऱ्या भारतीय चित्रपटाने आणि माझ्या आईने एकाच वर्षी तोंडातून आवाज काढला.**

**उ. पुढील वाक्यांचे अर्थ कायम ठेवून त्यांतील शब्द, वाक्प्रचार इ.च्या जागी समानार्थी शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.**

उदा. यथावकाश आई बोबडे शब्द बोलू लागली. चित्रपट मात्र त्यापूर्वीच तुफान बडबड करू लागला होता आणि त्याहीपेक्षा तुफान गात सुटला होता.

काही काळानंतर आई बोबडे शब्द बोलू लागली. चित्रपटात मात्र त्यापूर्वीच प्रचंड प्रमाणात संवाद आणि त्याहीपेक्षा खूप जास्त गाणी ऐकू येऊ लागली होती.

१. चित्रपट – विशेषतः भारतीय चित्रपट – हा गांभीर्याने चर्चा करण्याच्या लायकीचा विषयच नाही, असे ती स्वतःला हट्टाने बजावत होती.
२. शिरली म्हणजे ती भूमिका पार नाकातोंडात जाईल इतकी त्यात बुडाली.



३. तिच्या दृष्टीने चित्रपटाला वेळेवर जाणे, तो सुरुवातीपासून शेवटपर्यंत लक्षपूर्वक पाहणे म्हणजे तुच्छ आणि उथळ मनोरंजनाला नको तेवढे महत्त्व देणे होते.

४. एके काळी आईच्या पिढीचा त्याला धाक होता. आता त्यानेही तो धाक झुगारून त्या पिढीचा नाद सोडला होता आणि सर्व वयाच्या भारतीयांचे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन सर्व बाजूंनी वेढून टाकले होते.

**ऊ. उतारा पुन्हा एकदा नीट वाचून पुढील प्रश्नांची उत्तरे त्यात मिळतात का ते पाहू या.**

१. 'एखादी गोष्ट केली तर त्रास होतो, पण नाही केली तर नुकसानही होते' अशा अर्थाची म्हण उताऱ्यात आहे का?

२. आईचा जन्म किती साली झाला?

३. लहानपणी आईला कोणत्या चित्रपटातली गाणी विशेष आवडली होती?

४. 'आईला चित्रपट आवडत असूनही ती ते मान्य करत नव्हती', असे लेखकाने म्हटले आहे, त्यामागे कोणते कारण असेल?

५. चित्रपटाला वेळेवर न जाण्यामागे आईचा तुमच्या मते कोणता विचार होता?

६. लेखक आणि त्याची बहीण 'स्वतःचे मार्ग स्वतःच शोधत होते' म्हणजे नक्की काय करत होते? कल्पना करून लिहू या.

७. धसका घेण्याइतके सामर्थ्य चित्रपटकलेत खरेच आहे का? आपले मत मांडू या.

८. लेखाचा शेवट तुम्हाला पटतो का? कारणे देऊन स्पष्ट करू या.

**ए. पुढे दिलेले शब्द, वाक्प्रचार इ॰ वापरून वाक्ये पूर्ण करा.**

नाकातोंडात जाणे, धसका घेणे, धाक असणे, उथळ, वेढून टाकणे, झुगारणे,
नाद सोडणे, धरले तर चावते आणि सोडले तर पळते, हुक्की येणे



१. बऱ्याच दिवसांनी हाताने पत्र लिहिण्याची मला ........................ ........................, म्हणून तुला लिहीत आहे.

२. इथे नदीचे पात्र ........................ आहे, त्यामुळे आरामात चालत ते ओलांडता येईल.

३. अपघात झाल्यापासून बाबांनी वाहन चालवण्याचा ........................ ........................ आहे.

४. विजू आणि निखिलशी मैत्री करण्याचा मी प्रयत्न केला, पण ते मला टाळतात हे लक्षात आल्यावर त्यांचा ........................ ........................ .



५. तुषारला आईचा फार ........................ ........................ तो ........................ अकिराशी लग्न करण्याची हिंमत त्याच्यात नव्हती.

६. त्या हिरव्यागार टेकडीला नव्या बांधकामांनी सगळीकडून ........................ ........................ .

७. बाळासाहेबांचा सचिव अतिशय हुशार होता. त्याच्याशिवाय त्यांचे सगळेच अडत असे, पण त्याच्या हट्टी आणि लहरी स्वभावाचा त्रासही होत असे. ------------------ ------------- -------- -------------------- -------------------- अशी त्यांची अवस्था झाली होती.



८. पोहायला येत नसताना अद्वैतने पाण्यात उडी मारली, पण पाणी --- ------------------ --------------------मुळे त्याला श्वास घेता येईना.

**ऐ. उताऱ्यातील 'नाम + क्रियापद' किंवा 'इतर शब्द + क्रियापद' यांची यादी पूर्ण करू या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चर्चा होणे | निकाल | कानावर | मनोरंजन | नाद |
| हिरमोड | नावं | भूमिकेत | जाणीव | मार्ग |
| जन्म | दडपण | त्याहूँ | डोक्यावर | वेढून |
| आठवण | मोह | व्याप | मनात | धाक |
| सामील | वेड | बोबडे | उलघाल | हुक्की |
| सवड | वर्ष | धक्का | ताल | धसका |

**ओ. खालील प्रश्नांच्या मदतीने चित्रपटांशी असलेल्या आपल्या नात्याबद्दल बोलू या.**

- तुम्हाला चित्रपट पाहायला का आवडतं किंवा आवडत नाही?
- तुम्ही कधी आणि किती चित्रपट पाहता?
- तुम्हाला कोणत्या प्रकारचे चित्रपट पाहायला आवडतं किंवा आवडत नाही? का?
- कोणताही चित्रपट पाहताना तुम्ही त्यातले कोणते पैलू पाहता?
- माणसाने चित्रपट पाहावा की पाहू नये? का?

## २ चित्रपटक्षेत्रात करिअर

**क. खालील उताऱ्यातील प्रत्येक वाक्यात दोन दोन क्रियापदांची जोडी वापरली आहे. अशा जोड्या अधोरेखित करू या आणि पुढे दिलेला तक्ता पूर्ण करू या.**

जगभरात गेल्या काही वर्षांपासून चित्रपट-उद्योग आणि त्याच्याशी संबंधित इतर माध्यमे झपाट्याने वाढू लागली आहेत. त्यामुळे बरेच जण ह्या क्षेत्रांशी निगडित अभिनय, दिग्दर्शन, पटकथा लेखन, छायाचित्रण, संकलन, ध्वनी, संगीत, नृत्य दिग्दर्शन, ग्राफिक्स इ. वेगवेगळ्या विभागांमध्ये करिअर करू इच्छीत आहेत आणि खूप मेहनतीने ह्या क्षेत्रात आपला जम बसवू पाहत आहेत.

मात्र, या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी आधी स्वत:चा कल ओळखला पाहिजे, थोडे आत्मपरीक्षण केले पाहिजे. नुसती आवड किंवा इच्छा असून चालत नाही, तर त्यासाठी मेहनत करण्याची तयारी असली पाहिजे. जे ह्या क्षेत्रात पूर्णवेळ अभिनेता किंवा अभिनेत्री म्हणून आपले नशीब आजमावू पाहतात, त्यांनी आपल्या



क्षमता आणि बलस्थानांचा विचार केला पाहिजे. आजच्या ह्या स्पर्धेच्या जगात भरपूर मेहनतीची तयारी आणि जिद्द असेल तर ह्या क्षेत्रात यश मिळवता येते. चित्रपटसृष्टीत काम करण्यासाठी प्रत्येकाकडे कामाचा ध्यास, संयम आणि चिकाटी असली पाहिजे. कामाचा ध्यास असल्याशिवाय कोणीही ह्या क्षेत्रात भरीव कामगिरी करू शकत नाही.

| धातू + ऊ | |
|---|---|
| वाढ + ऊ = वाढू | वाढू लागणे |
| | |
| बस + व + ऊ | |
| | आजमावू पाहणे |

| धातू + वा / वी / वे / व्या | |
|---|---|
| | पाहावी लागणे |
| | |
| | |

| धातू + ला / ली / ले / ल्या | |
|---|---|
| | ओळखला पाहिजे |
| | |
| के + ला | |
| | |

| धातू + ऊन | |
|---|---|
| अस + ऊन = असून | असून (न) चालणे |
| | |
| | |
| | |
| | |

| धातू + ता | |
|---|---|
| मिळ + व + ता | मिळवता येणे |
| | |
| | |
| | |
| | |

व्याकरण

**ख. खालील वाक्यांमध्ये एक मुख्य क्रियापद 'धातुसाधित' आणि दुसरे 'साहाय्यक क्रियापद' म्हणून आले आहे, ते कोणते?**

| वाक्य | धातुसाधित | साहाय्यक क्रियापद |
|---|---|---|
| उदा. मी चित्रपटक्षेत्रातील एखाद्या विभागामध्ये करिअर करू इच्छितो. | करू | इच्छिणे |
| अ. चित्रपटाशी संबंधित इतर माध्यमे झपाट्याने वाढू लागली आहेत. | | |
| आ. लोक खूप मेहनतीने ह्या क्षेत्रात आपला जम बसवू पाहतात. | | |
| इ. इथे काम करण्याची नुसती इच्छा असून चालत नाही. | | |
| ई. जिद्द असेल तर ह्या क्षेत्रात यश मिळवता येते. | | |

**धातुसाधित + साहाय्यक क्रियापद = 'संयुक्त क्रियापद'**

- **विशिष्ट अर्थ व्यक्त करण्यासाठी एखादे क्रियापद दुसऱ्या क्रियापदाची मदत घेते आणि अशा प्रकारे दोन्ही क्रियापदे एकत्रितपणे – संयुक्तपणे – तो अर्थ स्पष्ट करतात. क्रियापदांच्या अशा जोडीला 'संयुक्त क्रियापद' असे म्हणतात.**
- **मात्र, या दोन्ही क्रियापदांमधून कोणत्याही एकाच क्रियेचा बोध होणे आवश्यक आहे.**

उदा. अनय तबला वाजवतो. ('वाजवणे' हे एकच क्रियापद आहे.)

अनयला तबला वाजवता येतो. ('वाजवणे + येणे' असे हे संयुक्त क्रियापद आहे. यातून अनयला वाजवण्याची क्रिया जमते असे स्पष्ट केले आहे)



आणखी उदाहरणे :

मी मराठी बोलतो आणि थोडे हिंदीही बोलू शकतो.

अनय तबला वाजवतो आणि त्याला सतारही वाजवता येते.

- **मुख्य क्रियापदाला साहाय्य करणारी आणखीही क्रियापदे आहेत. वेगवेगळे अर्थ व्यक्त करण्यासाठी विशिष्ट साहाय्यक क्रियापदे वापरावी लागतात.**

**संयुक्त क्रियापदे - विभागणी**

| | मुख्य क्रियापदे (main verbs) | साहाय्यक क्रियापदे (helping verbs) |
|---|---|---|
| धातू + ऊ | करू, खाऊ, चालू... | शकणे, लागणे, इच्छिणे, पाहणे, देणे, धजणे |
| धातू + ऊन | करून, खाऊन, चालून... | येणे, पाहणे, टाकणे, जाणे, चुकणे, बघणे, ठेवणे, बसणे, घेणे, देणे |
| धातू + ता | करता, खाता, पोहता... | येणे |

व्याकरण

| | | |
|---|---|---|
| विध्यर्थी रूपे | करावा, करावी, करावे / करावं, खावा, खावी, खावे / खावं, चालावे / चालावं... | लागणे |
| धातू + त | करत, खात... | येणे, जाणे, राहणे, बसणे |
| भूतकाळी रूपे | केला, केली, केले, केल्या, खाल्ला, खाल्ली, खाल्ले, खाल्ल्या... | पाहिजे, जाणे |
| धातू + आयला | करायला, खायला... | पाहिजे, जाणे, लागणे, जमणे, घेणे, देणे, आवडणे |
| धातू + ता, ती, ते / तं, त्या | चालता, चालती, चालते / चालतं, चालत्या... | होणे (चालती झाली.) (बोलता हो.) |

**ग. खालील साहाय्यक क्रियापदांसाठी योग्य धातुसाधित क्रियापदे निवडू या. चुकीचे क्रियापद खोडू या.**

उदा. लागणे : शिकू लागणे / ~~शिकता लागणे~~ / शिकावे लागणे / शिकायला लागणे

अ. शकणे : चढायला शकणे / चढता शकणे / चढू शकणे

आ. येणे : बोलता येणे / बोलू येणे / बोलत येणे

इ. पाहिजे : चालले पाहिजे / चालायला पाहिजे / चालून पाहिजे

ई. पाहणे : सांगायला पाहणे / सांगू पाहणे / सांगून पाहणे

उ. देणे : पाहायला देणे / पाहू देणे / पाहून देणे

ऊ. जाणे : द्यायला जाणे / देऊन जाणे / दिले जाणे




**घ. योग्य पर्याय अधोरेखित करू या. काही ठिकाणी एकापेक्षा जास्त पर्यायही लागू होतात.**

उदा. त्याच्या गाण्याच्या कार्यक्रमाला तुला **जावं** / **जाऊन** / **जात लागेल.**

अ. "ज्यांचे पैसे घेतलेस त्यांचे परत **देऊ** / **देत** / **देऊन टाक.**"

आ. "तिची एवढी इच्छा आहे तर, **जायला** / **जाऊ** / **जाऊन द्या** तिला सैन्यात."

इ. चित्रपटात काम करण्यासाठी मृण्मयी घर सोडून **निघत** / **निघायला** / **निघून** गेली.

ई. परीक्षेत आलेल्या अपयशानंतर ओम मनापासून पुन्हा अभ्यास **करू** / **करून** / **केला लागला.**

उ. कश्मिराच्या आईचा आज आदर्श शिक्षिका म्हणून सत्कार होणार आहे. कश्मिरानं समारंभाला **गेलंच** / **जायलाच** / **जाऊन पाहिजे.**

ऊ. खूप विनवणी केल्यावर बाबांनी ज्योत्स्नाला हॉस्टेलमध्ये **राहायला** / **राहू** / **राहून दिले.**

ए. अक्षयला उत्तम पोळ्या **लाटायला** / **लाटू** / **लाटता येतात.**



व्याकरण

**च. योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

- **चित्रपट बनवण्यासाठी पूर्वतयारी म्हणून दिग्दर्शकाने काय करणे आवश्यक आहे?**

उदा० (कथेची पडद्यावरील मांडणी ठरवणे) दिग्दर्शकाला कथेची पडद्यावरील मांडणी ठरवावी लागते.

अ. (पटकथाकारासोबत पटकथेचा अभ्यास करणे)

आ. (छायाचित्रकार व कलादिग्दर्शकासोबत चर्चा करणे)

इ. (तंत्रज्ञांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेणे)

ई. (सर्व विभागांतील कार्यप्रणालींची माहिती असणे)

- **एक उत्तम संवादलेखक काय करू शकतो?**

उदा० (चमकदार संवाद लिहून प्रेक्षकांची करमणूक करणे) एक उत्तम संवादलेखक चमकदार संवाद लिहून प्रेक्षकांची करमणूक करू शकतो. / एका उत्तम संवादलेखकाला चमकदार संवाद लिहून प्रेक्षकांची करमणूक करता येते.

अ. (नेमक्या संवादातून कथासूत्राची सुयोग्य मांडणी करणे)

**छ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

**अ. संयुक्त क्रियापद (... + लागणे) / (... + शकणे)**

आपण-एवढं-चालणे आपण-गाडीने-जाणे



उदा० पहिला विद्यार्थी : आपल्याला एवढं का चालावं लागतंय?
दुसरा विद्यार्थी : कारण आपण गाडीने जाऊ शकत नाही.

| | |
|---|---|
| तू – एवढं – ओरडणे | ते – तितक्या लांबून – ऐकणे |
| मी – तुझं पुस्तक – वाचणे | दुसरं कोणी – तुझ्याइतकी खरी प्रतिक्रिया – देणे |
| तो – एवढं काम – करणे | त्याचे सहकारी – मदत – करणे |
| त्या – एवढे पैसे – भरणे | आपण – त्यांना – सवलत देणे |
| तुम्ही – त्यांचं – एवढं – ऐकून घेणे | कोणीही – त्यांच्या विरोधात – काहीही – बोलणे |

**आ. संयुक्त क्रियापद (... + लागणे) / (... + शकणे)**

तुम्ही आत्ताच्या आत्ता सरांना भेटणे — मी उद्या

उदा॰ पहिला विद्यार्थी : तुम्हाला आत्ताच्या आत्ता सरांना भेटावं लागेल.
दुसरा विद्यार्थी : आत्ता अवघड आहे. मी त्यांना उद्या भेटू शकणार नाही का?

| | |
|---|---|
| तू – आजच्या आज – त्याच्या पत्राला – उत्तर देणे | मी – पुढच्या आठवड्यात |
| तुम्ही सगळे – उद्याच्या आत – हा गृहपाठ – करणे | आम्ही – परवा |
| तो – उद्याच – पैसे भरणे | तो – आज |
| ती – ह्या महिनाअखेरीस – घर सोडणे | ती – पुढच्या महिन्यात |
| आपण – लगेच – निघणे | आपण – रात्री उशिरा |

- दोन क्रियापदे एकत्र आली म्हणजे प्रत्येक वेळी ती संयुक्त क्रियापदेच असतात असे मात्र नाही. हे उदाहरण पाहू या : मुंग्यांची रांग तुला दिसत नाही? मग चश्मा **लावून बघ.**

ह्या वाक्यात 'लावणे' आणि 'बघणे' ह्या दोन्ही क्रियांचा स्वतंत्र बोध होत आहे (चश्मा लाव, मुंग्यांची रांग बघ), म्हणून हे संयुक्त क्रियापद नाही. वाक्यातील क्रियापदांमधून कोणत्याही **एकाच** क्रियेचा बोध झाला तरच ते **संयुक्त क्रियापद** होते.

**ज. पुढे दिलेल्या वाक्यांमधील क्रियापदांच्या जोड्या शोधू या. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे त्या संयुक्त असण्याची (✓) किंवा नसण्याची (✗) कारणे स्पष्ट करू या.**

उदा॰ बाबा, पोस्टमनकाकांनी पार्सल आणलंय. मी उघडून बघू आत काय आहे ते? **(✗)**
पार्सल उघडणे आणि आत बघणे, ह्या दोन वेगळ्या क्रिया असल्याने हे संयुक्त क्रियापद नाही.

अ. कामाला बसणार आहेस का? मग जेवून बस म्हणजे मला ओटा आवरता येईल.

आ. सुशीलाने खुर्ची वर उचलून धरली आणि माईंनी खालची फरशी पुसली.

इ. सरपंचांनी मांडलेला शेततळ्याचा मुद्दा सर्वच सभासदांनी उचलून धरला.



ई. रांगोळी चुकली म्हणून काय झालं! पुन्हा एकदा काढून बघ.

उ. निखिल, चांगल्या कागदावर एक प्रिंट काढून बघ आणि मग तुझं मत सांग.

ऊ. कुरियरवाल्यानं पत्रपेटीत पत्र टाकलं नसेल ना? जो, खाली जाऊन बघ रे!

ए. डॉक्टरांनी दिलेल्या औषधांच्या जुन्या चिठ्ठ्या कचऱ्यात टाक, पण फाडून टाक.

**झ. पुढील वाक्यांमधील रिकाम्या जागेत कोणते क्रियापद वापराल?**

| देणे, टाकणे, घेणे, बघणे, जाणे, बोलणे, पाहणे, लावणे, लागणे |
|---|

अ. "धने, जिरे आणि खोबरे तव्यावर भाजून घे, मिक्सरमध्ये बारीक करून .................. आणि बाजूला ठेवून ..................."

आ. “कुठं लागलंय, मला पाहू ................! हॅ:! थोडंसंच खरचटलंय. आपण औषध लावून ................ आणि पट्टी बांधून ................”

इ. “थोडाच मजकूर आहे नं? आत्ताच वाचून ................ आणि शोभाला माझं मतही कळवून ................. उमा, माझ्या टेबलावरचा चश्मा आणून ................?”

ई. “हा कुडता मला लहान होतोय. तू घालून ................ आणि बरोबर झाला तर तूच वापरून ................”

उ. “रोहिणीताई, पालेभाजी फ्रीजमध्ये ठेवून ................. बाहेर राहिली तर वाळून.”

## ३ कॉफी हाऊस

**क. एक नवाकोरा चित्रपट पाहिल्यानंतर प्रथेप्रमाणे कॉफी हाऊसमध्ये झालेली एक चर्चा ऐकू या.**

**ख. खालील विधाने चूक (✗) की बरोबर (✓) ते लिहू या.**

| | |
|---|---|
| उदा॰ मुख्य नट्यांनी चांगला अभिनय केला. | ✗ |
| अ. निधीला फिल्म कळली नाही. | |
| आ. सर्व जण विनोदी चित्रपट पाहायला गेले होते. | |
| इ. निधीला चित्रपट खूप विनोदी वाटला. | |
| ई. निधीला तरुणांवरील सिनेमे आवडतात. | |
| उ. सुझानला सिनेमातले संवाद पोरकट वाटले. | |
| ऊ. सुझानला सिनेमातल्या शिव्या आवडल्या. | |
| ए. सिनेमात गाणी होती हे संकेतला आठवत नाही. | |
| ऐ. सिनेमात लग्नंही दाखवली होती. | |

**ग. संवादात कोणत्या गोष्टींसाठी खालील विशेषणे वापरली आहेत?**

कुरूप खास पोरकट कंटाळवाणी मूर्ख भावुक

**घ. चार ते पाच विद्यार्थी एकत्र येऊ या आणि एका चित्रपटाबद्दल एक संवाद सादर करू या.**



## ४ चित्रपटाचा इतिहास

डिसेंबर २८, १८९५ या दिवशी पॅरिस येथील ग्रँड कॅफेमध्ये मोजक्या प्रेक्षकांच्या उपस्थितीत जगातील पहिल्या चित्रपटाचा पहिला खेळ झाला. हा अद्भुत खेळ प्रेक्षकांनी अक्षरशः तोंडाचा 'आ' वासून पाहिला. एका चित्रपटातील धडधडत धावणारी आगगाडी थेट आपल्या दिशेने येत असलेली पाहून काही स्त्रिया किंचाळत कॅफेतून बाहेर पळाल्या. हे चित्रपट लुई आणि ओग्युस्त ल्युमिएर या दोघा भावांनी तयार केले होते. त्यांच्या दृष्टीने ती केवळ हलत्या चित्रांची मजा होती. आपण एका क्रांतिकारक कलाप्रकाराला जन्म देत आहोत, याचा त्यांनाही पत्ता नव्हता. या खेळात एक ते दीड मिनिट लांबीचे काही चित्रपट होते. ते अर्थातच मूक होते; त्यांना आवाज नव्हता. या खेळालाच 'ल्युमिएर प्रोग्राम' असे नाव पडले.



त्यानंतर सहाच महिन्यांनी, म्हणजे ७ जुलै १८९६ या दिवशी, मुंबईतील वॉटसन हॉटेलमध्ये चित्रपटांचा भारतातील पहिला खेळ झाला. ल्युमिएर बंधूंचेच निवडक सहा चित्रपट त्यात दाखवण्यात आले. करमणुकीच्या ह्या नव्या प्रकाराने मुंबईत एकच खळबळ उडाली आणि मुंबईकरांनी तो पाहायला गर्दी केली.

**क. कल्पना करू या, चित्रपटाच्या भारतातील ह्या पहिल्या खेळाला पत्रकार म्हणून उपस्थित राहण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. खालील मुद्द्यांच्या मदतीने ह्या घटनेबद्दल वृत्तपत्रासाठी एक लेख लिहू या.**

- अशा कार्यक्रमाला त्या काळात मुंबईतील कोणत्या प्रकारचे लोक गेले असतील? (त्यांचे व्यवसाय, भाषा इ॰)
- चित्रपट सुरू होण्यापूर्वी ते त्याबद्दल आपसात काय बोलले असतील? (कल्पना, शंकाकुशंका, ऐकीव माहिती इ॰)
- खेळ सुरू असताना आणि संपल्यानंतर प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया कशा झाल्या असतील? (आश्चर्य, धक्का, भीती, कुतूहल इ॰)
- जर आपण खरेच तिथे असतो, तर आपली स्वतःची प्रतिक्रिया कशी झाली असती?

**काल मुंबईत एक विलक्षण घटना घडली...**

**ख. खालील प्रसंगांवर संवाद सादर करू या.**

अ. तुम्ही एका चित्रपटगृहात चित्रपट पाहत आहात. तुमच्या शेजारी बसलेला प्रेक्षक बराच वेळ फोनवर बोलतोय आणि त्यामुळे सगळ्यांचा रसभंग होतोय.

आ. तुम्ही एका चित्रपटाचे ऑनलाईन तिकीट काढले आहे. चित्रपटगृहात गेल्यावर तुम्हाला कळते की कमी तिकिटे विकली गेल्यामुळे चित्रपटाचा खेळ रद्द झाला आहे.



इ. तुम्ही एक गंभीर चित्रपट पाहत आहात, परंतु तुमच्या शेजारी बसलेला प्रेक्षक गंभीर संवादांनाही मोठमोठ्याने हसतोय. तुम्हाला त्याचा त्रास होतोय.

**ग. चार ते पाच विद्यार्थ्यांचे गट करून खालीलपैकी एका मुद्द्यावर आपले मत सविस्तर मांडू या आणि चर्चा करू या.**

अ. नावीन्य, कल्पकता आणि कलात्मकता ह्यांचा त्रिवेणी संगम म्हणजे 'चित्रपट'

आ. चित्रपट केवळ मनोरंजन करतात.

इ. 'चित्रपट' हे सामाजिक वास्तवाचे यथार्थ दर्शन घडवणारे एक प्रभावी माध्यम आहे.

ई. चित्रपटांच्या मदतीने जनसंवाद घडवून आणता येतो.

उ. चित्रपटांमुळे माणसे बिघडतात.

ऊ. चित्रपटांचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला पाहिजे.



**घ. खालील उतारा वाचून त्यातील नाम + क्रियापद / वाक्प्रचार / संयुक्त क्रियापदे इ॰ अशा जोड्या अधोरेखित करू या.**

मोबाइलच्या तळहाताएवढ्या पडद्याकडे एकटक पाहणाऱ्या माझ्या नातवाला मी विचारले, "काय रे पाहतोयस?"

माझ्याकडे न बघताच त्याने बेफिकिरीने उत्तर दिले, "गॉडफादर."

गॉडफादर! मी अवाक् झालो. त्या चिमुकल्या चौकोनात गॉ-ड-फा-द-र मावतो? डॉन कोर्लेओनचा खोल विहिरीतून आल्यासारखा प्रत्येक शब्द नीट ऐकू येतो? आणि तो भव्य काळोख! काळोखाच्या त्या साम्राज्यामध्ये सावल्यांसारख्या वावरणाऱ्या व्यक्तिरेखा त्यात दिसतात? चित्रगृहातला भलामोठा पडदा व्यापूनही उरणारा मार्लन ब्रॅन्डोचा चेहरा, आणि प्रेक्षकाला खुर्चीत खिळवून ठेवणारा रॉबर्ट डी निरो, आणि अल पचिनोच्या नजरेतली थंड जरब त्या एवढ्याश्या चौकटीत? तंत्रज्ञानाने केलेल्या अफाट प्रगतीचे कौतुक मलाही वाटते. केवळ वय वाढले म्हणून नव्याला मी कधीच नावे ठेवत नाही. मात्र, काही अजरामर कलाकृतींना सामोरे जाण्याची एक रीत असते, काही उसूल असतात. ते पाळले तरच, आणि आपल्याला त्यांचे महत्त्व जाणण्याइतकी समज असली तरच, त्या आपल्यावर प्रसन्न होतात. तेव्हा जाताजाता, कुठेही, कसेही ते आपल्या बोटांवर नाचवण्याचा उद्धटपणा करू नये. आपल्याच प्रकृतीसाठी ते बरे नाही.



मी नातवाला विचारले, "मग?"

नातू म्हणाला, "ऊंऽऽ, काही खास नाहीये."

५ **विद्यार्थ्यांचे गट करू या आणि कमीत कमी वेळेचा एक लघुपट मोबाईल फोनवर चित्रित करू या. चित्रपट वर्गात सादर करू या आणि त्यावर चर्चा करू या.**

## व्यक्तिपरिचय

**दादासाहेब फाळके (१८७०-१९४४)**

जागतिक चित्रपटनिर्मितीच्या इतिहासात डेव्हिड वॉर्क ग्रिफिथ यांचे जे स्थान आहे, तेच स्थान भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके यांचे आहे. चित्रपटतंत्र, वितरण, मूव्ही कॅमेरा हे शब्दच ठाऊक नसण्याच्या काळात फाळके यांनी एकहाती प्रयत्न करून पहिल्या भारतीय चित्रपटाची निर्मिती केली. ३ मे, १९१३ रोजी प्रदर्शित झालेला फाळकेंचा 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला भारतीय चित्रपट ठरला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चित्रपटतंत्र आत्मसात करून त्यांनी चित्रपटनिर्मितीचा पाया घातला आणि म्हणूनच त्यांना 'भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक' म्हटले जाते.

३० एप्रिल, १८७० रोजी नाशिकच्या त्र्यंबकेश्वरमध्ये दादासाहेबांचा जन्म झाला. मुद्रण व्यवसायात असलेल्या फाळकेंना १९१० साली 'लाईफ ऑफ ख्राईस्ट' हा चित्रपट पाहण्याची संधी मिळाली आणि त्यांनी चित्रपटनिर्मिती करण्याचा ध्यासच घेतला. मित्रमंडळींकडून कर्ज उभारून १९१२ साली ते इंग्लंडमध्ये चित्रपटतंत्र शिकून घेण्यासाठी गेले. तिथून आल्यावर थोड्याच अवधीत त्यांनी इंग्लंडहून यंत्रसामग्री मिळवली आणि राहत्या घरातच स्टुडिओ उभारला. चित्रीकरणाचे छोटे छोटे प्रयोग यशस्वी केल्यावर त्यांनी पूर्ण लांबीच्या मूकपटाच्या निर्मितीला सुरुवात केली. द.दा.दाबके (हरिश्चंद्र) आणि भालचंद्र फाळके (रोहिदास) यांना प्रमुख भूमिकांसाठी घेऊन अत्यंत परिश्रमपूर्वक पहिल्या स्वदेशी चित्रपटाची त्यांनी निर्मिती केली. यात त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणामही झाला. समाजाकडून अवहेलना होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून, प्रसंगी पत्नीच्या संमतीने तिचे दागिने गहाण ठेवून त्यांनी या चित्रपटाची निर्मिती केली. हे तंत्र आणि त्याचे महत्त्व आपल्या मित्रांना पटवून देण्यासाठी त्यांनी प्रथम कडधान्य पेरून त्याची वाढ चित्रित केली. निर्मितीसाठी अभिनय शिकवण्यापासून चित्रीकरण करण्यापर्यंत पडेल ते काम केले. महिला कलाकार नसल्याने पुरुष कलाकारांना स्त्रीभूमिका करण्यासाठी राजी केले. या पहिल्या भारतीय चित्रपटातील पहिली स्त्रीभूमिका करणारा नट हा एक आचारी होता.



आपल्या पहिल्या चित्रपटाच्या यशस्वी निर्मितीनंतर फाळके यांनी ‘भस्मासुर मोहिनी’ आणि ‘सत्यवान सावित्री’ (१९१४) या चित्रपटांची निर्मिती केली. १९१३ ते १९३३ दरम्यानच्या वीस वर्षांत स्वत: निर्मिलेल्या तीन चित्रपटांसह एकूण सत्तेचाळीस मूकपट आणि एका बोलपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले.

अत्यंत निष्ठेने दृक्-श्राव्य माध्यमाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या फाळके यांनी वितरणव्यवस्थेच्या अभावावर मात करण्यासाठी प्रिंट्सचे डबे खांद्यावर घेऊन गावोगाव पायपीट केली. पैसा, मनुष्यबळ ह्या सगळ्याचाच अभाव असताना जिद्दीने त्यांनी प्रतिकूल परिस्थितीशी सामना केला आणि इतिहास घडवला. या अट्टहासापायी अमाप कर्जे काढली. मात्र ‘लंकादहन’च्या लक्षणीय यशामुळे ते आर्थिकदृष्ट्या स्थिरावले.

जिज्ञासा, संशोधक वृत्ती, कलात्मक दृष्टिकोन आणि कष्टाळू वृत्ती या भांडवलावर त्यांनी शून्यातून चित्रपटव्यवसायाचा पाया घातला. त्यात त्यांना यश मिळाल्यावर भारतभर निर्मितीचे प्रयत्न सुरू झाले. त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून इतरांनी आपली वाटचाल सुरू केली. फाळके यांच्या या योगदानाचे महत्त्व लक्षात घेऊनच शासनाने ‘दादासाहेब फाळके’ यांच्या नावे पुरस्कार देण्यास सुरुवात केली आणि त्यांचा बहुमान केला. भारतीय चित्रपटक्षेत्रात आजन्म योगदान देणाऱ्या कर्तबगार व्यक्तींना दिला जाणारा ‘दादासाहेब फाळके पुरस्कार’ हा सर्वोच्च मानाचा वार्षिक पुरस्कार आहे.

चित्रपटनिर्मितिक्षेत्रात पायाभूत कार्य करणाऱ्या फाळके यांचे १६ फेब्रुवारी, १९४४ रोजी निधन झाले.

‘हरिश्चंद्राची फॅक्टरी’ हा २००९ साली प्रदर्शित झालेला मराठी चित्रपट दादाहेबांच्या ‘राजा हरिश्चंद्र’ या पहिल्या चित्रपटनिर्मितीमागील धडपडीची कथा सांगतो.



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो कुल्ला, ते कुल्ले | ती प्रतिमा, त्या - | ते नेपथ्य, ती नेपथ्ये / नेपथ्यं |
| तो छायाप्रकाश | ती कसरत, त्या कसरती | ते पार्श्वसंगीत |
| तो विस्तार, ते - | ती छायाचित्रकार, त्या - | ते संज्ञापन, ती संज्ञापने / संज्ञापनं |
| तो छायाचित्रकार, ते - | ती पटकथाकार, त्या - | ते छायाचित्रण, ती छायाचित्रणे / छायाचित्रणं |
| तो पटकथाकार, ते - | ती वेषभूषाकार, त्या - | ते भिंग, ती भिंगे / भिंगं |
| तो वेषभूषाकार, ते - | ती नेपथ्यकार, त्या - | ते समीपदृश्य, ती समीपदृश्ये / समीपदृश्यं |
| तो नेपथ्यकार, ते - | ती निर्मिती व्यवस्थापिका, त्या - | ते संकलन, ती संकलने / संकलनं |
| तो निर्मिती व्यवस्थापक, ते - | ती निर्मितिप्रक्रिया, त्या - | ते आशयसूत्र, ती आशयसूत्रे / आशयसूत्रं |
| तो अवकाश, ते - | ती चित्रनिर्मिती | ते चित्रीकरण, ती चित्रीकरणे / चित्रीकरणं |
| तो विस्तृतकोन, ते - | ती संहिता, त्या - | ते उपशीर्षक, ती उपशीर्षके / उपशीर्षकं |
| तो बोलपट, ते - | ती मंदगती | ते चलचित्र, ती चलचित्रे / चलचित्रं |
| तो मूकपट, ते - | ती चमत्कृती, त्या - | ते दूरदृश्य, ती दूरदृश्ये / दूरदृश्यं |
| तो छेद, ते - | ती लोकजागृती | ते ध्वनिसंकलन, ती ध्वनिसंकलने / ध्वनिसंकलनं |
| तो वितरक, ते - | ती अढी, त्या अढ्या | ते हत्याकांड, ती हत्याकांडे / हत्याकांडं |
| तो अपराधीपणा | ती उलघाल, त्या उलघाली | ते दडपण, ती दडपणे / दडपणं |
| तो हिरमोड | ती कलात्मकता | ते सामर्थ्य, ती सामर्थ्ये / सामर्थ्यं |
| तो युक्तिवाद, ते - | ती कल्पकता | |
| तो धाक | | |
| तो धसका, ते धसके | | |
| तो संयम, ते - | | |
| तो ध्यास, ते - | | |

## क्रियापद

वैतागणे, घडवणे, रचणे, झुगारणे, आजमावणे, धजणे, खिदळणे, मावणे

## विशेषण

यांत्रिक, कृष्णधवल, स्थिर, बोबडे, बेसावध, अरसिक, स्वाभाविक, अविभाज्य, तुच्छ, उथळ, चमकदार, वाह्यात, यथार्थ, शास्त्रशुद्ध

## क्रियाविशेषण

खदाखदा, एकंदर, यथावकाश, तुफान, धडधडत, एकटक

## नाम / इतर शब्द + क्रियापद

जाहीर करणे, धोका पत्करणे, कसरत करावी लागणे, व्याप वाढणे, हुक्की येणे, जिवाची उलघाल होणे, नाद सोडणे, वेढून टाकणे, धसका घेणे, धक्का बसणे, शरण जाणे, निकाल लागणे, हिरमोड होणे, नावं ठेवणे, दडपण असणे, भूमिकेत शिरणे, डोक्यावर लादणे, खळबळ उडणे, एकटक पाहणे, अवाक होणे, व्यापून उरणे, खिळवून ठेवणे, नावे ठेवणे, सामोरे जाणे, समज असणे, प्रसन्न होणे, बोटांवर नाचवणे

## म्हणी आणि वाक्प्रचार

धरले तर चावते आणि सोडले तर पळते, 'आ' वासून पाहणे, त्रिवेणी संगम



## आता मला हे येतं...

चित्रपट ह्या विषयावर बोलणे, वाचणे, लिहिणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

चित्रपट परीक्षणे वाचणे, लिहिणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

चित्रपटाविषयी अभिप्राय देणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

संयुक्त क्रियापदे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# २ विरंगुळा









## चला, शिकू या...

- फावला वेळ, विरंगुळा ह्याची गरज व महत्त्व
- 'लागणे'चे विविध अर्थ
- क्रियापद नाम + सप्तमी
- 'तर' चे विविध उपयोग
- नामसाधित कालवाचक विशेषणे व क्रियाविशेषणे
  - नामसाधित कालवाचक क्रियाविशेषणे
- उद्देशार्थक काळ

## १ विरंगुळा

क. खालील चित्रांत विरंगुळ्याच्या कोणत्या कृती लपल्या आहेत? ओळखू या.




ख. सहा विद्यार्थ्यांना खालीलपैकी एक चिठ्ठी मिळेल. "चिठ्ठीमधील कृती तुम्ही विरंगुळा म्हणून करता का?" असा प्रश्न वर्गातील प्रत्येकाला त्यांनी विचारायचा आहे आणि उत्तर होकारार्थी असेल तर चिठ्ठीवर प्रत्येकाची सही घ्यायची आहे. जो विद्यार्थी आधी सर्वात जास्त सह्या आणेल तो जिंकला.

| | | |
|---|---|---|
| चित्र काढणे | पोस्टाची तिकिटे जमा करणे | नाणी जमा करणे |
| स्वयंपाक करणे | एखादे वाद्य वाजवणे | गिर्यारोहण |

करा आणि शिका

### ग. उपजीविकेचे साधन आणि फावला वेळ

उपजीविकेचे साधन म्हणून आणि फावल्या वेळात खालील व्यक्ती काय करतात? उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या आणि योग्य त्या रकान्यात लिहू या.

| | चित्र | उपजीविकेचे साधन | चित्र | फावल्या वेळातील काम |
|---|---|---|---|---|
| अ |  | मीनाक्षी डॉक्टर आहे. उपजीविकेचे साधन म्हणून ती वैद्यकीय व्यवसाय करते. |  | फावल्या वेळात ती वृद्धाश्रमांत काम करते. |
| आ |  | उदय पोलीस आहे. |  | |
| इ |  | परिणीता शिक्षिका आहे. |  | |
| ई |  | उमेशचे वाणसामानाचे दुकान आहे. |  | |
| उ |  | श्रीधर शेतकरी आहे. |  | |

**घ. फावला वेळ आणि विरंगुळा**

फावल्या वेळात माणूस नेहमी स्वत:च्याच करमणुकीसाठी, मनोरंजनासाठी, विसाव्यासाठी काही तरी करतो असं नाही. थोडा रिकामा वेळ मिळाला तर तो सत्कारणी लागावा म्हणून अनेक जण आपापल्या परिसरासाठी, समाजासाठी काही तरी करतात. स्वतःच्या करमणुकीसाठी, आनंदासाठी किंवा छंद म्हणून माणसे आपापले विरंगुळ्याचे साधन निवडतात. वरील तक्त्यात आपण काही माणसे फावल्या वेळेत काय करतात ते लिहिले. पुढील तक्त्यात हीच माणसे विरंगुळा म्हणून काय करतात ते दिलेल्या उदाहरणाप्रमाणे लिहू या.

| | फावला वेळ | विरंगुळ्याचे साधन | विरंगुळा |
|---|---|---|---|
| अ | मीनाक्षी डॉक्टर आहे. फावल्या वेळात ती वृद्धाश्रमात काम करते. |  | विरंगुळा म्हणून ती गाणं शिकते. |
| आ | उदय पोलीस आहे. |   | |
| इ | परिणीता शिक्षिका आहे. |  | |
| ई | उमेशचे वाणसामानाचे दुकान आहे. |  | |
| उ | श्रीधर शेतकरी आहे. |  | |

**च. चार किंवा पाच विद्यार्थ्यांचे गट करू या. गटात सर्वांनी एकमेकांना पुढील प्रश्न विचारून त्यावर चर्चा करू या.**

**अ.** तुम्ही स्वतः उपजीविकेसाठी काय करता किंवा भविष्यात काय करणार आहात?

**आ.** तुम्ही फावल्या वेळाचा उपयोग कसा करता?

**इ.** तुम्ही विरंगुळा कशात शोधता?

प्रत्येक गटातील विद्यार्थी त्यांना त्यांच्या गटात जो व्यवसाय, जे फावल्या वेळातील काम किंवा जो विरंगुळ्याचा छंद जास्त रंजक वाटला असेल त्यावर एक छोटे सादरीकरण करतील.

**छ. खालील संवाद वाचू या आणि नंतरच्या प्रश्नांच्या मदतीने चर्चा करू या.**

**विरंगुळा म्हणजे ...**



"सुप्रभात! लवकर उठलीस."
"चूक! मी उठले नाहीय, तू मला उठवलंयस! किती रे वाजलेत, केतन?"
"सव्वाआठ."
"सकाळचे सव्वाआठ?"
"होय, सकाळचे."
"मग इतक्या सकाळी हे काय चाललंय तुझं?"
"तुझी खुर्ची डुगडुगतेय असं म्हणाली होतीस नं? ती दुरुस्त करतोय."
"सुट्टीच्या दिवशी ह्याहून काही वेगळं घडू शकत नाही का तुझ्या आयुष्यात?"
"उदाहरणार्थ?"
"उदाहरणार्थ थोडा आळस, थोडा विरंगुळा, थोडी ..."
"कामात बदल हाच माझा विरंगुळा."
"सुभाषित, अं? किती रे, किती कंटाळवाणा झालायस तू, केतन! हसू नकोस, मी खरंच म्हणतेय."
"मीसुद्धा! बरं, तुझ्या मते विरंगुळा म्हणजे काय?"
"विरंगुळा म्हणजे ... म्हणजे जे केल्यानं मनाला आनंद वाटेल, मन आणि शरीरही सैल होईल, टवटवीत होईल असं काही तरी. थांब, तुला कोशातच बघून सांगते ... हं, हे बघ – विरंगुळा = करमणूक, मनोविनोद, छंद, नाद, विसावा, आराम, खेळ ... अं ऽऽऽ, पुढे 'करमणूक पाहा' असं म्हटलंय ... करमणूक = मनोरंजन, मौज, मजा, गंमतजंमत, गप्पाटप्पा, थट्टा-विनोद, हास्यविनोद, चैन, आवडता उद्योग... वगैरे वगैरे. ह्यात 'सुट्टीच्या दिवशी सकाळी सव्वाआठ वाजता बायकोची डुगडुगणारी खुर्ची दुरुस्त करणे' असा अर्थ दिलेला नाहीये, केतन. आता?'

**अ. चर्चा करू या.**

१. माणसे दोन्ही प्रकारची असतात : 'कामात बदल हाच विरंगुळा' असे म्हणून सतत हे किंवा ते काम करत राहणारी, किंवा कधी एकदा हातातील काम संपवून पळ काढता येईल ह्याचा विचार करत विरंगुळ्याच्या शोधात असणारी. तुम्ही कोणत्या गटात आहात?

२. आज करमणुकीची म्हणजेच विरंगुळ्याची असंख्य साधने, माध्यमे आणि तेवढीच निमित्तेही आहेत. बहुतेकांना ती सर्वच हवी असतात. माणसाला इतक्या करमणुकीची खरेच गरज असते का?

३. 'करमणूक म्हणजे डोके बाजूला ठेवून करण्याचा व्यवहार' अशी एक व्याख्या प्रचलित आहे. तुम्ही कशी व्याख्या करता?

४. वरील संवादात पत्नीने शेवटी विचारलेल्या 'आता?' ह्या प्रश्नाचे केतन काय उत्तर देईल असे तुम्हाला वाटते?

**ज. वाचू या.**

**छंद लागला असा ...**



संध्याकाळी निनाद घरी आला तेव्हा त्याच्या दोन्ही हातांमध्ये निरनिराळ्या आकारांच्या मातीच्या कुंड्या होत्या.

"हे काय नवीन?" रेणूने विचारले. तिच्या कपाळावर आठ्या होत्या.

"तू काल जे म्हणालीस ते माझ्या मनाला फार लागलं," कुंड्या बाल्कनीत ठेवत निनाद म्हणाला.

"काय म्हणाले मी?"

"तू म्हणालीस : तुम्हा आयटीवाल्यांचं मातीशी नातं उरलेलं नाहीये. तुमच्या अंगाला तर सोडच, पायांनाही माती लागत नाही. लिफ्टमधून उतरून गाडीत चढायचं, ते थेट ए सी पार्किंगमध्येच बाहेर पडायचं. प्रवासही हवेतून करायचा वगैरे नाही नाही ते बोललीस. फार म्हणजे फारच लागलं ते मला," निनाद गाल फुगवून म्हणाला.

"अच्छा! म्हणून ह्या मातीच्या पाच रिकाम्या कुंड्या!"

"गाडीत मातीसकट पाच रोपंही आहेत. मी बाल्कनीत बाग करणार आहे."

"खरीखुरी?"

"हो, खरीखुरी. काही अडचण?"

रेणूने मोठ्ठा नि:श्वास टाकला. "निनाद, छंद म्हणून हे करणार असलास तर आत्ताच त्या कुंड्या परत करून टाक. कारण तुझे छंद नंतर मला सांभाळावे लागतात; आणि आता माझ्याकडे त्यासाठी वेळ नाहीये. हा त्या फार्मव्हिलसारखा बटणं दाबून शेतीबिती करण्याचा मूर्ख खेळ नाहीये. जिवंत रोपं आहेत ही. एक असो की पाच असोत, त्यांना रोज वेळ द्यावा लागतो. जीव लावावा लागतो. आपोआप काहीही होत नसतं ..."

"श:ss! किती बोलते आहेस! मी सगळं व्यवस्थित करणार आहे. तू फक्त माझ्या बागेचं कौतुक करायचंस, बस!" निनाद म्हणाला.

"बघू नं!"

'बघच तू,' असे आव्हान देऊन निनादने आपली पाच कुंड्यांची बाग थाटली. रेणूने काही दिवस निर्धाराने तिकडे दुर्लक्ष केले; पण हळूहळू जे व्हायचे होते ते झालेच. दोन रोपे मेली. एकाला कीड लागली. त्या कुंड्यांमध्ये निनादने कसल्या तरी बिया पेरल्या, पण त्या रुजल्याच नाहीत. मग नवी रोपे लावली, तीही जगली नाहीत.

आता मात्र रेणूचा संयम संपला. अखेर तिने निनादच्या मरायला टेकलेल्या बागेचा ताबा घेतला. तिचे हात लागले आणि अर्धमेल्या रोपांना तरतरी आली. नव्या पानांआडून चारदोन कळ्या डोकावू लागल्या. रोपांबरोबर कुंड्यांची संख्याही वाढू लागली आणि बाल्कनीला खरोखरच बागेचे रूप आले. काही कळण्याआत रेणूला त्या पानाफुलांचा इतका लळा लागला, की ती निनादवर चिडायचेही विसरली. उलट, कुणी तिचे कौतुक केले, की ती म्हणे, "निनादला श्रेय द्या. मी स्वतःहून हा उद्योग केलाच नसता. ह्याच्यासारखा आरंभशूर मित्र आहे म्हणून जमलं. हो ना रे, निनाद?"



अ. वरील उताऱ्यात 'लागणे' ह्या क्रियापदाच्या वेगवेगळ्या अर्थांच्या छटा दिसतात. उतारा वाचून त्या समजावून घेऊ या.

आ. खाली दोन तक्ते दिले आहेत. त्यातील वाक्यांमध्ये आलेल्या 'लागणे' ह्या क्रियापदाच्या दिलेल्या अभिप्रेत अर्थांशी जोड्या लावू या.

| | वाक्य | 'लागणे' चा अर्थ |
|---|---|---|
| १ | अचानक रतीच्या पावलाला काही तरी गिळगिळीत लागले. तिने पाहिले ... ईsss ! एक लठ्ठ गोगलगाय तिच्या पावलावर चढली होती.  | रुजणे; रमणे |
| २ | बांधकाम पूर्ण होण्यासाठी आणखी तीन महिने लागतील. | जागेवर येऊन थांबणे |
| ३ | शिकण्यात मन लागत नाही आणि शिक्षण नसल्याने नोकरी मिळत नाही, अशी एकनाथची स्थिती झाली आहे. | स्पर्श होणे; चिकटणे; चिकटून येणे |
| ४ | गॅलरी सेव्हनमध्ये बंगाली शिल्पकारांच्या कामाचे प्रदर्शन लागले आहे. | चालू / बंद होणे; चालू / बंद असणे |
| ५ | "अमेय, लवकर ये, टीव्हीवर आमिर खानची मुलाखत लागली आहे!  | गरज भासणे; आवश्यक असणे |
| ६ | रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गाड्या लागल्या आहेत त्यामुळे रस्ता अधिकच अरुंद झाला आहे. | मांडणे; प्रदर्शित करणे; जाहीर करणे |

| | वाक्य | 'लागणे' चा अर्थ |
|---|---|---|
| १ | इरफानला आजीचा इतका लळा आहे, की तिने दिलेली शिवीसुद्धा त्याला गोडच लागते  | चालू / बंद होणे; चालू / बंद असणे |
| २ | हल्ली जुने चित्रपट थिएटरमध्ये लागतच नाहीत, त्यामुळे टीव्हीवरच पाहावे लागतात. | टोचणे; जखम होणे; दुखावणे |
| ३ | घरात प्राणी पाळायचा म्हणजे अनेक कटकटी मागे लागतात. नकोच ते!  | चव किंवा स्पर्श जाणवणे; वाटणे |
| ४ | नोकरीची पार्टी हवी म्हणून मित्र कधीपासून मागे लागले आहेत. ह्या रविवारी करून टाकावी. | कीटकांची गर्दी होणे |
| ५ | मांजरीचे दात जसे पिलाला लागत नाहीत, तसे आईचे रागावणे मुलाच्या मनाला लागत नाही.  | जबाबदारी अंगावर पडणे; ओझे होणे |

| | | |
|---|---|---|
| ६ | माळ्यावरच्या पुस्तकांना वाळवी लागली आहे. औषध मारायला हवे. | आग्रह करणे; हट्ट करणे |

इ. 'लागणे' ह्या क्रियापदाच्या वरीलपैकी वेगवेगळ्या अर्थच्छटा वापरून किमान पाच वाक्ये लिहू या.

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

**झ. संवाद ऐकू या आणि पुढील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

**अ. पुढील वाक्यांतील अधोरेखित भागाचा अर्थ न बदलता तीच वाक्ये वेगळ्या पद्धतीने लिहिता येतील का?**

उदा॰ मी फक्त आवश्यक तेवढंच वाचतो असा कुणाचा समज होऊ नये.
मी फक्त आवश्यक तेवढंच वाचतो असं कोणाला वाटू नये. / असं कोणी समजू नये.

१. चाळायला म्हणून काल एक पुस्तक हातात घेतलं आणि पूर्ण वाचूनच खाली ठेवलं.

२. पहिल्या महायुद्धापूर्वी एका ब्रिटिश प्रवाशानं अतिपूर्वेकडच्या खाद्यसंस्कृतीवर लिहिलेलं झकास पुस्तक निघालं ते.

३. तेव्हा ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य मावळत नव्हता.

४. काही वेळा अत्यंत अस्वस्थ आणि हताश करणारी चांगली पुस्तकंही हाती लागतात.

**आ. पुढील शब्द वापरून वाक्ये लिहू या. एका वाक्यात एकापेक्षा अधिक शब्द वापरता येतील.**

| | | | |
|---|---|---|---|
| - जीर्ण | - अनावश्यक | - मुखपृष्ठ | - खाद्यसंस्कृती |
| - झकास | - लिखाण | - स्वाभाविकपणे | - अहंकार |
| - सवड | - विराम | - समाजमाध्यम | - दृष्टिकोन |

**इ. संवादात काही वाक्ये अर्धवट वाटावी अशी आहेत. म्हणजे कधी त्यात कर्ता नाही, कधी क्रियापद नाही वगैरे. अशी वाक्ये शोधून ती पूर्ण करून लिहून पाहू या.**

उदा॰ आवश्यक आणि अनावश्यकही – मी आवश्यक आणि अनावश्यकही वाचन केलं.

**ई. दोन ते तीन विद्यार्थ्यांचे गट करून पुढीलपैकी एका विधानाबद्दल चर्चा करू या. आपापल्या चर्चेची वर्गासमोर थोडक्यात मांडणी करू या.**

१. आमच्या पिढीला जगण्याची सवड मिळाली.

२. कंटाळा त्या विरामासारखाच असतो.

३. दात घासणं हीसुद्धा तुमच्यासाठी एक घटना होते.



**उ. शब्दकोशाच्या मदतीने पुढील शब्दांचे अर्थ शोधून मोकळ्या जागेत लिहू या.**

| | |
|---|---|
| १. स्तंभलेखन = ---------------- | ६. वळण = ---------------- |
| २. चौफेर = ---------------- | ७. खाद्यसंस्कृती = ---------------- |
| ३. जीर्ण = ---------------- | ८. हताश = ---------------- |
| ४. चाळणे = ---------------- | ९. अर्थपूर्ण = ---------------- |
| ५. अतिपूर्व = ---------------- | १०. विराम = ---------------- |

## २ ही मुलं करतात तरी काय?



**बाबा :** मोहन, वरुण आणि रोनित दुपारी किंवा संध्याकाळी आपापल्या खोल्यांत बसून काय करत असतात? शाळा-कॉलेजव्यतिरिक्त मिळणारा मोकळा वेळ मित्रमंडळींबरोबर किंवा मैदानावर **घालवण्यात** किती आनंद असतो, ह्याची त्यांना जाणीव नाही का? सारखं काय बंद खोल्यांत स्वतःला डांबून घेतात ही मुलं!

**मोहन :** बाबा, ती दोघंही त्यांच्या लॅपटॉपवर किंवा मोबाईलवर काहीतरी काम करत असतात.



**बाबा :** तेच म्हणायचंय मला. अलीकडेच माझ्या **ऐकण्यात** आलंय, की नवीन पिढीला वाचनात फारसा रस राहिलेला नाही. त्यांचा बराच फावला वेळ पुस्तकं वाचण्याऐवजी मोबाईलवर चॅट **करण्यात** आणि संदेश **पाठवण्यात** जातो. ह्याखेरीज टीव्हीसमोर **बसण्यात** आणि व्हिडीओ गेम्स **खेळण्यात** त्यांना जास्त रस आहे.

**मोहन :** खरंच आहे की हे, बाबा. आणि नवीन गोष्टी **करण्यात** गैर ते काय? तुम्हीही तुमच्या काळात असं काहीतरी नवीन केलंच असेल ना? प्रत्येक पिढी पुढच्या पिढीला अशीच नावं ठेवत असते. तुमचे आई-वडील तुमच्या पिढीविषयी काय म्हणायचे?



**बाबा :** त्यांचा स्वतःचा जास्त वेळ घरकामात किंवा शेतीच्या कामात जात असे. आम्ही जास्त वेळ पुस्तकं **वाचण्यात** आणि रेडिओ **ऐकण्यात** घालवतो असं त्यांचं म्हणणं असे. त्यांचा फावला वेळ ते देव-देव **करण्यात** घालवत. आम्हाला ते चुकीचं वाटे.

**मोहन :** आणि आमच्या पिढीनं टीव्हीची सुरुवात पाहिली. तुम्हाला आठवतं का बाबा, टीव्ही **बघण्यात** आम्ही वेळ वाया घालवतो म्हणून तुम्ही आम्हाला किती रागवायचात ते? आणि आज तुम्ही सतत टीव्हीवरच्या मालिका बघत असता. टीव्हीशिवाय दोन दिवस घालवायची कल्पनाही तुम्ही करू शकत नाही.

**बाबा :** हो रे, अगदी खरंय तुझं म्हणणं. आम्ही कधी बदललो ते आमचं आम्हालाच कळलं नाही. बदल हवाच. स्वतःला काळाप्रमाणे **बदलण्यात** आणि हा बदल मान्य **करण्यात**च खरा शहाणपणा आहे. पण म्हणून जुन्या गोष्टी अगदीच **सोडण्यात**ही अर्थ नाही, हेही नव्या पिढीनं जाणलं पाहिजे.

**क्रियापद-नाम + सप्तमी**

वरील संवादात हिरव्या रंगातील शब्द क्रियापदाची वेगळी रूपे दाखवतात. ती क्रियापद-नामांची सप्तमीची रूपे आहेत. ही रूपे कशी तयार होतात ते पाहू या.

| क्रियापद-नाम | सामान्यरूप + त | क्रियापद-नामाचे सप्तमीचे रूप |
|---|---|---|
| करणे | करण्या + त | करण्यात |
| देणे | देण्या + त | देण्यात |

**एखादी गोष्ट सांगण्याची साधी सरळ पद्धत असतेच, पण ती थोड्या वेगळ्या पद्धतीनेही सांगता येते.**

| | |
|---|---|
| **"मला अभिनय <u>करायला आवडतं</u>."**<br>कर + आयला = करायला | **"मला अभिनय <u>करण्यात / करण्यामध्ये रस आहे.</u>"**<br>**करणे + आत / मध्ये = करण्यात / करण्यामध्ये**<br>**येथे धूम्रपान करण्याला बंदी आहे.**<br>**करणे + ला = करण्याला** |
| **"फटाके वाजवताना तुम्हाला कसला आनंद होतो?"** | **"फटाके वाजवण्यात / वाजवण्यामध्ये तुम्हाला कसला आनंद मिळतो?"** |
| **वाजव + ताना = वाजवताना** | **वाजवणे + आत / मध्ये = वाजवण्यात / वाजवण्यामध्ये** |
| | **# 'करणे' या क्रियापदनामाचे 'करण्या' हे सामान्यरूप + ला / त / मध्ये** |

**अशीच रचना नाम वापरूनही होते.**

| | |
|---|---|
| **आदित्यला बुद्धिबळ आवडते.** | **आदित्यला बुद्धिबळात / बुद्धिबळामध्ये रस आहे.** |
| **सुरिंदरला संगीताची आवड आहे.** | **सुरिंदरला संगीतामध्ये रस आहे.** |



**नाम + इतर क्रियापदे**



**टीप :** वरील वाक्यांच्या शेवटी नामाबरोबर इतरही क्रियापदे वापरता येतात.
**रस** असणे / घेणे / वाटणे   **गती** असणे   **मजा** असणे / वाटणे / येणे
**गंमत** असणे / वाटणे / येणे  **अर्थ** असणे / वाटणे

अशा प्रकारे कर्त्याचा उल्लेख न करता दोन क्रियापदे वापरूनही रचना होते.

उदा. नव्या पुलाचे उद्‌घाटन सप्टेंबर महिन्यात करण्यात येईल. (कोण करेल ते इथे सांगितलेले नाही)

लवकरच एक नवी आरोग्यनीती आखण्यात येणार आहे. (कोण आखेल ते इथे सांगितलेले नाही)

**(अशी रचना सामान्यपणे अधिकृत शासकीय भाषेत वापरली जाते)**

**क. खालील उताऱ्यातील क्रियापद + सप्तमी असणारी सर्व रूपे अधोरेखित करू या आणि त्या क्रियापदांचे मूळ रूप लिहू या.**

**तुझ्यावाचून करमेना ....**

"अनय, रेस्टॉरंटमध्ये जाऊन खाण्यात जी मजा असते ती जेवण घरी मागवण्यात नसते, हे तुला मान्यच नाही का?"

"नाही, मला ते मान्य नाही."

अनय नेहमी ठाम विधानं करतो, त्यामुळे खरं तर त्याच्याशी वाद घालण्यात अर्थ नसतो; पण तरीही मी तेच करतो.

"का पण?" मी हट्टानं विचारलं.

"कारण तिथे नको त्या गोष्टी करण्यात फार वेळ जातो."

"नको त्या गोष्टी?"

"खूप माणसं असतात तिथे. त्यातली बरीचशी नाही-भेटली-तर-बरं अशा गटातली असतात. त्यांच्याशी बोलण्यात आणि त्यांच्या मूर्ख गप्पा आणि टिंगलटवाळी ऐकण्यात मला रस नसतो."

"तुझी खरी अडचण काय आहे, सांगू? जे जे करण्यात मला रस असतो ते ते तुला नकोसं असतं. हे नाकारण्यात काही अर्थ नाही, अनय, वाद घालू नकोस. ही वस्तुस्थिती आहे आणि ती स्वीकारण्यातच शहाणपणा आहे."



अनयनं आश्चर्यानं माझ्याकडे पाहिलं. "अरे वा! आणि जर मीही म्हटलं की, जे करण्यात मला रस नसतो तेच नेमकं तुला करायचं असतं, तर? पण मी तसं म्हणणार नाही, कारण तू जसा आहेस तसा आहेस; तुला बदलण्यात मला रस नाही. तेव्हा तू तुला हवं तिकडे जा, मी मला हवं ते मागवतो, ठीक आहे?"

"ठीक आहे," मी चपला घालत फणकाऱ्यानं म्हणालो आणि दरवाजा उघडून बाहेर पडलो. पाठीमागून अनयचा आवाज आला.

"मंदार, फार उशीर करू नकोस! तुझी वाट बघत ताटकळण्यात मला रस नाहीय!"

माझा फणकारा विसरून मी फिसकन हसलो.

| | |
|---|---|
| उदा॰ मागवण्यात – मागवणे | उ. |
| अ. | ऊ. |
| आ. | ए. |
| इ. | ॲ. |
| ई. | ऐ. |

**ख. खाली दिलेल्या क्रियापदांचे सप्तमीचे रूप करून वाक्ये पूर्ण करू या.**

(भिजणे, पाहणे, ठरवणे, खेळणे, नटवणे, ताटकळणे, ऐकणे, पाहणे, खाणे, पकडणे, ठेवणे)



अ. मी पाहिलाय तो सिनेमा. तोच सिनेमा परत पाहण्यात मला रस नाही.

आ. तीच गोष्ट परत परत .............................. काय मजा आहे?

इ. घरबसल्या बैठे खेळ .............................. मितालीचा जास्त वेळ जात असे.



ई. किती दुष्ट आहे हा मुलगा! सुंदर फुलपाखरं .............................. त्याला रस नाही, तर ती .............................. आणि बाटलीत भरून .............................. त्याला मजा येतेय.

उ. भातुकली खेळताना त्यांचा जास्त वेळ आपापल्या भूमिका .............................. आणि त्या भूमिकेनुसार स्वतःला .............................. जातो.

ऊ. पहिल्या पावसाच्या धारांत चिंब .............................. आणि रस्त्याकडेच्या टपरीवरील गरम गरम भजी .............................. जो आनंद आहे तो तुम्हाला इतर कुठे मिळू शकेल का?

ए. आपल्या नवऱ्याची वाट पाहत .............................. तिने कित्येक संध्याकाळी घालवल्या आहेत.



**ग. पुढे दिलेली क्रियापदे वापरून वाक्ये पूर्ण करू या –**

(फणकाऱ्याने म्हणणे, ठाम विधान करणे, वाद घालणे, फिसकन हसणे, हट्टाने विचारणे, नकोसे वाटणे, मान्य नसणे, रस नसणे)



अ. "शिकण्यासाठी परदेशात गेलेली माझी मुलगी 'तिकडचं जेवण आवडत नाही' हे कारण सांगून परत येते? हे मला ........................ ........................ आणि कधी होणारही नाही," अविनाश चिडून म्हणाला.



आ. "आई, कालच्या भाषणात 'माझी मुलं कधीच आंतरजातीय लग्न करणार नाहीत' असं .................... .................... .................... तू? आम्हाला न विचारताच?"

"सुमेध, ह्या विषयावर मला चर्चा नकोय!"

"का पण?" सुमेधने .................... ...................., "मला उत्तर हवंय, आत्ता!"

इ. आता ह्या वयात धावपळ, लांबचा प्रवास, नव्या ओळखी, खोटे हसणे, फसवे बोलणे .................... .................... .

ई. "देसायांना ही फाईल दे. ते वेडंवाकडं बोलतील; त्यांच्याशी .................... .................... नकोस. न बोलता परत ये."

उ. "काका, उद्या देतो ना उरलेले पैसे! तुमचे दोन रुपये घेऊन मी काय बंगला बांधणार आहे का?" दत्तू .................... .................... .



ऊ. दोन वर्षे आईच्या दवाखान्यात प्रॅक्टिस केली, पण आपल्याला एकूण डॉक्टरकीतच .................... ...................., हे शिवानीच्या लक्षात आले.

ए. वर्ग तपासायला आलेल्या अधिकाऱ्यानेच फळ्यावर चुकीचे स्पेलिंग लिहिले. ते पाहून सगळा वर्ग मान खाली घालून .................... .................... .

## ३ तर, तरी ...

**क. दोन विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन खालील संवाद वाचू या आणि त्यातील 'तर' ह्या शब्दाचे आपल्याला समजलेले विविध उपयोग लिहू या आणि सांगू या.**

**मंदार** : हे बघ प्रज्योत, आज काहीही झालं तरी मी सिनेमाला जाणारच. आज माझा सिनेमाचा दिवस आहे, माहितेय ना तुला? मी आज हा सिनेमा पाहणार म्हणजे पाहणारच.

**प्रज्योत** : अरे, पण चार वाजताचा खेळ आहे! कसं जमेल तुला?

**मंदार** : असू दे. मी ३ वाजताच ऑफिसमधून निघेन. कितीही ट्रॅफिक असला तरी ३.३० पर्यंत पोचेनच मी. चारचं तिकीट नाही मिळालं तर तिथेच थांबून राहीन. पुढच्या खेळाचं तरी मिळेलच ना?



**प्रज्योत** : आणि भुकेचं काय? भूक लागेल ना तुला?

**मंदार** : भुकेचं म्हणशील तर मला भूक सिनेमाचीच आहे. खायला नाही वेळ मिळाला तरीही सिनेमा चुकवणार नाही. पोटाची भूक तर कधीही भागवता येते.

**प्रज्योत** : तर तर! सिनेमाच खा, सिनेमाच पी! तुझं हे सिनेमाचं वेड जगावेगळंच आहे. कितीही अडथळे आले तरी तू दर आठवड्याला एक सिनेमा तरी बघतोसच. पैसे नसतील तर उधार घेशील, सोबतीला कोणी नसेल तर एकटा जाशील, पण जाशीलच. मला आठवतंय, एकदा तर तुझे डोळे आले होते, नीट दिसत नव्हतं, तरीही तू तुझा आठवड्याचा सिनेमा चुकवला नव्हतास! सांगता येईल का तुला त्या सिनेमाची गोष्ट?

**'तर' – विविध उपयोग**

| अ. क्र. | उदाहरण | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | वेळ मिळाला तर मी येईन. तू उद्या ये तर खरा, मग बघू. त्याला येऊ दे तर आधी, मग ओरडायचंय तेवढं ओरड. | अट |
| २. | वेळ मिळाला तरच मी येईन. | ठासून केलेले विधान |
| ३. | मी आज सिनेमाला आलो तर येईन. | अनिश्चितता |
| ४. | तू तर म्हणाला होतास तिकिटं आरामात मिळतील, पण कार्यक्रम तर हाऊसफुल आहे! मी तर येणारच.<br>मी तर नाही येणार.<br>माझी आई तर नाही येणार ह्या मिटिंगला. | अध्याहृत विरोध |
| ५. | तर तर! लागून गेलाय मोठा! | उद्गार |
| ६. | हो! आता मी जातो तर! | वाक्यपूरक |

व्याकरण

**‘तरी’ – विविध उपयोग**

| अ. क्र. | उदाहरण | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | ढग आले तरी पाऊस पडला नाही. | **जरी – तरी** |
| २. | तू तरी जा, नाहीतर मी तरी जातो. | **पर्याय** |
| ३. | मला जेवून तरी घेऊ देत. | **किमान / कमीत कमी** |
| ४. | तरी मी सांगत होतो. | **पूर्वसूचना ऐकली असती तर असं झालं नसतं** |
| ५. | “तरीच! तो आणि ती सारखे एकत्र फिरत असतात.” | **म्हणूनच** |

**ख. योग्य जागी ‘तर’, ‘तरच’, ‘तरी’ किंवा ‘तरीही’ भरून वाक्ये पूर्ण करू या.**



अ. इतका चांगला झालाय केक! भूक नसली ------------ मी खाईन.

आ. अरे, मला केक इतका आवडतो! चांगला झाला नसला ------------ मी खाईन.

इ. केक कधीच वाईट होत नाही. मी ------------ कसाही असला ------------ खाईनच.

ई. मला घरी यायला उशीर झाला ------------ तू जेवून घे.

च. मला घरी यायला खूपच उशीर झाला ------------ तू जेवून घे.

छ. संदीप वेळेवर आला ------------ आपण नाटकाला जाऊ.



ज. संदीप वेळेवर आला नाही ------------ आपण नाटकाला जाऊ.

झ. मी इतकी चांगली गायले ------------ मानवने टाळ्या वाजवल्या नाहीत.

ट. मी इतकी चांगली गायले नाही ------------ विवेकने टाळ्या वाजवल्या.



ठ. पाणी खोल आहे. पोहता येत नसलं ------------ बुडशील हं!

ड. पाणी जास्त खोल नाहीये. अगदीच पोहता येत नसेल ------------ बुडशील!

ढ. वेळेवर औषध घेतले नाहीत ------------ लवकर बरे कसे व्हाल?

ण. वेळेवर औषध घेतलेत ------------ लवकर बरे व्हाल.

**ग. लागून गेली मोठी**



टीप : जेव्हा शब्दसमूहाच्या आधी उद्गारवाचक ‘तर तर!’ वापरतात,
तेव्हा त्या विधानाला जास्त जोर येतो.

तर तर! लागून गेलास मोठा / गेलीस मोठी / गेलात मोठे / गेले मोठे / गेल्या मोठ्या / ...

तर तर! मोठा आला / आलास / मोठी आली / आलीस ...

तर तर! आला मोठा ... / आली मोठी ...

तर तर! आले मोठे ... / आल्या मोठ्या ...

तर तर! मोठा लागून गेला की नाही! / गेलास / गेलीस की नाही / मोठे लागून गेलात ... /

**घ. 'आला मोठा / आली मोठी, लागून गेलास मोठा / लागून गेलीस मोठी' योग्य जागी भरून वाक्ये पूर्ण करू या.**

क.

| |
|---|
| साहिल – मी ना, मोठा झाल्यावर खूप खूप मोठ्ठं घर बांधणार आहे. |
| सीमा – तर तर! .............. .............. घर बांधणारा! आधी दिवाळीतला किल्ला करून दाखव. |

ख.

| |
|---|
| केया – मी मोठी झाल्यावर ना, नटी होणार आहे. |
| विराट – तर तर! .............. .............. नटी होणारी! आधी आरशात तोंड बघ स्वतःचं. |

ग.

| |
|---|
| अनुपा – मी मोठी झाल्यावर सैनिक होणार आहे आणि शत्रूला पळवून लावणार आहे. |
| तेजस – .............. .............. .............. सैनिक होणारी! आधी झुरळाला घाबरणं थांबव. |

घ.

| |
|---|
| अझीझ – मी मोठा झाल्यावर प्रसिद्ध शेफ होणाराय आणि छान छान जेवण बनवणार आहे. |
| आलिया – .............. .............. .............. शेफ होणारा! आधी केळ्याची शिकरण करून दाखव. |

## ४ बिनसलेले वेळापत्रक

आमच्या कंपनीची एक खास कार्यपद्धती आहे. **सकाळी** विमानाचे तिकिट पाठवायचे आणि 'बंगळुरूला महत्त्वाची बैठक आहे' असा निरोप **संध्याकाळी** किंवा दुसऱ्या **दिवशी** पाठवायचा. माझी झोप **त्याक्षणी** उडते.




बैठकीला वेळेवर पोहोचायचे, तर **सकाळची** पहिलीच फ्लाइट पकडावी लागते. त्यासाठी **पहाटे** चार वाजताच उठावे लागते. जाग येणार नाही, गजर वाजणार नाही ह्या धास्तीने मला **रात्री** झोप लागत नाही आणि विमानात कधीच झोपता येत नाही. तारवटलेल्या डोळ्यांनी मी बंगळुरूच्या विमानतळावर उतरतो. उरलेली सकाळ तिथल्या रहदारीत संपते. बैठकीचे **सकाळचे** सत्रही जवळपास संपलेले असते.

मग **दुपारचे** जेवण. मला सपाटून भूक लागलेली असते. नकळत मी दोन घास जास्तच खातो. आता खरी परीक्षा असते. महत्त्वाच्या चर्चा हमखास **दुपारच्याच** सत्रात असतात. डोळे उघडे ठेवताना सर्वांचीच तारांबळ उडते. दुपार सरता सरत नाही. चार वाजता चहा घेता घेता सगळ्यांच्या डोक्यात परतीच्या प्रवासाचे हिशेब सुरू होतात. रस्त्यांत **संध्याकाळची** गर्दी होण्याआत विमानतळावर पोहोचता येईल का? घरी जाईपर्यंत रात्र होणार. काही तर **मध्यरात्री** पोहोचणार. **रात्रीची** रिक्षा किंवा टॅक्सी मिळणार का?



परतीचा प्रवास सुरळीत झाला, तरी ह्या एका दिवसामुळे माझे पुढच्या चार **दिवसांचे** वेळापत्रक बिनसते. ऑफिसमध्ये मी **दिवसाढवळ्या** पेंगतो आणि मध्यरात्र उलटली तरी टक्क जागा असतो.

क. वरील उताऱ्यात काही शब्द हिरव्या रंगात आहेत तर काही गुलाबी. हे शब्द कोणत्या नामापासून आले आहेत, ते ओळखू या, ते 'विशेषण' आहेत की 'क्रियाविशेषण'? विचार करू या आणि योग्य त्या रकान्यात लिहू या.

| | मूळ नाम | नामसाधित विशेषण | नामसाधित क्रियाविशेषण |
|---|---|---|---|
| १ | सकाळ | सकाळचे | सकाळी |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |
| ८ | | | |
| ९ | | | |

नामसाधित कालवाचक विशेषणे / क्रियाविशेषणे

| नाम | विशेषण | क्रियाविशेषण |
|---|---|---|
| प्रात:काळ | प्रातःकाळचा | प्रात:काळी |
| सकाळ | सकाळचा | सकाळी, सकाळला, सकाळचा |
| दुपार | दुपारचा | दुपारी, दुपारचा |
| संध्याकाळ | संध्याकाळचा | संध्याकाळी |
| सायंकाळ | सायंकाळचा | सायंकाळी |

नामसाधित कालवाचक विशेषणे / क्रियाविशेषणे सामान्यरूपासह

| नाम | विशेषण | क्रियाविशेषण |
|---|---|---|
| पहाट | पहाटेचा | पहाटे / पहाटी |
| दिवस | | |
| मध्यान्ह | मध्यान्हीचा | मध्यान्ही |
| तिन्हीसांज | | |
| रात्र | रात्रीचा | रात्री / रात्रौ |
| मध्यरात्र | | |

टीप : नाम + षष्ठी प्रत्यय = विशेषण / क्रियाविशेषण
दिवस + चा / ची / चे (चं), चे / च्या / ची

**ख. कंसातील नामापासून क्रियाविशेषण करून रिकाम्या जागा भरू या.**

**वैशाली** : मोहिनी, (दुपार) .................... चक्कर टाक जरा.

**मोहिनी** : नाही जमणार गं! (दुपार) .................... बाहेर गेले तर गरगरतं मला उन्हानं!

**वैशाली** : उगाच नखरे करू नकोस! (सकाळ) .................... हिंडतेस भाजी आणायला म्हणून, हवा खायला म्हणून (संध्याकाळ) .................... बाहेर पडतेस, (रात्र) .................... नवऱ्याबरोबर फिरायला हवं असतं तुला. मैत्रिणीसाठी एखाद्या दिवशी (दुपार) .................... निघालीस घराबाहेर तर काही होत नाही. छत्री घे आणि नीघ बरं!

**टीप** : 'दुपार' ह्या नामापासून 'दुपारी' हे क्रियाविशेषण तयार होते. बोली भाषेत 'दुपारचं', 'दुपारचा', 'दुपारची' अशी रूपेही वापरतात उदा. "दुपारची बाहेर पडू नकोस."
**ह्याचप्रमाणे** : संध्याकाळची, पहाटेची, रात्रीची इ.



**ग. कंसातील नामापासून क्रियाविशेषण करून रिकाम्या जागा भरू या.**

अ. गावी गेलं की आईचा नेहमी सल्ला असे : "असा (तिन्हीसांज) .................... घराबाहेर पडू नकोस. गावात रस्त्यावर दिवे नसतात. काही साप-किरडू पायाखाली आलं तर?"

आ. आजी (सकाळ) .................... बराच वेळ घरकामात असतात. (दुपार) .................... काय करावं ते त्यांना कळत नाही. (संध्याकाळ) .................... टीव्ही बघण्यात वेळ जातो.

इ. (रात्र) .................... डोळ्याला डोळा लागत नाही. बिचाऱ्या ह्या कुशीवरून त्या कुशीवर करत असतात. (पहाट) .................... जरा डोळा लागणार तोच घरात गडबड चालू होते आणि त्यांना उठावंच लागतं.

**घ. पुढील वाक्यांमध्ये रिकाम्या सोडलेल्या जागेत लिहिण्यासाठी योग्य अर्थाचे शब्द वरील उताऱ्यात आहेत, ते शोधू या आणि वाक्ये पूर्ण करू या.**



अ. दरवेळी परदेशातून आल्यावर दोन-तीन दिवस संदीपच्या कामाचं .................... .................... .

आ. त्या दिवशी कडेवर सहा महिन्यांचा प्रणव, एका खांद्यावर दोन जड पिशव्या, एका हातात मोबाईल, पर्स आणि दुसऱ्या हातात छत्री घेऊन धो धो पावसात गाडीमध्ये चढताना माझी अशी काही .................... .................... की विचारू नका. पण नशीब माझं, प्रवास मात्र ....................पार पडला.



इ. "अमेय, अरे काय हे! डोळे बघ तुझे! झोपलाच नाहीस का रात्री? अशा .................... .................... परीक्षेचा पेपर कसा लिहिशील?"

ई. पिलू दिवसभर झोप काढतो आणि रात्री .................... .................... . त्याला खेळायचं असतं आणि त्याच्या आईला झोपायचं असतं.

उ. बारावीनंतर मी एक वर्षाची सुटी घेतली; वर्षभर .................... व्यायाम केला, तब्येत सुधारली आणि मगच कॉलेजात प्रवेश घेतला.

ऊ. परवाचं श्रीखंड इतकं शिल्लक आहे, की आम्ही सकाळ-संध्याकाळ तेच खातो आहोत; पण अजूनही ते ------------------------------------------ नाहीये. गोड खाऊन खाऊन कामाच्या ठिकाणीही सगळे ------------------------------------------ असतो.



## ५ आमचा तन्मय



आमच्या तन्मयने एकदा काही ठरवलं की ठरवलं. मग काहीही झालं तरी तो ते करणारच. आणि तो काय करणार आहे ह्याबाबतीत तो कोणालाही संभ्रमात ठेवत नाही. बरं, आपल्याला काय करायचं आहे हे सांगतानाही त्याचा निग्रही स्वभाव दिसून येतो. आजच बघा ना, सकाळी उठल्या उठल्या तो म्हणाला, "आज मी डब्यात लाडू **नेणार**."

'डब्यात लाडू नेऊ का?, डब्यात लाडू देशील का?' असले प्रश्न तर तो विचारतच नाही. जरा मवाळपणे '**नेणार आहे** हं' असंही तो म्हणणार नाही. एकदम एक ठाम निर्णय ऐकवतो. एवढासा चार वर्षांचा पोर, पण आपले गोबरे गाल आणि नकटं नाक फुगवून बोलायला लागला की मी अगदी विरघळतेच. 'नाही **देणार**!' असं काही मी म्हणत नाही. "चिवडा चालेल का? लाडू संपलेयत," मी हळूच सुचवते.

"**खाणार** नाही," तन्मय म्हणतो. "माझं आज सगळं ठरलंय. बाबा मला शाळेत **सोडणार**, मी डब्यात लाडू **नेणार**, घरी आल्यावर चॉकोलेट घालून दूध **पिणार** आणि रात्री आजीजवळ **झोपणार** आणि गोष्ट **ऐकणार**."

"बरं बरं, चालेल. पण आधी मी ह्या गोबऱ्या गालांची पापी **घेणार** म्हणजे **घेणार**," त्याला जवळ ओढत त्याच्याच सुरात मी म्हणते आणि डबा भरायला स्वयंपाकघराकडे वळते.

> उद्देशार्थक काळ म्हणजे - कर्त्याचा एखादी कृती करण्यामागचा उद्देश अथवा संभाव्यता दाखवणारा काळ. वरील परिच्छेदात हिरव्या रंगात दाखवलेली रूपे ह्याच काळात आहेत.
>
> उद्देशार्थक काळ = धातू + णार + असणे
>
> उदा॰ केशव बसणार आहे. (वर्त॰)
> केशव बसणार होता. (भूत॰)
> केशव बसणार असेल. (भवि॰)
>
> 
>
> कर्त्याने जर साहाय्यक क्रियापदाचा वापर केला नाही, तर कृती करण्यामागील उद्देश पक्का असल्याचे आणि ती करण्याची शक्यता अधिक असल्याचे स्पष्ट होते.
>
> उदा॰ केशव काम करणार.

**क. वरील परिच्छेदात आलेली उद्देशार्थक काळातील सर्व रूपे खालील तक्त्यात भरू या.**

**ख. आई तर तिच्या निर्णयावर अधिकच ठाम आहे. 'म्हणजे' वापरून ती तिच्या निर्णयाची द्विरुक्ती करतेय! सर्व क्रियापदांचे तसेही रूप करून तिसऱ्या रकान्यात भरू या.**

| | धातू + णार + असणे | धातू + णार | धातू + णार + म्हणजे + द्विरुक्ती |
|---|---|---|---|
| अ. | नेणार आहे | नेणार | नेणार म्हणजे नेणार |
| आ. | | | |
| इ. | | | |
| ई. | | | |
| उ. | | | |
| ऊ. | | | |
| ए. | | | |
| ॲ. | | | |

**घ. दिलेले शब्द वापरून उद्देशार्थक वाक्ये बनवू या.**

उदा॰ मी, सिनेमा, आज, पाहणे – मी आज सिनेमा पाहणार आहे. मी आज सिनेमा पाहणार.

अ. दिनेश, देणे, प्रवेशपरीक्षा, वैद्यकीय अभासक्रम.

---

आ. लवकरच, नवे पुस्तक, प्रकाशन, होणे.

---

इ. आम्ही, लेह-लडाख, पुढील वर्ष, जाणे.

---

ई. क्षितिज, लग्नाआधी, शिकणे, स्वयंपाक.

---

उ. आज, आईला पत्र, लिहिणे, मी.

---

## व्यक्तिपरिचय –

**शिल्पकार गणपत काशिनाथ म्हात्रे (१८७६-१९४७)**

ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थिर झाली आणि चित्र, शिल्प ह्यांसारख्या दृश्यकलांच्या क्षेत्रात आधुनिकतेचे – म्हणजे अर्थातच युरोपीय कलाविचारांचे – वारे वाहू लागले, कलाविद्यालये स्थापन झाली. तिथल्या कलाशिक्षणातून देशी परंपरा जवळपास हद्दपार झाली आणि युरोपीय वास्तववादाला महत्त्व आले. तरीही, काही कलाकारांनी ही नवी आणि परकी कलाशैली उत्तम प्रकारे आत्मसात केली आणि त्या शैलीतूनही आपली भारतीय संवेदना व्यक्त केली. अशा कलाकारांच्या पहिल्या रांगेत गणपत काशिनाथ म्हात्रे ह्या शिल्पकाराचे नाव घ्यावे लागते. चित्रकलेत राजा रविवर्मा ह्यांचे जे महत्त्व आणि स्थान आहे तेच शिल्पकलेत म्हात्र्यांचे आहे. आधुनिक काळातले पहिले अभिजात आणि प्रतिभावंत कलाकार असे त्यांचे वर्णन केले जाते.

गणपतराव म्हात्रे ह्यांचा जन्म पुण्यात झाला, पण वडिलांना मुंबईत नोकरी मिळाल्याने म्हात्रे कुटुंब मुंबईकर झाले. गणपतरावांच्या आईच्या हातात उत्तम कलाकुसर होती. त्यांचे काका आणि थोरले बंधू द्वारकानाथ मातीच्या मूर्ती करत. त्यामुळे गणपतराव लहानपणापासूनच रंगरेषांशी आणि मातीशी खेळले. त्यांचा कल ओळखून वडिलांनी त्यांना वयाच्या पंधराव्या वर्षीच सर ज.जी. कलाविद्यालयात दाखल केले. तेव्हा शिल्पविभागात शिक्षक उपलब्ध नसल्याने त्यांनी चित्रकलेचा अभ्यास सुरू केला. अनेक पुरस्कारही मिळवले.



अखेरच्या वर्षात असताना म्हात्रे बरेच दिवस वर्गात गैरहजर राहिले. प्राचार्यांनी एक दिवस त्यांना त्याचे कारण विचारले, तेव्हा म्हात्रे त्यांना शिल्पविभागात घेऊन गेले आणि गैरहजेरीच्या काळात केलेले 'मंदिरपथगामिनी' (देवळाकडे जाणारी स्त्री) हे शिल्प दाखवले. प्राचार्य अक्षरशः स्तिमित झाले. म्हात्र्यांनी वयाच्या केवळ एकोणिसाव्या वर्षी, शिल्पकलेचे औपचारिक शिक्षण न घेता केलेल्या त्या पूर्णाकृती शिल्पाने महाराष्ट्राच्याच नव्हे, तर संपूर्ण देशाच्याच कलाजगतात खळबळ उडवली. राजा रविवर्मा म्हणाले, 'ह्या देशात निर्माण झालेले आणि मी पाहिलेले हे सर्वांत मनोहर शिल्प आहे.' रवीन्द्रनाथ टागोरांनी दोन लेख लिहून प्रकाशित केले. ते म्हणतात, 'म्हात्रे ह्यांच्या शिल्पकृतीची दोन छायाचित्रे पुनःपुन्हा पाहूनही आमच्या मनाची तृप्ती होत नाही.' लंडनमधील वृत्तपत्रांनी आणि कलासमीक्षकांनीही ह्या कलाकृतीची ठळक दखल घेतली.

म्हात्र्यांच्या ह्या एकाच शिल्पाने भारतीय कलाक्षेत्रात खरेच इतिहास घडवला. पाश्चिमात्य कलाशैली, तंत्र आणि अस्सल भारतीय विषय ह्यांचा त्यात साधलेला उत्कृष्ट मेळ, हे त्याचे कारण होते. 'आमच्या स्त्रीरूपाचा जो आदर्श पाहण्यासाठी आम्ही अतिशय उत्सुक होतो, ती प्रतिमा आता साकार झाली आहे', असे रवीन्द्रनाथांनी आपल्या लेखात म्हटले आहे. त्यापूर्वी शिल्पे, विशेषत: स्मारकशिल्पे घडवण्यासाठी परदेशातूनच कलाकार बोलावले जात. परंतु आता देशातील संस्थानिक, नेते, उद्योगपती, ब्रिटिश अधिकारी वगैरेंसाठी शिल्पे घडवण्याचे काम म्हात्रे आणि इतर गुणी भारतीयांना मिळू लागले. म्हात्रे ह्यांनी केलेली अनेक व्यक्तिशिल्पे देशभर विखुरलेली आहेत. मुंबईच्या चर्चगेट परिसरात आजही त्यांनी केलेले न्यायमूर्ती रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचे पूर्णाकृती पुतळे पाहायला मिळतात.

१९२९ साली इंग्रज सरकारने 'रावबहादूर' हा किताब देऊन गणपतरावांचा गौरव केला. त्यांनी अनेक वर्षे सर ज.जी. कलाविद्यालयात शिक्षक म्हणूनही काम केले. पुढच्या पिढीतील बाळाजी तालीम, विनायक करमरकर, गोरेगावकर बंधू आणि स्वतःचेच चिरंजीव श्यामराव म्हात्रे

असे गुणी विद्यार्थी तयार केले.

३० एप्रिल, १९४७ रोजी वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी गणपतराव म्हात्रे ह्यांचे निधन झाले.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो मनोविनोद, ते - | ती घोडेस्वारी, त्या स्वाऱ्या | ते सत्र, ती सत्रे / सत्रं |
| तो फणकारा, ते फणकारे | ती हस्तकला, त्या - | ते स्तंभलेखन |
| तो निग्रह, ते - | ती शेरेबाजी, त्या शेरेबाज्या | ते वळण, ती वळणे / वळणं |
| तो संभ्रम, ते - | ती टिंगलटवाळी, त्या टिंगलटवाळ्या | ते रूपांतर, ती रूपांतरे / रूपांतरं |
| तो विराम, ते विराम | ती कार्यपद्धती, त्या - | ते जागरण, ती जागरणे / जागरणं |
| तो शोधनिबंध, ते - | ती बैठक, त्या बैठका | |
| तो विसावा | ती कुवत, - | |
| तो त्रागा | ती द्विरुक्ती, त्या द्विरुक्त्या | |
| | ती तिन्हीसांज, त्या तिन्हीसांजा | |

## क्रियापद

डुगडुगणे, चाळणे (पुस्तक / कागद इ.), झटकणे (केस / टॉवेल / आरोप / आळस इ.), वैतागणे



## विशेषण

जीर्ण, झंगड

## क्रियाविशेषण

फिसकन, सकाळी, संध्याकाळी, दुपारी, पहाटे, रात्री, सांजवेळी, गडप, चौफेर, बेजार, तरातरा, झुंजूमुंजू

## म्हणी आणि वाक्प्रचार

डोळे मोठे करणे, ...नक्षत्रावर जन्माला येणे, डोळ्याला डोळा न लागणे, डोळे भरून येणे, दिवस काढणे / ढकलणे, दिवस चढणे / डोईवर येणे / माथ्यावर येणे, दिवस भरणे, दिवस फिरणे, दिवसाढवळ्या स्वप्न पाहणे, दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करणे, सकाळी उठून एखाद्याचे तोंड बघणे, झुंजूमुंजू होणे, सावली पायाखाली येणे

## नाम / इतर शब्द + क्रियापद

| | |
|---|---|
| **शेरेबाजी करणे** | "नाटक फालतू आहे, पोरकट आहे अशी नुसती शेरेबाजी करू नका; कारणं स्पष्ट करा." |
| **वाटप करणे** | शासकीय अधिकाऱ्यांनी पूरग्रस्तांना धान्याचे वाटप अतिशय शिस्तबद्ध रीतीने केले. |
| **हेतू बाळगणे** | "तुम्ही एकमेकांचे दोष दाखवण्याचाच हेतू मनात बाळगला आहे का? मग प्रश्न सुटणं कठीण आहे." |
| **रस असणे / घेणे / वाटणे** | शिक्षकांना शिकवण्यात रस असतो म्हणून मुलांना शिकण्यात रस वाटतो. पालकांनीही शाळेच्या कामात रस घेतला तर आम्हाला आनंद वाटेल. |
| **गंमत असणे / घेणे / वाटणे** | अवघड विषय हळूहळू समजून घेण्यात गंमत असते. कोडे सोडवण्यात जशी गंमत वाटते तशी गंमत गणित सोडवण्यात घेता आली पाहिजे. |
| **अर्थ असणे / घेणे** | "बोरगांवकरांशी बोलण्यात काही अर्थ असतो का? कुठल्याही मुद्द्याचा ते उलटाच अर्थ घेतात आणि वाद घालतात." |
| **गती असणे** | आपल्याला कशात गती आहे हे जोपर्यंत तुलाच समजत नाही तोपर्यंत मी तुला मदत करू शकणार नाही. |
| **आळस झटकणे** | "परशा, तत्त्वचिंतन पुरे झालं. आता आळस झटक आणि काम सुरू कर." |
| **मुहूर्त चुकणे** | वडिलांच्या आजारपणामुळे पुस्तक प्रकाशनाचा दसऱ्याचा मुहूर्त चुकला. |
| **दृढनिश्चय करणे** | एक जानेवारीला नव्या घरी राहायला जायचंच असा दृढनिश्चय आम्ही केला. |
| **सवय मोडणे / लागणे** | आपल्या अपयशासाठी दुसऱ्याला जबाबदार ठरवण्याची तुला सवय लागली आहे, ती अगोदर मोड. |
| **डोळा लागणे** | पाचच मिनिटे माझा डोळा लागला, तेवढ्यात खिडकीतून दोन कबुतरे घरात शिरली. |
| **गडप होणे** | भूकंपात कोसळलेल्या दरडींखाली संपूर्ण वस्ती गडप झाली. |
| **भूक भागवणे** | शास्त्रीय संगीत ऐकण्याची भूक भागवण्यासाठी शरद दरवर्षी भारतात येतो. |
| **संभ्रमात ठेवणे** | "डॉक्टर, मला खरं काय ते स्पष्ट सांगा; संभ्रमात ठेवू नका." |
| **बेजार होणे** | तारामावशी कालपासून उलट्यांनी बेजार झाली आहे. |
| **हताश होणे / करणे** | एम. ए. च्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका वाचून मी हताश झालो आहे. |
| **ठाम असणे** | "गिरीशला काही पटवून देण्याच्या भानगडीत पडू नकोस, काही उपयोग होणार नाही. तो त्याच्या मतावर नेहमी ठाम असतो." |
| **सहमत असणे** | "तुझ्या विचारांशी मी सहमत आहे, पण तू घाईनं निर्णय घेऊ नयेस असं मला वाटतं." |

## आता मला हे येतं...

**फावला वेळ, विरंगुळा ह्याची गरज व महत्त्व**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'लागणे'चे विविध उपयोग**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**क्रियापद नाम + सप्तमी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'तर' चे विविध उपयोग**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**नामसाधित कालवाचक विशेषणे व क्रियाविशेषणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**उद्देशार्थक काळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# भेटीगाठी ३



## चला, शिकू या...

- भेटीगाठींचे महत्त्व
- लक्षात राहिलेली भेट / लक्षात राहिलेल्या भेटी
- औपचारिक / अनौपचारिक भेट
- पत्रांद्वारे होणाऱ्या भेटी ते आजच्या आभासी भेटी
- क्रियापद + द्वितीया
- प्रयोग (मुख्य प्रकार)
- परिणामबोधक अव्यये
- कालवाचक क्रियाविशेषणे : आता, अजून, अजूनही, अखेर, एरवी इ.

## १ अड्डा, कट्टा, नाका, चव्हाटा, पार, चावडी इत्यादी ...

माणसे काही कारण नसताना एकमेकांना नियमितपणे जिथे भेटतात आणि तिथेच रमतात, अशी ही काही ठिकाणे. तरुणांच्या भाषेत सांगायचे, तर एक कप चहा चार जणांमध्ये वाटून घेऊन



तासन्तास 'पडीक असण्याच्या' जागा. कोण किती वाजता कुठे भेटेल हे त्यांच्या घरच्यांना ठाऊक नसेल – किंवा बऱ्याचदा नसतेच; पण बाकी सगळ्या जगाला बरोबर माहीत असते. अगदी पोस्टमनलासुद्धा. स्वतःच्या घराची माणसाला जेवढी ओढ असते, त्यापेक्षा जरा जास्तच ह्या जागांची असते असे म्हटले, तर ते चुकीचे ठरणार नाही. तिकडे जाताना पावले वाऱ्याचा वेग पकडतात; तीच तिथून निघताना मात्र मणामणाचे ओझे वाहून नेत असल्यासारखी जड होतात. घरून येणाऱ्या निरोपांना 'आलोच!', 'निघालोच आहे!', 'तुम्ही सुरुवात करा जेवायला, मी पोहोचतोच तोपर्यंत ...' अशी उत्तरे दिली जातात आणि निघण्याचा क्षण जमेल तेवढा पुढे ढकलण्याचे केविलवाणे प्रयत्न केले जातात. अखेर मन तिथेच सोडून देह घराची वाट धरतो.



समानशील मित्रांबरोबर वेळ घालवण्यासाठी, मोकळेपणे वागण्या-बोलण्यासाठी, भांडण्यासाठी, जे समोर नसतात त्यांच्या कुचाळक्या करण्यासाठी अशा जागांची माणसाला गरज असते; नेहमीच होती आणि काळाने बदलांची कितीही वळणे घेतली तरी पुढेही असणार आहे. ह्यालाच हल्ली स्वतःची 'स्पेस' असणे म्हणत असावेत. आता तर ही 'स्पेस' शोधायला उठून कुठे जावेही लागत नाही. तो अमकातमका 'दिवसभर फेसबुकवर पडीक असतो' अशासारखी विधाने सर्रास ऐकू येतात. ह्या अड्ड्यांचे सदस्य जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात असू शकतात. प्रत्यक्षातले अड्डे रात्री उशिरा का होईना, बंद तरी होतात. पण हे आभासी अड्डे चोवीसपैकी पंचवीस तास उघडेच असतात. त्यावर पडीक असणाऱ्या एखाद्याच्या किंवा एखादीच्या सादेला प्रतिसाद देण्यातली त्यांची तत्परता पाहिली, की हे लोक काम कधी करतात असा प्रश्न पडतो.

ते काहीही असले, तरी काळाबरोबर एक बरा आणि अटळ बदल झाल्याचेही लक्षात



येते. पूर्वी बायकांना अशा अड्ड्यांवर जाण्याची तर सोडाच, पण त्यांच्यासमोरून जा-ये करण्याचीही सोय नव्हती. अर्थात त्यांचे वेगळे अड्डे असायचेच. अभिजनवर्गातल्या महिलांसाठी क्लब, महिलामंडळे असत, तर इतर बायका चाळीतल्या जिन्यांमध्ये, वाड्यांच्या देवड्यांवर, सार्वजनिक नळापाशी, देवळांमध्ये आपले अड्डे जमवत. आज मात्र पुरुषांच्या बरोबरीने बायका, विशेषतः तरुण मुलांबरोबर मुलीही वेगवेगळ्या अड्ड्यांवर रमताना, मोकळेपणाने हसताबोलताना दिसतात. थोडक्यात काय, तर प्रत्यक्ष असोत की आभासी, अड्डे अमर आहेत.

**क. खाली पहिल्या रकान्यात भेटण्याची जागा आणि शेजारीच त्या जागेचे एक चित्र दिले आहे. दुसऱ्या रकान्यातील त्यांचे अर्थ मात्र खालीवर झाले आहेत. उदाहरणाप्रमाणे चित्र आणि भेटण्याच्या जागेशी योग्य अर्थाची जोडी लावू या.**

| | भेटण्याची जागा | | अर्थ |
|---|---|---|---|
| अ. | तो अड्डा |  | १. मोठ्या वृक्षाच्या बुंध्याभोवती बसण्यासाठी बांधलेला वर्तुळाकार कट्टा |
| आ. | तो कट्टा |  | २. चार रस्ते जिथे मिळतात ती जागा |
| इ. | तो नाका / ते नाके |  | ३. - लहान गावातली पोलीसचौकी<br>- गावाचा कारभार जिथून चालतो ते कार्यालय |
| ई. | तो चव्हाटा / चवाठा / चौक |  | ४. काही जणांना सहज बसता येईल अशी – कधी कधी मुद्दाम बांधलेली जागा. |
| उ. | तो पार |  | ५. मोकळ्या वेळात गप्पा मारण्यासाठी किंवा विरंगुळ्यासाठी माणसे नेहमी भेटतात अशी कोणतीही जागा. |
| ऊ. | ती चावडी |  | ६. - गल्लीत जिथून प्रवेश होतो किंवा गल्ली जिथे संपते अशी लोकांनी एकत्र येण्याची जागा.<br>- गल्लीचा कोपरा. |

**ख. प्रत्यक्षातील भेटण्याच्या जागा आणि आभासी भेटण्याच्या जागा ह्यांत कोणता फरक दिसतो?**

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

**ग. चर्चा करू या.**

अ. उताऱ्याच्या शीर्षकामध्ये जे स्थलदर्शक शब्द आहेत, त्या सर्वांचा उपयोग एकाच कारणासाठी होत असला, तरी त्यांचे स्वरूप आणि समाजातले स्थान मात्र वेगवेगळे आहे. कसे, त्याबद्दल वर्गात शिक्षक / शिक्षिकेच्या मदतीने चर्चा करू या.

आ. 'पडीक' असण्याची तुमची जागा कोणती? एकच आहे की अनेक आहेत?

इ. अशा जागांचे उताऱ्यामध्ये केलेले वर्णन आणि तुमचे स्वतःचे अनुभव, ह्यांत काही फरक आहेत का?

ई. माणसाला अशा जागांची गरज असते हे विधान स्पष्ट करू शकणारी आणि तुम्हाला पटलेली उताऱ्यातील दोन वाक्ये निवडून त्याबद्दल बोलू या.

उ. पडीक असण्याबरोबरच तिथे पुढील उद्योगांपैकी तुम्ही कोणकोणते उद्योग करता?

भेटणे, गप्पा मारणे, भांडणे, वेळ घालवणे, ओळखी करून घेणे, रमणे, वाद घालणे, चर्चा करणे, खाणेपिणे, नवनिर्मिती करणे, ताणमुक्त होणे, मन मोकळे करणे, समस्यांपासून पळ काढणे, आळस करणे, विचारांची देवघेव करणे, टिंगलटवाळी करणे, उखाळ्यापाखाळ्या काढणे, नवे अनुभवणे, माणसे वाचणे, स्वतःकडे पाहणे



## २ प्रयोग (voice)

मोहित : बाबा, आम्हाला ना, इतके दिवस शास्त्रातले प्रयोगच शिकवत होते शाळेत. आज सर म्हणाले की, मी मराठी भाषेतले प्रयोग शिकवणार आहे. म्हणजे काय हो, बाबा?

बाबा : हं! मलापण खूप दिवस झाले हे शिकून. मला जितकं आठवतंय ते आधी सांगतो. मला सांग, तू रोज काय करतोस?




मोहित : मी शाळेत जातो.

बाबा : आणि मेधा काय करते?

मोहित : ती शाळेत जाते.

बाबा : डब्यात तुला कोणता खाऊ आवडतो?

मोहित : मला जिलबी आवडते.

बाबा : आणि मेधाला?

मोहित : तिला लाडू आवडतो.

बाबा : बरोबर! तू मुलगा आहेस म्हणून '<u>मी</u> शाळेत <u>जातो</u>' असं म्हणालास आणि मेधा मुलगी आहे '<u>ती</u> शाळेत <u>जाते</u>' असं म्हणालास. पण तू मुलगा आहेस म्हणून '<u>मला जिलबी आवडतो</u>' असं नाही म्हणालास. तसंच '<u>मेधाला लाडू आवडते</u>' असंही नाही म्हणालास. असं का? तेच मराठी भाषेतील प्रयोग सांगतात. चल, आपण ह्या पुस्तकातच पाहू या.

**क. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे पुढे दिलेल्या वाक्यांतील कर्ता, कर्म आणि क्रियापद तक्त्यात भरू या आणि क्रियापद कशाप्रमाणे बदलते ते लिहू या.**

अ. बाबा वर्तमानपत्र वाचतात.
आ. मिथिला कादंबरी वाचते.
इ. रोहित कोणता तरी लेख वाचतो.
ई. आई पाककृती वाचते.

| | कर्ता | कर्म | क्रियापद | क्रियापद कशाप्रमाणे बदलले? |
|---|---|---|---|---|
| उदा० अ. | बाबा | वर्तमानपत्र | वाचतात | कर्त्याप्रमाणे बदलले |
| आ. | | | | |
| इ. | | | | |
| ई. | | | | |



अ. मृण्मयीने पिझ्झा खाल्ला.
आ. बाबूने जिलबी खाल्ली.
इ. अधिराजने चॉकलेट खाल्ले.
ई. बाबूने जिलब्या खाल्लया.

| | कर्ता | कर्म | क्रियापद | क्रियापद कशाप्रमाणे बदलले? |
|---|---|---|---|---|
| अ. | | | | |
| आ. | | | | |
| इ. | | | | |
| ई. | | | | |

अ. शिक्षकाने विद्यार्थ्याला बोलावले.
आ. शिक्षकाने विद्यार्थिनीला बोलावले.
इ. शिक्षिकेने विद्यार्थ्याला बोलावले.
ई. शिक्षिकेने विद्यार्थिनीला बोलावले.

| | कर्ता | कर्म | क्रियापद | क्रियापद कशाप्रमाणे बदलले? |
|---|---|---|---|---|
| अ. | | | | |
| आ. | | | | |
| इ. | | | | |
| ई. | | | | |

**कर्ता आणि कर्म ह्यांचा क्रियापदावर होणारा किंवा न होणारा परिणाम म्हणजे प्रयोग.**

अ. खालील उताऱ्यात क्रियापद कशाप्रमाणे बदलले? कर्त्याप्रमाणे की कर्माप्रमाणे?

सकाळी बाबा चहा करतो. मग तो बाजारातून भाज्या आणतो. आई स्वयंपाक करते. मी तिला मदत करतो. मी भाज्या चिरतो आणि कणिक मळतो. आई भाज्यांना फोडणी देते. मग ती पोळ्या लाटते. मी पोळ्यांना तूप लावतो. माझा धाकटा भाऊ कुकरमध्ये डाळ आणि भात शिजवतो. शिवाय कोशिंबीरही करतो. मग आम्ही दोघे आमचे डबे भरतो आणि शाळेला जातो.



आ. आता हाच उतारा भूतकाळामध्ये लिहू या.

सकाळी बाबाने चहा केला. मग त्याने बाजारातून भाज्या आणल्या. ----------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

इ. यात कोणकोणते बदल करावे लागले आहेत ते अधोरेखित करून मग वर्गात चर्चा करू या.

ई. कर्त्याच्या रूपातील बदलाबाबत काही गोष्टी तुमच्या लक्षात आल्या का? कोणत्या?

कर्त्याप्रमाणे / कर्माप्रमाणे बदल / तटस्थ
(हिरवा रंग – कर्त्याप्रमाणे बदल, निळा रंग – कर्माप्रमाणे बदल, गुलाबी रंग – तटस्थ)

| | |
|---|---|
| मनोज सिनेमा पाहतो.<br>वैशाली सिनेमा पाहते.<br>बाळ सिनेमा पाहते / पाहतं.<br>लोक सिनेमा पाहतात. | } कर्ता बदलला की क्रियापदाचे रूप बदलते. (कर्तरी प्रयोग) |

| | |
|---|---|
| रामने आंबा खाल्ला.<br>रामने आंबे खाल्ले.<br>रामने कैरी खाल्ली.<br>रामने लोणचे खाल्ले / लोणचं खाल्लं. | } कर्म बदलले की क्रियापदाचे रूप बदलते. (कर्मणी प्रयोग) |

भावे प्रयोगात क्रियापद बदलत नाही. ते नेहमी तृतीय पुरुषी, एकवचनी व नपुंसकलिंगी असते.

| अकर्मक | सकर्मक | भावे प्रयोग |
|---|---|---|
| शिक्षकाने वेळेवर शाळेत यावे.<br>शिक्षिकेने वेळेवर शाळेत यावे. | शिक्षकाने विद्यार्थ्याला बोलावले.<br>शिक्षकांनी विद्यार्थ्याला बोलावले.<br>शिक्षिकेने विद्यार्थ्याला बोलावले.<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बोलावले.<br>शिक्षकांनी विद्यार्थिनींना बोलावले. | कर्ता किंवा कर्म काहीही बदलले तरी क्रियापदाच्या रूपात बदल होत नाही. |

मराठीत क्रियापदाचे रूप बरेचदा कर्त्याप्रमाणे चालते.
मात्र पुढील रचनांमध्ये सकर्मक क्रियापद कर्माप्रमाणे चालते.

१. सामान्य भूतकाळ (Simple Past Tense) २. कोणताही पूर्ण काळ (Any Perfect Tense)

**कर्त्याप्रमाणे / कर्माप्रमाणे बदल**

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| सामान्य | मी पत्र लिहितो / लिहिते. | मी पत्र लिहिले. | मी पत्र लिहीन. |
| | तू पत्र लिहितोस / लिहितेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिता. | तू पत्र लिहिलेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिले / त. | तू पत्र लिहिशील.<br>तुम्ही / आपण पत्र लिहाल. |
| | भाऊ मुलाला पत्र लिहितो. | भावाने मुलाला पत्र लिहिले. | भाऊ मुलाला पत्र लिहील. |
| अपूर्ण | मी पत्र लिहीत आहे. | मी पत्र लिहीत होतो / होते. | मी पत्र लिहीत असेन. |
| | तू पत्र लिहीत आहेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत आहात. | तू पत्र लिहीत होतास / होतीस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत होता / त. | तू पत्र लिहीत असशील.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत असाल. |
| | भाऊ मुलाला पत्र लिहीत आहे. | भाऊ मुलाला पत्र लिहीत होता. | भाऊ मुलाला पत्र लिहीत असेल. |
| पूर्ण | मी पत्र लिहिले आहे. | मी पत्र लिहिले होते. | मी पत्र लिहिले असेल. |
| | तू पत्र लिहिले आहेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिले आहे / त. | तू पत्र लिहिले होतेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिले होते / त. | तू पत्र लिहिले असशील. |
| | भावाने मुलाला पत्र लिहिले आहे. | भावाने मुलाला पत्र लिहिले होते. | भावाने मुलाला पत्र लिहिले असेल. |
| रीति | मी पत्र लिहीत असतो / असते. | मी पत्र लिहीत असे. | मी पत्र लिहीत राहीन. |
| | तू पत्र लिहीत असतोस / असतेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत असता. | तू पत्र लिहीत असायचास / असायचीस / असस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत असायचात / असा. | तू पत्र लिहीत राहशील.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत राहाल. |
| | भाऊ मुलाला पत्र लिहीत असतो. | भाऊ मुलाला पत्र लिहीत असे. | भाऊ मुलाला पत्र लिहीत असेल. |

व्याकरण

अपवाद – खालील क्रियापदे सकर्मक असूनही कर्त्याप्रमाणे चालतात.

| १. प्रत्यक्ष कर्म | | २. अप्रत्यक्ष कर्म | |
|---|---|---|---|
| शिकणे<br>खेळणे<br>बोलणे<br>विसरणे<br>पिणे, नेसणे | मी मराठी शिकलो.<br>ती कबड्डी खेळली.<br>ते फ्रेंच बोलले.<br>त्या छत्री घरी विसरल्या. | घाबरणे<br>भिणे<br>रागावणे<br>बोलणे | ते सापाला भ्यायले.<br>ती मुलाला रागावली.<br>त्या मुलाला खूप बोलल्या. |

**महत्त्वाचे**

- कर्म निर्जीव वस्तू असेल तर त्याला प्रत्यय लागत नाही.
  उदा. मी चित्रपट बघतो.
- कर्म मानव असेल तर त्याला द्वितीयेचा प्रत्यय लागतोच.
  उदा. मी अभिनेत्याला बघतो.
- कर्माच्या ठिकाणी मानवेतर सजीव प्राणी असेल तर त्याला द्वितीयेचा प्रत्यय वैकल्पिक असतो.
  उदा. मी घोडा / घोड्याला बघतो.

कर्त्याला आणि कर्माला अशा दोन्ही नामांना प्रत्यय असेल तर क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी आणि एकवचनी असते.

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| सामान्य | शेतकरी बैल / बैलाला बांधतो. | शेतकऱ्याने बैल / बैलाला बांधले. | शेतकरी बैल / बैलाला बांधेल. |
| अपूर्ण | शेतकरी बैल / बैलाला बांधत आहे. | शेतकऱ्याने बैल बांधला / बैलाला बांधत होता. | शेतकरी बैल / बैलाला बांधत असेल. |
| पूर्ण | शेतकऱ्याने बैल बांधला आहे. | शेतकऱ्याने बैल बांधला होता. | शेतकऱ्याने बैल बांधला असेल. |
| | शेतकऱ्याने बैलाला बांधले आहे. | शेतकऱ्याने बैलाला बांधले होते. | शेतकऱ्याने बैलाला बांधले असेल. |
| रीतीकाळ | शेतकरी बैल / बैलाला बांधत असतो. | शेतकरी बैल / बैलाला बांधत असे. | शेतकरी बैल / बैलाला बांधत असेल. |

| टीप : | |
|---|---|
| १. सकर्मक क्रियापदांचा विध्यर्थ (Transitive Potential) | मुलांनी रोज व्यायाम करावा. |
| २. सकर्मक धातू + आयचा | आम्हाला सिनेमा पाहायचा आहे. |
| ३. सकर्मक धातू + आवा + लाग | उसाच्या पिकाला जास्त पाणी द्यावं लागतं. |

**ग. वाचू या.**

**विजेचं बिल**

**अ. खालील उतारा वाचू या.**

हातातले विजेचे बिल फडकावत मी बिलभरणा केंद्रात शिरले. समोर दिसलेल्या पहिल्या माणसाला मी जरा चढ्या आवाजात म्हणाले, "मला तक्रार नोंदवायची आहे!"

तो माणूस बावरला. "तुम्ही म... मला काही म्हणालात?" त्याने चाचरत विचारले.

"होय, तुम्हालाच! तक्रार कुठे नोंदवायची?" मी आवाज आणखी चढवून विचारले.

"मला काय माहीत! मी काय महावितरणचा कर्मचारी आहे का?" तो तोंडात पुटपुटला.

"नाही का? मग तुम्ही आधीच का नाही सांगितलंत? ह्या देशात नं, लोकांच्या वेळेची किंमतच नसते कुणाला!" मी फुणफुणले.




मग मी इकडेतिकडे पहिले. एका काचेच्या खिडकीवर 'चौकशी' अशी पाटी होती. मी तरातरा तिथे गेले. काचेपलीकडे बसलेल्या बाईंना दिसेल अशा रीतीने हातातला कागद नाचवला आणि म्हणाले, "तक्रार इथंच नोंदवायची का?"

बाई खाली पाहून लिहीत होत्या. त्यांनी शांतपणे काम पूर्ण केले, पेनाचे टोपण नीट लावले, मान वर करून माझ्याकडे बघितले आणि त्या गोड हसल्या. ते पाहून माझा पारा झपकन खाली उतरला. "हं, बोला, ताई," बाई म्हणाल्या.

"हे माझं बिल आहे आणि ते चुकीचं आहे."

"हो? कशावरून?"

"अहो, उभ्या जन्मात मी एवढं बिल पाहिलेलं नाही," माझा आवाज पुन्हा चढला, "सत्तेचाळीस हजार तीनशे पंच्याऐंशी रुपये? मी एकटी राहते. एकट्या माणसाच्या घराचं एवढं बिल?"

"बघू जरा!" बाई म्हणाल्या. मी काचेखालून बिल आत सरकवले. "तुमचं मीटर कोणाच्या नावे आहे?"

"माझ्या सासूबाईंच्या. अन्नपूर्णा मोरे..."

"तुमची पिठाची गिरणी आहे का?"

"गिरणी?" मी किंचाळले. आजूबाजूच्या सर्वांचे डोळे माझ्याकडे वळले.

"अहो, बिलावर 'अन्नपूर्णा फ्लोअर मिल' असं नाव आहे म्हणून मी विचारतेय. आहे का तुमची गिरणी?" बाईंनी विचारले.



मी गोंधळले आणि शरमलेही. "नाही हो! असं नाव आहे बिलावर?" मी ओशाळून विचारले.

"एवढं मोठं बिल पाहून तुम्हाला शंका आली नाही का, ताई? तुमच्या घराच्या आसपास कुठं तरी ही गिरणी असेल. तिचं बिल चुकून तुमच्याकडे आलं आहे," असे म्हणून बाई पुन्हा गोड हसल्या आणि मी पडलेल्या चेहऱ्यानं तिथून काढता पाय घेतला.

**अ. उताऱ्यामध्ये पुढीलप्रमाणे आलेल्या वाक्यांची प्रत्येकी दोन उदाहरणे शोधून ती तक्त्यामध्ये लिहू या.**

| कर्त्याप्रमाणे क्रियापद बदलले | कर्माप्रमाणे क्रियापद बदलले | कर्ता किंवा कर्म दोन्हींप्रमाणे क्रियापद बदलले नाही. |
|---|---|---|
| | | |
| | | |

**आ. 'मी मोठ्याने म्हणाले' ह्या अर्थाची शब्दरचना असणारी पाच वाक्ये शोधून लिहू या.**




१. ..........

२. ..........

३. ..........

४. ..........

५. ..........

**इ. पुढील वाक्यांच्या अर्थाशी जुळणारी उताऱ्यातील वाक्ये शोधून लिहू या.**

१. त्याने मला अडखळत विचारले. ..........

२. तो ऐकू जाईल न जाईल अशा हळू आवाजात म्हणाला. ..........

३. माझा राग वेगाने कमी झाला. ..........

४. "मी कधीही एवढ्या मोठ्या रकमेचं बिल पाहिलेलं नाही." ..........

५. "तुमचं मीटर कोणाच्या मालकीचं आहे?" ..........

६. मी तिथून बाहेर पडले. ..........

**ई. उताऱ्यात पुढील वाक्प्रचार आहेत, ते शोधू या आणि त्यांचा उपयोग करून नवीन वाक्ये लिहू या.**

१. आवाज चढवणे. ..........

२. पारा उतरणे. ..........

३. चेहरा पडणे. ..........

४. काढता पाय घेणे. ..........

**उ. तुमचा किंवा कोणाचाही चेहरा पडल्याची तुमची एखादी आठवण लिहा किंवा वर्गात सांगा.**

व्याकरण

## ४ ग्रेट भेट

**क. पुढील चित्रफीत पाहू या आणि प्रश्नांची उत्तरे देऊ या.**



अ. मुलाखतकाराशी आमिर खान ह्यांची पहिली भेट कधी झाली होती?

आ. आमिर खान ह्यांच्या मते ते मराठी कसे बोलतात?

(१) उत्तम (२) चांगलं (३) बरं (४) वाईट

इ. आमिर खान ह्यांच्या मते भूगोल आणि भाषा ह्यांचा काय संबंध आहे?

ई. आमिर खान ह्यांच्या मते माणूस भाषेपासून दूर जातो तेव्हा तो आणखी कोणत्या गोष्टींपासून दूर जातो? किमान दोन गोष्टी सांगा.

उ. आमिर खान त्यांच्या शिक्षकांबरोबर कोणकोणत्या विषयांवर चर्चा करतात?

**ख. वाचू या.**

### आनंद अमृताचा

आम्ही पुण्यात माडीवाले कॉलनीत राहत होतो. रविवार होता. सर्व सावकाश चालले होते. दुसऱ्या चहाची भांडी विसळत असतानाच यांची बाहेरून हाक आली, "इंदू, लवकर बाहेर ये. तुला महर्षी कर्व्यांना बघायचं आहे ना?"



मी तशीच बाहेर धावत गेले. खिडकीतून पाहिले तो भिकारदास मारुतीकडून येणाऱ्या रस्त्याने एक व्यक्ती खाली मान घालून जलद पावले टाकत येत होती. घोट्याच्या वर असे साध्या पद्धतीने नेसलेले धोतर, अंगात काळपट कोट, डोक्याला टोपी, असे ते कृश बांधणीचे धोंडो केशव कर्वे येत होते. "हे धोंडो केशव कर्वे?" असे आश्चर्याने म्हणत, एका सेकंदात मी ओचा-पदर नीट केला आणि गेटशी गेले. जराशी धावतच त्यांना आडवी गेले आणि मनोभावे नमस्कार करून म्हटले, "मी बेळगावची, अहोबाईंची विद्यार्थिनी."

ते जरा स्मित करत चश्म्यातून बघत म्हणाले, "हां! हां! म्हणजे तू बनाबाईंच्या शाळेत शिकलीस. बरं, मॅट्रिकलाच थांबलीस की पुढे शिकलीस?"

मी त्यांच्या संस्थेची गृहितागमा ही पदवी घेतली नव्हती. बीए झाले होते. मी त्यांना सांगताच ते म्हणाले, "हरकत नाही. शिकलीस ना? चांगलं झालं."

ते पुढे होणार, तोच मी म्हटले, "हे आमचं घर. आपण घरी यायला पाहिजे."

त्यांना पुढे काम होते. जायची घाई होती. तेवढ्यात हेपण आले आणि आमच्या दोघांच्या आग्रहाने ते घरी आले. आरामखुर्चीवर बसले. मी त्यांच्याकडे बघतच राहिले ... पाच मिनिटे बोलणे झाल्यावर, म्हणजे तेच बोलल्यावर, कर्वे उठले; तोवर ह्यांनी कॉफी आणली.

त्यांच्या हातातील कप दूर सारत ते म्हणाले, "मी काही घेत नाही. मला आग्रह नको. पण

असं करा, या कॉफीला चार आणे पडतात – ते माझ्या आश्रमासाठी द्या म्हणजे मी कॉफी घेतली असं होईल.”

असे कुणी लोकविलक्षण बोलले की माझे मन भरून येते. घुसमटल्यासारखे वाटते. मी आणखीच गप्प राहिले. डोळे ओले होऊ लागले. हे मोठ्या आदराने कर्व्यांना म्हणाले, “आपण एकच घोट घ्या. मी मला आज शक्य ते देतो आपल्याला.”

मी बशीत थोडी कॉफी घालून त्यांच्या पुढे केली ... त्यांनी ती ओठापर्यंत नेली, घेतली नाही. बशी खाली ठेवून ते उठले. ह्यांनी कोटाच्या खिशातून एक रुपया काढून त्यांना दिला. आम्ही दोघांनी त्यांना नमस्कार केला आणि रस्त्यापर्यंत पोहोचवून घरात आलो. अगदी एका मोठ्या शक्तीने भारल्यासारखे झाले. (...)

आज जे स्वातंत्र्य, स्वावलंबन आणि सन्मान यांचे प्रवाह स्त्रीजीवनात मिसळून गेले आहेत, त्या प्रवाहांची ती गंगोत्री होती. त्यांनी जी माणसे तयार केली, त्यांच्यापैकी एकीच्या कर्तृत्वाची – बनूबाई अहो यांची – स्तुती, निंदा, नालस्ती यांच्यापलीकडे जाऊन केलेली तपःसाधना मी प्रत्यक्ष पाहिली होती. त्या उदात्त प्रेरणांचे किरण फेकणारे केंद्रस्थान आज मी प्रत्यक्ष पाहिले. (...) कॉफीच्या साध्या कपातही संस्थेचे प्रतिबिंब बघणाऱ्या त्या त्यागी, व्रतस्थ योग्याच्या दर्शनाने मन दिपून गेले होते.

**- इंदिरा संत**

नऊवारी साडी दोन पद्धतीने नेसतात. ब्राह्मणी पद्धतीने नेसलेल्या साडीला ओचा असतो. मराठमोळ्या नऊवारी साडीला काष्टा असतो पण ओचा नसतो.





अ. नामवंत कवयित्री-लेखिका इंदिरा संत आणि त्यांचे कवी-लेखक पती नारायण माधव संत ह्या दांपत्याची महर्षी कर्वे ह्यांच्याशी अचानक झालेली भेट साधारण कोणत्या काळात झाली असावी? लेखातील काही संदर्भांवरून अंदाज करता येईल का? नसल्यास मराठी विश्वकोश किंवा साहित्यकोशाची मदत घेऊन ओळखण्याचा प्रयत्न करू या.

आ. तुमची अशा एखाद्या महान व्यक्तीशी गाठ पडली आहे का? वर्गात अनुभव सांगू या.

## ५ आज अचानक गाठ पडे!



- काय? ही तीच का? नाक तसंच वाटतंय, थोडंस अपरं. रंग जरा उजळ होता का? उंची वाढतेच ह्या वयात, पण इतकी? माझ्याहून उंच झाली की ही! केस? तेव्हा घट्ट, चपचपीत दोन वेण्या असायच्या. आता हे मोकळे सोडलेले लांब, तपकिरी केस. खळी पडायची का तिच्या गालावर? की मलाच भास व्हायचा? तिच्याशी बोलू का पुढे जाऊन? खुलासा तरी होईल एकदाचा.



हा का टवकारून बघतोय माझ्याकडे? दहा मिनिटं झाली. पुरे आता. मी अजून शांत आहे, कारण चेहरा जरा ओळखीचा, कुठे तरी पाहिलेला वाटतोय. इथला तर वाटत नाहीये. मला देश सोडून इतकी वर्षं झाली; तिथला असेल का? शाळेतला? शेजारचा? बेताची उंची, जरा जाडसर अंगलट..., विरळ केस..., चश्मा... असेल का त्याला तेव्हा? आं! हा 'तो' तर नाही? 'तिसरी क'मधला? ह्या दिशेनं यायला लागलाय वाटतं. कळेलच आता.



- नाव ओळखीचं वाटलं, म्हणून ह्या सत्कारसमारंभाला आलो. परदेशात नाव कमावलेल्या भारतीयांचे सत्कार! त्या यादीत ह्याचं नाव. पण नावासारखी नावं असतात. हा तोच कशावरून? होता माझ्या वर्गात तो, माझा लाडका विद्यार्थी. खूप हुशार, चुणचुणीत, जीव लावणारा. पण किती वर्षं झाली ह्या गोष्टीला. मलाच सेवानिवृत्त होऊन वीस वर्षं होऊन गेली. स्टेजवर दिसतोय तो तोच का? साठीकडे झुकणारं वय, भारदस्त व्यक्तिमत्त्व, हुशारीचं तेज आहे चेहऱ्यावर. काय करावं? कार्यक्रम झाल्यावर द्यावी का ओळख? की कौतुक सोहळा पाहून निघून जावं?



तिसऱ्या ओळीत बसलेत ते. खूपच वयस्कर वाटतायेत. पण त्या सुरकुतलेल्या चेहेऱ्यावर तेच ओळखीचे प्रेमळ भाव आहेत. माझ्याकडेच बघतायेत. नक्कीच ते तेच आहेत. त्यांच्यामुळेच मी आज इथे आहे. कसा विसरलो मी? जावं का लगेच उठून त्यांना भेटायला? की कार्यक्रम होताच त्यांना गाठावं आणि मग आरामात खूप वेळ त्यांना भेटावं?



- का बोलावलंय पोलिसांनी परत? तो हरवला त्याला झाली बारा वर्षं. किती वेळा आले ओळख पटवायला आणि आपलाच मुलगा आहे का हे पाहायला. प्रत्येक वेळी निराशाच पदरी आली. दर वेळी भरकटलेली मुलं सापडली की बोलावतात. आज येणारच नव्हते. तेव्हा चार वर्षांचा होता तो. आज सतराचा असेल. ही समोर उभी असलेली चार मुलं. मिसरूड फुटलेली. आडनिड्या वयाची. आणि तो – तो होता कोवळा, गोबऱ्या गालांचा, बोबडं बोलणारा. कसं ओळखणार आम्ही एकमेकांना?



ह्या तीन बायका समोर उभ्या आहेत. त्यांत असेल का माझी आई? कशी होती ती? काही आठवत नाही. माझं स्वतःचं नाव फक्त लक्षात राहिलं माझ्या, बाकी काही नाही. जर ह्यांच्यापैकी कोणी ओळखलं मला, तर आमची डॉक्टरी तपासणी करतील आणि काय तो निर्णय घेतील असं म्हणाले पोलीस. पण ह्या तिघींपैकी कोणीच मला नाही ओळखू शकलं तर? सापडतील का मला माझी माणसं कधी तरी?

क. वरील तिन्ही घटना वाचल्यात ना? आपल्या सहाध्यायींशी चर्चा करून ह्यातील कोणतीही एक घटना निवडू या. ह्या घटनेत पुढे काय घडलं असेल? एक छोटा संवाद लिहून तो वर्गासमोर सादर करू या.

ख. तुमचीही अशीच अचानक, अनपेक्षितपणे कोणाशी गाठ पडली आहे का? असेल तर तो प्रसंग वर्गात सर्वांना सांगू या.

ग. वरील तिन्ही प्रसंगांत दोन्ही व्यक्ती –

(अ) एकमेकींना ओळखतील, कडकडून भेटतील, एकमेकींची विचारपूस करतील, ह्या भेटीच्या आनंदाने गहिवरून जातील, असे होऊ शकते किंवा –

(ब) त्यातील एखादी व्यक्ती दुसरीला ओळखूनही ओळख दाखवणार नाही. त्या व्यक्तीला टाळून निघून जाईल. का घडेल असं? काही तरी कारण असेलच. त्याचाच हा परिणाम असेल ना?

(अ) किंवा (ब) प्रमाणे घटना घडली असेल अशी कल्पना करू या आणि 'म्हणून, त्यामुळे' ही अव्यये वापरून वाक्ये बनवू या.

उदा॰ दुसऱ्या प्रसंगातील विद्यार्थी शिक्षकांना न भेटता, त्यांना टाळून निघून जातो. का? कारण तो विद्यार्थी खूप हुशार होता, तरी त्याने एकदा कॉपी केली होती. त्याला त्या गोष्टीची अजून लाज वाटत होती, म्हणून तो शिक्षकांना न भेटता निघून गेला.

१. (म्हणून) ------------------------------------------------

२. (त्यामुळे) ------------------------------------------------

३. (म्हणून) ------------------------------------------------

४. (त्यामुळे) ------------------------------------------------

५. (म्हणून) ------------------------------------------------

६. (त्यामुळे) ------------------------------------------------

घ. अभिनव भाषावर्गाचा सूचना फलक वाचू या आणि त्यात अधोरेखित केलेली अव्यये कशी वापरली आहेत ह्याचा विचार करू या. त्याखाली दिलेले शब्द योग्य जागी घालून व्याख्या पूर्ण करू या.

**अभिनव भाषावर्ग**

**सूचना**

सतत पडणाऱ्या पावसामुळे बस आणि रेल्वेसेवा विस्कळीत झाल्या आहेत, सबब आज आणि पुढील दोन दिवस सर्व वर्ग रद्द करीत आहोत. ह्या तीन दिवसांची भरपाई व्हावी, याकरिता पुढील तीन आठवड्यांत रविवारीही वर्ग घेतले जातील. तेव्हा सर्वांनी ह्या बदलाची नोंद घ्यावी आणि आम्हाला सहकार्य करावे ही विनंती.



शब्द : (याकरिता, सबब, तेव्हा, परिणाम, अव्ययांना, 'परिणामबोधक उभयान्वयी अव्यये', त्यामुळे)

म्हणून, सबब, ..................., ..................., ..................., ह्या ...................
'...................' असे म्हणतात. ही अव्यये पहिल्या वाक्यात जे घडले त्याचा ................... पुढील वाक्यात सुचवतात.

**परिणामबोधक अव्यये**

| अव्यय | | वाक्यात उपयोग |
|---|---|---|
| म्हणून | | वाटेत गाडी बंद पडली **म्हणून** यायला उशीर झाला. |
| त्यामुळे | | गर्दीत चुकामूक झाली **त्यामुळे** आमची भेट होऊ शकली नाही. |
| याकरिता | | कार्यक्रमाला येऊ शकणार नाही, **याकरिता** क्षमस्व. |
| तेव्हा | | उद्या मुसळधार पावसाची शक्यता आहे, **तेव्हा** उद्याची सहल रद्द करावी असं मला वाटतं. |
| सबब | | येताना गाडी बंद पडली, **सबब** मला उशीर झाला. |
| यास्तव | तस्मात् | - |
| **टीप :** यास्तव, तस्मात् ही अव्यये जुन्या साहित्यात पाहायला मिळतात. | | |

**च. योग्य ते पर्याय निवडून वाक्ये तयार करू या आणि लिहू या. (एकापेक्षा जास्त पर्याय असू शकतात)**

| | | |
|---|---|---|
| अ. मेधाला गेले दहा दिवस सतत ताप येतोय  | | ह्या महिन्यात तुम्हाला सुट्टी मिळणार नाही. |
| आ. मागील महिन्यात तुमच्या चार सुट्ट्या झाल्या | म्हणून | मी तुमची माफी मागतो. |
| इ. भर पावसात ती छत्रीशिवाय बाहेर पडली  | याकरिता | कृपया वेळेआधी दहा मिनिटे कार्यालयात यावे. |
| ई. माझ्यामुळे तुमचा संगणक बिघडला | सबब | तिला फारच अशक्तपणा आलाय. |
| उ. आजची बैठक बरोबर चार वाजता सुरू होईल | तेव्हा | तो दिवस-रात्र रियाज करत असतो. |
| ऊ. आपला गायनाचा कार्यक्रम खूप चांगला व्हावा असं विनयला वाटतं  | त्यामुळे | ती नखशिखांत भिजली. |
| | म्हणून | |

व्याकरण

उदा॰ मेधाला गेले दहा दिवस सतत ताप येतोय, म्हणून तिला फारच अशक्तपणा आलाय.

अ. ............................................................................................................................................

आ. ............................................................................................................................................

इ. ............................................................................................................................................

ई. ............................................................................................................................................

उ. ............................................................................................................................................

**छ. परिणाम दिले आहेत. कारणे स्वतःच शोधून काढू या आणि परिणामबोधक उभयान्वयी अव्यये वापरून पूर्ण वाक्ये लिहू या.**

उदा॰ अजयला धाप लागलीय. का? - अजय धावत धावत आला, म्हणून त्याला धाप लागलीय.

अ. बाई आज वर्गात शमीमला रागावल्या. का?

............................................................................................................................................

आ. जमीरचा फोन लागत नाहीये. का?

............................................................................................................................................

इ. विद्याचं अक्षर आज वाईट आलंय. का?

............................................................................................................................................

ई. गौरी सकाळपासून काहीच बोलत नाहीये. का?

............................................................................................................................................

उ. महिमा गेले दोन आठवडे दिसलीच नाही कुठे. का?

............................................................................................................................................

**ज. कारणे दिली आहेत, परिणाम काय होईल ते आपण लिहू या.**

उदा॰ आदिलची नोकरी सुटलीय, म्हणून तो काटकसरीने राहतोय.

अ. ........................................................................................................, म्हणून संकेत रडतोय.

आ. ...................................................................................................., याकरिता आम्ही प्रयत्न करतोय.

इ. ..................................................................................., सबब सर्वांची रजा रद्द करण्यात येत आहे.

ई. ...................................................................................................., त्यामुळे तो इतका वेळ झोपलाय.



उ. ........................................................................................................, तेव्हा तो लवकरच घरी येईल.

## ६ संवाद ऐकू या.

**विनंती**

**क. संवाद पुन्हा ऐकून गाळलेला शब्द रिकाम्या जागी लिहू या.**

**(अ)** .............................. **योग**

**माधव आबनावे :** नमस्कार, सर. माझं चुकत नसेल तर ... आपण विश्वास कुबेर...?

**विश्वास कुबेर :** होय. आपण...?

**माधव आबनावे :** नाही नाही, आपली ओळख नाहीये. म्हणजे कधी **(आ)** .............................. झालेली नाहीये, पण कधीपासून **(इ)** .............................. होतं. तसा मी एकदोनदा प्रयत्नही करून पाहिला, पण जमलं नाही.
आज योगायोगानं **(ई)** .............................. होतेय. मी माधव आबनावे. ह्याच विद्यापीठात शिकवतो, पण सध्या प्रबंध पूर्ण करण्यासाठी रजा घेतलीय.

**विश्वास कुबेर :** डॉक्टरेट करताहात?

**माधव आबनावे :** होय. त्याच संदर्भात **(उ)** .............................. मिळू शकेल का?

**विश्वास कुबेर :** कठीण आहे हो! दोन-तीन **(ऊ)** .............................. आधीपासूनच ठरल्या आहेत ...

**माधव आबनावे :** प्लीज, सर. अर्धाच तास. कारण पुन्हा **(ए)** .............................. योग येईल न येईल ...

**विश्वास कुबेर :** एकदम **(ऐ)** .............................. योग वगैरे! होईल हो आपली **(ओ)** ..............................; काळजी करू नका.




**माधव आबनावे :** तसं नाही, सर, पण दोन महिन्यांत मला प्रबंध पुरा करायचाय म्हणून म्हटलं.

**विश्वास कुबेर :** बरं, बरं. कधी **(अं)** .............................. या? रात्री उशिरा चालेल?

**माधव आबनावे :** किती वाजता आणि कुठं **(अः)** ..............................?

**विश्वास कुबेर :** इथंच, दहानंतर.

**माधव आबनावे :** मी पाच मिनिटं अगोदरच इथं असेन, धन्यवाद, सर!

**ख. चूक की बरोबर ?**

अ. कुबेर आणि आबनावे ह्यांची जुनी ओळख आहे. ..............................

आ. आबनावे ह्यांना डॉक्टरेटसाठी कुबेर ह्यांचे मार्गदर्शन हवे आहे. ..............................

इ. भेटण्यास कुबेरांनी स्वच्छ नकार दिला आहे. ..............................

## ७ आईला पत्र

प्रिय आई,

आत्ता माझं मेल तुला अपेक्षित नसेल ना? कारण थोड्याच वेळात आपलं बोलणं होईल फोनवर! तेही व्हिडिओ कॉलवर. आपण एकमेकींना दिसू, बोलू! तू मला वाढदिवसाच्या शुभेच्छा देशील. डोळ्यातलं पाणी लपवून माझी चौकशी करशील, वाढदिवसाचा बेत काय आहे हे विचारशील,




मला आनंदी पाहून खूश होशील आणि ह्या आभासी भेटीवर समाधान मानशील, नेहमीप्रमाणे! मी कधीही काही म्हणत नाही, पण माझाही जीव कासावीस होतोच की गं! सगळं सोडून धावत तुझ्याकडे यावं, तुझ्या कुशीत शिरावं, असं मलाही वाटतंच. पण त्याच वेळी हे इतकं सोपं नाही, सहज शक्य नाही, हेही जाणवतं. गप्प होते मी! मग आत्ताचं हे मेल? कशाला? सांगते.

आज आत्ताच कामावरून आले. येताना बंगल्याच्या दारातली पोस्टबॉक्स उघडली, आणि हातात आलं तुझं पत्र, मला लिहिलेलं. वाढदिवसासाठी शुभेच्छांचं पत्र. किती दिवसांनी असं पत्र आलंय मला! ते हातात पडलं आणि किती आनंद झाला म्हणून सांगू! असं पत्र लिहिण्यात आणि ते मिळण्यात इतका आनंद दडलेला असतो, हे आज नव्यानं लक्षात येतंय माझ्या. आजचं तुझं पत्र हातात घेताना मला तुझा हातच हातात घेतेय असं वाटलं. तुझ्या अक्षरांत मला तूच दिसत होतीस. ह्या पत्राला तुझा गंध आहे, स्पर्श आहे. आणि ही भावनाच किती छान आहे गं! ई-मेल आणि स्काईपवरच्या भेटीत ह्या गोष्टी मिळत नाहीत ना!

इथे येऊन मला चांगली वीस-बावीस वर्षं झाली. त्यावेळी मोबाईल नव्हतेच. डायरेक्ट फोनही लावता यायचा नाही. आणि लावला तर किती महाग असायचा! तेव्हा ई-मेल पाठवायचे मी रोज तुम्हाला. एखाददिवशी त्यात खंड पडला तर तू काळजीनं हैराण व्हायचीस. बरेचदा मीही पत्र लिहायची. पण हळूहळू पत्र लिहिणं कमी होत गेलं. "पत्र लिहीत जावं गं अधूनमधून!" असं तू का म्हणायचीस, ते आज एकदम लक्षात आलं! ह्या माझ्या भावना लगेच तुझ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी हे मेल. नंतर फोनवर भेटूच! हो, आणखी एक गोष्ट सांगते : ह्यापुढे मीही तुला पत्र पाठवणार! अगदी वारंवार नाही, तरी अधूनमधून माझं पत्र तुला नक्कीच मिळेल.

तुझीच

...

**टीप : वरील पत्रात लाल रंगात असलेली अव्यये क्रिया घडण्याची वेळ किंवा काळ दाखवतात, म्हणून त्यांना 'कालवाचक क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात.**

**क. खालील उताऱ्यातील रिकाम्या जागांत पुढीलपैकी योग्य ती कालवाचक क्रियाविशेषण अव्यये भरून उतारा पूर्ण करू या.**

(आता (२), त्यावेळी (२), अजूनही, आज, आजही, अखेर गेल्या आठवड्यात, आजच्या मीटिंगला, मागच्या वेळी, गेल्या काही वर्षांत, ह्यावेळी)

**माजी विद्यार्थी मेळावा**

होणार होणार म्हणून गाजत असलेला, शाळेतून १९७१ साली पास झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा चौथा मेळावा (अ) ........................ पार पडला. आमच्या वर्गात (आ) ........................ असलेल्या एकूण पंचेचाळीस विद्यार्थ्यांपैकी तेहतीस जण (इ) ........................ उपस्थित होते. आम्ही पहिला मेळावा काही वर्षांपूर्वी भरवला होता, (ई) ........................ बेचाळीस जण हजर होते. (उ) ........................ दुर्दैवाने तिघे आम्हाला सोडून गेले. आम्हाला वाटले होते, की (ऊ) ........................ हजर असलेल्यांपैकी उरलेले एकोणचाळीस जण येतील, पण बऱ्याच जणांचा उत्साह (ए) ........................ आटायला लागलाय असे दिसते. साठी उलटल्यानंतरही आपला तारुण्यातला उत्साह आणि जोम राखून ठेवणारे थोडेच असतात. (ऐ) ........................ त्याच उत्साहाने आणि जोमाने काम करणारे आणि (ओ) ........................ आपल्या वर्गमित्रांविषयी आस्था बाळगणारे आम्ही काहीच जण (औ) ........................ उरलो आहोत असे वाटते. एकूण कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी काही कार्यकर्त्यांनी (अं) ........................ भेटायचे ठरवले आहे. (अः) ........................ बघू या किती जण येतात ते!




## ८ निरोपानिरोपी

| | |
|---|---|
| क. सकाळी वेळेवर उठायला जमत नसलं, तर रात्री जागरण करू नये. मला ७.३० पर्यंत कॉलेजमध्ये पोहोचायला हवंय. न्याहारीचं तू अन् तुझा बाबा, बघून घ्या. – आई | ख. मला रात्री यायला उशीर होईल. समेळांच्या नातवाचा पहिला वाढदिवस आहे; इच्छा नसूनही जायला लागेल. भाज्या आणायला जमणार नाही. – सुमेध |
| ग. मला फिल्म फेस्टिव्हलसाठी पैसे पाहिजेत. बाबा द्यायला तयार नाहीये. खूप बोलला त्यावरून. तू त्याला सांग. – प्रतीक | घ. त्याच्या बोलण्याला काही अर्थ नसतो. मिळतील तुला पैसे. – आई |
| च. धन्यवाद!! दुपारी तुला न्यायला येतो कॉलेजवर. – प्रतीक | छ. माझा पूर्वानुभव सांगतो की अर्थ तुझ्याही बोलण्याला नसतो. मी येईन माझ्या सोयीनं. जेवायला काय करू? – आई |

ज. वाट पाहायला लावल्याबद्दल सॉरी. तू जेवून घे, मला मित्राकडे जेवायला जायचंय. बाबा आला का? फिल्म फेस्टचं विचारायला विसरू नकोस. उद्या भेटू. – प्रतीक



टीप : करायला = कर (धातू) + आयला

करायला = कर (धातू) + आयला. क्रियापदाच्या या रूपातून क्रियेचा हेतू समजतो. परंतु, कर (धातू) + आयला + लाग या रूपातून ती क्रिया सुरू झाली आहे हे समजते.

उदा॰ बाळ सहाव्या महिन्यात रांगायला लागतं.

विद्यार्थी आता मराठी बोलायला लागले आहेत.

टीप :

करण्याला = करणे (क्रियापदाचा नामासारखा वापर) + ला

करण्याला = करण्यास

**काही उदाहरणे पाहू या.**




- त्याच्या बोलण्याला काही अर्थ नसतो. (ते बोलणे)
- स्वातीच्या म्हणण्याला सर्वांनीच पाठिंबा दिला. (ते म्हणणे)
- रविकाका सर्वांना मदत करतो, पण त्या करण्याला अहंकाराचा दर्प असतो. (ते करणे)
- पंडितजींच्या गाण्याला दैवी स्पर्श होता. (ते गाणे)



'येण्याला', 'भेटण्याला', ह्याच अर्थाची 'येण्यास', 'भेटण्यास' अशीही क्रियापदाची रूपे होऊ शकतात; पण ही पद्धत जुनी झाली आहे. बोलताना आज कुणी 'येण्यास उशीर होईल', 'विचारण्यास विसरू नकोस', असे म्हणत नाही. फारच औपचारिक निमित्त असेल, तर 'सभेचे अध्यक्षपद स्वीकारण्यास मंत्रिमहोदयांनी मान्यता दिली', किंवा 'प्रमुख वक्त्यांनी आपले विचार मांडण्यास मंचावर यावे' असे क्वचित ऐकू येते.

प्रशासकीय लेखनभाषेत मात्र ह्या रूपाचा बराच वापर होतो.

- दिलेल्या वेळेतच रुग्णांना भेटण्यास यावे.
- ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यास विद्यापीठाने मान्यता दिली.
- संप मागे घेण्यास कामगार नेत्यांनी नकार दिला.
- ताटात अन्न टाकण्यास मनाई आहे.

## ९. एक करता एक.

**कंसातील क्रियापदांना 'आयला' हा प्रत्यय लावून खालील उताऱ्यातील मोकळ्या जागा भरू या.**

काय करायला गेले आणि काय होऊन बसलं! मंजिरी पुरती वैतागली होती. मंजिरीला नाही तरी नको त्या गोष्टीत नाक खुपसायला आवडायचंच! तिची अगदी जवळची मैत्रीण, सोनिया, सहजच म्हणाली, 'तो रोहन काय छान मुलगा आहे ना?' झालं, मंजिरीनं त्या दोघांची जोडी जमवायचं मनावरच घेतलं. मग त्यांना एकत्र **(क)** (आणणे) ................................, **(ख)** (भेटवणे) ................................



ती कारणंच **(ग)** (शोधणे) ................................ लागली. कधी कोणाच्या वाढदिवसाचं निमित्त करून प्रेझेंट **(घ)** (निवडणे) ................................ आणि **(च)** (घेणे) ................................ 'तुम्ही दोघं जा ना रे' अशी त्या दोघांना गळ घालायची, तर कधी सगळ्यांची सिनेमाची तिकिटं काढून आयत्या वेळी ती दोघंच जातील असं बघायची. खरं तर त्या दोघांचं जास्त पटत नाहीये, हे इतर सर्वांच्याच लक्षात आलं होतं, पण मंजिरीला काही ते दिसत नव्हतं. वरुणच्या बहिणीच्या लग्नाच्या वेळी आपल्या सगळ्या मित्रमंडळींच्या घरी आमंत्रणं **(छ)** (देणे) ................................ हे दोघेच कसे योग्य आहेत हे



पटवलं तिनं वरुणला, आणि त्यांना जायला लावलंच एकत्र सर्वांकडे. मग काय आता सोनिया आणि रोहनचं खडाजंगी भांडण झाल्यावर जेव्हा सगळे त्याचा दोष मंजिरीला **(ज)** (देणे) ................................ लागले तेव्हा मंजिरी म्हणते, "करायला गेले काय आणि झालं काय!"

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो अड्डा, ते अड्डे | ती चावडी, त्या चावड्या | ते केंद्रस्थान, ती केंद्रस्थाने / केंद्रस्थानं |
| तो नाका, ते नाके | ती कुचाळकी, त्या कुचाळक्या | |
| तो कट्टा, ते कट्टे | ती साद | |
| तो चव्हाटा, ते चव्हाटे | ती देवडी, त्या देवड्या | |
| तो पार, ते - | ती नालस्ती | |
| तो प्रतिसाद, ते - | ती तपःसाधना | |
| तो अभिजनवर्ग | ती अंगलट | |
| तो अहंकार | ती निरोपानिरोपी | |
| तो जोम | ती खडाजंगी | |



## क्रियापद

फुणफुणणे, फडकावणे, भारणे, गहिवरणे, घुसमटणे, नोंदवणे

## विशेषण

समानशील, अटळ, कृश, लोकविलक्षण, उदात्त, व्रतस्थ, अपरे, चुणचुणीत, आडनिडे

## क्रियाविशेषण

चाचरत, झपकन

## म्हणी आणि वाक्प्रचार

आवाज चढवणे, चेहरा पडणे, पारा चढणे / उतरणे, काढता पाय घेणे, असून अडचण, नसून खोळंबा.

## नाम / इतर शब्द + क्रियापद

| | |
|---|---|
| **पारा उतरणे / चढणे** | मीरा माझ्याकडे बघून इतकं गोड हसली, की माझ्या रागाचा पारा लगेच खाली उतरला. |
| **ओढ असणे** | लग्न होऊन इतकी वर्षे झाली तरी मेधाला माहेरची तितकीच ओढ आहे. |
| **वाऱ्याचा वेग पकडणे** | मित्रांना भेटायचं म्हटलं की सर्वांचीच पावले वाऱ्याचा वेग पकडतात. |
| **पडीक असणे** | “मी नेहमी कॉलेजच्या कट्ट्यावर पडीक असतो, आणि तू?” |
| **कडकडून भेटणे** | आनंद आणि मी, इतक्या वर्षांनी एकत्र आलो आणि एकमेकांना कडकडून भेटलो. |

## आता मला हे येतं...

**भेटीगाठींचे महत्त्व**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**लक्षात राहिलेली भेट / लक्षात राहिलेल्या भेटी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**औपचारिक / अनौपचारिक भेट**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**पत्रांद्वारे होणाऱ्या भेटी ते आजच्या आभासी भेटी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**क्रियापद + द्वितीया**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**क्रियापद**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रयोग (मुख्य प्रकार)**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**परिणामबोधक अव्यये**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**कालवाचक क्रियाविशेषणे : आता, अजून, अजूनही, अखेर, एरवी इ॰**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ४ ‘श’ शिक्षणाचा









## चला, शिकू या...

- महाराष्ट्रातील शैक्षणिक व्यवस्थेविषयी माहिती
- शैक्षणिक क्षेत्रातील चालू घडामोडींविषयी बोलणे
- शैक्षणिक क्षेत्रातील उपलब्ध संधींविषयी
- शालेय शिक्षणाचे माध्यम : चर्चा करणे
- आत्मवाचक सर्वनामे व त्यांची विभक्तिरूपे
- संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये : म्हणजे, की, जर-तर, जरी-तरी
- -पेक्षा, -हून, -मध्ये, सर्वांत : तुलनादर्शक शब्द
- ‘असो’, ‘असोत’ चे विविध वापर
- विशेषणांचा नामांसारखा वापर

## १ महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था

**क. पुढे दिलेल्या उताऱ्यातील रिकाम्या जागा आकृतीच्या मदतीने भरू या.**




महाराष्ट्रात पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक या स्तरांवर शालेय म्हणजेच दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले जाते. सर्वसाधारणपणे वयाची पहिली ६ वर्षे पूर्ण होईस्तोवर मूल (अ)------------------------ किंवा अंगणवाडीतून पूर्वप्राथमिक शिक्षण घेते. त्यामुळे पहिलीत प्रवेश घेताना मुलाचे वय ६ वर्षे असते. चौथी पास करून पाचवीत प्रवेश घेताना विद्यार्थ्याचे वय साधारणपणे (आ)-------------- असते. वयाच्या (इ)-------------- वर्षी विद्यार्थी माध्यमिक विभागात येतात. महाराष्ट्रात दहावीचे वर्ष शाळेचे शेवटचे वर्ष असते, त्यामुळे (ई)------------------ परीक्षा ही अतिशय महत्त्वाची परीक्षा मानली जाते. त्यानंतर विविध (उ)---------------------- महाविद्यालयांमधून कला, वाणिज्य किंवा विज्ञान या शाखांमधून बारावीपर्यंतचे शिक्षण घेण्याची सोय आहे. पुढे (ऊ)------------------------------ विविध व्यवसाय व शाखांमधील प्रमाणपत्र, पदविका, पदवी, (ए)-------------------------------------- व संशोधनात्मक पातळ्यांवर विद्यार्थी आपापल्या आवडीनुसार व स्वत:च्या आर्थिक, बौद्धिक कुवतीनुसार शिक्षण घेऊ शकतात. असंख्य शासकीय व (ॲ)---------------------- विद्यापीठांमधून गुणवत्तापूर्ण उच्च व तंत्रशिक्षण घेण्याची सोय उपलब्ध आहे.

**अरे, बाप रे! परीक्षा!**

**ख. ऐकू या.**

**ग. खालीलपैकी कोणती विधाने आपण ध्वनिफितीत ऐकली? (✓) खूण करू या.**

अ. मयूर व मंजूषा शाळेच्या शेवटच्या वर्षाला आहेत.

आ. मयूरला परीक्षेचा ताण आला आहे.

इ. भूमिती हा मयूरचा आवडता विषय.

ई. मंजूषाला भूमितीपेक्षा बीजगणित सोपं जातं.

उ. मयूरला संस्कृतपेक्षा हिंदी कठीण वाटतं.

ऊ. मंजूषा व मयूर परीक्षेसाठी एकत्र सराव करणार आहेत.

**परीक्षा वेळापत्रक**

| दिवस | दिनांक | वेळ | विषय |
|---|---|---|---|
| बुध. | ७/३/१८ | ११ ते २ | मराठी |
| शुक्र. | ९/३/१८ | ११ ते १ | बीजगणित |
| सोम. | १२/३/१८ | ११ ते १ | भूमिती |
| बुध. | १४/३/१८ | ११ ते २ | हिंदी, संस्कृत |
| शुक्र. | १६/३/१८ | ११ ते १ | विज्ञान |
| शनि. | १७/३/१८ | ११ ते १ | इतिहास |
| सोम. | १९/३/१८ | ११ ते १ | भूगोल |
| मंगळ. | २०/३/१८ | ११ ते २ | इंग्रजी |

**घ. संवादात ऐकलेल्या पुढील विधानांचा तुमच्या मते योग्य अर्थ कोणता? योग्य अर्थ दर्शवणारे विधान अधोरेखित करू या.**

मला हिंदी**पेक्षा** संस्कृत सोपं जातं. → हिंदी जास्त सोपं / संस्कृत जास्त सोपं

मला भूमिती**पेक्षा** बीजगणित सोपं जातं. → भूमिती जास्त सोपी / बीजगणित जास्त सोपं

व्याकरण

**तुलनावाचक शब्द**

- दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये किंवा वस्तूंमध्ये तुलना करायची असल्यास -पेक्षा, -मध्ये या शब्दयोगी अव्ययांचा, -हून या पंचमीच्या विभक्तिप्रत्ययाचा किंवा सर्वांत, सगळ्यांत या शब्दांचा वापर होतो.

उदा. माझ्यापेक्षा माझी बहीण उंच आहे.
विनू सर्व मुलांमध्ये हुशार आहे.

बरखाहून सिद्धार्थ हुशार आहे.
सर्वांत / सगळ्यांत विनू हुशार आहे.

**च. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**




**अ. सोपं x कठीण → बीजगणित – भूमिती**

संभाषण

उदा. पहिला विद्यार्थी : मला बीजगणिताहून भूमिती सोपी वाटते.
दुसरा विद्यार्थी : ओहो! पण मला भूमितीहून बीजगणित कठीण वाटतं.

जीवशास्त्र – रसायनशास्त्र

नागरिकशास्त्र – अर्थशास्त्र

आ. रंजक x कंटाळवाणा ⟶ हिंदी – संस्कृत

उदा. पहिला विद्यार्थी : मला हिंदीपेक्षा संस्कृत रंजक वाटतं.
दुसरा विद्यार्थी : ओह्! पण मला संस्कृतपेक्षा हिंदी कंटाळवाणं वाटतं.

मराठी – इंग्रजी इतिहास – भूगोल

इ. आवडता ⟶ आवडणे ⟶ चित्रकला – शारीरिक शिक्षण

उदा. पहिला विद्यार्थी : चित्रकला हा माझा सगळ्यांत आवडता तास.
दुसरा विद्यार्थी : ओह्! मला तर शारीरिक शिक्षणाचा तास सर्वांत जास्त आवडतो.

गायन – शिवणकाम हस्तकला – कॉम्प्युटर

## २ शैक्षणिक क्षेत्रातील चालू घडामोडी

**क. चित्रफीत पाहू या व खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

अ. ही चित्रफीत कोणाला उपयुक्त ठरेल?
१. शिक्षकांना २. पालकांना ३. दोघांनाही



आ. चित्रफितीत दाखवलेली शिक्षिका पुढीलपैकी कोणत्या पद्धतीचा अवलंब करते?
१. ज्ञाताकडून अज्ञाताकडे
२. अज्ञाताकडून ज्ञाताकडे
३. भाषांतर पद्धती

इ. मुलांच्या अनुभवविश्वातील शब्द म्हणजे -
१. शाळेत शिकवले गेलेले शब्द
२. मुलांनी दैनंदिन आयुष्यात ऐकलेले, बोललेले शब्द
३. मुलांनी कधीही न ऐकलेले शब्द

ई. चित्रफितीत दाखवण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत प्रमाणभाषेचाच वापर करण्यात आला आहे. - चूक की बरोबर?
१. चूक २. बरोबर ३. सांगता येत नाही

**ख. शिक्षण क्षेत्रातील विविध, नवनवीन (अभिनव) प्रयोगांविषयी माहिती मिळवू या व स्वत:ला आवडलेल्या प्रयोगावर सादरीकरण करू या.**

करा आणि शिका

**ग. बाजूला दिलेले माहितीपत्रक वाचून खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करू या.**

अ. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या नवीन योजनेचे ब्रीद

आ. अपेक्षित गट (कोणासाठी?)

इ. योजनेचे उद्दिष्ट

ई. योजनेअंतर्गत राबविण्यात येणारे कार्यक्रम




## ३ 'आपण', 'स्वत:'

**क. वाचू या.**

"विराज, अरे, आहेस कुठे तू? किती फोन केले तुला! एका तरी फोनला उत्तर द्यायचंस! स्वातीने स्वत: दहा वेळा तरी चौकशी केली तुझी. निदान तिला तरी एकदा आपणहून खुशाली कळवायची होतीस रे! तुला नसेल आमची आणि स्वत:चीही काळजी; पण आम्हाला तुझी काळजी आहे. अरे, सांग ना, कुठे होतास इतके दिवस?"

"अगं, हो, हो! जरा दम खा! मला काही बोलू देशील की नाही? आपणच बोलत सुटलीयेस!"

"बरं बाबा, बोल आता तूच स्वत:. होतास कुठे आठवडाभर?"

"मी साताऱ्याला गेलो होतो."

"का रे बाबा? सध्या कास पठारावरच्या फुलांचाही मोसम नाही आणि महाबळेश्वरच्या स्ट्रॉबेरीचाही नाही. मग साताऱ्याला कशासाठी?"

"सांगतो. मी एका स्वयंसेवी संस्थेसाठी काम करतो. ही संस्था रस्त्यावरच्या मुलांच्या मोफत शिक्षणासाठी प्रयत्न करते. मी स्वत: गेली दोन वर्षं अशा मुलांना शिकवायला या संस्थेत जातोय."

"काय सांगतोस काय! कधी सांगितलं का नाहीस याबद्दल आधी?"

"आपलं बाबा असंच आहे! आपणहून स्वत:चं कौतुक करणं नाही आवडत मला. तर झालं असं, की या मुलांसाठी नुसत्या शिकवण्या घेणं पुरेसं नाही हे आमच्या लक्षात आलं. त्यांना एका छताखाली आणून, निवारा आणि अन्नाची सोय करून दिली, तर ती स्वत:हून शिक्षणात रस घेतील. शिवाय त्यांनी स्वत: काही काम करून लवकर आपल्या पायांवर उभंही राहिलं पाहिजे. यावरून मला एक कल्पना सुचली. या मुलांना रयत शिक्षण संस्थेत दाखल करता आलं तर?"



"कोणती संस्था?"

"रयत शिक्षण संस्था. साताऱ्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली ही संस्था. स्वावलंबी शिक्षण हे या

संस्थेचं ब्रीद आहे. त्यासाठी मागासलेल्या वर्गातील गरीब मुलांना मोफत शिक्षण दिलं जातं. एवढंच नाही, तर मुलांना काटकसरी, स्वावलंबी, शीलवान आणि उत्साही बनवण्यासाठी **स्वत:** कमवा आणि शिका हा मंत्र शिकवला जातो. इथे राहून मुलं काम करतात, कमावतात आणि **आपल्या** शिक्षणाचा भार **आपण** उचलतात. ही संस्था नुसतं शिक्षणच देत नाही, तर मुलांना **स्वत:च्या** पायांवर उभं राहायला शिकवते.”

“अरे वा! छानच!”

“म्हणूनच मी **स्वत:** तिथे जाऊन प्रत्यक्ष सगळं पाहून, चौकशी करून आलो. आमच्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमोर प्रस्ताव मांडला आणि तो मंजूरही झाला. आता लवकरच आमच्या संस्थेकडून काही मुलांना तिथे प्रवेश मिळवून दिला जाईल. ही मुलं तिथे राहतील, **स्वत:** कमावतील, **स्वत:हून** आनंदाने शिकतील, **आपल्या** पायांवर उभी राहतील आणि मग सुरू होईल त्या मुलांचं स्वावलंबी आयुष्य.”

“किती छान विचार आहेत तुझे! आणि ते प्रत्यक्षात आणायला तू **स्वत:** किती प्रयत्न करतोयस!”

“**आपणच आपल्याशी** संवाद केला, **स्वत:ला** काही तरी चांगलं आणि भक्कम कार्य करण्यासाठी घडवलं की **आपणहून** मार्ग सुचतात. आणि हे जितकं समाजासाठी तितकंच **स्वत:च्या** समाधानासाठीही!”

### आत्मवाचक सर्वनामे – Reflexive pronouns

- ‘आपण’, ‘स्वत:’ ही आत्मवाचक सर्वनामे आहेत.

उदा. १) **आपणच** बोलत सुटलीयेस. (आपण = स्वत:)
२) मी **स्वत:** गेली दोन वर्षं अशा मुलांना शिकवायला या संस्थेत जातोय.
३) ही संस्था मुलांना **स्वत:च्या** पायांवर उभं राहायला शिकवते.
४) **आपणहून स्वत:चं** कौतुक करणं नाही आवडत मला.

**लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वत: कोरडे पाषाण.**

व्याकरण

**ख. पुढील वाक्यांत योग्य ते आत्मवाचक सर्वनाम वापरा.**

स्वत:च्या, स्वत:ला, स्वत:हून, आपणहून, स्वत:, आपल्या, स्वत:शीच, स्वत:च

अ. मी का सांगू तुला सहलीला जायला? मी ---------------------- जात नाहीये.

आ. रीटा ---------------------------------- इतरांच्या मदतीला धावून जाते.

इ. या कार्यक्रमाची तयारी त्याने ---------------- ---------------- केली आहे.

ई. काय ---------------------------------- बोलत बसलायस!

उ. आपापली प्रमाणपत्रं -------------------------- ताब्यात घ्यावीत.

ऊ. रुग्णांनी ----------------------------- तक्रारी थोडक्यात सांगाव्यात.

ए. तू काय समजतोस रे ----------------------?



विभक्तिरूपे

| विभक्ती | आपण | स्वत: |
|---|---|---|
| प्रथमा | आपण | स्वत: |
| द्वितीया | आपणास, आपणाला, आपल्यास, आपल्याला | स्वत:स, स्वत:ला |
| तृतीया | आपणाशी, आपल्याशी | स्वत:, स्वत:शी |
| चतुर्थी | आपणास, आपणाला, आपल्यास, आपल्याला | स्वत:स, स्वत:ला |
| पंचमी | आपणहून, आपल्याहून | स्वत:हून, (स्वत:कडून) |
| षष्ठी | आपला, आपली, आपले / आपलं, आपले, आपल्या, आपली | स्वत:चा, स्वत:ची, स्वत:चे / स्वत:चं, स्वत:चे, स्वत:च्या, स्वत:ची |
| सप्तमी | आपणात / आपल्यात | स्वत:त |

**ग. पुढील वाक्यांत ‘आपण’ हे आत्मवाचक सर्वनाम म्हणून आले आहे की पुरुषवाचक सर्वनाम म्हणून हे ओळखू या.**

| | आत्मवाचक सर्वनाम | पुरुषवाचक सर्वनाम |
|---|---|---|
| अ. **आपण** कोण? | | |
| आ. **आपण** जाऊ या का आजच्या संमेलनाला? | | |
| इ. काय **आपणच** निघून गेलीस पुढे! | | |

| | | |
|---|---|---|
| ई. चिन्मयने आम्हाला अगदी वेळेवर यायला सांगितलं आणि **आपण** आलाच नाही. | | |
| उ. बहुतेक आज इथेच अडकून पडणार **आपण** सगळे. | | |
| ऊ. आता तू मोठा झालायस. आपली कामं **आपण** करायला लाग. | | |

## ४ शैक्षणिक क्षेत्रातील उपलब्ध संधी : करिअर आणि करिअर निवड

**क. काही तज्ज्ञांची ‘करिअर निवड’ या विषयावरील मते वाचू या व त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

आपले करिअर कोणत्याही एका विषयावर अथवा परीक्षेवर अवलंबून नसते. जीवनात विविध वळणांवर आपल्याला अनेक संधी मिळत असतात. त्यातून योग्य तो पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळते. मात्र मिळालेल्या त्या संधीचे सोने करण्यासाठी परिश्रमाची किंमत मोजावी लागते. एका अपयशाने सर्व काही संपले असे समजण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य उपभोगतानाच विद्यार्थ्यांनी जबाबदारीची जाणीव ठेवावी.

**‘ताणरहित व्यक्तिमत्त्व विकास’**
– डॉ. आनंद नाडकर्णी, मानसोपचारतज्ज्ञ

**क्षमता पणाला लावल्यास कला शाखेत यश नक्की**
– दीपाली दिवेकर, करिअर समुपदेशक

कला शाखेत प्रवेश घेऊन क्षमता पणाला लावल्यास यश नक्की मिळते. करिअर करताना समाजाची गरज आणि स्वत:ची आवड हे करिअरच्या यशाचे गमक आहे. व्यक्तिव्यक्तींमध्ये फरक आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या यशाचा मार्गही वेगळा असतो. स्वत:ला जे आवडते त्यातच करिअर केले पाहिजे. उदारीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांमधून व्यवहार करण्यात येतात. त्यामुळे दुसऱ्या राष्ट्राची भाषा येत असेल तर दुभाष्या म्हणून मोठ्या प्रमाणात माणसांची गरज लागते. बहुभाषा कौशल्यामुळे त्यात करिअर करता येते. मानसशास्त्रातही करिअर करता येऊ शकते. सद्य:स्थितीत समुपदेशकांची गरज मोठ्या प्रमाणात भासत आहे. सामाजिक कार्यातही करिअर करता येते.

ललित कलांमध्ये चित्रकला, शिल्पकला, फॅशन डिझायनिंग, स्थापत्यकला, ॲनिमेशन, वस्त्रप्रावरणे, अभिकल्प, ध्वनिमुद्रण, जाहिरात इ. क्षेत्रांत विद्यार्थ्यांना करिअर करता येऊ शकेल. उत्तम सर्जनशीलता, सूक्ष्म दृष्टी, एकाग्रता, प्रमाणबद्धता हे गुण त्या विद्यार्थ्यांच्या अंगी असणे गरजेचे आहे. स्पर्धा व आव्हाने असली तरीही या क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी सातत्य राखल्यास स्वत:चे करिअर करता येऊ शकेल. स्वत:ची क्षमता ओळखूनच विद्यार्थ्यांनी हे क्षेत्र निवडले पाहिजे. इतरांपेक्षा काही तरी वेगळे करण्याचा सकारात्मक विचार केल्यास स्वत:च्या कलेची छाप विद्यार्थी पाडू शकतील.

**ललित कलांमध्ये करिअर**
– जयवंत कुलकर्णी, समुपदेशक आयव्हीजीएस

केवळ वैद्यकीय, अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र यांचाच विचार करून पुढील दिशा ठरविली जाते. सध्या महागड्या शिक्षण युगात कमी शुल्कात विज्ञान शाखेत करिअरच्या संधी आहेत. यासाठी ‘सीईटी’ वा ‘नीट’ देण्याची गरज नाही. विज्ञान शाखेतून भूगोल विषयातही अनेक संधी उपलब्ध आहेत. बीएएमएस, बीएचएमएस, व्हेटरनरी सायन्स या विषयांची निवड केल्यास कमी फीमध्येही करिअर करता येते. सध्या व्हेटरनरीमधील विद्यार्थ्यांना सरकारी नोकरी, बँका, विमा कंपन्या यांच्यात नोकरीची संधी आहे. तसेच यात विदेशातही जाऊन चांगल्या वेतनाची नोकरी करता येते, त्याचप्रमाणे फिजिओथेरपीचा अभ्यासक्रम आहे. परिचारिका (नर्स) अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परदेशात उत्तम संधी आहे. फार्मसीचाही पर्याय उपलब्ध आहे. विज्ञान शाखेतूनच प्रिंटिंग, पेट्रोकेमिकल, पर्यावरण क्षेत्रात करिअरची संधी आहे. शिवाय विज्ञान विषयातूनच पर्यावरणशास्त्र, भूगर्भशास्त्र, जैवसांख्यिकी, फॉरेन्सिक सायन्स अशा किती तरी विषयांमधील करिअरच्या वाटा खुल्या होतात.

**विज्ञान शाखेतील करिअरसाठी अनेक पर्याय**
– विवेक वेलणकर, समुपदेशक

**गणिताच्या दोस्तांना वाणिज्य शाखेत संधी**
– आमिर अन्सारी, समुपदेशक आयव्हीजीएस

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उद्योग, शेअर बाजार, ट्रेडिंग, बँकिंग क्षेत्रासाठी वाणिज्य शाखा निवडावी. विद्यार्थ्यांच्या आवडीचा विचार पालकांनी करावा आणि नंतरच निर्णय घ्यावा. वाणिज्य शाखेतील पदविका संपादन केल्यानंतर चार्टर्ड अकाऊंटन्ट, कंपनी सेक्रेटरी, अर्थ विश्लेषक म्हणून संधी आहेत. गणितासोबत नेतृत्वगुण, सामाजिक शास्त्रांचा अभ्यास गरजेचा आहे.

करिअरच्या वाटा निवडताना त्यामागच्या प्रेरणा व्यापक स्वरूपाच्या हव्यात. आपण निवडलेल्या क्षेत्रामधून आपल्याला नेमके काय साध्य करायचे आहे, हे विद्यार्थ्यांनी आधीच ठरवले पाहिजे. करिअरच्या अनेक वाटा असल्या तरी भारतीय प्रशासकीय सेवा ही एक करिअरची सुवर्णसंधी आहे. देशाच्या प्रगतीचा भाग होण्यासाठी या वेगळ्या प्रवाहाचा शोध घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यायला हवे.

**भारतीय प्रशासकीय सेवेची संधी**
– आशुतोष डुंबरे, पोलीस सहआयुक्त, ठाणे



**ख. योग्य तो पर्याय निवडू या.**

अ. करिअर निवड याविषयी डॉ. नाडकर्णी म्हणतात :
   १) करिअर निवडताना खूप मोठी आर्थिक किंमत मोजावी लागते.
   २) करिअर निवडीचे स्वातंत्र्य उपभोगताना विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव असावी.
   ३) एकदा मिळालेल्या अपयशामुळे पुढील वाटाही बंद होतात.

आ. विज्ञान शाखेतील करिअरच्या संधींविषयी समुपदेशक काय म्हणतात?
   १) विज्ञान शाखेत कमी शुल्कातही करिअरचे विविध पर्याय उपलब्ध आहेत.
   २) व्हेटरनरीमधील विद्यार्थ्यांना बँकांमध्ये नोकरी करता येत नाही.
   ३) विज्ञान शाखेतून भूगोल विषयात करिअर करता येत नाही.

इ. करिअरच्या यशाचे गमक ...
   १) बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील नोकरीत आहे.
   २) कला शाखेतील उपलब्ध पर्यायांमध्ये आहे.
   ३) समाजाची गरज आणि स्वत:ची आवड हे आहे.



ई. ललित कलांमध्ये करिअर करण्यासाठी कोणते गुण विद्यार्थ्यांच्या अंगी असणे आवश्यक आहे?
   १) संयम, सातत्य
   २) उत्तम सर्जनशीलता, सूक्ष्म दृष्टी, एकाग्रता, प्रमाणबद्धता
   ३) स्पर्धात्मकता

उ. देशाच्या प्रगतीचा भाग होण्याच्या दृष्टीने कोणत्या वेगळ्या प्रवाहाचा उल्लेख तज्ज्ञ करतात?
   १) शेअर बाजार
   २) कंपनी सेक्रेटरी
   ३) भारतीय प्रशासकीय सेवा

**ग. पुढील शब्दांचा योग्य त्या तक्त्यात समावेश करू या.**

उद्योग, मानसशास्त्र, आर्किटेक्चर, फॅशन डिझायनिंग, शेअर बाजार, भूगर्भशास्त्र, शिल्पकला, प्राणिशास्त्र, संगीत, अभिकल्प, ध्वनिमुद्रण, नेपथ्यशास्त्र, अर्थविश्लेषण, पर्यावरणशास्त्र, भाषांतर, जाहिरात, अभियांत्रिकी, स्थापत्यकला, समुपदेशन, सामाजिक कार्य, जैवसांख्यिकी, प्राध्यापकी, भाषाभ्यास, क्रॉस कल्चरल ट्रेनिंग, चित्रकला, फॉरेन्सिक सायन्स, छायाचित्रण, ॲनिमेशन, नृत्यदिग्दर्शन

| कला | वाणिज्य | ललित कला | विज्ञान |
|---|---|---|---|
| | | | |

**घ. वाक्‌प्रचार आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावू या आणि या वाक्‌प्रचारांचा वाक्यात उपयोग करू या.**

| | |
|---|---|
| अ. संधीचे सोने करणे | १. मार्ग / संधी निवडणे |
| आ. क्षमता पणाला लावणे | २. नियमितपणे करणे |
| इ. वाटा खुल्या होणे | ३. मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करणे |
| ई. सातत्य राखणे | ४. प्रभाव पाडणे |
| उ. छाप पाडणे | ५. संधी निर्माण होणे |
| ऊ. वाटा निवडणे | ६. आपल्या क्षमतांचा पुरेपूर वापर करणे |

**च. आता पुढील वाक्ये पाहू या.**

| | |
|---|---|
| परकीय भाषा – चांगली नोकरी | एखादी परकीय भाषा शीक, **म्हणजे** चांगली नोकरी मिळेल. |
| नेट परीक्षा – प्राध्यापक | नेट परीक्षा पास झालास **की** प्राध्यापक म्हणून एखाद्या विद्यापीठात नोकरी करू शकतोस. |
| समुपदेशक – मानसशास्त्र | **जर** तुला समुपदेशक व्हायचं असेल, **तर** मानसशास्त्रात पदवी मिळवावी लागेल. |
| प्राण्यांचं वेड – प्राणिशास्त्र | **जरी** मला प्राण्यांचं वेड असलं, **तरी** घरचे काही मला प्राणिशास्त्राचा अभ्यास करू देणार नाहीत. |

### संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये

- संकेत म्हणजे खूण, चिन्ह, विशिष्ट अट.
- प्रधान वाक्य, त्यातील घटना जेव्हा गौण वाक्यातील संकेतावर अवलंबून असते तेव्हा संकेतदर्शक उभयान्वयी अव्ययांचा वापर केला जातो.

उदा॰ शिकलास **की** चांगली नोकरी मिळेल. / शिकलास **म्हणजे** चांगली नोकरी मिळेल.

↓ **गौण वाक्य** ↓ **प्रधान वाक्य**

↑ ↑

**जर** अभ्यास केलास, **तर** पास होशील.

**टीप :** जेव्हा जरी–तरी या अव्ययांनी दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा त्यातील प्रधान वाक्यात काही अंशी विरोध असतो. म्हणून त्यांना **विरोधी संकेतदर्शक** असेही म्हणतात.

उदा॰ आता **जरी** अभ्यास सुरू केला, **तरी** मी काही पास होत नाही.

व्याकरण

**छ. 'जर-तर' आणि 'जरी-तरी' ची गम्मत**

पुढील उदाहरणे पाहू या :

| जर–तर<br>अट | जरी–तरी<br>तरीही |
|---|---|
| जर ह्यावेळी सीए फायनल पास झाला नाहीस, तर बाईकचं विसरून जा. | जरी ह्यावेळी सीए फायनल पास झाला नाहीस, तरी तुला बाईक मिळेल. |
| जर ऐन वेळी पाऊस पडला, तर समारंभ रद्द करावा लागेल. | जरी ऐन वेळी पाऊस पडला, तरी समारंभ रद्द करावा लागणार नाही. |

**ज. पुढील वाक्यांमध्ये 'जर-तर' ह्या अव्ययांच्या जागी 'जरी-तरी' आणि 'जरी-तरी' च्या जागी 'जर-तर' वापरून, वाक्यांत आवश्यक ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहू या.**

अ. जर तू तिकीट काढणार असशील, तर मी नाटकाला येईन.

------------------------------------------------------------.

आ. जर प्रयत्न चालू ठेवले, तर समाजात कधी तरी बदल होतीलच.

------------------------------------------------------------.

इ. जर पुस्तकांच्या किमती कमी झाल्या, तर लोक वाचनाकडे वळतील.

------------------------------------------------------------.



ई. जरी ही भिंत पाडली, तरी फारसा फरक पडणार नाही.

------------------------------------------------------------.

उ. जरी वर्षाच्या सुरुवातीपासून अभ्यास केला, तरी परीक्षेत वाट लागतेच.

------------------------------------------------------------.

'जर' च्या जागी 'जर का' चा वापर केला, तर अर्थ बदलत नाही; पण वाक्याला थोडा जास्त जोर येतो.

उदा॰ इथून जर का हललास, तर याद राख.

त्यांनी जर का चूक लपवण्याचा प्रयत्न केला, तर ते त्यांना फार महाग पडेल.

'जर-तर' आणि 'जरी-तरी' ह्या जोडगोळ्या आहेत खऱ्या; पण तरीही त्यांच्यापैकी 'जर' आणि 'जरी' ही अव्यये वगळून अर्थामध्ये काही बदल न करता वाक्य रचता येते. आपण आतापर्यंत जी उदाहरणे पाहिली, त्यांतून हे शब्द वगळून ती वाचून बघू या.

**टीप :** 'जर-तर', 'जरी-तरी' ह्या जोडगोळ्यांमधील 'तर' आणि 'तरी' ह्या अव्ययांची जागा कधीच बदलता येत नाही. पण 'जर' आणि 'जरी' ह्यांच्या जागा मात्र बदलता येतात. त्यामुळे वाक्याच्या अर्थामध्ये कधी किंचित तर कधी बऱ्यापैकी फरक पडू शकतो.

- जर **ह्या विषयाची** नियमित उजळणी केलीस, तर केटी क्लिअर करू शकशील. (इथे 'ह्या विषयाची' हे महत्त्वाचे असल्याचे दाखवले आहे.)
- ह्या विषयाची जर **नियमित उजळणी** केलीस, तर केटी क्लिअर करू शकशील. (इथे 'नियमित उजळणी'ला जास्त महत्त्व दिले आहे.)
- **जरी ह्या विषयावर** तू लेख लिहिलास, तरी तो प्रसिद्ध केला जाणार नाही. (इथे 'ह्या विषयावर' हे महत्त्वाचे.)
- ह्या विषयावर तू **जरी लेख लिहिलास,** तरी तो प्रसिद्ध केला जाणार नाही. (इथे 'लेख लिहिलास' हे महत्त्वाचे.)
- ह्या विषयावर **जरी तू** लेख लिहिलास, तरी तो प्रसिद्ध केला जाणार नाही. (इथे 'तू' हे महत्त्वाचे.)

## ५ शालेय शिक्षणाचे माध्यम (मराठी, इंग्रजी, हिंदी इ.)

**क. तुमचे शिक्षण प्रामुख्याने कोणत्या माध्यमातून झाले?**

**ख. त्या माध्यमाचा तुमच्या आयुष्यावर साधारणपणे काय व कसा परिणाम झाला?**

**ग. वाचू या.**




भारतासारख्या बहुभाषिक देशात, जिथे २९ राज्यांत २२ भाषा बोलल्या जातात तिथे, याच २२ भाषा त्या त्या राज्यांमध्ये ज्ञानभाषेचं कामही करतात. परंतु स्वातंत्र्योत्तर काळापासून इंग्रजी या परकीय भाषेतून बऱ्याच भारतीयांनी आपले शालेय शिक्षण संपादित केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इंग्रजीतूनच संपूर्ण शिक्षण घेणाऱ्यांची वाढती संख्या व भारतीय भाषांचे कमी होत चाललेले महत्त्व आणि त्याच अनुषंगाने 'मातृभाषेतून शालेय शिक्षण' हा विषय सतत चर्चेत असलेला पाहायला मिळतोय. ह्याच विषयाशी निगडित काही विधाने खाली दिली आहेत.

**घ. योग्य त्या चौकटींत (✓) खूण करू या.**

| विधान | पूर्ण सहमत | सहमत | असहमत |
|---|---|---|---|
| अ. मातृभाषा हीच ज्ञानभाषा असावी. | | | |
| आ. मातृभाषेतील शिक्षणामुळे सर्वांगीण विकास होतो. | | | |
| इ. मातृभाषेतील शिक्षण अनुभवावर आधारित असते. | | | |
| ई. मातृभाषेतील शिक्षणामुळे कलात्मकतेला वाव मिळतो. | | | |
| उ. इंग्रजीतून शिक्षण अनिवार्य आहे. | | | |
| ऊ. इंग्रजीतून शिक्षण म्हणजेच व्यक्तिमत्त्व विकास | | | |

**च. आता खालील मुद्द्यांच्या आधारे वर्गात चर्चा करू या.**
**(जर-तर, जरी-तरी, म्हणजे, की इ. वापरून)**

नोकरीच्या अनेक संधी
सर्वांगीण प्रगती
परकीय भाषेतील शिक्षण आव्हानात्मक
इंग्रजी – काळाची गरज
मातृभाषेचा न्यूनगंड
ग्रहणक्षमता

## ६ असो, असोत... विशेषणांचा नामांसारखा वापर

**क. वाचू या.**

सारंग सरांसोबत मराठी वाङ्मय मंडळाच्या खोलीत शिरता शिरता केदार ओरडला, "थ्री चिअर्स फॉर मराठी वाङ्मय मंडळ! हिप् हिप्," आणि खोलीतले सगळे नकळत ओरडले, "हुर्रे!"

सारंगसर त्याच्या टपलीत मारत म्हणाले, "काय रे! मराठी वाङ्मय मंडळाचा जयजयकार इंग्रजीत?"

लग्गेच भैरवी त्यांची री ओढत म्हणाली, "आता तुम्हीच पाहा, सर. मराठीचा तास असो, किंवा वाङ्मय मंडळाचा कार्यक्रम, याचं इंग्रजीचं प्रेम काही लपत नाही. इंग्रज गेले कधीच, पण याला मागे सोडून!"

केदार वैतागून म्हणाला, "उगीच वाकड्यात शिरू नकोस हं!"

केदार नाटकीपणे हात जोडत म्हणाला, "सॉरी! नाही, नाही, चुकलो, बाई! मराठी वाङ्मय मंडळाचा..." सगळे ओरडले, "विजय असो!"

"बरं, असो!" पूर्वी म्हणाली, "पण झालंय काय, ते तरी सांगा." "सांगतो," सारंगसर म्हणाले, "प्राचार्यांनी आपल्या प्रस्तावाला मान्यता देत यंदाच्या संपूर्ण वार्षिक स्नेहसंमेलनाची जबाबदारी मराठी वाङ्मय मंडळावर सोपवली आहे."

सगळे आनंदाने चित्कारले, "सांगता काय, सर?!" "येस!" "याहू!" "वा! वा!" "मस्त!"



मल्हार म्हणाला, "मी म्हणालो नव्हतो? इतर कोणाचाही विरोध असो, प्राचार्य आपल्याच बाजूचे आहेत."

त्याला मध्येच तोडत सावनी म्हणाली, "तसं नाही, मल्हार. प्राचार्य आपल्या बाजूचे असोत, किंवा विरोधात असोत, त्यांना निर्णय घेताना सगळ्या बाजूंचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो."

"बरोबर म्हणतेय सावनी." सारंगसर सावनीला दुजोरा देत म्हणाले, "प्राचार्यांशी खूप चर्चा केल्यावर, तुमच्या कार्यक्षमतेबद्दल भरपूर बॅटिंग केल्यावर मग ते तयार झाले."

सारंग सरांच्या कौतुकाने भारावून केदार उद्गारला, "काहीही असो, आपले सर नेहमी आपल्या पाठीशी असतात. पटवलं की नाही प्राचार्यांना? त्यामुळे खरं तर आपण सरांचाच जयजयकार केला पाहिजे. सारंग सरांचा..." सगळे जोशात ओरडले, "विजय असो!"

"ए शहाण्यांनो! आगाऊपणा नको. असो! आता जरा मी काय सांगतो ते शांतपणे नीट लक्ष

देऊन ऐका. परवानगी तर मिळालीये आपल्याला. पण कोणतेही कार्यक्रम असोत, स्पर्धा असोत, पारितोषिक वितरण समारंभ असो, काहीही असो; लेक्चर्स चुकवून, अभ्यास टाळून कसलीही तयारी करायची नाही. रोजची लेक्चर्स झाल्यावरच कार्यक्रमाची कामं. तुमचं इव्हेन्ट मॅनेजमेंट असो, किंवा काहीही, या निमित्ताने कोणी अभ्यासात कमी पडलेलं मला चालणार नाही. नियमित लेक्चर्सना बसणारेच कार्यक्रमाच्या आयोजनात असतील. त्या बोलीवरच मी प्राचार्यांची परवानगी मिळवलीये. अभ्यासात टंगळमंगळ करणाऱ्यांनी आयोजनात भाग घ्यायचा नाही."

सगळ्यांनी तात्काळ होकार दिला, "हो, हो सर. नक्कीच!" सावनी सगळ्यांच्या वतीने म्हणाली,

"हो, सर. कितीही जबाबदाऱ्या असोत, आम्ही तास चुकवणार नाही आणि अभ्यासात मागेही राहणार नाही." "हो सर," पूर्वी म्हणाली, "फक्त आम्हाला तुमचं मार्गदर्शन आणि पाठिंबा सतत मिळत राहो, तुमचे आशीर्वाद सतत आमच्या पाठीशी असोत एवढीच इच्छा."

सर हसतच म्हणाले, "आशीर्वाद थोरामोठ्यांचे घ्यायचे. मी इतका मोठा नाही. पण माझ्या शुभेच्छा नेहमीच तुमच्यासोबत असतील. तुम्हाला या जबाबदारीच्या कामात आणि अभ्यासातही घवघवीत यश मिळो!"

"धन्यवाद, सर!"

**ख. वरील परिच्छेदातील जांभळे शब्द अभ्यासू या. काही आठवतंय का?**
**'असो', 'असोत' चा असाही वापर संभवतो. पाहू या.**

| उदाहरण | अर्थ |
|---|---|
| मराठीचा तास असो, किंवा वाङ्मय मंडळाचा कार्यक्रम; याचं इंग्रजीचं प्रेम काही लपत नाही. | असला तरी |
| मराठी वाङ्मय मंडळाचा विजय असो! | शुभेच्छा, इच्छा |
| तुमचे आशीर्वाद सतत आमच्या पाठीशी असोत. | इच्छा |
| बरं, असो! | असू दे |
| कितीही जबाबदाऱ्या असोत, आम्ही तास चुकवणार नाही. | विरोध |

**ग. खालील वाक्ये काय दर्शवतात? ओळखू या.**

अ. इतर कोणाचाही विरोध असो, प्राचार्य आपल्याच बाजूचे आहेत. ........................

आ. प्राचार्य आपल्या बाजूचे असोत, किंवा विरोधात असोत, त्यांना निर्णय घेताना सगळ्या बाजूंचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो. ........................

इ. काहीही असो, आपले सर नेहमी आपल्या पाठीशी असतात. ........................

ई. सरांचा... विजय असो! ........................

उ. असो! आता जरा मी काय सांगतोय ते शांतपणे, नीट लक्ष देऊन ऐका. ........................

ऊ. पण कोणतेही कार्यक्रम असोत, स्पर्धा असोत, पारितोषिक वितरण समारंभ असो, काहीही असो; लेक्चर्स चुकवून, अभ्यास टाळून कसलीही तयारी करायची नाही. ........................

**घ. आता वरील परिच्छेदातील भगव्या रंगाच्या शब्दांचा अभ्यास करू या.**

**विशेषणांचा नामांसारखा वापर**

- **कधी कधी विशेषणे नामांसारखी वापरली जातात.**

उदा॰ **ए शहाण्यांनो! आगाऊपणा नको.**
विशेषण – **शहाणा, शहाणी, शहाणे...** ⟶ नाम - **शहाण्यांनो**

**धातुसाधित विशेषणे**

- **धातुंपासून (क्रियापदांपासून) बनलेली विशेषणे**

उदा॰ **नियमित लेक्चर्सना बसणारेच कार्यक्रमाच्या आयोजनात असतील.**
क्रियापद – **बसणे** ⟶ धातू – **बस** ⟶ विशेषण – **बसणारे**
* बसणे – बस – बसणारा, बसणारी, बसणारे / बसणारं, बसणारे, बसणाऱ्या, बसणारी

**च. पुढील परिच्छेदातील विशेषणे व नामासारखी वापरली गेलेली विशेषणे ओळखा. विशेषणे निळ्या व नामासारखी वापरली गेलेली विशेषणे हिरव्या रंगाने अधोरेखित करा.**

"वर्गात गडबड करणाऱ्यांनी सरळ वर्गाच्या बाहेर जावं", मंजिरीबाई शांतपणे उद्गारल्या. त्याबरोबर आणखीच कुजबुज सुरू झाली. तशा तितक्याच शांतपणे बाई पुढे म्हणाल्या, "आणि केवळ उपस्थितीसाठी बसणाऱ्यांनी तर आधी उठावं आणि चालू लागावं. वर्गात लक्ष देऊन ऐकणारेच बसू शकतात. केवळ उपस्थितीसाठी येणाऱ्यांनी माझ्या तासाला आता नाही आलं तरी चालेल. त्यांची उपस्थिती लावली जाईल. आणि धूमकेतूसारखे क्वचितच उगवणारे नाही बसले तर उत्तम. कसंय ना, हुशार किंवा 'ढ' विद्यार्थी असा भेदभाव इथे कधीच केला जात नाही. पण कळकळीने शिकवणाऱ्याला विद्यार्थ्यांनीही साथ दिली तर तास रंगत जातो."

आता मात्र शांतता पसरली वर्गात. तशा बाई पुन्हा विषयाकडे वळल्या. 'अशिक्षितांना मदत करणे हे साक्षरांचे कर्तव्य आहे' हे पाठातील शेवटचे वाक्य वाचून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, रस्त्यांवर बारीकसारीक गोष्टी विकून गुजराण करणाऱ्या मुलांना आठवड्यातील चार तास शिकवण्याचा जेव्हा बाईंनी विषय काढला, तेव्हा मात्र अनेक उत्साही हात वर आले. वर्गातील जवळपास सर्वांनीच आठवड्यातील चार तास त्या मुलांसाठी द्यायचे ठरवले. बाईंनाही वाटले, कितीही मस्तीखोर असली तरी सुजाण आहेत ही मुलं.

## ७ व्यक्तिपरिचय



**महात्मा जोतीराव गोविंदराव फुले (१८२७-१८९०)**

मराठी समाजाच्या दुरवस्थेमुळे अस्वस्थ झालेल्या आणि ही परिस्थिती बदलण्याचे आव्हान स्वीकारणाऱ्या समाजसुधारकांची पहिली पिढी एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात तयार होत होती. आपली अशी अवस्था का झाली याची कारणमीमांसा करताना एका सुधारकाने

नेमक्या आणि साध्यासोप्या शब्दांत म्हटले :



विद्येविना मति गेली । मतिविना नीति गेली ।
नीतिविना गति गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । एवढे अनर्थ एका अविद्येने केले ॥

महात्मा जोतीराव फुले ह्या द्रष्ट्या विचारवंत सुधारकाने रचलेल्या ह्या ओळी आहेत. बऱ्याचदा असे दिसते, की समाजरचनेमध्ये तळाशी असणाऱ्यांची, अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या काळोखात पिचणाऱ्यांची स्थिती बदलण्याकरता झटणारे, त्याकरता वैचारिक बळ देणारे क्रांतिकारक – विचारवंत समाजातील वरच्या थरातून आलेले असतात. त्या मानाने, पिडलेल्या समाजातूनच स्वत: वेदनेचा अनुभव घेऊन येणारे संख्येने कमी दिसतात. महात्मा फुले अशा विचारवंत सुधारकांपैकी होते. त्यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबातच झाला होता. मराठी आणि थोडेफार इंग्रजी शालेय शिक्षणच त्यांना घेता आले. नंतर त्यांनी स्वत:च आपला अभ्यास वाढवला. मराठी – इंग्रजी – संस्कृत ग्रंथांचे सातत्याने वाचन आणि मनन केले. जगाच्या आणि भारताच्या भूगोलाचा आणि इतिहासाचा अभ्यास करून भारतीय समाजाच्या स्थितीमागील कारणे समजून घेतली. लोकशिक्षण आणि प्रबोधन हाच सुधारणेचा मार्ग आहे असे त्यांचे मत झाले. त्याच दिशेने त्यांनी कार्य सुरू केले. महात्मा फुले कर्ते सुधारक होते. म्हणजे लोकांनी जे करावे असे त्यांना वाटे ते अगोदर स्वत:च करून दाखवणारे होते.

त्या काळी स्त्रीशिक्षणाला सर्वच जातींचा प्रखर विरोध होता. महात्मा फुले ह्यांनी प्रथम आपल्या पत्नीलाच शिकवले आणि १८४८ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची ही मुहूर्तमेढ होती. त्यांच्या ह्या कार्यापायी त्यांच्या कुटुंबाने त्यांच्याशी संबंध तोडले. समाजाकडून अतिशय प्रखर विरोध झाला. तरीही १८५१ साली त्यांनी मुलींसाठी आणखी दोन शाळा आणि अस्पृश्य मुलांसाठीही शाळा सुरू केल्या. त्याच काळात त्यांच्या कार्याविषयी आस्था असणारे आणि त्यात प्रत्यक्ष सहभाग घेणारेही अनेक जण होते हेही लक्षात घ्यायला हवे.

त्या काळी सर्वच जातींमधील विधवा स्त्रियांची परिस्थिती भयानक होती. त्यांचे दर्शनही अपवित्र, अपशकुनी मानले जात असल्याने न्हाव्याकडून त्यांच्या डोक्यावरील केस काढून त्यांना विद्रूप केले जाई. ह्या प्रथेविरोधात चळवळ उभी करून जोतीरावांनी न्हाव्यांचा संपही घडवून आणला.

विधवा स्त्री गरोदर राहिल्यास तिला अमानुष शिक्षा केली जाई. अनेकदा ठारही मारले जाई. अशा स्त्रियांना संरक्षण देण्यासाठी जोतीरावांनी एक केंद्र सुरू केले. एवढेच नव्हे, तर काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेच्या मुलाला स्वत: दत्तक घेतले.

अस्पृश्यांना कोणत्याही विहिरीवर पाणी भरता येत नसे. जोतीरावांनी आपल्या घरातील हौद त्यांच्यासाठी खुला करून दिला.

१८७३ मध्ये त्यांनी ‘सत्यशोधक समाज’ ह्या संघटनेची स्थापना केली. सर्व जातिधर्मांचे लोक त्यात सहभागी व्हावेत असे प्रयत्न केले.

महात्मा फुले यांनी पुष्कळ लेखनही केले. जातिभेद, चातुर्वर्ण्य, ब्राह्मणी वर्चस्व अशा विषयांवर अत्यंत कठोर भाषेत लिहिले. शेतकरी, अस्पृश्य इत्यादींची स्थिती समाजासमोर आणणारे निबंध, ‘नीति हाच मानवी जीवनाचा आधार आहे अशी भूमिका मांडणारे तत्त्वचिंतनपर लेखन, काव्यरचना, एक नाटक असे त्यांचे साहित्य उपलब्ध आहे. अशा सगळ्या ‘गुन्ह्यां’साठी १८५६ साली त्यांच्या हत्येचाही प्रयत्न केला गेला.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्त्वांवर आधारलेला ‘सत्यधर्म’ हाच खरा धर्म असे त्यांनी शेवटपर्यंत सांगितले. ‘सर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकाशी सत्य वर्तन करून वागावे. इतकेच काय, एकाच घरात बौद्धधर्मीय बायको, ख्रिस्तधर्मीय नवरा, इस्लामधर्मीय कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म.’

**क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले (१८३५-१८९३)**

एका ध्येयाने झपाटलेल्या आणि त्यापायी वारंवार संकटांना निमंत्रण देणाऱ्या महात्मा फुले ह्यांच्यासारख्या क्रांतिकारकाच्या सहचारिणीलाही निखाऱ्यांवरूनच चालावे लागले. पण क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी पत्नी आणि सहकारी म्हणून आपल्या पतीला निष्ठेने साथ दिली. त्यांनी सुरू केलेल्या शाळांमध्ये शिक्षिका आणि व्यवस्थापिका म्हणून काम केले. समाजाने केलेल्या छळाला धैर्याने तोंड दिले. त्या रस्त्याने जाऊ लागल्या की टवाळ लोक त्यांना उद्देशून अर्वाच्य बोलत, त्यांना दगड आणि शेण, चिखल फेकून मारत. पण खचून न जाता सावित्रीबाई आयुष्यभर, अगदी पतीच्या निधनानंतरही स्त्रीशिक्षणाचे काम करतच राहिल्या. त्यांनी स्वत:ही दर्जेदार काव्यलेखन केले आणि ते पुस्तकरूपाने प्रकाशितही झाले. स्त्रीमुक्तीच्या विचारांची ज्योत उजळणारी पहिली महिला म्हणून इतिहासाने त्यांच्या नावाची नोंद घेतली आहे. आजही, शिक्षणाचा लाभ मिळालेल्या अनेक स्त्रिया ‘आम्ही सावित्रीच्या लेकी’ असे कृतज्ञतापूर्वक म्हणतात.

**क. खालील शब्दांच्या त्यांच्या योग्य अर्थाशी जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. दुरवस्था | १. अमानवी |
| आ. कारणमीमांसा | २. चांगले बदल घडवून आणणारा |
| इ. द्रष्टा | ३. हिंदू समाजरचनेतील चार श्रेणी |
| ई. सुधारक | ४. चांगल्या गोष्टींची शिकवण देणे |
| उ. प्रबोधन | ५. ज्ञानी, दूरचा विचार करू शकणारा |
| ऊ. अमानुष | ६. कारणांची चर्चा किंवा चिकित्सा |
| ए. अस्पृश्यता | ७. बोलू नये, उच्चार करू नये असे |
| ॲ. चातुर्वर्ण्य | ८. वाईट अवस्था |
| ऐ. अर्वाच्य | ९. विशिष्ट जातीच्या माणसांना स्पर्श न करण्याचा जुना सामाजिक संकेत |

**एक पुस्तक, एक लेखणी, एक मूल आणि एक शिक्षक**
**हे जग बदलू शकतात.**

**- मलाला युसुफज़ाई**

**ख. कंसातील जोड्यांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा भरू या.**

प्रेमाने नांदणे, ध्येयाने झपाटणे, संकटांना निमंत्रण देणे, निखाऱ्यांवरून चालावे लागणे, धैर्याने तोंड देणे, विचारांची ज्योत उजळणे

अ. पुस्तकातील आशय समजावून सांगणे हेच केवळ शिक्षकाचे काम नसते. विद्यार्थ्यांच्या -------------------- हे खरे तर शिक्षकांचे ध्येय असावे.

आ. "तुझ्या अशा वाईट सवयींमुळे तू असंख्य -------------------- हे कळतंय का तुला?"

इ. एकदा का -------------------- की माणसाला कोणीच अडवू शकत नाही.

ई. डॉ. प्रकाश आमटे ह्यांच्या हेमलकसा येथील घरात विविध वन्य तसेच पाळीव प्राणी --------------------.

उ. स्वत:च्या कुटुंबावर अचानक ओढवलेल्या संकटाला -------------------- स्मिताने स्वत:चे एल.एल.बी. पूर्ण केले.

ऊ. "मला अगदी -------------------- तरी चालेल, पण मी माझ्या मुलीचं शिक्षण थांबू देणार नाही," सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या चंचलाताई उद्गारल्या.

**ग. शिक्षण क्षेत्रात स्वत:चे योगदान दिलेल्या आणखी काही व्यक्तींची नावे माहीत आहेत का तुम्हाला?**

**घ. भारतातील किंवा तुमच्या देशातील अशा एका व्यक्तीबद्दल माहिती शोधून काढू या व वर्गासमोर सादर करू या. पुढील मुद्द्यांची मदत होईल.**

- वैयक्तिक माहिती- नाव, गाव, जन्म, शिक्षण, मृत्यू
- शैक्षणिक कार्य
- इतर सामाजिक कार्य
- तत्त्वे, लेखन, पुस्तके
- कार्याची घेतली गेलेली दखल, कार्यासाठी दिले गेलेले पुरस्कार
- परिणती

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो उपक्रम, ते - | ती बालवाडी, त्या बालवाड्या | ते रसायनशास्त्र |
| तो प्रयोग, ते - | ती अंगणवाडी, त्या अंगणवाड्या | ते बीजगणित, ती बीजगणिते / बीजगणितं |
| तो प्रस्ताव, ते - | ती कुवत, त्या कुवती | ते ब्रीद, ती ब्रीदे / ब्रीदं |
| तो मानसोपचारतज्ज्ञ, ते - | ती भूमिती | ते ब्रम्हज्ञान |
| तो समुपदेशक, ते - | ती शाखा, त्या - | ते मानसशास्त्र |
| तो अभ्यासक्रम, ते - | ती क्षमता, त्या - | ते गमक, ती गमके |
| तो विश्लेषक, ते - | ती समुपदेशिका, त्या - | ते कौशल्य, ती कौशल्ये |
| तो न्यूनगंड, ते - | ती सद्य:स्थिती | ते शुल्क, ती शुल्के |
| तो सुधारक, ते - | ती शिल्पकला | ते अभिकल्प, ते - |
| तो आशय, ते - | ती स्थापत्यकला | ते ध्वनिमुद्रण, ती ध्वनिमुद्रणे |
| तो भूगोल | ती सर्जनशीलता | ते आव्हान, ती आव्हाने |
| तो इतिहास | ती प्रमाणबद्धता | ते भूगर्भशास्त्र |
| | ती विश्लेषक, त्या - | ते प्राणिशास्त्र |
| | ती जैवसांख्यिकी | ते नेपथ्यशास्त्र |
| | ती ज्ञानभाषा | ते पर्यावरणशास्त्र |
| | ती कलात्मकता | ते माध्यम, ती माध्यमे |
| | ती ग्रहणक्षमता, त्या - | ते मनन, - |
| | ती दुरवस्था, त्या - | ते प्रबोधन, ती प्रबोधने |
| | ती कारणमीमांसा, त्या - | ते ध्येय, ती ध्येये / ध्येयं |
| | ती सुधारक, त्या - | ते योगदान, ती योगदाने / योगदानं |
| | ती मुहूर्तमेढ, त्या मुहूर्तमेढी | ते विज्ञान |
| | ती हस्तकला | |
| | ती चित्रकला | |

### क्रियापद

उपभोगणे, निवडणे, पिचणे, झटणे, ओढवणे, अडवणे, उद्धारणे

### विशेषण

शैक्षणिक, शालेय, वार्षिक, सहामाही, शालान्त, अभिनव, काटकसरी, स्वावलंबी, शीलवान, वाणिज्य, अनुभवाधिष्ठित, अनिवार्य, आव्हानात्मक, द्रष्टा, विद्रूप, अमानुष, अस्पृश्य, अर्वाच्य

### क्रियाविशेषण

आठवडाभर, प्रामुख्याने, साधारणपणे, सातत्याने, शेवटपर्यंत, एकमताने, निष्ठेने, कृतज्ञतापूर्वक

### नाम / इतर शब्द + क्रियापद

रस घेणे, दाखल करणे, भार उचलणे, मदतीला धावून जाणे, किंमत मोजणे, जाणीव ठेवणे, क्षमता पणाला लावणे, वाट खुली होणे, सातत्य राखणे, छाप पाडणे, संपादन करणे, वाव मिळणे, स्थापना करणे, प्रेमाने नांदणे, ध्येयाने झपाटणे, दखल घेणे

### म्हणी आणि वाक्प्रचार

लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वत: कोरडे पाषाण; संकटांना निमंत्रण देणे; निखाऱ्यांवरून चालावे लागणे; धैर्याने तोंड देणे



## आता मला हे येतं...

महाराष्ट्रातील शैक्षणिक व्यवस्थेविषयी माहिती

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शैक्षणिक क्षेत्रातील चालू घडामोडींविषयी बोलणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शैक्षणिक क्षेत्रातील उपलब्ध संधींविषयी

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शालेय शिक्षणाचे माध्यम – चर्चा करणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

आत्मवाचक सर्वनामे व त्यांची विभक्तिरूपे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये : म्हणजे, की, जर-तर, जरी-तरी

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

तुलनादर्शक शब्द : -पेक्षा, -हून, -मध्ये, सर्वांत

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

'असो', 'असोत' चे विविध वापर

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

विशेषणांचा नामांसारखा वापर

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ५ अतुल्य भारत









## चला, शिकू या...

- भारताविषयी जाणून घेणे
- भारत आणि जग - परस्परसंबंध - चर्चा करणे
- उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये - म्हणून, यासाठी, याकरिता, यास्तव
- 'म्हणून'चे वेगवेगळे उपयोग
- क्रमवाचक संख्याविशेषणे - पहिले, दुसरे, तिसरे ... अठरावे, एकोणिसावे, विसावे ...
- शब्दयोगी पदे - भर, आधी, पूर्वी

## १ भारताविषयी

क. अ. तुमच्यासाठी भारत म्हणजे काय?

आ. तुम्ही भारतात कुठे-कुठे फिरला आहात? कोणती ठिकाणे आवडली? कसा अनुभव आला?

इ. भारताविषयी कितपत माहीत आहे आपल्याला हे पाहू या.

| | |
|---|---|
| स्वातंत्र्य दिन | ------------------------------------------------ |
| ------------------------------------------------ | २६ जानेवारी |
| राजधानीचे शहर | ------------------------------------------------ |
| भारतातील प्रमुख शहरे | ------------------------------------------------<br>------------------------------------------------ |
| क्षेत्रफळ | ३२,८७,२६३ कि.मी.$^{२}$ |
| राष्ट्रीय चलन ₹ | ------------------------------------------------ |
| ------------------------------------------------ | वाघ |
| राष्ट्रीय पक्षी | ------------------------------------------------ |
| राष्ट्रीय फूल | ------------------------------------------------ |
| राष्ट्रीयता | ------------------------------------------------ |
| ------------------------------------------------ | २९ |
| केंद्रशासित प्रदेश | ------------------------------------------------ |
| भाषा | ------------------------------------------------ |
| भारतातील प्रमुख राजकीय पक्ष | ------------------------------------------------ |
| भारतीय झेंडा | ------------------------------------------------ |

**ई. आता वरील माहितीच्या आधारे भारताविषयी थोडक्यात लिहू या.**



**ख. भारतातील काही आश्चर्ये**

**खालीलपैकी कोणती विधाने ध्वनिफितीत ऐकली? योग्य तो पर्याय अधोरेखित करू या.**

अ. दोंग हे गाव समुद्रसपाटीपासून १४२० मी. उंचीवर आहे.

१) हो २) नाही

आ. भारताचे पहिले रॉकेट (अग्निबाण) बैलगाडीतून नेण्यात आले होते.

१) हो २) नाही

इ. चैल येथे जगातील सर्वात उंचीवर असलेले क्रिकेटचे मैदान आहे.

१) हो २) नाही

ई. कुट्टनाड येथे समुद्रसपाटीपासून ४ ते १० फूट खाली भातशेती केली जाते.

१) हो २) नाही

उ. राजम्याचे दाणे पोर्तुगालहून भारतात आले.

१) हो २) नाही

ऊ. भारतात २८ अधिकृत प्रादेशिक भाषा आहेत.

१) हो २) नाही

ग. पुढील ई-पत्र वाचू या.

**नवीन संदेश**

**प्रति :** **शिवम जांभळे <shivam.jambhale@gmail.com>**

**विषय :** **भारतभ्रमण**

हाय शिवम,
कसा आहेस? आम्ही सगळे मजेत. गेस व्हॉट? मी, आई आणि बाबा येतोय भारतात. पुढच्या महिन्यात. आणि या वेळी चक्क तीन महिन्यांसाठी. सगळ्या नातेवाइकांना भेटता यावं म्हणून आणि आमची भारतभ्रमण करण्याची बऱ्याच वर्षांची इच्छाही पूर्ण करता यावी यासाठी बाबाने ही तीन महिन्यांची ट्रीप ठरवलीये. तर आम्ही पुढील महिन्याच्या ९ तारखेला येतोय आणि मुंबईलाच उतरतोय. म्हणजे आधी दक्षिण भारत फिरून घेता येईल. परतीचं विमानही दिल्लीहून आहे, शेवटी उत्तरेकडील ठिकाणं फिरता यावीत याकरता. तर आमचं हे भारतभ्रमण प्लॅन करण्यासाठी मदत करशील का? म्हणजे कोणती पर्यटन स्थळं पाहावीत, मुक्काम कुठे करावा, तसेच प्रवास आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कुठे आणि काय खावं. काही राहायला नको. म्हणून तुलाच विचारतेय. तुझे ब्लॉग्ज वाचत असतो आम्ही नियमितपणे. म्हणूनच कदाचित आमच्यात भारत फिरण्याची इच्छा निर्माण झाली.

वाट बघतेय तुझ्या उत्तराची.

भेटू लवकरच.
शची





पाठवा →

**उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये**

- एखाद्या कृतीमागील उद्देश दर्शविणारी अव्यये.
- या अव्ययांनी जोडलेल्या वाक्यांच्या पूर्वार्धात उद्देश व उत्तरार्धात परिणाम असतो.
  म्हणून, यासाठी, याकरता / याकरिता, यास्तव

उदा॰ सगळ्या नातेवाईकांना भेटता यावं म्हणून ही तीन महिन्यांची ट्रीप ठरवलीये.

**टीप :** उद्देशदर्शक उभयान्वयी अव्ययाने जी दोन वाक्ये जोडली जातात, त्यांतील पहिल्या वाक्याचे क्रियापद नेहमी विध्यर्थी असते.

**घ. उताऱ्यात आलेले रंगीत शब्द समजून घेऊन ते योग्य जागी भरू या.**

अ. ऑफिसला वेळेवर पोहोचावं ................ तिने अखेर रिक्षा केली.

आ. आपल्या मुलांनी शिकून मोठं व्हावं ................ आईबाप किती खस्ता खातात!

इ. मंत्र्यांच्या भेटीदरम्यान काहीही अनुचित घडू नये .......... चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली.

**च. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

संभाषण

टॅक्सीने येणे – उशीर न होणे

उदा. पहिला विद्यार्थी : टॅक्सीने का आलास तू?
दुसरा विद्यार्थी : उशीर होऊ नये म्हणून / यासाठी / याकरिता.

अ. मोठ्या सुट्टीवर जाणे – आराम करता येणे

आ. डाएट करणे – लवकर बारीक होता येणे

इ. सतत फिरायला जाणे – इतर संस्कृतींबद्दल माहिती मिळवता येणे

ई. खूप पुस्तकं वाचणे – ज्ञानात भर पडणे

उ. सायकल वापरणे – प्रदूषणात भर न पडणे



**'म्हणून'चे आणखीही काही उपयोग आहेत. पाहू या.**

| क्र. | उदाहरण |
|---|---|
| १. | खूप भूक लागली **म्हणून** मी सगळ्यांच्या आधी जेवून घेतलं. |
| २. | फिरायला **म्हणून** बाहेर पडलो आणि जोरात पाऊस आला. |
| ३. | "त्यांनी काय **म्हणून** माझी झडती घेतली?" विनू संतापाने म्हणाला. |
| ४. | प्रजा अकबराला भावी बादशाह **म्हणून** पाहत होती. |
| ५. | "मला काही सांगायचंय," असं **म्हणून** तिने बोलायला सुरुवात केली. |

**छ. चित्रफीत पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

अ. चित्रफितीत दिसणारी पात्रे कोणत्या धर्मांची आहेत?
१. ख्रिस्ती – इस्लाम  २. हिंदू – इस्लाम  ३. हिंदू – ख्रिस्ती

आ. चित्रफितीच्या सुरुवातील दिसणारे पात्र काय गात आहे?
१. पोवाडा  २. अभंग  ३. भजन

इ. 'भरल्या ताटावरून उठणे' म्हणजे –
१. एखादी गोष्ट अर्धवट सोडणे
२. अन्न वाया घालवणे
३. जेवण अर्धवट सोडणे

ई. पुढीलपैकी योग्य पर्याय कोणता
१. जिवबा व मिर्झा अनेक वर्षांपासून एकमेकांच्या शेजारी राहत असतात.
२. जिवबा व मिर्झा नव्यानेच एकमेकांच्या शेजारी राहायला आलेले असतात.
३. जिवबा व मिर्झा काही महिन्यांपासून एकमेकांच्या शेजारी राहत असतात.

उ. 'आतली कटकट' असे शिवबा कशाला उद्देशून म्हणतात?
१. मुलांच्या खेळण्याला
२. बायकांच्या गाण्याला
३. बायकांच्या गप्पांना

ऊ. 'हाडवैरी' म्हणजे –
१. सख्खे शेजारी
२. हाडाचे मित्र
३. कट्टर शत्रू

ए. चर्चा करू या – 'विविधतेत एकता' हा भारतीय संस्कृतीशी निगडित पैलू चित्रफितीत कशा प्रकारे दाखवला आहे? अशी आणखी उदाहरणे माहीत आहेत का तुम्हाला?

## २ भारत आणि जग

**क. वाचू या.**

आज आंतरराष्ट्रीय समूहात कोणतेही राष्ट्र पूर्णपणे स्वावलंबी नाही, त्याला कोणत्या ना कोणत्या गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून राहावेच लागते, किंवा आज जगातील कोणतेही राष्ट्र एकमेकांच्या सहकार्याशिवाय जगूच शकत नाही; त्याचप्रमाणे जगातील प्रत्येक राष्ट्र आज स्वतंत्र व सार्वभौम असल्यामुळे दुसऱ्याबरोबर आपले संबंध कशा प्रकारे प्रस्थापित झाले पाहिजेत याची जाणीव प्रत्येकालाच असते; म्हणजेच आपल्या गरजा भागविण्यासाठी ज्या वेळी दोन राष्ट्रे आपापसात संबंध प्रस्थापित करतात; त्या वेळी त्यांचे नेमके स्वरूप कशा प्रकारचे असावे हे निश्चित होणे आवश्यक असते, आणि याच स्वरूपाची दिशा ठरविण्यासाठी प्रत्येक राष्ट्र आपले परराष्ट्रधोरण निर्धारित करीत असते, किंबहुना परराष्ट्रधोरण निर्धारित करणे हे आज प्रत्येक राष्ट्राचे महत्त्वाचे कार्य बनलेले दिसून येते. परराष्ट्रधोरण म्हणजे एका राष्ट्राद्वारे दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण किंवा व्यवहार होय. राष्ट्राच्या कृतीची, स्वहितासाठी जुळणी करून घेणे हा परराष्ट्रधोरणाचा उद्देश समजला जातो.



**ख. जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. सार्वभौम | १. संबंध निर्माण करणे |
| आ. परराष्ट्रधोरण | २. ठरवणे |
| इ. निर्धारित करणे | ३. गरजा पूर्ण करण्यासाठी |
| ई. किंबहुना | ४. स्वाधीन |
| उ. संबंध प्रस्थापित करणे | ५. इतकेच नाही तर |
| ऊ. गरजा भागविण्यासाठी | ६. इतर राष्ट्रांबाबत स्वीकारलेला व्यवहार |

**ग. पुढील शब्दांचे उताऱ्यात आलेले विरुद्धार्थी शब्द लिहू या.**

अ. परतंत्र x ------------------------------

आ. परावलंबी x ------------------------------

इ. परहित x ------------------------------

**घ. चर्चा करू या.**

अ. भारताचा जगातील इतर देशांशी कशा प्रकारे संबंध येतो?

आ. जगातील विविध देश कशा प्रकारे एकमेकांवर अवलंबून असतात?

**च. प्राचीन भारत आणि जग**

**मुलाखतकार :** नमस्कार, आज आपल्याकडे प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ प्रा॰ डॉ॰ कमला वासुदेव आल्या आहेत. प्राचीन भारत आणि जग यांच्या संबंधाविषयी त्या आपल्याला मौलिक माहिती देणार आहेत. डॉ॰ वासुदेव, आपलं खूप स्वागत.

**डॉ॰ वासुदेव :** नमस्कार आणि धन्यवाद मला इथे बोलावल्याबद्दल.

**मुलाखतकार :** डॉ॰ वासुदेव, आज भारताचे सगळ्या जगाशी व्यापारी संबंध आहेत. या आंतरराष्ट्रीय संबंधांमुळे खूप मोठी आर्थिक उलाढाल रोज होत असते. आज जगभर भारताच्या बाजारपेठा आहेत. शिवाय जसजसे जग जवळ येत चालले आहे तसतशी सांस्कृतिक देवाणघेवाणही वाढत चालली आहे. कधी सुरू झाली ही देवाणघेवाण?



**डॉ॰ वासुदेव :** ही आर्थिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीची प्रक्रिया शेकडो वर्षांपूर्वी सुरू झाली. हा काळ होता इसवी सनाच्या पहिल्या शतकातला. या काळात भारत आणि पश्चिमेकडील देशांमध्ये व्यापारी संबंध निर्माण झाले. आताच्या पाकिस्तानात असलेल्या सिंधू नदीच्या किनारी वसलेल्या हडप्पा संस्कृतीचे लोक पश्चिमेकडील देशांशी व्यापार करत होते. या निमित्ताने केवळ व्यापार नाही, तर कपडे, भांडी, खाद्यपदार्थ, विज्ञान-तंत्रज्ञान-तत्त्वज्ञान, संगीत-नृत्य-शिल्प-चित्र इत्यादी कला, भाषा, अशा संस्कृतीच्या सर्वच

घटकांची देवाणघेवाण सुरू होती.
**मुलाखतकार** : म्हणूनच अफगाणिस्तानात बुद्धमूर्ती होत्या का?
**डॉ. वासुदेव** : आता भारत आणि अतिपूर्वेकडील देशांमध्ये बौद्ध धर्म अधिक प्रमाणात दिसत असला, तरी यापूर्वी बौद्ध धर्माचा प्रसार अफगाणिस्तान आणि मध्य आशियातील अनेक देशांमध्ये झाला होता. त्या काळातील ग्रीक इतिहासकारांनी भारताबद्दलच्या लेखनातून पश्चिमेकडील देशांना भारताचा परिचय करून दिला. ग्रीक मूर्तिकलेच्या प्रभावातून कुशाण काळात भारतामध्ये गांधार कलाशैलीचा प्रसार झाला. या शैलीतील बुद्धमूर्ती अफगाणिस्तानातल्या गांधार प्रांतात सापडल्या. भारतातील इसवी सनापूर्वीची नाणीही ग्रीक नाण्यांच्या धर्तीवर घडवलेली होती.
**मुलाखतकार** : भारत आणि रोम यांच्यातही व्यापारी संबंध होते ना?
**डॉ. वासुदेव** : होय, इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकाच्या काळात भारत आणि रोम यांच्यामधील व्यापार भरभराटीस आला होता. महाराष्ट्रातील कोल्हापूर तसेच तमिळनाडूमधील अरिकामेडू येथील उत्खननात रोमन बनावटीच्या अनेक वस्तू सापडल्या आहेत. अरबी लोकांनी भारतीय मालाबरोबर भारतीय तत्त्वज्ञान आणि विज्ञान युरोपपर्यंत पोचवले. आज परकीयांनी केलेल्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधनाला अपार महत्त्व दिले जात असले, तरी परकीयांआधी भारताने संपूर्ण जगाला एक मोठी देणगी दिली, ती गणितातील 'शून्य' ही संकल्पना.
**मुलाखतकार** : डॉ. वासुदेव, इतर आशियाई देशांशी भारताचे संबंध कसे होते?
**डॉ. वासुदेव** : खूपच चांगले व्यापारी संबंध होते. आशियातील अनेक देशांमध्ये प्राचीन भारतीय संस्कृतीचा विशेष प्रभाव पडला होता. श्रीलंकेतील मोती आणि इतर मौल्यवान वस्तूंना भारतात मोठ्या प्रमाणात मागणी होती.
**मुलाखतकार** : आणि चीनशी?
**डॉ. वासुदेव** : सम्राट हर्षवर्धनाने चीनच्या दरबारात राजदूत पाठवला होता. चीनची बाजारपेठ भारतभर पसरली ती तेव्हापासूनच. चीनमध्ये तयार होणाऱ्या रेशमी कापड म्हणजे 'चीनांशुक' याला भारतात मोठी मागणी होती. प्राचीन भारतातील व्यापारी खुश्कीच्या मार्गाने जगभर प्रवास करून या चीनांशुकाचा व्यापार करत असत. त्या मार्गाला 'रेशीम मार्ग' असेही म्हणतात.

खुश्की = जमीन

**मुलाखतकार** : रेशीम मार्ग?
**डॉ. वासुदेव** : होय. भारतातील काही प्राचीन स्थळे या रेशीम मार्गाशी जोडलेली होती. त्यांमध्ये महाराष्ट्रातील मुंबईजवळ असलेले नालासोपारा हे एक होते. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी भारतात आलेले फाहियान आणि ह्यून त्यांग हे बौद्ध भिक्खूही रेशीम मार्गानेच भारतात आले. इसवी सनाच्या पहिल्या शतकात चीनभर बौद्ध धर्माच्या प्रसारास चालना मिळण्याआधी बौद्ध भिक्खूंनी अनेक भारतीय बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेत रूपांतर केले. बौद्ध धर्म जपान, कोरिया, व्हिएतनाम या देशांमध्येही पोहोचला.
**मुलाखतकार** : आशियातल्या आणखी कोणत्या देशांशी भारताचा संबंध होता?
**डॉ. वासुदेव** : कंबोडिया या देशातील 'फुनान' या प्राचीन राज्याची स्थापना इसवी सनाच्या पहिल्या शतकात झाली. चिनी परंपरेच्या आधारे कौंडिण्य नावाच्या भारतीयाने त्याची स्थापना केली, अशी माहिती मिळते. फुनानच्या लोकांना संस्कृत भाषेचे ज्ञान होते. त्या काळातील एक कोरीव शिलालेख उपलब्ध आहे. तो संस्कृतमध्ये आहे. आग्नेय आशियातील इतर देशांमध्येही भारतीय वंशाच्या लोकांची छोटी राज्ये उदयाला आली होती. या राज्यांमुळे भारतीय संस्कृतीचा प्रसार आग्नेय आशियामध्ये होत राहिला. आग्नेय आशियातील



कला आणि सांस्कृतिक जीवन यांवर भारतीय संस्कृतीचा ठसा उमटलेला दिसतो. इंडोनेशियात आजही रामायण आणि महाभारत यांतील कथांवर आधारलेली नृत्य-नाट्ये लोकप्रिय आहेत. आग्नेय आशियातील राज्यांमध्ये भारतीय संस्कृतीचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला. प्राचीन कालखंडात बौद्ध धर्म म्यानमार, थायलंड, इंडोनेशिया इत्यादी देशांत पोहोचला. नंतरच्या काळात शिव आणि विष्णू यांच्या मंदिरांचीही निर्मिती झाली.

**मुलाखतकार** : डॉ. वासुदेव, तुम्ही खूप चांगली आणि महत्त्वाची माहिती आज आमच्या श्रोत्यांना दिलीत. त्याबद्दल तुमचे मनापासून आभार.

**छ. योग्य जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. शेकडो वर्षांपूर्वी | १. इसवी सन सुरू झाल्यापासूनची शंभर वर्षे |
| आ. इसवी सनाचे पहिले शतक | २. इराणी सम्राटाच्या काळात |
| इ. इराणी साम्राज्याचा काळ | ३. अनेक शतकांपूर्वीचा काळ |
| ई. प्राचीन कालखंड | ४. अनेक शतकांपूर्वी |

**ज. खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्यात शोधून अधोरेखित करू या.**

प्रश्न : अ. भारताचे जगातील इतर देशांशी व्यापारी संबंध कधी सुरू झाले?
आ. व्यापाराच्या निमित्ताने कोणत्या घटकांची देवाणघेवाण सुरू होती?
इ. पश्चिमेकडील देशांना भारताचा परिचय कसा झाला?
ई. रोमन बनावटीच्या वस्तू भारतात कुठे सापडल्या?
उ. भारताने संपूर्ण जगाला कोणती देणगी दिली आहे?
ऊ. चीनची बाजारपेठ भारतभर केव्हा पसरली?



**उत्तरे :** १. आग्नेय आशियातील इतर देशांमध्ये उदयाला आलेल्या भारतीय वंशाच्या लोकांच्या छोट्या राज्यांमुळे
२. महाराष्ट्रातील कोल्हापूर तसेच तमिळनाडूमधील अरिकामेडू येथील उत्खननात
३. गणितातील ‘शून्य’ ही संकल्पना
४. शेकडो वर्षांपूर्वी
५. कपडे, भांडी, खाद्यपदार्थ, विज्ञान-तंत्रज्ञान-तत्त्वज्ञान, संगीत-नृत्य-शिल्प-चित्र इत्यादी कला, भाषा, अशा संस्कृतीच्या सर्वच घटकांची
६. सम्राट हर्षवर्धनाने चीनच्या दरबारात राजदूत पाठवला तेव्हापासून
७. त्या काळातील ग्रीक इतिहासकारांनी केलेल्या भारताबद्दलच्या लेखनातून

| अ. | आ. | इ. | ई. | उ. | ऊ. | ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

| क्रमवाचक संख्याविशेषणे |
|---|
| उदा.<br>- इ. स. १९२१ मध्ये / विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पंजाबमधील रावी नदीच्या काठी हडप्पा येथे उत्खनन प्रथम सुरू झाले.<br>इ. स. ⟶ इसवी सन ⟶ १९०१ ते २००० – विसावे शतक – विसाव्या शतकात<br>इ. स. पूर्व ... शतकात ⟶ गौतम बुद्धाचा जन्म इसवी सन पूर्व पाचव्या शतकात झाला. |

**लक्षात ठेवा :**
क्रमवाचक संख्याविशेषणे नामाच्या लिंगाप्रमाणे पुढीलप्रमाणे बदलतात.

| तो | ती | ते |
|---|---|---|
| दुसरा<br>मुलगा | दुसरी<br>गाडी | दुसरे / दुसरं<br>पुस्तक |

**झ. उदाहरणाप्रमाणे खालील कोष्टक पूर्ण करू या.**

| उदा. १९०१ ते २००० | विसावे शतक | विसाव्या शतकात |
|---|---|---|
| अ. १८०१ ते १९०० | ---------- | ---------- |
| आ. ---------- | पंधरावे शतक | ---------- |
| इ. ७०१ ते ८०० | ---------- | ---------- |
| ई. २०१ ते ३०० | ---------- | ---------- |
| उ. ---------- | एकविसावे शतक | ---------- |
| ऊ. १७०१ ते १८०० | ---------- | ---------- |
| ए. ---------- | दुसरे शतक | ---------- |
| ॲ. १६०१ ते १७०० | ---------- | ---------- |

**ट. खालील वाक्यांत आवश्यक ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहू या.**

अ. दादासाहेब फाळक्यांनी **इ. स. १९१३ मध्ये** भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली.

उदा. दादासाहेब फाळक्यांनी **विसाव्या शतकाच्या सुरुवातीला** भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली.

> १९१३ – विसाव्या शतकाच्या सुरुवातीला / सुरुवातीस.
> १९८३ – विसाव्या शतकाच्या शेवटी.

आ. डॉ. आंबेडकरांनी १९२० च्या जानेवारी महिन्यात 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले.

इ. इ.स. १४९२मध्ये पश्चिमेकडे जाऊन भारताचा शोध ... घेण्याच्या प्रयत्नात ख्रिस्तोफर कोलंबस अमेरिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचला.

ई. इ. स. १६०० मध्ये इंग्रजांनी भारतात व्यापार करण्यासाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली.

उ. १७५७ पासून इंग्रजांनी अनेक भारतीय राज्ये ताब्यात घेतली.

ऊ. १७७४ ते १८१८ या दरम्यान मराठे व इंग्रज यांच्यात तीन युद्धे झाली.

ए. १८६० ते १९०० या काळात भारतात मोठे दुष्काळ पडले.



ॲ. १८५३ साली मुंबई-ठाणे रेल्वे मार्गावर आगगाडी धावू लागली.

ऐ. १८५७ साली कोलकाता, मुंबई, मद्रास (चेन्नई) येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली.



ओ. इ. स. पूर्व ३३०० ते १३०० हा हडप्पा येथील सिंधू संस्कृतीचा काळ मानला जातो.

**आता लेखातील गुलाबी रंगातील शब्दांचा अभ्यास करू या.**

**टीप : शब्दयोगी पदे - आधी, पूर्वी, भर (कालवाचक)**

- ही शब्दयोगी पदे जोडून नामांची व क्रियापदांची कालवाचक क्रियाविशेषणे तयार होतात.
- नामाला व क्रियापदाला ‘आधी’ व ‘पूर्वी’ ही शब्दयोगी पदे जोडताना त्यांचे सामान्य रूप होते.
- नामाला ‘भर’ हे शब्दयोगी पद जोडताना नामाचे सामान्य रूप होत नाही.

उदा॰ आज दिवसभर टीव्हीवर निवडणुकीच्या बातम्या येत आहेत.
परकीयांआधी भारताने संपूर्ण जगाला एक मोठी देणगी दिली.
आर्थिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीची प्रक्रिया शेकडो वर्षांपूर्वी सुरू झाली.

- नामाचे / क्रियापदाचे सामान्य रूप + आधी, पूर्वी, भर

**आणखी काही उदाहरणे-**

| शब्दयोगी पद | भर | आधी | पूर्वी |
|---|---|---|---|
| उदाहरणे | क्षणभर | शाळेआधी | वर्षांपूर्वी |
| | दिवसभर | जेवणाआधी | झोपण्यापूर्वी |
| | आयुष्यभर | जाण्याआधी | करण्यापूर्वी |

**ठ. गाळलेल्या जागा भरू या.**

**-भर**

अ. आज ------------------------ पाऊस पडत होता.
आ. ------------------------ मी तिच्याकडे पाहतच राहिलो.
इ. आपल्या मुलांना चांगलं शिक्षण मिळावं म्हणून सगुणाने ------------------------ खस्ता खाल्ल्या.
ई. मी रोज सकाळी ------------------------ प्राणायाम करते.
उ. दहावीत ------------------------ सौरभने मनापासून अभ्यास केला.



आयुष्य
वर्ष
दिवस
तास
क्षण

**-आधी**

ऊ. नाटकाला ------------------------ बाबांची परवानगी घेतलीस का?
ए. रोज ------------------------ दोन तास क्लास असतो.
ॲ. ------------------------ हात स्वच्छ धुवावेत.

जेवण
जाणे
शाळा

**-पूर्वी**

ऐ. रोज रात्री ------------------------ दात घासावेत.
ओ. परदेशी नोकरीसाठी अर्ज ------------------------ एकदा नीट विचार कर.
ऑ. दोन ------------------------ मी कोलकात्याहून मुंबईला आलो.

वर्ष
झोपणे
करणे

**टीप :**

१. असाही वापर – (काही ठिकाणी शब्दाचे सामान्य रूप होते)
उदा. वर्ष + भर + आधी = वर्षभराआधी / वर्ष + भर + पूर्वी = वर्षभरापूर्वी
तास + भर + आधी = तासाभराआधी / महिना + भर + पूर्वी = महिन्याभरापूर्वी
वर्ष + भर + ने = वर्षभराने
तास + भर + त = तासाभरात

२. इतर शब्दयोगी पदांप्रमाणेच आधी, पूर्वी आणि भर या पदांपुढेही षष्ठीचे प्रत्यय लागतात.
उदा. परीक्षेआधीचा अभ्यास, वर्षांपूर्वीचे गाव, दिवसभराचा थकवा इ.

**ड. कंसातील शब्दांना आधी / पूर्वी जोडून रिकाम्या जागा भरू या.**

अ. (स्वातंत्र्य + पूर्वी) ------------------------ विविध वृत्तपत्रे लोकजागृतीचे काम करत होती.

आ. शेतीच्या (व्यापारीकरण + आधी) ------------------------ मुख्यत्वे स्वत:च्या गरजेपुरते अन्नधान्य पिकवले जायचे.



इ. १८५७ च्या (स्वातंत्र्यलढा + पूर्वी) ------------------------ भारतात ब्रिटिशांविरोधात अनेक लढे झाले.

ई. (इंग्रज + आधी) ------------------------ पोर्तुगीज भारतात आले होते.

उ. १९७१ (साल + पूर्वी) मूत्रपिंड प्रत्यारोपणासारख्या शस्त्रक्रिया भारतात तितक्याशा होत नव्हत्या.

**ढ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

दिवस- – झोपा काढणे

उदा. पहिला विद्यार्थी : काय केलंस दिवसभर?
दुसरा विद्यार्थी : आज दिवसभर मी झोपा काढल्या.

अ. वर्ष- – यु.पी.एस.सी.ची तयारी करणे

आ. महिना- – योगासने (योगासनं) शिकणे

इ. आठवडा- – दिवाळीची तयारी करणे

ई. तास- – बसची वाट पाहणे

संभाषण

**त. पुढील बातमी वाचू या व त्याखालील प्रश्न सोडवू या.**

**'या' कारणासाठी भारताने यूएईकडून मिळणारे ७०० कोटी रुपये नाकारले**



केरळमध्ये पुराचे पाणी ओसरल्यानंतर आता झालेल्या नुकसानीचे नेमके चित्र समोर येत आहे. पावसाच्या रौद्ररूपामुळे ओढवलेल्या या भीषण आपत्तीत होत्याचे नव्हते झाले. मानवी जीवनाबरोबरच हजारो कोटी रुपयांची मालमत्ता 'स्वाहा' झाली. पुरामध्ये घरदार वाहून गेल्यामुळे लाखो लोकांचे संसार उघड्यावर आले आहेत. जे बचावले आहेत त्यांच्यासाठी पुढचा प्रवास सोपा नाही. आयुष्य नव्याने उभे करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. या पुराच्या दररोज समोर येणाऱ्या नवनवीन फोटोंमुळे पुढचा मार्ग किती खडतर असेल त्याची कल्पना येते. या कठीण प्रसंगात केरळसाठी देश-विदेशातून मदतीचे हात पुढे आलेले असले तरी मिळणारी मदत ही तात्पुरत्या स्वरूपाची आहे. सध्या केरळवर ओढवलेली आपत्ती मानवनिर्मित की, नैसर्गिक हा वाद सुरू आहे. खरं तर या वादात न पडता त्यावर मात करून बाहेर कसे पडायचे यावर विचार केला पाहिजे.

केरळसमोर पुनर्निर्माण आणि पुनर्वसन हे दोन मुख्य प्रश्न असून ते करताना सरकारची कसोटी लागणार आहे. सध्या केरळला संयुक्त अरब अमिराती सरकारकडून ७०० कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. त्यावरून वाद सुरू आहे. केरळची परिस्थिती भीषण असल्याने ही मदत नाकारू नये असे राज्य सरकारचे मत आहे, तर दुसऱ्या देशांची मदत न घेता आपणच आपल्या पायावर उभे राहू असे केंद्रसरकारचे मत आहे. वास्तविक भारताची क्षमता आणि जगभरात निर्माण झालेली प्रतिमा विचारात घेतली तर मदत नाकारण्याचा निर्णय योग्य वाटतो. आज भारत अनेक देशांसाठी मोठया भावाची भूमिका बजावत आहे. आज भारताकडून छोटया देशांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे आपणच दुसऱ्यांच्या मदतीवर अवलंबून आहोत हा संदेश जाणे योग्य नाही.

अवकाश असो वा तंत्रज्ञान, अनेक क्षेत्रांत भारताने प्रगती केली आहे. मोजक्या देशांच्या पंक्तीत आपले स्थान निर्माण केले आहे. आपण पूर्णपणे विकसित देशांमध्ये मोडत नसलो, तरी आलेले संकट स्वबळावर परतवून लावण्यास सक्षम आहोत. महत्त्वाच्या जागतिक प्रश्नांवर आपली भूमिका निर्णायक ठरत नसली, तरी जगाला आपल्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे दुसऱ्या देशाच्या मदतीसाठी हात पसरणे योग्य नाही.

**अ. प्रस्तुत लेखात / बातमीत कोणत्या आपत्तीचा उल्लेख आला आहे?**

**आ. संकटसमयी इतर देशांकडून मदत घेणे योग्य की अयोग्य? का?**

**इ. युएईकडून मिळणारी मदत भारताने का नाकारली असेल?**

**थ. जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. होत्याचे नव्हते होणे | १. अंगी क्षमता असणे / -च्या योग्य असणे |
| आ. स्वाहा होणे | २. संकटाशी सामना करणे |
| इ. संसार उघडयावर येणे | ३. उपाय कठीण असणे |
| ई. आयुष्य नव्याने उभे करणे | ४. आपली ओळख निर्माण करणे |
| उ. मार्ग खडतर असणे | ५. मदत मागणे / न मागणे |
| ऊ. मदतीचे हात पुढे येणे | ६. घरदार मोडून पडणे |
| ए. कसोटी लागणे | ७. संकटातून बाहेर पडून नव्याने सुरुवात करणे |
| ॲ. आपल्या पायावर उभे राहणे | ८. खूप मोठे नुकसान होणे |
| ऐ. आपले स्थान निर्माण करणे | ९. मदत मिळणे |
| ओ. संकट परतवून लावणे | १०. क्षमतेची परीक्षा द्यावी लागणे |
| ऑ. सक्षम असणे | ११. नष्ट होणे |
| औ. मदतीसाठी हात पसरणे / न पसरणे | १२. स्वबळावर सक्षम होणे |

**द. खालील शब्दांसाठी किंवा शब्दसमूहांसाठी लेखातील योग्य शब्द निवडून लिहू या.**

अ. एखाद्या नष्ट झालेल्या गोष्टीची नव्याने निर्मिती करणे - ----------------

आ. एखादा नष्ट झालेला भाग नव्याने वसवणे - ----------------

इ. भयंकर, भयावह - ----------------

ई. निर्णय घेण्यास कारणीभूत ठरणारे - ----------------

उ. स्वत:च्या इच्छेनुसार - ----------------

ऊ. स्वार्थी वृत्ती - ----------------



**ध. खालील मुद्द्यांच्या संदर्भात लेखात कोणती माहिती आली आहे? स्वत:च्या शब्दांत थोडक्यात लिहू या.**

अ. केरळवर ओढवलेली भीषण आपत्ती

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

आ. परदेशी मदत व भारताची त्याविषयीची भूमिका

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

इ. भारताने केलेली प्रगती

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

भारत म्हणजे मानववंशाचा पाळणा, मानवी भाषेचे जन्मस्थान, इतिहासाची जननी, पुराणांची आजी आणि परंपरेची पणजी होय. मानवी इतिहासाची सर्वांत मौल्यवान आणि रचनात्मक सामग्री भारतातच दडलेली आहे. **- मार्क ट्वेन**

## करा आणि शिका

**भारताबद्दल बऱ्याच तज्ज्ञांनी, इतिहासकारांनी, तत्त्वज्ञांनी फार पूर्वीपासून लिहून ठेवले आहे. २-३ विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे गट तयार करा. भारताबद्दलची अशीच विविध भाषांतील प्रसिद्ध उद्धरणे शोधा व एक छानसे कोलाज तयार करा. तुम्ही निवडलेल्या उद्धरणाचा अर्थ वर्गातील इतर विद्यार्थ्यांना मराठीतून समजावून सांगा.**

करा आणि शिका

### व्यक्तिपरिचय



**महात्मा गांधी**

**(२ ऑक्टोबर १८६९ – ३० जानेवारी १९४८)**

७ जून, १८९३. दक्षिण आफ्रिकेतल्या रेल्वेच्या गाडीतून पहिल्या वर्गाचे तिकीट काढून प्रवास करू पाहणारा एक भारतीय तरुण बॅरिस्टर मोहनदास करमचंद गांधी. पहिल्या वर्गाचे तिकीट असूनही केवळ कृष्णवर्णीय असल्याने त्यांना तिसऱ्या वर्गात बसायला सांगून त्यांचा अपमान करण्यात आला. हा एकच प्रसंग नव्हे, तर द. आफ्रिकेत त्यांना अनेकदा वंशभेद व वर्णभेदाला सामोरे जावे लागले, अपमान सहन करावा लागला. आणि या प्रसंगांनी त्यांच्या

आयुष्याला कलाटणी मिळाली. तिथे असताना त्यांना आपण आणि भारतीय समाजाचे गुंतागुंतीचे प्रश्न यांच्यातील अंतर प्रकर्षाने जाणवले. तिथल्या भारतीय नागरिकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी लढण्याची, गोऱ्या साहेबाची गुलामगिरी करण्याला नकार देण्याची प्रबळ इच्छा जागृत झाली आणि यातूनच एका नव्या स्वातंत्र्यलढ्याला सुरुवात झाली. असहकार आणि अहिंसात्मक मार्गाने द. आफ्रिकेत वर्णद्वेषाचा विरोध करतानाच भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीही हाच असहकाराचा आणि अहिंसेचा मार्ग अवलंबण्याचा निश्चय त्यांनी केला.



इ.स. १९३० मध्ये इंग्रजांनी मिठावर लादलेल्या कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० कि.मी. (२५० मैल) लांब दांडी यात्रेमध्ये नेतृत्व केले. इ.स. १९४२ मध्ये इंग्रजांविरुद्ध 'भारत छोडो आंदोलन' चालू केले. खेड्यांकडे खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले आणि आपल्या जमिनी सोडून शहरांकडे वळणाऱ्या समाजाला "खेड्याकडे चला" अशी साद घातली.

सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा अवलंब त्यांनी शेवटपर्यंत निष्ठेने केला. गांधीजींनी आपले आयुष्य सत्याच्या शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे 'माझे सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. स्वदेशीची चळवळ, असहकार आंदोलन, नि:शस्त्र क्रांती ही गांधीजींच्या सत्याग्रहाची वैशिष्ट्ये. त्यांच्या पूर्ण स्वराज्याच्या कल्पनेत पूर्ण वैयक्तिक, धार्मिक आणि राजकीय स्वातंत्र्य समाविष्ट होते. त्यांनी अहिंसेच्या तत्त्वाला स्वदेशीची जोड दिली. त्यांनी सर्वांना परदेशी - विशेषत: ब्रिटिश - वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आणि खादी वापरण्याचा आग्रह धरला.

समाजातल्या तळागाळातल्या उपेक्षितांना त्यांनी 'हरिजन' म्हटले. भारतातील कितीतरी जनता अर्धनग्न अवस्थेत जगते ही जाणीव झाल्याने धोतर आणि पंचा एवढाच वेष कायम ठेवला. स्वावलंबनाचा पुरस्कार करणाऱ्या गांधीजींनी नेहमी स्वत: कातलेल्या सुताचे धोतर परिधान केले.

गोपाळ कृष्ण गोखले हे त्यांचे राजकीय गुरू. त्यांनीच गांधीजींना भारतीय राजकारणाचा आणि समाजकारणाचा परिचय करून दिला. रवींद्रनाथ टागोरांनी त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. त्यांचे निकटवर्तीय, सगळे राजकीय नेते आणि सामान्य जनता त्यांना प्रेमाने, आदराने 'बापू' म्हणे.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो भारतीय, ते - | ती देवाणघेवाण, - | ते स्वातंत्र्य, - |
| तो झेंडा, ते झेंडे | ती समुद्रसपाटी | ते दळणवळण |
| तो संगम, ते - | ती देणगी, त्या देणग्या | ते शिखर, ती शिखरे |
| तो अग्निबाण, ते - | ती भातशेती | ते भारतभ्रमण |
| तो भूभाग, ते - | ती पोटभाषा, त्या - | ते राष्ट्र, ती राष्ट्रे |
| तो खाद्यप्रकार, ते - | त्या खस्ता (नित्य बहुवचनी) | ते धोरण, ती धोरणे |
| तो दाणा, ते दाणे | ती सुरक्षा | ते स्वहित |
| तो उद्देश, ते - | ती यातना, त्या - | ते परहित |
| तो काळ, ते - | ती उलाढाल, त्या उलाढाली | ते शतक, ती शतके |
| तो प्रसार | ती संस्कृती, त्या - | ते उत्खनन, ती उत्खनने |
| तो संपर्क | ती इतिहासकार, त्या - | ते तत्त्वज्ञान, ती तत्त्वज्ञाने |
| तो इतिहासकार, ते - | ती मूर्ती, त्या - | ते पाक्षिक, ती पाक्षिके |
| तो उगम, ते - | ती मूर्तिकला | ते युद्ध, ती युद्धे |
| तो परस्परसंबंध, ते - | ती कलाशैली, त्या - | ते पुनर्वसन, ती पुनर्वसने |
| तो राजदूत, ते - | ती चेहरेपट्टी, त्या चेहरेपट्ट्या | ते संकट, ती संकटे |
| तो भिक्खू, ते - | ती बनावट, त्या बनावटी | ते पुनर्निर्माण |
| तो शिलालेख, ते - | ती संकल्पना, त्या - | ते मोती, ती मोत्ये |
| तो वंश, ते - | ती परंपरा, त्या - | |
| तो ठसा, ते ठसे | ती टोळी, त्या टोळ्या | |
| तो कालखंड, ते - | ती खिंड, त्या खिंडी | |
| तो किनारा, ते किनारे | ती मुहूर्तमेढ, त्या मुहूर्तमेढी | |
| तो प्राणायाम, ते - | ती विविधता | |
| तो मतभेद, ते - | ती स्वीकारार्हता | |

| | | |
|---|---|---|
| | ती मालमत्ता, त्या - | |
| | ती आपत्ती, त्या - | |
| | ती कसोटी, त्या कसोट्या | |
| | ती प्रतिमा, त्या - | |
| | ती विचारसरणी | |

- **क्रियापद**

विसावणे, भोगणे, वसणे, घडवणे, पोचवणे, पसरणे, सुचवणे, स्वीकारणे, नाकारणे, ओढवणे, वसवणे

- **विशेषण**

अतुल्य, सांस्कृतिक, राष्ट्रीय, राजकीय, भारतीय, नैसर्गिक, लोकप्रिय, अधिकृत, प्रादेशिक, सर्वाधिक, चोख, आंतरराष्ट्रीय, स्वावलंबी, स्वतंत्र, सार्वभौम, परराष्ट्रीय, शेकडो, इराणी, ग्रीक, तत्कालीन, अरबी, प्राचीन, रेशमी, चिनी, कोरीव, खडतर, तात्पुरता, भीषण, मोजका, विकसित, सक्षम, निर्णायक, परदेशी, संकुचित

- **क्रियाविशेषण**

अखेर, जोरात, प्रामुख्याने, सर्वप्रथम, नियमितपणे, कदाचित, नेहमीच, मुख्यत्वे

- **नाम / इतर शब्द + क्रियापद**

खस्ता खाणे, यातना भोगणे, निर्धारित करणे, उगम होणे, भरभराटीस येणे, प्रभाव पडणे, उदयाला येणे, ठसा उमटणे, मुहूर्तमेढ रोवणे, आपत्ती ओढवणे, मदत जाहीर करणे, सामना करणे

- **म्हणी आणि वाक्प्रचार**

होत्याचे नव्हते होणे, स्वाहा होणे, संसार उघड्यावर येणे, नव्याने उभे करणे, मार्ग खडतर असणे, कसोटी लागणे, आपल्या पायांवर उभे राहणे



## आता मला हे येतं...

भारताविषयी जाणून घेणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

भारत आणि जग – परस्परसंबंध – चर्चा करणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये : म्हणून, यासाठी, याकरिता, यास्तव

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

'म्हणून'चे वेगवेगळे उपयोग

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

क्रमवाचक संख्याविशेषणे : पहिले, दुसरे, तिसरे ... अठरावे, एकोणिसावे, विसावे ...

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शब्दयोगी पदे : भर, आधी, पूर्वी

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ६ घरकुल



## चला, शिकू या...

- बदलत्या काळातील घरे
- घरसजावट
- कुटुंब, कुटुंबसंस्था
- समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये : आणि, अन्, न्, नि इ.
- प्रयोजक क्रियापदे
- आधीच ... तशात / त्यात

## १ माझं घर

**क. पुढील प्रश्नांच्या साहाय्याने स्वत:विषयी सांगू या.**

अ. तुम्ही कुठे, कसे व कोणाबरोबर राहता?

आ. तुम्ही जिथे राहताय तिथे किती वर्षं राहताय?

इ. तुम्हाला तुमचं घर आवडतं का? घरातल्या कोणत्या गोष्टी आवडतात? कोणत्या आवडत नाहीत?



**ख. खालील मनोगते वाचू या व त्याखालील प्रश्नांची योग्य उत्तरे निवडू या.**

**सुझी**

मी मूळची इंदूरची. दोन वर्षांपूर्वी पुण्यात आले. शिक्षणासाठी. तेव्हापासून एका मावशींकडे पेईंग गेस्ट म्हणून राहतेय. सुरुवातीला एकटं वाटायचं. घराची, घरच्यांची खूप आठवण यायची. पण आता सवय झालीये माझ्या या खोलीची. उलट आता इथेच जास्त कम्फर्टेबल वाटतं. अभ्यासात छान मन रमतं, शांत झोप लागते. आणिक मावशींच्या हातचं जेवण म्हणजे अहाहा! सुटीत कधी इंदूरला गेले तरी कधी एकदा इकडे येतेय असं वाटतं.

**सुहाना व प्रल्हाद**



आम्ही जळगावचे. प्रेमविवाह केला. तोही आंतरधर्मीय. त्यामुळे गावात तर राहणं शक्य नव्हतं. तेव्हा आलो मुंबईत. थोडे हात-पाय मारल्यावर प्रल्हादला नोकरी मिळाली. मग हे घर घेतलं भाड्याने. आता जवळजवळ ५ वर्षं झालीत या घरात. त्यामुळे आमचंच वाटतं. शिवाय घरमालकही चांगले आहेत. भाडं द्यायला कधी थोडा उशीर जरी झाला तरी काही कटकट नाही. या घराने खूप काही दिलंय. माझं बी. एड., मुलाचा जन्म नि माझी नोकरी, या सगळ्याचं साक्षीदार आहे हे आमचं घर.

**श्री. व सौ. शेट्टी**

दोघांच्या मेहनतीचं हे फळ आहे. स्वत:चं घर घेऊ असं कधीच वाटलं नव्हतं. पण हिंमत करून केलं बुक. दोघंही नोकरी करत होतोच, त्यामुळे इ. एम. आय. भरणंही तसं फार कठीण गेलं नाही. हळूहळू घरातल्या इतर गोष्टीही घेत गेलो. सुषमाला भारी आवड घरसजावटीची. नेहमी नीटनेटकं ठेवत असते ती घर. ह्या खुर्च्या, हा झोपाळा, कपाटं, आणखी हा आरसाही. घरात येणारी प्रत्येक गोष्ट हिच्या आवडीचीच असते. या संपूर्ण प्रवासात काही आव्हानंही पेलली, पण हे घरही होतंच साथीला. शेवटी असंच म्हणेन, एकदा तरी घर पाहावं बांधून.

**स्मिता, चैत्रा, मिनू, समा**

आमच्यासाठी आमचं हॉस्टेलच आमचं घर. शिक्षणासाठी म्हणून या शहरात आलो तेव्हापासून या घरात म्हणजे हॉस्टेलमध्ये राहतोय. एव्हाना तर आमच्यापैकी दोघींना नोकरीही लागलीये. समा तिच्या ऑडिशनची तयारी करतेय अन् स्मिता गेटची. जेवणासाठी तसा डबा लावलाय; पण कधी मूड असेल, तर चौघी मिळून छान स्वयंपाकही करतो. जिथे आपल्याला करमतं, सुरक्षित वाटतं, जिथे रात्री परत यावंसं वाटतं, जिथे जिवाला जीव देणारी, आपल्यावर प्रेम करणारी, आपली काळजी घेणारी आणि प्रसंगी ओरडणारीही माणसं असतात, त्यालाच तर घर म्हणतात.



अ. सुझी पुण्यात का आली?
१. नोकरीसाठी २. शिक्षणासाठी

आ. सुझीला तिच्या पुण्यातील घरात खूप एकटं वाटतं.
१. हो. २. नाही.

इ. सुझीला इंदूरच्या घरी जास्त करमतं.
१. नाही. २. सांगता येत नाही.

ई. सुहाना व प्रल्हाद मुंबईत ---------- घरात राहतात.
१. भाड्याच्या २. स्वत:च्या

उ. मुंबईत आल्यावर लगेच सुहानाला नोकरी लागली.
१. हो. २. नाही.



ऊ. श्री॰ व सौ॰ शेट्टींनी कर्ज काढून घर घेतलं आहे.
१. हो. २. नाही.

ए. श्री॰ शेट्टींना घरसजावटीची आवड आहे.
१. हो. २. नाही.

ॲ. स्मिता तिच्या मैत्रिणींबरोबर ---------------------- राहते.
१. हॉस्टेलमध्ये. २. पेईंग गेस्ट म्हणून.

ऐ. नोकरी कोणाला लागलीये?
१. समा आणि चैत्राला. २. चैत्रा आणि मिनूला.

**ग. पुढील वाक्प्रचारांचे योग्य अर्थ निवडू या.**

अ. मन रमणे -
१. आवड वाटणे २. विसर पडणे ३. मन भरकटणे

आ. हात-पाय मारणे -
१. पोहायला शिकणे २. प्रयत्न करणे ३. मारामारी करणे

इ. आव्हाने पेलणे -
१. वजन उचलणे २. चुका करणे ३. कठीण गोष्टी करून दाखवणे

ई. जिवाला जीव देणे -
१. साथ देणे २. बलिदान देणे ३. आत्महत्या करणे

घ. आता वरील मनोगतांमधील निळ्या रंगाच्या शब्दांचा अभ्यास करू या. कोणते शब्द ओळखीचे वाटतायत?

**समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये**




उदा. समा तिच्या ऑडिशनची तयारी करतेय अन् स्मिता गेटची.

- या अव्ययांनी दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडली जातात आणि जोडले गेलेले शब्द / वाक्य पहिल्या शब्दात / वाक्यात भर घालतात.
- व, आणि, शिवाय, अन्, न्, नि, आणखी, आणखीन, आणिक

**च. जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. माझे आजोबा ८३ वर्षांचे आहेत | १. **अन्** दोन कासवंही आहेत. |
| आ. हा माझा भाऊ अक्षय | २. **शिवाय** त्याची ध्वनिफीतही तयार करून मिळेल. |
| इ. आमच्या घरात दोन कुत्री, एक मांजर | ३. **व** आजी ८० वर्षांची. |
| ई. आमच्या येथे समारंभाची छायाचित्रे घेतली जातील | ४. **नि** आई डॉक्टर. |
| उ. माझे बाबा पायलट आहेत | ५. **आणखी** एक आरसा घ्यायचाय. |
| ऊ. घरासाठी काही खुर्च्या, एक छोटं कपाट, घड्याळ | ६. **आणि** ही त्याची बायको पूजा. |

**लक्षात ठेवा-**
* ‘अन्, नि, न्’ ही ‘आणि’ ची अपभ्रष्ट रूपे आहेत.
* ‘अन्, नि, न्’ चा वापर विशेषत: बोलताना केला जातो.
* ‘व’ चा वापर लेखनभाषेत केला जातो.

**छ. ‘आणि’ चा वेगळ्या प्रकारे वापर-**

- मी आणि स्टुडन्ट? (शक्यच नाही.)
- मनोहर आणि सत्यनारायणाची पूजा? (अशक्य! तो तर नास्तिक आहे.)
- बाबूने आणि मला ओळखले? (शक्य नाही. त्याने मला पूर्वी कधीही पाहिलेले नाही.)

**वरील उदाहरणांमध्ये ‘आणि’ हे समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय म्हणून आलेले नाही.**

**ज. पुढील वाक्ये वाचू या व ज्या वाक्यांमध्ये 'आणि' हे समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय म्हणून आलेले आहे त्या वाक्यांपुढे (✓) ची खूण करू या.**

अ. शाल्मली आणि खोटं?

आ. विनित आणि अमित सख्खी भावंडं आहेत?

इ. नम्रता आणि वेळेवर येणार?

ई. गॅलरी आणि ओसरीमध्ये काय फरक आहे?

उ. दीप्ती आणि ओजस एकत्र राहतात?

ऊ. तू आणि मैदानात?

ए. मी आणि गाणं?

## २. क. ऐकू या व गाळलेल्या जागा भरू या.

**घर असावे घरासारखे**

घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या ----------------------

तिथे असावा प्रेम ----------------------
नकोत नुसती नाती

त्या शब्दांना अर्थ असावा
नकोच नुसती ----------------------

---------------------- जुळावे परस्परांचे
नकोत नुसती गाणी

त्या अर्थाला ---------------------- असावा
नकोत नुसती नाणी

अश्रूंतुनही प्रीत ----------------------
नकोच नुसते पाणी

या घरट्यांतुन पिल्लू उडावे
दिव्य घेउनी ----------------------

---------------------- पंख असावे
उंबरठ्यावर भक्ती



**- विमल लिमये**

**ख. आता ही ध्वनिफीत पुन्हा ऐकू या व योग्य पर्याय निवडू या.**

अ. घराला घरपण कशामुळे येते?
१. भिंतींमुळे २. घरातील माणसांमुळे ३. घरातील वस्तूंमुळे

आ. 'नकोच नुसती वाणी' म्हणजे
१. केवळ बडबड नको
२. वाण्याचं दुकान घराजवळ नको
३. 'व', 'आणि' ही अव्यये नकोत



इ. 'त्या अर्थाला अर्थ असावा' या ओळीतील पहिला अर्थ म्हणजे-
१. हेतू २. पैसा ३. पृथ्वी

ई. 'आकांक्षांचे पंख असावे उंबरठ्यावर भक्ती' या ओळींचा योग्य अर्थ कोणता?
१. उंच झेप घेण्याचा प्रयत्न करावा परंतु पुन्हा घराकडे येण्याची ओढ असावी.
२. मोठी स्वप्नं पाहावीत व ती पूर्ण करण्यासाठी देवाची भक्ती करावी.
३. केवळ उंबरठ्यावरच देवाची भक्ती करावी.

**ग. 'सूर जुळावे परस्परांचे नकोत नुसती गाणी' या ओळींतून कवीला काय सांगायचे आहे? चर्चा करू या.**

**घ. 'घरकुल' या विषयाशी निगडित काही नाम-क्रियापद जोड्या खाली दिल्या आहेत. त्यांचा योग्य अर्थ शोधू या.**

| | |
|---|---|
| अ. आधार देणे | १. राखण करणे |
| आ. आसरा घेणे | २. एका जागी राहणे |
| इ. घरदार सोडणे | ३. सुख निर्माण करणे |
| ई. देखरेख करणे | ४. आश्रय घेणे |
| उ. वास्तव्य करणे | ५. घरापासून दूर राहणे |
| ऊ. नंदनवन बनवणे | ६. संरक्षण देणे |

**च. गाळलेल्या जागी योग्य त्या नाम-क्रियापद जोडीचा वापर करू या.**

अ. बाळाने आपल्या बालक्रीडांनी घराचे ------------------------.
आ. पडक्या वाड्याला टेकू लावून ------------------------ गरजेचे होते.
इ. नोकरीपायी रामने ------------------------.
ई. परदेशात शिक्षणासाठी गेलेल्या परेशने तेथेच ------------------------.
उ. बंगल्याची ------------------------ कुणालबापूंनी एक दारवान नेमला.
ऊ. राजकीय सत्तांतर किंवा बेकारी यांमुळे निर्वासित झालेले लोक शेजारील देशांमध्ये ------------------------.

## ३ घर सजावट

**क. बघू या, आपण कुठल्या प्रकारात मोडतो. प्रत्येक प्रश्नासमोरील पर्यायांपैकी एक पर्याय निवडू या. शेवटी आपण निवडलेल्या पर्यायासमोरील गुणांची बेरीज करू या.**

| प्रश्न | पर्याय १ | पर्याय २ | पर्याय ३ |
|---|---|---|---|
| **अ.** तुम्हाला घर सजवायला आवडतं का? | हो (५) | नाही (३) | घर - सजावट म्हणजे? (२) |
| **आ.** तुम्ही तुमचं घर कधी सजवता? | इच्छा होईल तेव्हा (५) | सणासुदीला (३) | पाहुणे येणार असतील तेव्हा (२) |
| **इ.** घर सजवताना तुम्ही कोणत्या गोष्टीकडे विशेष लक्ष देता? | सजावटीसाठी आवश्यक वस्तू (५) | घरच्यांची आवड (३) | होणारा खर्च (२) |
| **ई.** घर सजवण्यामागचं कारण? | बदलातून आनंद मिळावा म्हणून (५) | फावल्या वेळातील विरंगुळा म्हणून (३) | इतरांनी कौतुक करावं म्हणून (२) |
| **उ.** घर - सजावट म्हणजे तुमच्यासाठी नेमकं काय? | घरातीलच वस्तूंची जागा बदलणं (५) | नवीन वस्तू विकत आणणं (३) | जुन्या वस्तू टाकून देणं (२) |
| **ऊ.** घर सजवताना तुम्ही कोणत्या गोष्टी विचारात घेता? | नवीन ट्रेंड्स (५) | स्वत:ची आवड (३) | गरज (२) |

जर तुमची बेरीज २५-३० येत असेल तर तुम्ही पक्के डिझाइनर आहात.
जर तुमची बेरीज १५-२५ येत असेल तर तुम्ही विशेष प्रसंगांच्या वेळी घर सजवता.
जर तुमची बेरीज १०-१५ येत असेल तर तुम्ही गरज पडली तरच घराची सजावट करता.

**ख. आखीव-रेखीव : सजावटीचे पर्याय**



घर सजवणे हा तसा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय. सजावटीने घरदार प्रसन्न होतं आणि आपोआप मनही. आपलं आणि आपल्या घराचं नातंच वेगळं असतं. मन प्रसन्न राहण्याकरता त्यात केलेले छोटे बदलही महत्त्वाचे असतात. बदल करण्यासाठी कोणतेही सणवार असण्याची गरज नाही. जसे आपण रोजचा केरकचरा काढून घर स्वच्छ ठेवतो तसेच घरात वरचेवर बदल करणे आवश्यक असते. घरात सतत बदल करायचे म्हणजे काय करायचे ते आपण समजावून घेऊ या.

**<u>वस्तूंची बेरीज आणि वजाबाकी</u>** :

अनेकदा घर म्हणजे खूपच गर्दी वाटते वस्तूंची. जे वापरात नाही किंवा मागच्या दोन वर्षांत एकदाही त्या जागेवरून काढले नाही, असे सामानसुमान आधी मोडीत काढले, तर नवीन वस्तू ठेवायला जागा होईल. बऱ्याचदा खूप कपाटं असूनही वस्तू बाहेरच असतात, पसारा होऊन घर अस्वच्छ राहते याचे सोयरसुतकही ठेवले जात नाही. म्हणून वस्तूंची बेरीज आणि वजाबाकी आवश्यक असते.

**<u>वस्तू तीच, रूप नवे</u>** :



सोफ्याची जागा बदलून, डायनिंग टेबल जरा वेगळ्या पद्धतीने ठेवून, वरचे फिनिशिंग मटेरियल बदलून किंवा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आपण आपल्या फर्निचरला नवीन रूप देऊ शकतो. नवीनच फर्निचर करायचे असेल आणि जागा लहान असेल, तर खूप अवजड फर्निचर न घेता जागा वाचवणारे आटोपशीर फर्निचर घ्यावे.

* कपाट आतून व्यवस्थित ठेवण्यासाठी बाजारात ट्रे, छोटी बास्केट्स अशा वेगवेगळ्या वस्तू मिळतात त्या वापराव्यात. म्हणजे त्याच कपाटाला एक प्रकारचा सुटसुटीतपणा येईल.

* घरात काही मोकळ्या जागा आणि कॉर्नर्स असतात. हे कानेकोपरे जरी सजवले तरी घर छान वाटते. काही भिंती या कायमच मोकळ्या असतात. त्यामुळे त्यावर एखादी तसबीर लावता येईल का; किंवा एखादी फळी लावून काही छोट्या सुंदर सजावटीच्या वस्तू ठेवता येतील का याचा विचार नक्की करावा. भिंतीवरच्या चित्राची जागा बदलावी.

* खरे तर या बदलाची सुरुवात मुख्य दरवाजापासूनच करावी. आजकाल खूप सुंदर नेमप्लेट्स करून मिळतात. आपण त्यांचा विचार करावा. तसेच तोरणामध्येही अनेक उत्तम डिझाइन्स उपलब्ध आहेत. रांगोळीचे स्टिकरही छान वाटतात. नवीन प्रकारच्या दिव्यांच्या माळाही आपण वापरू शकतो; तोरणाला पर्याय म्हणून.

एन्ट्रन्स लॉबी असेल तर त्या जागेत छोटे बदल करू शकतो. उदाहरणार्थ दिवे बदलणे, एखादा छानसा आरसा लावणे किंवा रोपटे ठेवणे.

* बैठकीच्या खोलीत तर सतत बदल करावेत. फारच प्रसन्न वाटते. सोफ्याची जागा, भिंतीवरची पेंटिंग्ज, एखादे कोपऱ्यातले छोटे टेबल, त्यावर शोभेच्या वस्तू, कोपऱ्यात एखादी लॅम्पशेड... अशा वस्तूंनी बैठकीच्या खोलीला शोभा येते आणि बदल करणे सोपे जाते. सोफ्याचे कापडही बदलता येते. ते शक्य नसेल आणि सगळे जर हलक्या रंगांचे असेल तर गडद रंगाचा फ्लॉवरपॉट ठेवून बैठकीच्या खोलीचे रूप बदलू शकते._



* स्वयंपाकघरात मोठे बदल शक्यच नाहीयेत, पण तरीही काही वस्तूंच्या वापराने आपण आकर्षकता आणू शकतो. जर उघडे शेल्फ असेल, तर त्यावर आपण काही काचेची भांडी, किंवा

शोभेच्या वस्तू ठेवू शकतो किंवा तांब्याच्या / पितळेच्या वस्तू ठेवून एक वेगळेच रूप देऊ शकतो. डायनिंग टेबलवर थोडीशी क्रोकरी ठेवून शोभा नक्कीच वाढेल.

* झोपण्याच्या खोलीतही आपण जर काळजीपूर्वक बदल करत राहिलो तर आपल्याला जराही कंटाळवाणे वाटणार नाही. खोलीच्या रंगसंगतीनुसार चादरी, कुशन्सचे अभ्रे, साइड टेबलवर पुस्तकांसारख्या सहज हलवता येतील अशा वस्तू ठेवता येतात._

* **कधी इथे तर कधी तिथे** :

बदलासाठी खूप पैसाअडका लागतो असेही नाही. खोलीनुसार काही बदल करता येतात. दर वेळेला आपण नवीन वस्तू आणायची अजिबातच गरज नाहीये. आपण आर्ट पीस कधी या रूममध्ये तर कधी दुसरीकडे अशा पद्धतीने ठेवू शकतो. याशिवाय पडदे, कुशन कव्हर, कार्पेट या वस्तू सतत बदलत ठेवाव्यात. एखादे छोटे रोपटेही आपण वेगवेगळ्या खोल्यांमधून ठेवू शकतो. त्यांच्या जागा बदलू शकतो. फ्रेम, टेबल लाइट, छोटे दिवेही आपण बदलत ठेवू शकतो. एका खोलीसाठी घेतलेल्या वस्तू कायम तिथेच ठेवल्या पाहिजेत असे नाही. खिडक्या जर मोठ्या असतील तर खिडक्यांवर टांगण्यासारख्या वस्तूही छान मिळतात. नाजूक दिव्यांच्या माळा आपण लावू शकतो. झाडे ग्रिलवर अडकवता येतील अशा काही कुंड्यांचा वापरही करता येऊ शकतो.



* **घर की दुकान?** :

बऱ्याचदा आपण आवडते म्हणून अनेक गोष्टी आपल्या घरासाठी घेत असतो. दरवेळेला गरज म्हणून सजावटीच्या गोष्टी घेतल्या जात नाहीत; त्या फक्त आवडतात म्हणून घेतल्या जातात. अशा वेळी या वस्तू नीटनेटक्या ठेवण्यासाठी जागा करावी. अनेकदा वस्तूंची खूप गर्दी वाटते. त्यामुळे आणलेल्या वस्तू या एकाच वेळी सगळीकडे ठेवण्याचा मोह अगदी टाळावा आणि त्या आलटूनपालटून ठेवाव्यात, त्यामुळे एक प्रकारचे नावीन्य टिकून राहते.
बदल हा कायम आनंद, प्रसन्नता आणि उत्साह वाढवण्यासाठी असावा आणि त्याची सुरुवात आपण येणाऱ्या सणांपासून करूच शकतो.

**- कविता भालेराव**

लक्षात ठेवा: उच्चार बदलला की अर्थ बदलतो.

जड - (उच्चार - 'जहाज' या शब्दातील 'ज़'प्रमाणे)
उदा॰ जड वस्तू

जड - (उच्चार - 'जंगल' या शब्दातील 'ज'प्रमाणे)
उदा॰ जडबुद्धी, जडदेह

जड – वजनदार (सामान, जेवण, जीभ)
अवजड – जड (वाहने, सामान)
बोजड – न पेलण्यासारखे, ओबडधोबड (वस्तू, शब्द)

**ग. चूक की बरोबर ते लिहू या.**

अ. घरात छोटे बदल केल्यामुळे मन प्रसन्न राहते. ---------------------

आ. घरसजावटीसाठी खूप खर्च होतो. ---------------------

इ. नवनवीन वस्तू खरेदी करून घरात साठवून ठेवायच्या असतात. ---------------------

ई. मोकळ्या भिंतीवर एखादे चित्र लावावे. ---------------------

उ. तोरणाला पर्याय म्हणून रांगोळीचे स्टिकर वापरू शकतो. ---------------------

ऊ. घरातील शोभेच्या वस्तूंची मांडणी वस्तुसंग्रहालयातील वस्तूंप्रमाणे करावी. ---------------------

ए. नावीन्य टिकवून ठेवण्यासाठी घरातील वस्तूंची जागा बदलती ठेवावी. ---------------------

**घ. वरील उताऱ्यात बरेच इंग्रजी शब्द आले आहेत. त्यांसाठी पर्यायी मराठी शब्द शोधू या.**

उदा॰ अ- १० ---------------------------------------------------------------------------

| | | | |
|---|---|---|---|
| अ. रूम | ए. एन्ट्रन्स लॉबी | १. कोपरा | ७. जेवणाचे टेबल |
| आ. फर्निचर | अॅ. लिव्हिंग रूम | २. फुलदाणी | ८. चित्र |
| इ. डायनिंग टेबल | ऐ. लॅम्पशेड | ३. गालिचा | ९. उशी |
| ई. कॉर्नर | ओ. फ्लॉवरपॉट | ४. प्रवेश करतो ती जागा | १०. खोली |
| उ. पेंटिंग | ऑ. कुशन | ५. घरातील खुर्च्या, टेबल इ. सामान | ११. फळी |
| ऊ. शेल्फ | औ. कार्पेट | ६. दिव्यावर लावायचे नक्षीदार झाकण | १२. बैठकीची खोली / दिवाणखाना |

टीप : cupboard = कपाट. wooden cupboard = फडताळ

**च. पाठात आलेल्या काही शब्दांसाठी समानार्थी शब्द शोधू या.**

| | |
|---|---|
| अ. आखीव – रेखीव | १. तेच तेच, कंटाळवाणे |
| आ. लक्षात येणे | २. सतत वस्तू जमवणे |
| इ. एकसुरी | ३. वजनदार |
| ई. वस्तूंची बेरीज करणे | ४. ध्यानात येणे |
| उ. अवजड | ५. नीटनेटके |

**छ. पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द पाठात आले आहेत. ते शोधून लिहू या.**

अ. वैविध्यपूर्ण x ..............................

आ. वस्तू मोडीत काढणे x ..............................

इ. अस्ताव्यस्त x ..............................

ई. स्वस्त x ..............................

उ. फिका x ..............................

ऊ. अनाकर्षक, कुरूप x ..............................

ए. उत्साहवर्धक x ..............................

**ज. उताऱ्यात आलेले लाल रंगातले जोडशब्द वाचून खाली दिलेले शब्द पूर्ण करा.**

अ. ..............वार आ. ..............दार इ. केर..............

ई. सामान.............. उ. ..............सुतक ऊ. ..............कोपरा

ए. ..............अडका ॲ. नीट..............



**करा आणि शिका**

तुम्ही तुमच्या कल्पनांनुसार तुमच्या घरात बदल करा आणि त्याविषयी वर्गात चर्चा करा.

**झ. खालील वस्तू कुठे ठेवू शकतो?**





(सोफा, डायनिंग टेबल, कपाट, सुगंधित दिवे, काचेच्या छोट्या बरण्या, शेगडी, बिछाना, उश्या, छोटी रोपटी, खुर्च्या, भांड्यांची मांडणी, फुलझाडे, गालिचा, लँपशेड, चित्र)

| | | |
|---|---|---|
| एन्ट्रन्स लॉबी | बेडरूम / झोपायची खोली | स्वयंपाकघर |

| | | | |
|---|---|---|---|
| व्हरांडा | बेडरूम | न्हाणीघर | बैठकीची खोली / दिवाणखाना |

## ४ पुढील संवाद वाचू या.

(गौरव-सानिकाच्या नवीन घराच्या सजावटीसाठी सीमा आणि विनय त्यांना मदत करतायत.)

गौरव : अगं, सानिका, नीट लक्ष देऊन लाव त्या तसबिरी भिंतीवर. नाही तर पाडशील.

सानिका : मी कशाला पाडू एवढ्या सुंदर तसबिरी? मला काय वेड लागलंय? तू केलेली पेंटिंग्ज आहेत ती, माझ्यासाठी किती मौल्यवान आहेत तुला काय माहीत! (एवढं बोलून होईपर्यंत सानिकाच्या हातून एक तसबीर सटकते आणि विनय ती हातात झेलतो.)

विनय : वाचली!

गौरव : तू वाचवलीस म्हणून वाचली ती, विनयदा. नाही तर सानिकाने पाडलीच होती. त्या बिचाऱ्या तसबिरीचं आयुष्य संपवण्याचा पुरेपूर बंदोबस्त केला होता हिने. संपलंच असतं ते.

सानिका : (चिडून) मी मुद्दाम पाडली नाही. पडली ती माझ्या हातून चुकून. आता यावरून किती दिवस ऐकवणार आहेस मला? ऐकणार नाही हं मी! सांगून ठेवते.

सीमा : अरे हो, हो, किती भांडताय! लहान आहात का आता? लग्न झालं म्हटलं तुमचं! मोठे व्हा आता जरा.

विनय : (विषय बदलण्यासाठी) बाय द वे, गौरव-सानिका, तुमचं घर बाकी छान रंगवलंयत हं! सुरेख रंग आहेत सगळे.

सानिका : (खुलत) हो ना? भिंती हलक्या-फुलक्या रंगांनी रंगवल्या ना, की घरात छान उजेड पसरतो. म्हणून मीच निवडले तिन्ही खोल्यांचे रंग. आणि पंखे-दिवेही साधेच बसवले. शिवाय मीच घरी बनवलेल्या कापडी लॅम्पशेड्स. परफेक्ट बसल्या त्या दिव्यांवर. उगीच भपका कशाला?

भपका = दिखाऊपणा, बडेजाव




गौरव : हो, त्यातलाही एक दिवा फोडून झाला बाईसाहेबांचा!

सानिका : मी तो दिवा फोडला नाही. तू धक्का लावलास आणि फुटला तो माझ्या हातून.

गौरव : मी मुद्दाम धक्का लावला का? आं? चुकून लागला धक्का.

सानिका : (वेडावून दाखवत) तसाच चुकून फुटला दिवा!

विनय : अरे, अरे! झालं तुमचं पुन्हा सुरू?

सानिका : मी नाही, त्याने आधी सुरू केलं. सीमाताई, तू गप्प बसवलंस तरच शांत बसेल हा.

सीमा : श्श्! पुरे! गप्प बसा आता.

विनय : बरं, पडद्यांचं काय? या चादरी किती दिवस लटकणार इथे?

गौरव : इथलाच एक गाद्या, अभ्रे, पडदे वगैरे शिवणारा शिंपी आहे. चांगले शिवतो. त्याच्याकडून शिवून घेणार आहे. तोवर चादरी लटकवल्या आहेतच.

सीमा : सगळं छानच आहे एकंदरीत. पण घर फक्त वस्तूंनी बनत नसतं हेही लक्षात असू द्या रे बाबांनो!

विनय : हो! घर आपुलकीने, स्नेहाने, समजुतीने आणि विश्वासाने बनवावं, घडवावं लागतं. आपण घडवू तसं घडतं ते.



क. वरील संवादात अधोरेखित केलेली क्रियापदे पुन्हा वाचू या.

ख. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे त्यात काही जोड्या दिसत आहेत का? अशा आणखी कोणकोणत्या जोड्या मिळतात त्या लिहू या.

उदा. वाचली – वाचवली

------------------------ - ----------------------------    ------------------------- - --------------------------------

------------------------ - ----------------------------    ------------------------- - --------------------------------

------------------------ - ----------------------------    ------------------------- - --------------------------------

------------------------ - ----------------------------    ------------------------- - --------------------------------

प्रयोजक क्रियापद - मूळ धातू + वणे

उदा. उड + वणे = उडवणे    रड + वणे = रडवणे



ग. वरीलप्रमाणे वरील कोणकोणत्या प्रयोजक क्रियापदाची फोड करता येते?

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

हा झाला प्रयोजक क्रियापदांचा पहिला प्रकार.

घ. आता दुसरा प्रकार पाहू.

उदा. फुटणे – फोडणे

च. अशाच प्रकारची आणखी क्रियापदे संवादात आहेत. तीही लिहू या.

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

**प्रयोजक क्रियापदे – causative verbs**

- वाक्यातील क्रियेचा कर्ता, ती क्रिया स्वतः करत नसून, ती क्रिया तो दुसऱ्या कोणाला तरी करायला लावतो तेव्हा प्रयोजक क्रियापदांचा वापर होतो.

उदा. जुईला थापटून झोपवावं लागतं तेव्हा कुठे झोपते ती शांतपणे.

प्रयोजक क्रियापदांचे साधारणतः तीन प्रकार आहेत.

| १. मूळ धातू + वणे = प्रयोजक क्रियापद | २. मूळ धातूशी साधर्म्य दाखवणारी प्रयोजक क्रियापदे | ३. मूळ धातूपेक्षा वेगळी असणारी प्रयोजक क्रियापदे |
|---|---|---|
| उदा॰ वाचणे - वाचवणे | उदा॰ लागणे - लावणे | उदा॰ खाणे - भरवणे |
| याचप्रमाणे –<br>ऐकणे-ऐकवणे<br>बसणे-बसवणे<br>हसणे-हसवणे<br>रडणे-रडवणे<br>खेळणे-खेळवणे<br>संपणे-संपवणे<br>पसरणे-पसरवणे<br>झोपणे-झोपवणे<br>रंगणे-रंगवणे इ॰ | याचप्रमाणे –<br>तुटणे-तोडणे<br>पिणे-पाजणे<br>फिटणे-फेडणे<br>फुटणे-फोडणे<br>तरणे-तारणे इ॰ | याचप्रमाणे –<br>निघणे-काढणे<br>येणे-आणणे<br>बघणे-दाखवणे<br>जाणे-पाठवणे / नेणे / घालवणे / हाकलणे* इ॰ |
| - बबन बुडता बुडता वाचला.<br>- मधूने बबनला बुडताना वाचवले. | - त्यांच्या घराची पार वाट लागली.<br>- दारूने त्या घराची पार वाट लावली. | - आमची नलू दूध-चपाती अगदी आवडीने खाते.<br>- नलूला कधी-कधी आई भरवते. |
| * 'हाकलणे' व 'हाकलवणे' अशी दोन्ही प्रयोजक रूपे संभवतात. | | |

**छ. रिकाम्या जागा भरू या.**

(फिटणे-फेडणे, पिणे-पाजणे, वाचणे-वाचवणे, जाणे-पाठवणे, फुटणे-फोडणे)



अ. "------------------------ बुवा."
"वाचलास? मी ------------------------ तुला."

आ. "खिडकीची काच कशी ------------------------?"
"राशीने ------------------------."

इ. "खूप मदत झाली तुझी. कसं ------------------------ तुझं कर्ज?"
"------------------------ गं. काळजी करू नकोस."

ई. "------------------------ का रोहित बंगळुरूला? जायचं नव्हतं ना त्याला?"
"हो, बाबांनी जबरदस्तीने ------------------------."

उ. आमची मांजर गेले दोन दिवस दूध ------------------------ नव्हती. शेवटी आज दादाने तिला दूध ------------------------ तेव्हा कुठे जरा तरतरी आली तिला.



**टीप :**

» काही धातूंची प्रयोजक रूपे वापरण्याची आवश्यकताच नसते.
उदा॰ असणे, खोकणे, शिंकणे, विंचरणे, वापरणे, धुणे इ॰

» जाणणे - जाणवणे - यात 'जाणवणे' हे 'जाणणे'चे प्रयोजक क्रियापद होत नाही.

» काही धातूंची (विशेषत: सकर्मक) जरी प्रयोजक रूपे होत असली तरी ती वापरली जात नाहीत.
लिहिणे    लिहिणे    लिहून घेणे
उदा॰ चैताली पत्र लिहिते. आई चैतालीकडून पत्र लिहून घेते.

» काही धातूंचे प्रयोजक रूप होताना कोणताही फरक नाही.
मोडणे    मोडणे
उदा॰ वाऱ्यामुळे फांदी मोडली. बबनने फांदी मोडली.

» काही धातूंची दोन प्रयोजक रूपे होतात.
सांडणे    सांडणे / सांडवणे
उदा॰ तिच्या हातून चहा सांडला. तिने चहा सांडला / सांडवला.
पडणे    पाडणे / पाडवणे
उदा॰ सानिकाच्या हातून तसबीर पडली. सानिकाने तसबीर पाडली / पाडवली.

» काही धातूंची प्रयोजक रूपे वेगवेगळ्या पद्धतींनी होतात आणि अर्थच्छटाही बदलते.
होणे    करणे / व्हायला लावणे / व्हायला भाग पाडणे
उदा॰ तो मंत्री झाला. पक्षाने त्याला मंत्री केले.
पक्षाने त्याला मंत्री व्हायला लावले.
पक्षाने त्याला मंत्री व्हायला भाग पाडले.

## ५ कुटुंब व कुटुंबसंस्था



**क. संभाषण करू या.**

अ. तुमच्या मते कुटुंब म्हणजे काय?
आ. कुटुंब कोणत्या प्रकारचे असते, असू शकते?
इ. तुमचे कुटुंब कोणत्या प्रकारचे आहे?

**ख. गतिमान काळातील कुटुंबसंस्था**

प्रेम, विश्वास आणि सुरक्षितता ही महत्त्वाची कौटुंबिक मूल्ये आहेत. ही मूल्ये जिथे असतात तिथे कुटुंब असते. मग ते माळरानावर आईच्या कुशीतसुद्धा असते. चार भिंती व छपराचा फक्त 'निवारा' असतो. ज्या घरामध्ये प्रेम किंवा सुरक्षितता नसते, तिथली मुले पळून जातात आणि स्टेशनचा आसरा घेतात. अशी भग्न कुटुंबे आजही आहेत. म्हणजेच चार भिंतींचे घर असले की तिथे 'कुटुंब' असेलच असे नाही. एखादी कुटुंबरचना समाजात सर्वमान्य झाली, की तिच्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी काही नियम बांधावे लागतात आणि मग कुटुंबाचे रूपांतर कुटुंबसंस्थेत होत असते. अशा रीतीने कुटुंब, घर आणि कुटुंबसंस्था या वेगवेगळ्या संकल्पना आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानानुसार स्त्री-पुरुषाची बदलणारी जीवनशैली, त्यानुसार बदलणाऱ्या अपेक्षा

आणि विचार, तसेच, दडपलेल्या स्थितीतून लैंगिक, नैतिक आणि धार्मिक कल्पना मोकळ्या होणे आणि त्यातून स्त्री-पुरुषांनी विकासाची गती पकडणे, या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून कुटुंबरचना पूर्वीसुद्धा बदलत राहिली आणि पुढेही बदलत राहणार आहे. यापुढे या कुटुंबबदलाचे धक्के जर आपल्याला बसू द्यायचे नसतील, तर अनेक प्रकारच्या कुटुंबरचना आपणच निर्माण केल्या पाहिजेत आणि प्रत्येक व्यक्तीची कुटुंबनिवड समाजात मान्य झाली पाहिजे. अमुक नात्यांनी बनलेले आणि अमुक संख्या असणारे, तेच तेवढे कुटुंब, असे यापुढे आपल्या पूर्वजांपेक्षा उत्क्रांत झालेल्या आणि अर्थव्यवस्थेचा चक्रीय इतिहास माहीत झालेल्या माणसाला म्हणता येणार नाही. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे प्रेम, विश्वास आणि सुरक्षितता व्यक्तीला ज्या सहजीवनातून मिळण्याची खात्री आहे, ते त्या माणसाचे कुटुंब असेल. मग हे कुटुंब फक्त दोन किंवा अधिक पुरुषांचे असेल, तर कुठे दोन किंवा अधिक स्त्रियांचे असेल. काही कुटुंबे 'माता-मुले' अशी असतील, तर काही 'पिता-मुले' अशी असतील. काही स्त्री-पुरुष एकेकटे राहतील, काही जण फक्त दत्तक मुलांबरोबर राहतील. विवाह हा दंडक आवश्यक असेलच असे नाही. तरी ज्यांना 'माता-पिता-मुले' असे कुटुंब हवे असेल ते विवाह करतीलच. खुशीने एकत्र राहणाऱ्यांची कुटुंबसंस्था अनैतिक म्हणता येणार नाही. अशा विविध कुटुंबसंस्थांमधील आर्थिक व्यवहारासंबंधी, वारसाहक्कांसंबंधी कायदे होणे आवश्यक ठरेल. एक कुटुंबसंस्कृती मोडते आहे, तर तिला अनेक पर्याय निर्माण करण्याचा हा काळ आहे आणि हे पर्याय स्वीकारण्यातच आपले मानसिक, सामाजिक स्वास्थ्य आहे, हे आपण ओळखले पाहिजे.

**अ. खाली दिलेल्या अर्थाचे उताऱ्यातील शब्द शोधून लिहू या.**

१. नियमबद्धता - ------------------------------------
२. चक्रानुसारी - ------------------------------------
३. नियम - ------------------------------------
४. आनुवंशिक हक्क - ------------------------------------
५. कुरण, मैदान - ------------------------------------
६. दाबून टाकणे - ------------------------------------



**आ. कंसात दिलेल्या सूचनेनुसार वाक्य बदलून पुन्हा लिहू या.**

१. कुटुंब, घर आणि कुटुंबसंस्था या वेगवेगळ्या संकल्पना आहेत.
('नि' हे अव्यय वापरून वाक्य पुन्हा लिहू या.)

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२. ज्या घरामध्ये प्रेम किंवा सुरक्षितता नसते, तिथली मुले पळून स्टेशनचा आसरा घेतात.
(धातुसाधित विशेषण वापरून साधे वाक्य तयार करू या.)

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

३. कुटुंबबदलाचे धक्के जर आपल्याला बसू द्यायचे नसतील तर अनेक प्रकारच्या कुटुंबरचना आपणच निर्माण केल्या पाहिजेत. ('यासाठी' हे अव्यय वापरून हे वाक्य पुन्हा लिहू या.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

४. विवाह हा दंडक आवश्यक असेलच असे नाही. ('आवश्यक' या शब्दापासून होणाऱ्या नामाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहू या.)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**इ. कुटुंब व कुटुंबसंस्था ही एकच संकल्पना आहे का? का?**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**ई. कुटुंबरचनेतील बदल कोणत्या कारणांमुळे होतात?**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**उ. कोणत्या प्रकारच्या कुटुंबसंस्था निर्माण होत आहेत?**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------




**ऊ. आपले मानसिक, सामाजिक स्वास्थ्य कशात आहे?**

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**ग. पुढील चित्रफीत पाहू या व खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**



अ. दरवाजावर आलेली बाई कोण आहे?
(१) सासूची मैत्रीण (२) सासू (३) नायिकेची मैत्रीण

आ. प्रिया व नायिकेचे काय नाते आहे?
(१) सहकारी (२) पूर्वीची रूममेट (३) मैत्रीण

इ. नायिका ------------------------------
(१) नोकरी करते (२) गृहिणी आहे (३) व्यावसायिका आहे

ई. नायिका आपल्या सासूला घरात मदत करते.
(१) बरोबर (२) चूक (३) सांगता येत नाही

उ. आमच्या कुंकवानं म्हणजे-
(१) नवऱ्यानं (२) मुलानं (३) सासऱ्यानं

**ऊ. ह्या चित्रफितीतील सासू-सुनेचं नातं तुम्हाला कसं वाटलं? यावर चर्चा करू या.**

**ए. 'घरोघरी मातीच्या चुली' ही म्हण पूर्वी ऐकलीय का? कोणत्या अर्थाने वापरतात ही म्हण?**

## ६ आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास...

**क. पुढील संवाद ऐकू या व गाळलेल्या जागा भरू या.**



अ. आसिफ : आणखी रद्दी कुठे असेल तर दे गं जरा.
नुरी : काय रे आसिफ, -------------------- इतका पसारा आहे घरात, -------------------- तू रद्दी काय काढून बसलायस!

आ. आई : शानू, चल, पटकन घर आवरून घेऊ. पाहुणे येतीलच आता.
शनाया : काय गं आई! दिवाळीमुळे -------------- काही अभ्यास झाला नाहीये, -------------- आता पाहुणे कुठे येतायत मध्येच?

इ. चारू : आज संध्याकाळी नवीन पडदे आणायला जायचंय. तेव्हा लवकर ये.
परेश : नवीन पडदे? -------------- इतका खर्च झालाय या महिन्यात, -------------- नवीन पडदे कशाला? नंतर बघू.

ई. आजी : माझं शेगावचं तिकीट काढून दे की रे जरा!
चैतन्य : आजी, मला -------------- खूप उशीर झालाय. -------------- तू तिकिटाचं काय घेऊन बसलीयस मघापासून. ऑफीसमधून फोन करतो. तेव्हा बोलू.

**ख. आता वरील संवाद पुन्हा ऐकू या आणि दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करून वर्गात सराव करू या.**

| आधीच... तशात / त्यात... |
|---|
| उदा॰ आधीच इतका पसारा आहे घरात, तशात तू रद्दी काय काढून बसलायस!<br>आधीच इतका खर्च झालाय या महिन्यात, त्यात नवीन पडदे कशाला?<br>• आधीच्या अडचणींमध्ये जेव्हा नव्या अडचणींची भर पडते / पडणार असते, तेव्हा आधीच... तशात / त्यात... वापरले जाते. |

## आधीच मर्कट, तशात मद्य प्यायला.



**ग. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**



कुत्रा पाळण्याचं ठरवणं – घर लहान असणं

उदा॰ पहिला विद्यार्थी : मी कुत्रा पाळण्याचं ठरवलंय.
दुसरा विद्यार्थी : आधीच घर लहान आहे, त्यात / तशात तुला कुत्रा पाळायचाय.

अ. नवीन पेईंग गेस्ट येणे – जागा न पुरणे
आ. मित्रांना जेवायला बोलावणे – ऑफिसमध्ये जास्त काम असणे
इ. जास्तीचे कपडे धुवायला काढणे – पाण्याची कमतरता असणे
ई. जेवायला बाहेर जाण्याचा बेत आखणे – दुपारचं जेवण उरलेलं असणे
उ. घरमालकाने भाडेवाढ करणे – महागाई वाढणे

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो घरमालक, ते - | ती सजावट, त्या सजावटी | ते घरकुल, ती घरकुले / घरकुलं |
| तो साक्षीदार, ते - | ती कुटुंबसंस्था, त्या - | ते भाडे / भाडं, ती भाडी |
| तो जिव्हाळा | ती खोली, त्या खोल्या | ते आव्हान, ती आव्हाने / आव्हानं |
| तो अर्थ (पैसा) | ती साक्षीदार, त्या - | ते हॉस्टेल, ती हॉस्टेले / हॉस्टेलं |
| तो पंख, ते - | ती साथ | ते कर्ज, ती कर्जे / कर्जं |
| तो उंबरठा, ते उंबरठे | ती वाणी | ते घरटे / घरटं, ती घरटी |
| तो आसरा, ते आसरे | ती प्रीत | ते पिल्लू, ती पिल्ले / पिल्लं |
| तो आश्रय | ती आकांक्षा, त्या - | ते घरपण |

| | | |
|---|---|---|
| तो वाडा, ते वाडे | ती भक्ती | ते घरदार, ती घरेदारे / घरंदारं |
| तो टेकू, ते - | ती देखरेख, त्या देखरेखी | ते वास्तव्य, ती वास्तव्ये / वास्तव्यं |
| तो दारवान, ते - | ती राखण | ते नंदनवन, ती नंदनवने / नंदनवनं |
| तो उल्हास | ती बालक्रीडा, त्या - | ते तोरण, ती तोरणे / तोरणं |
| तो सुटसुटीतपणा | ती प्रसन्नता | ते न्हाणीघर, ती न्हाणीघरे / न्हाणीघरं |
| तो आकर्षकपणा | ती शांतता | ते सहजीवन |
| तो कोपरा, ते कोपरे | ती रांगोळी, त्या रांगोळ्या | ते छप्पर, ती छपरे / छपरं |
| तो गालिचा, ते गालिचे | ती फुलदाणी, त्या फुलदाण्या | ते सामानसुमान |
| तो दिवाणखाना, ते दिवाणखाने | ती बरणी, त्या बरण्या | ते सोयरसुतक |
| तो व्हरांडा, ते व्हरांडे | ती रचना, त्या - | |
| तो भपका | ती रंगसंगती, त्या - | |
| तो अभ्रा, ते अभ्रे | ती तसबीर, त्या तसबिरी | |
| तो पडदा, ते पडदे | ती चादर, त्या चादरी | |
| तो निवारा, ते निवारे | ती गादी, त्या गाद्या | |
| तो दंडक, ते - | ती आपुलकी | |
| तो वारसाहक्क | ती समजूत, त्या समजुती | |
| तो स्नेह | ती सुरक्षितता | |
| तो साक्षीदार, ते - | ती कूस, त्या कुशी | |
| तो केरकचरा | ती सुसूत्रता | |
| तो सणवार, ते - | ती कुटुंबरचना, त्या - | |
| तो पैसाअडका | ती चूल, त्या चुली | |
| तो कानाकोपरा, ते कानेकोपरे | | |

## क्रियापद

बांधणे, जुळणे, झरणे, सजवणे, कंटाळणे, बदलणे, बदलवणे, हलवणे, मांडणे, लावणे, सटकणे, झेलणे, वाचवणे, पाडणे, फोडणे, फुटणे, मोडणे, स्वीकारणे

## विशेषण

नीटनेटका, प्रसन्न, एकसुरी, अवजड, आटोपशीर, मोकळा, सुगंधित, कलात्मक, खर्चीक, गडद, आकर्षक, नीटनेटका, काळजीपूर्वक, कंटाळवाणा, नाजूक, नक्षीदार, तसबीर, भग्न, सर्वमान्य, लैंगिक, नैतिक, धार्मिक, उत्क्रांत, चक्रीय, एकेकटे, दत्तक, अनैतिक, मानसिक, सामाजिक

## नाम / इतर शब्द + क्रियापद

आधार देणे, आसरा मागणे, घरदार सोडणे, देखरेख करणे, वास्तव्य करणे, नंदनवन बनवणे, आयुष्य एकसुरी होणे, वस्तू मोडीत काढणे, मोह टाळणे, बंदोबस्त करणे, सुसूत्रता आणणे, बेत आखणे

## म्हणी आणि वाक्प्रचार

हात-पाय मारणे, जिवाला जीव देणे, विकासाची गती पकडणे, घरोघरी मातीच्या चुली, आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास



## आता मला हे येतं...

**बदलत्या काळातील घरे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**घरसजावट**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**कुटुंब, कुटुंबसंस्था**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये : आणि, अन्, न्, नि इ०**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रयोजक क्रियापदे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**आधीच ... तशात / त्यात**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# दगडांच्या देशा

## ७









**चला, शिकू या...**

- महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांविषयी जाणून घेणे
- किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांचे संवर्धन
- किल्ला कसा पाहावा?
- महाराष्ट्रातील लेणी
- विरोधसूचक उभयान्वयी अव्यये : पण, परंतु, परि
- 'म्हणजे'चे वेगवेगळे उपयोग
- तृतीयेचा प्रत्यय '-ने', शब्दयोगी पद '-मुळे'
- चढणे, चढून जाणे

## १ किल्ला व किल्ल्यांचे प्रकार

**क. पाठाच्या शीर्षकावरून व पहिल्या पानावरील छायाचित्रांवरून या पाठात कोणता विषय हाताळला गेला आहे असे वाटते? 'दगडांच्या देशा' असे कोणत्या प्रदेशाला / राज्याला म्हणत असावेत? का?**

**ख. चार ते पाच विद्यार्थ्यांचे गट करू या. खालील प्रसंगावर एक संवाद तयार करू या आणि तो वर्गात सादर करू या.**

- काही मित्रमैत्रिणी प्रवासाला जाण्याचा बेत आखताहेत. कोणीतरी ट्रेकिंगला जाण्याचे सुचवतो. काही जणांना किल्ले पाहण्याची कल्पना आवडते, तर काहींना किल्ले पाहण्यात मुळीच रस नाहीये. किल्ले का पाहिले पाहिजेत किंवा का पाहू नयेत यावर सगळे चर्चा करतात.

**ग. किल्ल्यांवरील एक ब्लॉग वाचू या.**



सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले किल्ले म्हणजे महाराष्ट्राचे खरे वैभव आहेत. हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यात या किल्ल्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. हे दुर्गम व सागरी किल्लेच शिवरायांची खरी सेना होती. महाराष्ट्रात आजमितीला ३५०हून अधिक किल्ले आहेत. पण या समृद्ध वैभवाकडे आपल्या सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे. इतिहासात एवढी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या किल्ल्यांवर आज फक्त पुरातत्त्व विभागाच्या एका निळ्या पाटीशिवाय काहीच नाही. ढासळत चाललेल्या अनेक किल्ल्यांची पडझड अशीच चालू राहिली तर काही वर्षांनंतर तेथे या किल्ल्यांचे अस्तित्वच राहणार नाही. पुढच्या पिढीला फक्त किल्ल्यांच्या फोटोंवर समाधान मानावे लागेल. काही मोजके किल्ले सोडले तर कित्येक किल्ले लोकांना माहीतसुद्धा नाहीत.

आज किल्ल्यांच्या बाबतीत माहिती गोळा करायची तर फार थोड्या किल्ल्यांबद्दल त्रोटक माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. यातूनच किल्ल्यांवर एखादे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करण्याची संकल्पना आमच्या मनात आली. यात शक्य होईल तेवढ्या किल्ल्यांची माहिती व छायाचित्रे देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. प्रत्येक किल्ल्याचा इतिहास, त्या किल्ल्यांवर जायचे कसे, तेथे राहण्याची, जेवणाची सोय आहे की नाही, अशी सर्व प्रकारची माहिती देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. आमच्या या छोट्याशा प्रयत्नातून जर कोणाच्या मनात किल्ल्यांविषयी आस्था निर्माण झाली तर हे या संकेतस्थळाचे सर्वात मोठे यश असेल.

**– राकेश रासकर**

**अ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे उताऱ्यातील वाक्यांची रचना बदलून पाहू या.**

उदा॰ सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले किल्ले म्हणजे महाराष्ट्राचे खरे वैभव आहेत.

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये जे किल्ले वसलेले आहेत, ते महाराष्ट्राचे खरे वैभव आहेत.

१. इतिहासात एवढी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या किल्ल्यांवर आज फक्त पुरातत्त्व विभागाच्या एका निळ्या पाटीशिवाय काहीच नाही.

❖ इतिहासात एवढी महत्त्वाची भूमिका ज्या ------------------------------------
त्या किल्ल्यांवर आज फक्त पुरातत्त्व विभागाच्या एका निळ्या पाटीशिवाय काहीच नाही.

२. <u>ढासळत चाललेल्या अनेक किल्ल्यांची</u> पडझड अशीच चालू राहिली तर काही वर्षांनंतर तेथे या किल्ल्यांचे अस्तित्वच राहणार नाही.

❖ अनेक किल्ले, जे ------------------------------------, त्यांची
पडझड अशीच चालू राहिली तर काही वर्षांनंतर तेथे या किल्ल्यांचे अस्तित्वच राहणार नाही.

**आ. उताऱ्यात आलेल्या ह्या शब्दांचा योग्य अर्थ निवडू या.**

| | |
|---|---|
| १. वैभव | क. मोडतोड, बिघाड |
| २. दुर्गम | ख. ऐश्वर्य, श्रीमंती, समृद्धी |
| ३. पुरातत्त्वविभाग | ग. अपुरा, अत्यल्प, तुटपुंजा |
| ४. पडझड | घ. जेथे जाणे कठीण अशी जागा |
| ५. त्रोटक | च. प्राचीन काळाचा अभ्यास, जतन, संवर्धन इ. करणारा सरकारी विभाग |

**इ. वरील यादीतील योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरू या.**

१. नुकतीच पंढरपुरातील विठोबाच्या मंदिराच्या दुरुस्तीसाठी ------------ ------------च्या अधिकाऱ्यांनी मंदिराची पाहणी केली.

२. राज्यातील ------------ भागात तसेच शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये आता फिरत्या दवाखान्यांमधून मोफत आरोग्य सेवा पुरवली जाणार आहे.

३. मुसळधार पावसामुळे शहरातील झाडांची मोठ्या प्रमाणात ------------ झाली.

४. अन्य भाषांच्या तुलनेत आंतरजालावरील मराठी भाषेविषयीची माहिती अत्यल्प आणि ------------ आहे.

५. "कठोर परिश्रम करून त्याने हे ------------ मिळवले आहे."



घ. **खालील माहिती वाचू या आणि प्रत्येक किल्ल्याच्या प्रकारासाठी योग्य चित्र निवडू या.**

**अ. भुईकोट / भुईदुर्ग** – भुईदुर्ग म्हणजेच सपाट भूभागावर बांधण्यात आलेला किल्ला.

उदा॰ नगरचा किल्ला, कंधार, नगरधन, सुभानमंगळ, परांडा इ॰

**आ. गिरिदुर्ग** - हे डोंगरावरच बांधलेले किल्ले. अतिशय कठीण अशा पाऊलवाटांनी या किल्ल्यांवर जाता येते. किल्ल्याच्या पायथ्याकडून येणाऱ्या शत्रूच्या आक्रमणाची पूर्वसूचना मिळण्यासाठी आणि प्रतिकार करण्यासाठी हे किल्ले अतिशय उपयोगी पडत.

उदा॰ रायगड, कर्नाळा, तोरणा, पन्हाळा, प्रतापगड, सिंहगड, लोहगड इ॰

**इ. जलदुर्ग** - चहूबाजूंनी समुद्राने वेढलेले किल्ले. या किल्ल्यांकडे बहुधा होडीने जावे लागते. काही किल्ल्यांकडे समुद्राच्या ओहोटीच्या वेळी उथळ पाण्यातून किंवा पाण्यातून वर आलेल्या पायरस्त्यावरून पायी पायी जाता येते. काही किल्ल्यांच्या तीन बाजूंनी पाणी आणि चौथ्या बाजूने किल्ल्याकडे जाण्यासाठी सरळ वाट असे. समुद्रावरून येणाऱ्या आक्रमणाची पूर्वसूचना मिळून प्रतिकार करण्यासाठी या किल्ल्यांचा उपयोग होत असे.

उदा॰ सिंधुदुर्ग, मुरूड जंजिरा, विजयदुर्ग, अर्नाळा इ॰







### करा आणि शिका

**आंतरजालावर जाऊन महाराष्ट्रातील एखाद्या किल्ल्याची माहिती मिळवू या व ती वर्गात सादर करू या. सादरीकरण भित्तिचित्र, ध्वनिफीत, चित्रफीत यांपैकी कोणत्याही स्वरूपात होऊ शकते.**

करा आणि शिका

## २ किल्ला : संरचना

क. **ऐकू या व योग्य पर्याय निवडू या.**

अ. किल्ल्याच्या भागांची नावं तिथीला आधीपासूनच माहीत होती.
 १) हो.  २) नाही.

आ. बऱ्याच किल्ल्यांची पडझड झाल्यामुळे किल्ल्यांच्या भागांची नेमकी माहिती मिळत नाही.
 १) हो.  २) नाही.

इ. किल्ला पूर्वी कधीच एका झटक्यात बांधला जात नसे.
 १) हो.  २) नाही.

ई. किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गावाला मेट असे म्हणतात.
१) हो. २) नाही.

उ. घेरा व मेट हे भाग तिथीने एका ट्रेकवेळी पाहिले होते.
१) हो. २) नाही.



ऊ. प्रमुख व्यक्तींच्या राहण्याचे ठिकाण म्हणजे बालेकिल्ला.
१) हो. २) नाही.

**ख. पुढील वाक्ये उत्तरे असतील, तर त्यांचे प्रश्न कोणते?**

अ. किल्ल्याच्या भागांची नावं तिथीला आधीपासूनच माहीत होती.

---

आ. बऱ्याच किल्ल्यांची पडझड झाल्यामुळे किल्ल्यांच्या भागांची नेमकी माहिती मिळत नाही.

---

इ. किल्ला पूर्वी कधीच एका झटक्यात बांधला जात नसे.

---

ई. किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गावाला मेट असे म्हणतात.

---

उ. घेरा व मेट हे भाग तिथीने एका ट्रेकवेळी पाहिले होते.

---

ऊ. प्रमुख व्यक्तींच्या राहण्याचे ठिकाण म्हणजे बालेकिल्ला.

---

**ग. जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. पडझड होणे | १. शोधून लक्षात ठेवणे |
| आ. अवशेष आढळणे | २. नेमणे |
| इ. (जागा) हेरणे | ३. युद्धात मृत्यू येणे |
| ई. कामी येणे | ४. वास्तूचे पडके, राहिलेले भाग सापडणे |
| उ. तैनात करणे | ५. वास्तूचा काही भाग पडणे, ढासळणे |

**घ. आता पुढील वाक्ये वाचू या.**

» मी मागे दोन-तीन ट्रेक केले, <u>पण</u> ही नावं मी कधी ऐकली नव्हती.

» आता बऱ्याच किल्ल्यांची पडझड झाल्यामुळे त्यांचे नेमके सगळे भाग नाही कळून येत. <u>पण</u> एखाद्या किल्ल्याचे बऱ्यापैकी अवशेष आढळतात.

### विरोधसूचक उभयान्वयी अव्यये

- **पण, परंतु, परि** या शब्दांना **'विरोधसूचक उभयान्वयी अव्यये'** असे म्हणतात. दोन विरुद्धार्थी शब्द किंवा वाक्ये जोडण्यासाठी त्यांचा वापर होतो.
- उदा॰ दुर्गभ्रमण करणाऱ्या बऱ्याच लोकांना मी ओळखतो, पण यांचं नाव कधी ऐकलं नाही.
  आपल्या तक्रारी मुद्देसूदपणे परंतु थोडक्यात सांगाव्यात.

**लक्षात ठेवा-** * 'परि' या विरोधसूचक उभयान्वयी अव्ययाचा वापर बोलताना होत नाही.
उदा॰ मरावे **परि** कीर्तिरूपे उरावे.

## मोडेन **पण** वाकणार नाही.

### 'म्हणजे'चे वेगवेगळे उपयोग

- 'म्हणजे' या उभयान्वयी अव्ययाचा दोन प्रकारे वापर करता येतो.

उदा॰ सकाळी ७च्या आत निघा म्हणजे १०पर्यंत किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचाल. – संकेतदर्शक
पाण्याने वेढलेला किल्ला म्हणजे जलदुर्ग. – स्वरूपदर्शक

**च. संभाषण करू या.**

अ. एक किलोमीटर म्हणजे किती मीटर?

उदा॰ पहिला विद्यार्थी : एक किलोमीटर म्हणजे किती रे?
दुसरा विद्यार्थी : सोपंय. एक किलोमीटर म्हणजे एक हजार मीटर.

आ. दुर्ग म्हणजे?
इ. भुईदुर्ग म्हणजे?
ई. जलदुर्ग म्हणजे?
उ. एक डझन म्हणजे नेमके किती?
ऊ. एक लिटर म्हणजे किती मिलीलिटर?



**छ. चित्रफीत पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

**अ. खालील वाक्यांतील चुका शोधून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. चित्रफितीत एव्हरेस्ट हे जगातील सर्वोच्च शिखर दाखवण्यात आले आहे.
उदा॰ चित्रफितीत कळसूबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर दाखवण्यात आले आहे.

२. कळसूबाईची उंची ५७२४ फूट आहे.

---

३. घोटी हे कळसूबाईच्या पायथ्याकडचं गाव.

---



संभाषण

४. पावसाळा संपताना बारीच्या वनराईत पुष्कळ काजवे दिसतात.

-----

५. कळसूबाई चढताना वाटेत मुबलक पाणी उपलब्ध आहे.

-----

६. कळसूबाईचा ट्रेक करताना कळसूबाई देवीचं फक्त एक मंदिर लागतं.

-----

**आ. पुढील प्रश्नांची तीन-चार शब्दांत उत्तरे लिहा.**

१. कळसूबाई शिखराची उंची (मीटरमध्ये) ----------

२. बारीला पोहोचण्याचे मार्ग क) ----------

ख) ----------

३. पायथ्यापासून शिखरापर्यंत जायला लागणारा वेळ ----------

४. पहिली टेकडी पार केल्यावर काय पाहायला मिळते? ----------

५. वाटेत लागणारी पावलं कोणाची आहेत असे गावकऱ्यांना वाटते? ----------

-----

६. शेवटच्या शिडीच्या आधी काय लागते? ----------

७. कळसूबाई शिखरावरून दिसणारे किल्ले ----------

-----

**इ. पुढील वाक्ये वाचू या. काय फरक आहे दोन्ही वाक्यांत? फरक अधोरेखित करू या.**

१. कळसूबाई चढायला साधारणपणे ३-४ तास लागतात.

२. कळसूबाई चढून जायला साधारणपणे ३-४ तास लागतात.

**दोन्ही वाक्यांच्या अर्थात काही बदल झाला का?**

('२' मध्ये 'चढून जाणे' ह्या संयुक्त क्रियापदाचा वापर केला आहे.)

## ३ किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांचे संवर्धन

**क. चर्चा करू या.**

महाराष्ट्रातील जवळजवळ ३५० किल्ले महाराष्ट्राला लाभलेला एक ऐतिहासिक वारसाच आहे. त्या वारशाचं संरक्षण, संवर्धन करणं ही नेमकी कोणाची जबाबदारी? तसं करण्याची खरंच गरज आहे का? बाजूचे चित्र पाहून खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करू या.






अ. काय करतायत चिंटू व त्याची मित्रमंडळी?
आ. हे करण्याची वेळ त्यांच्यावर का आली असेल?
इ. अशा प्रकारच्या प्रयत्नांचा काय परिणाम होतो?
ई. अशा प्रकारचे आणखी प्रयत्न केले गेले पहिजेत का? का?

**ख. दोन ते तीन विद्यार्थ्यांचे गट करू या आणि गटाने चर्चा करून किल्ल्यांच्या संवर्धनासाठी उपाय सुचवू या.**

**ग. गड-किल्ले संवर्धन : समज-गैरसमज**

गेल्या काही वर्षांत शिवप्रेमी संघटना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून गडकिल्ल्यांच्या संवर्धनाची कामे मनापासून करत आहेत. पण हे काम संवर्धनाच्या नियमांना धरून आहे की नाही, याचा फारसा विचार दुर्गप्रेमी करत नाहीत. दुर्गसंवर्धन किंवा कोणत्याही ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन हा भावनिक नव्हे तर तांत्रिक विषय आहे. प्रत्येकाने स्वतःला वाटेल तसे संवर्धन केले तर किल्ल्यांची दुर्दशाच होईल आणि दुर्गप्रेमींचे कष्ट पूर्णपणे वाया जातील.

इतिहासाचा अभ्यास आणि गडकिल्ल्यांचे जतन, संवर्धन हे स्वतंत्र अभ्यासाचे विषय आहेत. भारतातील आणि भारताबाहेरील अनेक विद्यापीठांमध्ये जतन आणि संवर्धन हा वेगळा विषय म्हणून शिकवला जातो. जतन आणि संवर्धनाचे काही नियम आणि अटी भारतीय पुरातत्त्व विभागातही पाळले जातात. अशा स्थितीत अतिउत्साही गडप्रेमींनी भावनेच्या भरात स्वतःला हवे तसे गडाचे संवर्धन केले तर संवर्धन होण्याऐवजी नुकसानच जास्त होते.

महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने किल्ले किंवा वास्तू यांचे जतन करण्यासाठी किल्ले दत्तक योजना तयार केली आहे. या योजनेची माहिती घेऊन एखादा किल्ला संवर्धनासाठी रीतसर दत्तक घेता येऊ शकतो. कोणत्याही किल्ल्यावर साफसफाई करणे, कचरा स्वच्छ करणे अशी कामे करण्यास काहीच हरकत नाही; पण शास्त्रशुद्ध संवर्धन पद्धतीची माहिती न घेता जर संवर्धन करायला गेलो, तर आपण दुर्गप्रेमी दुर्गसंवर्धनाच्या मूळ संकल्पनेपासून दूर जाऊ. हे सर्व गडकिल्ले म्हणजे ऐतिहासिक स्मारके आहेत. त्यांचे संवर्धन शास्त्रशुद्ध पद्धतीनेच झाले पाहिजे.

दुर्गसंवर्धन या विषयाने सध्या ज्वलंत रूप धारण केले आहे. महाराष्ट्रात एवढे किल्ले आहेत आणि त्यांचे संवर्धन पुरातत्त्व विभागाकडून होत नाही, याबद्दल गड-किल्ल्यांवर काम करणाऱ्या अनेक संस्था आक्रोश करत आहेत. दुर्गसंवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या अनेक संस्था मुंबई-पुण्यात आहेत. ही मंडळी गडांवरील कचरा साफ करतात. काही संस्था गडावरील पडलेल्या मंदिरांचे बांधकाम स्वखर्चाने करतात; परंतु हे सगळे करत असताना नकळत त्यांच्या हातून गडावरील पुरातत्त्वीय स्थळांची नासधूस होते. पुरातत्त्वशास्त्र हा विषय माहीत नसल्याने प्रत्येकजण आपल्याला वाटेल तसे संवर्धन करत असतो. सर्वसाधारणपणे आपली समजूत अशी असते, की दुर्गसंवर्धन म्हणजे गड-किल्ल्यांवर जाऊन



तिथे जे पडलेले बांधकाम आहे ते दुरुस्त करणे. तटबंदीच्या पडलेल्या भिंती पुन्हा उभ्या करणे, दरवाजे, सदर, वाडे पुन्हा बांधून काढणे; पण याला दुर्गसंवर्धन म्हणत नाहीत. कोणत्याही ऐतिहासिक वास्तूच्या संवर्धनाची पुरातत्त्वज्ञांनी ठरवलेली एक नियोजित पद्धत आहे. कोणत्याही ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी तीन मुख्य पायऱ्यांचा वापर करणे गरजेचे आहे.

१. वास्तूंचे अत्याधुनिक पद्धतीने सर्वेक्षण
२. वास्तूंची दुरुस्ती
३. वास्तूंचे जतन आणि संवर्धन

**घ. चूक की बरोबर ते लिहू या.**

अ. अनेक दुर्गप्रेमी संवर्धनाच्या नियमांना धरूनच संवर्धनाची कामे करत असतात.
------------------------------------------

आ. ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन भावनिक दृष्टिकोनातून केले पाहिजे.
------------------------------------------



इ. एखादा किल्ला संवर्धनासाठी रीतसर दत्तक घेता येऊ शकतो.
------------------------------------------

ई. गड, किल्ल्यांवरील पडके दरवाजे, वाडे पुन्हा नव्याने बांधणे म्हणजेच दुर्गसंवर्धन. ------------------------------------------

**च. विरोधसूचक उभयान्वयी अव्यये वापरून खालील वाक्ये पुन्हा लिहू या.**

अ. दुर्गप्रेमी स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून संवर्धनाचे काम मनापासून करत आहेत. हे काम संवर्धनाच्या नियमांना धरून आहे की नाही, याचा फारसा विचार ते करत नाहीत.

------------------------------------------

------------------------------------------

आ. काही संस्था गडावरील पडलेल्या मंदिरांचे बांधकाम स्वखर्चाने करतात. हे सगळे करत असताना नकळत त्यांच्या हातून गडावरील ऐतिहासिक स्थळांची नासधूस होते.

------------------------------------------

------------------------------------------

इ. प्रत्येकाने स्वतःला वाटेल तसे संवर्धन केले तर किल्ल्यांची दुर्दशाच होईल आणि दुर्गप्रेमींचे कष्टही पूर्णपणे वाया जातील.

------------------------------------------

------------------------------------------

## ४ '-ने', '-मुळे'

**क. वाचू या व लाल रंगातील शब्दांचा अभ्यास करू या.**

शिनूचे आबा आता ८१ वर्षांचे आहेत. वय झालं तरी त्यांची फिरण्याची आवड मात्र अजून कायम आहे. शिनू सुट्टीत त्यांच्या गावाला गेला तर ते नेहमी त्याला पन्हाळा किल्ला दाखवायला घेऊन जायचे. यावर्षी शिनूचे दोन मित्र, वेदान्त आणि अंशुमन त्याच्यासोबत त्याच्या आजोळी राहायला आले होते. शिनूचं गाव त्यांना खूप आवडलं. शिनूच्या आजोळी मोठ्ठा वाडा आहे, हे त्यांना ऐकून माहीत होतं. ते सगळं नवलाईनं न्याहाळत होते. एवढ्या मोठ्या वाड्यात राहायची त्यांना खूप मजा वाटत होती. तिथली सगळी माणसं त्यांचा आपुलकीनं पाहुणचार करत होती.

वेदान्तनं शिनूला विचारलं, "शिनू, आपण कुठे कुठे फिरणार आहोत?"

शिनू म्हणाला, "याची पूर्ण जबाबदारी मी आबांवर सोपवली आहे. काय आबा, बरोबर ना?"



आबा हसत त्यांच्याकडे पाहत म्हणाले, "हो तर! उद्या आपण खूप फिरायचं आहे. पोरांनो, पहाटे पाचला उठायचं."

वेदान्त आणि अंशुमन यांना खूप आश्चर्य वाटलं. एवढे वयस्कर आजोबा आपल्याला फिरायला कसे नेणार? या विचारातच ते झोपी गेले.

पहाटे सर्वांच्या आधी आबा उठून तयार. मुलं उठली आणि न्याहारी वगैरे करून तयार झाली. आबांनी वाटेत सर्वांना बेत सांगितला. "आज आपण पन्हाळ्याला जाऊ. किल्ला पूर्ण चढून जायचा आहे. तेव्हा तुम्ही पोरं माझ्याबरोबर चाला. आणि हो, मागे राहिलात तर तुम्ही तुमची वाट शोधत या. मी थांबणार नाही."

अंशुमन वेदान्तला म्हणाला, "आपण तर आबांच्याही पुढे जाऊ."



थोड्या वेळातच ते पन्हाळ्याच्या पायथ्याशी पोहचले.

आबा पटापट वर चढत होते. शिनूही त्यांच्या हाताखाली तयार झाल्याप्रमाणे चपळाईने चढत होता. वेदान्त आणि अंशुमन हळूहळू धापा टाकत चढत होते.

त्यांना पाहून आबा एका झाडापाशी थांबले. ते दोघे जवळ आले तसे आबा मुद्दाम शिनूला म्हणाले, "शिन्या, चल बाबा, आता थांबायचं नाही."

एव्हाना अंशुमन पार दमून गेला होता. त्याला आता विश्रांतीसाठी बसावंच लागणार होतं. तो घाबरून म्हणाला, "आबा, आपण इथे थोडं थांबू या ना. माझे पाय दुखायला लागलेत."

"अरे पोरा, एवढ्यानेच थकलास होय? अजून निम्मा गडसुद्धा चढलो नाही आपण."

अंशुमनने वेदान्तकडे पाहिलं. त्याची स्थितीदेखील तशीच होती. त्या दोघांनाही अपराधी वाटू लागलं. आबांच्या वयाची थट्टा केली याची त्यांना लाज वाटू लागली. ते दोघे आबांना म्हणाले, "आबा, आम्हाला माफ करा. आम्हाला वाटलं तुम्ही तुमच्या वयाच्या मानाने हळू चालाल पण उलटंच झालं."

आबा म्हणाले, "अरे बाबांनो, तुम्ही तरुण मुलं आहात. मला तर वाटलं होतं, तुम्ही उत्साहाने चढाल. पण हरकत नाही, तुमची पहिली वेळ आहे. होईल सवय हळूहळू. इतकं



काही मनाला लावून घेऊ नका. वय झालं असलं तरी हे शरीर मी खूप कष्टाने कमावलं आहे. अनेक वर्षं मेहनत केल्याने मी इतका काटक झालो आहे, आणि हा किल्ला तर मी अनेकदा चढलो-उतरलो आहे.”

वेदान्त म्हणाला, “हो आबा, आम्ही आधी कधीच असं गिर्यारोहण केलं नाही. आम्हाला वाटलं आपण असंच फिरायला जाणार असू.”

आबा म्हणाले, “ते ठीक आहे, पण तुम्हीच सांगा, असं केलंत तर तुम्हाला ते कठीणच वाटणार. फिरल्यानेच तुम्हाला ते सवयीचं होईल. लवकर लवकर चढलात तर तुम्हाला संपूर्ण किल्ला नीट पाहता येईल. दमल्यामुळे तुम्ही अशी सारखी विश्रांती घ्यायची म्हणाल तर वेळ इथेच जाईल आणि तुम्हाला फक्त किल्ला चढून परत लगेच उतरल्यासारखं वाटेल.”

दोघांनाही आबांचं म्हणणं पटलं. आबांच्या सल्ल्यानुसार ते किल्ला चढले.

**ख. वरील लाल रंगातील शब्द खालील कोष्टकात योग्य त्या ठिकाणी भरू या.**

| क्रियापद + ने / नं | नाम + ने / नं |
|---|---|
| ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- |

**तृतीयेचा प्रत्यय ‘-ने’, शब्दयोगी पद ‘-मुळे’**

- नामाला / क्रियापदाला ‘-ने’ हा तृतीयेचा प्रत्यय किंवा ‘-मुळे’ हे शब्दयोगी पद जोडताना नामाचे / क्रियापदाचे सामान्य रूप होते.

उदा॰ कष्टाने, केल्याने इ॰

| | -ने / -नं | -मुळे / -मुळं |
|---|---|---|
| **क्रियापद** | गेल्याने, केल्याने इ॰ | गेल्यामुळे, केल्यामुळे इ॰ |

**टीप :** ‘-ने’ ह्या विभक्तिप्रत्ययाचे काम जरी ‘-मुळे’ हे शब्दयोगी पद करत असले, तरी प्रत्येक वेळी त्यांची अदलाबदल करता येतेच असे नाही.
उदा॰ कष्टाने, मेहनतीने, आपुलकीने, घाईघाईने इ॰

## ५ कंसातील शब्द योग्य ठिकाणी वापरून रिकाम्या जागा भरू या.

(भोज्या, पार्श्वभूमी, माघारी, शोधून, भन्नाट, व, यावेगळं, खच्चून, पाहणं, होणारं)

### किल्ला कसा पाहावा?



गड कसा पाहावा, याचं एक तंत्र आहे. तो धावता पळता (धावत पळत) ------------ उपयोगाचा नाही. त्याची भौगोलिक ------------, त्याचं नकाशातलं स्थान, संरक्षणदृष्ट्या त्याचं महत्त्व, त्याच्या आसपासचे घाट, मैदानं, खिंडी, पठारं, नद्या, ओढे, रणक्षेत्रं, त्यावर चढायचे मार्ग, त्यावरून दिसणारा प्रदेश, त्या प्रदेशातील किल्ले, शिखरं, त्यांची मजबूती, त्यावरील पाण्याची ठिकाणं – हौद, तलाव, त्याचे तट, त्याचे बुरूज, त्याची प्रवेशद्वारं – हे सगळं नीट तपासलं पाहिजे, तरच त्याचं महत्त्व ध्यानी येतं.

किल्ला धावता पळता पाहायला तो म्हणजे काही ------------ नव्हे ! धावता पळता त्याला भेट देऊन जाणं, म्हणजे त्याचाही अपमान ------ आपलाही ! असं करू नये.

------------ अगदी निसर्गसौंदर्याच्या दृष्टीनं जरी किल्ल्यांकडे पाहायचं म्हटलं, तरी अशी ही रोमहर्षक, अशी ही चैतन्यमय, अशी ही वय विसरवून टाकणारी, अशी ही तरुणाईस हाक घालणारी स्फूर्तिस्थळं अन्यत्र ------------ सापडायची नाहीत. किल्ल्यांवरून दिसणारे सूर्योदय आणि सूर्यास्त हे तर अपूर्व दृश्य आहे. किल्ल्यांवरून रात्री ------------ नक्षत्रदर्शन, हा अवर्णनीय आनंद आहे. त्याची कशाशीच तुलना करता यायची नाही.

सांसारिक व्यापांपासून मन मुक्त होतं. रानावनातील पशुपक्ष्यांशी मैत्र जुळतं. स्वच्छ ------------ वारा छातीत भरून घेतल्यानं आरोग्य आपला पत्ता विचारीत येतं. वाढतं वय तिथंच थांबतं. ते ------------ वळतं. पाच-दहा वर्षांनी तरी तरुण झालो आहोत, असा साक्षात्कार होतो.

नाना समस्यांनी ------------ भरलेल्या, काळंजून गेलेल्या जीवनातून काही क्षण तरी बाजूस काढून जे या ऐतिहासिक स्फूर्तिस्थळांच्या दर्शनासाठी जातात, त्यांना हा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. साक्षात्कार म्हणजे तरी यावेगळं काय असतं?

**– गोपाळ नीळकंठ दांडेकर, दुर्गभ्रमणगाथा**

## ६ महाराष्ट्रातील लेणी

**क. वाचू या.**



महाराष्ट्रातील किल्ल्यांप्रमाणेच सह्याद्रीत वसवलेली लेणीही नेहमीच पर्यटकांना आकर्षित करत आलेली आहेत. महाराष्ट्रातील बौद्ध, हिंदू व जैन लेणी हा सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचा फार मोठा वारसा आहे व सुमारे पंधराशे ते दोन हजार वर्षांपासून ही लेणी सामाजिक, आर्थिक व आध्यात्मिक विकासाची केंद्रे आहेत. प्राचीन काळात लेणी अध्यात्म व शिक्षणाची केंद्रे होती. वृद्ध व अनुभवी आचार्यांसोबत तरुण व होतकरू विद्यार्थिवर्गही लेण्यांच्या परिसरात आढळत होता.

अशोकाच्या काळात पहिल्या गुहा खोदण्यात आल्या, त्या वेळेस त्यांच्या उपयुक्ततेचा विचार करण्यात आला असावा. भिक्षुसंघांना हवा असणारा एकांत, ध्यान-मनन-चिंतन करण्यासाठी लागणारी शांतता ही नगरात किंवा गावात निवास बांधून मिळणार नव्हती. ह्यासाठी मनुष्यवस्तीपासून दूर, विशेषतः डोंगर परिसरात वास्तव्य करण्यावर भर देण्यात आला. अशा ह्या विश्रामगृहांना संस्कृतमध्ये 'लयनम्' व प्राकृतात 'लेणं' असे म्हटलेले आहे. गुहांतील विविध आलेखांत 'लेणं' हा शब्द सतत वापरण्यात आलेला आहे, त्यावरून मराठीत 'लेणे' हा शब्द आला असावा.

महाराष्ट्र हे ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या भारतातील वैभवसंपन्न राज्य आहे. ह्या भूमीमध्ये सातवाहनांपासून मराठ्यांपर्यंतचा स्फूर्तिशाली इतिहास घडला. महाराष्ट्राला भूषणास्पद असलेले आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील कोरीव लेणी. भारतातील जवळपास बाराशे लेण्यांपैकी आठशे लहान-मोठी लेणी महाराष्ट्रात आहेत. सर्व लेण्यांचे स्वरूप धार्मिक स्थापत्याचे असल्यामुळे धर्मप्रकारांनुसार लेण्यांचे बौद्ध, शैव-वैष्णव (हिंदू) व जैन असे तीन प्रकार पडतात. बौध्दधर्मीय, सातवाहन आणि धर्मप्रसारक ह्यांनी सर्वप्रथम हा वास्तुप्रकार आणि त्याचे तंत्रज्ञान महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या रांगांत वापरले. वैष्णव व शैव पंथीयांनी ते आत्मसात करून त्याला मोठी उंची मिळवून दिली. जैनांनी प्रथम बौद्ध विहाराचे आणि नंतर हिंदुधर्मीय देवालयस्थापत्याचे अनुकरण करून त्यात आपली भर घातली.



महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन असे भाजे-कोंढाण्याचे चैत्य व विहार इसवीसनपूर्व दुसऱ्या शतकात खोदले गेले असावेत. सह्याद्रीतील कातळशिला अशा चैत्यगृहांसाठी योग्य असल्यामुळे बौद्धांच्या अनेक धार्मिक शाखांनी महाराष्ट्राकडे धाव घेतली. पुढच्या काही शतकांत भाजे, कोंढाणे, बेडसे, कार्ले, जुन्नर, महाड, कऱ्हाड, वाई, कान्हेरी येथील डोंगरांची निवड होऊन लेण्यांच्या निर्मितीला वेग आला. घाटमाथ्यावर जुन्नर, नाशिक व कऱ्हाड येथे, इंध्याद्री परिसरात पितळखोरे येथे, तसेच, मराठवाड्यात अजिंठा, औरंगाबाद व पुढे वेरूळ येथील डोंगरांची निवड होऊन लेणी खोदण्यात आली. ही सर्व स्थळे प्राचीन महामार्गांवर असल्यामुळे सोयीची ठरली. हा परिसर कोकणापेक्षा भारताच्या इतर भागांशी जवळीक साधणारा असल्यामुळे शतकानुशतके त्यांचा उपयोग लेण्यांच्या निर्मितीसाठी करण्यात आला. सह्याद्री आणि अजिंठा-वेरूळचे डोंगर ही बौद्ध, हिंदू व जैन धर्मीयांची कर्मभूमी झाली.

**ख. चूक की बरोबर ते लिहू या.**

अ. महाराष्ट्रातील केवळ बौद्ध व जैन लेणी अध्यात्म व आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. ------------

आ. भिक्षुसंघांना आवश्यक असा एकांत मनुष्यवस्तीत मिळणे अशक्य असल्याने विश्रामगृहांसाठी डोंगर परिसर निवडण्यात आला. ------------

इ. सह्याद्रीत लेणी हा वास्तुप्रकार सर्वप्रथम रुजवण्याचे काम शैव पंथीयांनी केले. ------------

ई. बौद्धांनी जैन विहाराचे अनुकरण करून त्यात आपली भर घातली. ------------

उ. सह्याद्रीचे भौगोलिक स्थान व त्यातील कातळशिला यांमुळे सह्याद्री ही बौद्ध, हिंदू व जैन धर्मीयांनी कर्मभूमी झाली. ------------

**ग. खालील शब्दांच्या त्यांच्या योग्य अर्थाशी जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. उपयुक्तता | १. बौद्धांचा मठ |
| आ. स्फूर्तिशाली | २. खडक |
| इ. विहार | ३. बौद्ध धर्मीयांचे प्रार्थनागृह |
| ई. कातळशिला | ४. उपयोग |
| उ. चैत्य | ५. प्रेरणादायी |

**घ. कंसातील अक्षरे योग्य प्रकारे जोडून खालील शब्दांसाठी एक शब्द लिहू या.**

अ. गुरू, शिक्षक - ------------------------------------ (चार्यआ)

आ. श्रीमंत - ------------------------------------ (भसंन्नवैवप)

इ. जुन्नर, नाशिक व कऱ्हाड - ------------------------------------ (टथाघामा)

ई. अनेक शतकांपासून - ------------------------------------ (नुकाततशकेश)

उ. वास्तुकला, वास्तुविद्या - ------------------------------------ (पस्थात्य)

करा आणि शिका

**तुम्ही एखाद्या लेण्याला कधी भेट दिली आहे का? त्या लेण्याचे तोंडी वर्णन करा. खालील मुद्द्यांची तुम्हाला मदत होईल.**

- लेणी कोणत्या शहरात / देशात आहेत?
- लेणी कोणाकडून / कोणाच्या काळात निर्माण केली गेली?
- स्थापत्य – प्रकार, शिल्पे
- सद्य:स्थिती



## ७ व्यक्तिपरिचय

### छत्रपती शिवाजीमहाराज (सतरावे शतक)

महाराष्ट्रातल्या जनतेचा अभिमान आणि दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज / राजे. शिवराय, शिवबा, राजे, महाराज अशा वेगवेगळ्या उपनावांनी छत्रपती शिवाजीमहाराजांना संबोधले जाते. महाराष्ट्राच्या समाजमनावर पिढ्यानुपिढ्या राज्य करणारा हा राजा रयतेचा लाडका होता, आणि आजही आहे. भोसले कुळातील या सुपुत्राने विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध आणि मोगल साम्राज्याविरुद्ध ऐतिहासिक संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य - स्वराज्य शिवाजीराजांनी उभे केले. शिवाजीराजांची कारकीर्द म्हणजे मराठा साम्राज्याचा शौर्यपूर्ण आणि अभिमान वाटावा असा इतिहास.

स्वराज्याचा संस्थापक छत्रपती, सुसंघटित प्रशासन आणि शिस्तबद्ध आरमार उभारणारा एक कुशल सेनानायक, रयतेची काळजी वाहणारा जाणता राजा, गनिमी काव्याने शत्रूला

नामोहरम करणारा शूर लढवय्या, जिजाऊंचा आज्ञाधारक शिवबा, अशी किती तरी रूपे आहेत शिवाजीराजांची. एकाहून एक शूर, जिवाला जीव देणाऱ्या लढवय्या मावळ्यांनी स्वराज्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. त्याच बळावर शिवाजीराजांनी स्वराज्यासाठी लढा दिला. अत्यंत वेधक अशा असंख्य नाट्यपूर्ण प्रसंगांनी शिवाजीराजांचे जीवन व्यापलेले दिसते.



वयाच्या सतराव्या वर्षी शिवाजीराजांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणागड जिंकला आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. आणि पुढच्या तेरा वर्षांत त्यांनी जवळपासच्या पश्चिम घाटातील आणि कोकणातील चाळीस किल्ले जिंकले होते. राजांनी किल्ले नुसते जिंकलेच नाहीत, त्यांची डागडुजीही केली, अनेक नवे किल्ले उभारले. इ॰स॰ १६७४मध्ये रायगडावर त्यांचा राज्याभिषेक झाला आणि ते छत्रपती झाले.

शिवाजीराजांचा जन्मदिवस महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा होतो. त्यांच्या जयंतीला महाराष्ट्रात शिवजयंती म्हणतात. त्यांच्या जन्मतारखेबद्दल वाद असल्याने इथे वर्षभरात दोनदा शिवजयंती साजरी होते.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो भुईदुर्ग, ते - | ती पूर्वसूचना, त्या - | तो वीरगळ, ते – |
| तो जलदुर्ग, ते - | ती स्मृतिशिला, त्या - | ते संवर्धन, ती संवर्धने / संवर्धनं |
| तो गिरिदुर्ग, ते - | ती माची, त्या माच्या | ते पुरातत्त्वशास्त्र |
| तो घेरा, ते घेरे | ती तटबंदी, त्या तटबंद्या | ते रणक्षेत्र, ती रणक्षेत्रे / रणक्षेत्रं |
| तो बालेकिल्ला, ते बालेकिल्ले | ती सदर, त्या सदरा | ते नक्षत्र, ती नक्षत्रे |
| तो बुरूज, ते - | ती पर्वतरांग, त्या पर्वतरांगा | ते मेट, ती मेटे / मेटं |
| तो दुर्गप्रेमी, ते - | ती गुहा, त्या - | ते लेणे / लेणं, ती लेणी |
| तो गडप्रेमी, ते - | ती उपयुक्तता | ते वास्तव्य, ती वास्तव्ये / वास्तव्यं |
| तो इतिहासतज्ज्ञ, ते - | ती कातळशिला, त्या - | ते स्थापत्य, ती स्थापत्ये / स्थापत्यं |
| तो आचार्य, ते - | | ते चैत्य, ती चैत्ये / चैत्यं |
| तो निवास, ते - | | |
| तो विहार, ते - | | |
| तो घाटमाथा, ते घाटमाथे | | |

- **क्रियापद**

हेरणे, न्याहाळणे, आढळणे, खोदणे, रुजवणे

- **विशेषण**

अवर्णनीय, तांत्रिक, पुरातत्त्वीय, निमुळता, शास्त्रशुद्ध, ज्वलंत, रोमहर्षक, आध्यात्मिक, होतकरू, वैभवसंपन्न, स्फूर्तिशाली

- **क्रियाविशेषण**

चहुबाजूंनी, सरसकट, आडमार्गाने, स्मरणार्थ, नवलाईने, आपुलकीने, चपळाईने, उत्साहाने, कष्टाने, शतकानुशतके

- **नाम / इतर शब्द + क्रियापद**

प्रचलित असणे, प्रतिकार करणे, स्थापन करणे, पडझड होणे, अवशेष आढळणे, जागा हेरणे, कामी येणे, तैनात करणे, समजावून सांगणे, आकर्षित करणे, वास्तव्य करणे, भर देणे / घालणे, आत्मसात करणे, पराकोटीला नेणे, अनुकरण करणे, धाव घेणे, वेग येणे

- **म्हणी आणि वाक्प्रचार**

मोडेन पण वाकणार नाही, मरावे परि कीर्तिरूपे उरावे



## आता मला हे येतं...

महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांविषयी जाणून घेणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांचे संवर्धन – चर्चा करणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

किल्ला कसा पाहावा?

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

महाराष्ट्रातील लेणी

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

विरोधसूचक उभयान्वयी अव्यये : पण, परि, परंतु

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

'म्हणजे'चे वेगवेगळे उपयोग

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

तृतीयेचा प्रत्यय '-ने', शब्दयोगी पद '-मुळे'

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

चढणे / चढून जाणे – वापर व फरक

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ८ खाद्यसंस्कृती









**चला, शिकू या...**

- महाराष्ट्रातील खाद्यसंस्कृतीतील विविधतेबद्दल जाणून घेणे
- नामसाधित विशेषणे, धातुसाधित विशेषणे
- ध्वन्यनुकारी विशेषणे
- स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे, प्रश्नशब्द : कशाबरोबर?
- विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये : की, किंवा, वा, अथवा, अगर, नाही तर
- त्यात येते / येतं
- चतुर्थी + क्रियापद : जमणे, येणे, समजणे, आवडणे इ०

## १ महाराष्ट्राची खाद्यपरंपरा

**क. खालील उतारा वाचू या आणि वर्गात ‘महाराष्ट्राची खाद्यपरंपरा’ या विषयावर चर्चा करू या.**



**खोडसाळ :** हा पाठ वाचताना भूक चाळवली जाऊ शकते. वाचायला सुरुवात करण्यापूर्वी पोट भरलेले ठेवावे.

शिक्षकांनी एक महाराष्ट्रीय पदार्थ आणून विद्यार्थ्यांना खायला द्यावा आणि त्याचे साहित्य व कृती समजावून सांगावी.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात जसं वैविध्य आहे तसंच ते इथल्या खाद्यसंस्कृतीतही दिसून येतं. ‘जिथे जे पिकतं तेच तिथे शिजतं’, असं म्हटलं जातं ते अगदी खरंय. देशभरात कुठेही जा, काही निवडकच पदार्थ ताटात दिसतात. उत्तरेकडे गेलात तर गव्हापासून बनवलेल्या रोट्या आणि भाज्यांचे प्रकार अधिक असतात. तिथे भाताचं प्रमाण कमी तर दक्षिणेकडच्या राज्यांत याउलट चित्र दिसतं. पण महाराष्ट्रात चित्र खूपच वेगळं आहे. एक संपूर्ण आहार इथल्या घराघरातल्या ताटांत दिसतो. दर दोन कोसांवर बोलीभाषेचं एक वेगळं रूप बघायला मिळतं तशी खाद्यसंस्कृतीतील विविधताही दिसून येते. प्रदेशांनुसार विविध प्रकारचे खाद्यपदार्थ खायला मिळतात.

**ख. अ. आता खालील उतारा वाचून एक मानसचित्र बनवू या.**

**मराठवाडी ‘उसऱ्या’**

ज्वारी, बाजरी, गहू, तूर, मूग, करडई, हरभरा ही पिके मराठवाड्यात घेतली जातात. त्यामुळे साहजिकच इथे राहणाऱ्या समाजाच्या सगळ्या थरांमध्ये आहारात प्रामुख्याने या सर्व धान्यांचा समावेश असतो. याबरोबर मराठवाड्यावर अनेक वर्षे निजामाचे शासन असल्यामुळे काही प्रमाणात इथल्या खाद्यसंस्कृतीवर त्याचा परिणाम झालेला दिसून येतो. शेंगदाणा, तीळ, जवस, कऱ्हाळे हेदेखील मोठ्या प्रमाणात इथे होतात. त्यामुळे इथल्या स्वयंपाकात, मसाल्यांमध्ये हे सर्व घटक महत्त्वाचे आहेत. ‘उसऱ्या’ नावाचा एक वेगळा प्रकार या भागात बघायला मिळतो. गवार, भेंडी, वाल भाजी आणि कैरीच्या फोडी या सावलीत वाळवून साठवून ठेवतात. उन्हाळ्यात भाजीचा तुटवडा असतो तेव्हा याच सुकवलेल्या भाजीपासून छान चविष्ट भाजी बनवली जाते.



**विदर्भाचा झणका**



विदर्भात जेवढ्या आवडीने तिखटाचे झणझणीत पदार्थ खाल्ले जातात तेवढ्याच आवडीने गोड पदार्थही खातात. गहू, ज्वारी, तूर, मूग यांच्या बरोबरीने काही भागांत तांदूळही होतो. उन्हापासून बचाव करण्यासाठी या

भागात ज्वारीची आंबील केली जाते. 'उकडपेंड' हा असाच चविष्ट पदार्थ ज्वारीच्या पिठापासून बनवला जातो. अमरावती, अकोला, बुलढाणा ह्या भागांत ज्वारीच्या पिठापासून 'रोडगा' बनवला जातो. भंडारा, गोंदिया, गडचिरोली भागांत गोळाभात, वडेभात, भरडाभात, हातफोडणीचा भात, मूगवड्याचा भात, खिचडी असे भाताचे अनेक प्रकार रस्त्यांवरील गाड्यांवर मिळतात. नागपूरचा सावजी मसाला प्रसिद्ध आहे.

**खानदेशी पदार्थ**



खानदेश म्हटलं की जळगावचं वांग्याचं भरीत आणि ज्वारीची भाकरी, झणझणीत शेवभाजी असा बेत डोळ्यांसमोर आल्याशिवाय राहत नाही. जळगावची हिरव्या-पांढऱ्या रेषा असलेली वांगी भरतासाठी प्रसिद्ध आहेत. खानदेशातील मांडे हा पदार्थदेखील उभ्या महाराष्ट्राचा आवडता. पुरणाचे मांडे तर खासच असतात! ते हातावर बनवण्याची पद्धत बघून थक्क व्हायला होतं. गव्हाच्या जाड शेवया, पुरणपोळी आणि आमरस असं एकत्र खाण्याची अनोखी पद्धत इथे प्रचलित आहे.

**कोकणी पदार्थ**

महाराष्ट्रातील अन्य भागांपेक्षा इथली भौगोलिक परिस्थिती खूप वेगळी आहे. लाभलेला मोठाच्या मोठा समुद्रकिनारा, नारळी-सुपारीच्या कुळागरांची संपन्नता, आगरी, कोळी, भंडारी, वाडवळ-सोनार आणि



चित्पावन ब्राह्मण यांचे कोकणात मूळ आहे. आगरी आणि कोळी समाजाचे प्रमुख अन्न मासळी. त्यामुळे या घरांमध्ये मासळीचे अनेक चविष्ट प्रकार बनवले जातात. कोकणात तांदूळ, नाचणी पिकतात, त्यामुळे तांदळाची किंवा नाचणीची भाकरी बनवली जाते. या प्रदेशातल्या गृहिणींचा कमीत कमी साहित्य वापरून अतिशय चविष्ट पदार्थ बनवण्यात हातखंडा आहे. तांदळाची उकड, पानग्या, पातोळ्या, फणसाचे-आंब्याचे सांदणे, नारळाच्या दुधातील शेवया हे पदार्थ त्यांच्याच हातचे खावेत. साखरभात, नारळीभात, उकडीचे मोदक उत्कृष्टच असतात. कोकणातल्या घरांमध्ये बनणारी तांदळाची 'सालपापडी' ही प्रसिद्ध आहे.

या सर्व भौगोलिक रचनेनुसार बदलत जाणाऱ्या खाद्यसंस्कृतीशिवाय सामाजिक आणि जातीय रचनेनुसारदेखील प्रत्येकाची खाद्यशैली इतरांपेक्षा वेगळी आहे.

**आ. जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| १. मराठवाडा | क. उकडपेंड |
| २. विदर्भ | ख. तांदळाची उकड, पानग्या, पातोळ्या, फणसाचे-आंब्याचे सांदणे, साखरभात, नारळीभात, उकडीचे मोदक |
| ३. खानदेश | ग. उसऱ्या |
| ४. कोकण | घ. मांडे |

## २ नामसाधित विशेषणे

**क. विशेष नाम + ई : प्रांतांच्या, शहरांच्या, राज्यांच्या, देशांच्या, खंडांच्या नावांना प्रत्यय जोडून केली जाणारी विशेषणे –**

**विशेष नाम + ई = विशेषण**

| प्रांत | शहर / जिल्हा | राज्य | देश | खंड |
|---|---|---|---|---|
| कोकणी,<br>मालवणी,<br>खानदेशी,<br>वऱ्हाडी,<br>मारवाडी,<br>मुलतानी, | सातारी,<br>कोल्हापुरी,<br>सोलापुरी,<br>बनारसी,<br>भोजपुरी,<br><br>पण...<br>पुणेरी | केरळी,<br>कर्नाटकी,<br>गुजराती,<br>पंजाबी,<br>राजस्थानी,<br>बंगाली,<br>काश्मिरी,<br>श्रीलंकी<br><br>पण..<br>महाराष्ट्रीय | पाकिस्तानी,<br>नेपाळी,<br>चिनी,<br>जपानी,<br>इंग्रजी,<br><br>पण...<br>भारतीय,<br>जर्मन | आशियाई<br><br>पण...<br>अमेरिकी,<br>आफ्रिकी आणि<br>युरोपीय |

**ख. वरील उताऱ्यातील नामसाधित विशेषणांची यादी करू या.**

मराठवाडी...

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ग. नामसाधित विशेषणे आणि प्रांतिक खाद्यवैशिष्ट्ये. जोड्या लावू या.**

अ. मालवणी मसाला
आ. खानदेशी भरीत
इ. वऱ्हाडी ठेचा
ई. सातारी पेढे
उ. कोल्हापुरी रस्सा
ऊ. गुजराती थाळी
ए. पंजाबी छोले
ऐ. बंगाली मिठाई
ओ. काश्मिरी पुलाव
औ. चिनी भात
अं. जपानी सुशी













## ३ लोकप्रिय खाद्यपदार्थ

**क. ऐकू या व रिकाम्या जागा भरू या.**

काही सण आणि पदार्थ यांचं नातं अतूट असतं. होळी म्हटली की ---------------- (अ), संक्रांतीला ---------------- (आ) तसं गणेश चतुर्थीला ---------------- (इ) हे समीकरण इतकं घट्ट आहे की गणपतीबाप्पांच्या नुसत्या स्मरणानेही अनेकांच्या डोळ्यांसमोर २१ मोदकांचं ताट तरळू लागतं.

**ख. परिच्छेदात विविध सण आणि त्यावेळी केले जाणारे पदार्थ यांची नावे दिली आहेत. तुम्हाला माहीत असलेल्या विशिष्ट सणांच्या निमित्ताने केल्या जाणाऱ्या पदार्थांविषयी आपल्या सहाध्यायाबरोबर बोलू या.**

**ग. तुम्हाला माहीत आहे का? योग्य क्रमांक लिहू या.**

____ कबाब या मूळच्या पर्शियन शब्दाचा अर्थच 'भाजणे' असा होतो.

____ 'बिर्याणी' या शब्दाचं मूळ पर्शियन भाषेतल्या 'बिर्याण' या शब्दात आहे. बिर्याण म्हणजे शिजवण्यापूर्वी तळलेला वा खरपूस भाजलेला पदार्थ. बिर्याणवरून बिर्याणी शब्द आला आहे.

____ ऑम्लेट हा जगभरात वापरला जाणारा शब्द मूळचा फ्रेंच आहे. आल्युमेल या फ्रेंच शब्दापासून तो सोळाव्या शतकात प्रचलित झाला.

____ पर्शियन भाषेत सारण भरलेल्या पदार्थासाठी 'संबोसाग' हा शब्द होता. तिथून अरबांकडे त्याचं संबुसक अथवा संबुसाज असे नामकरण झालं.

६.____ संस्कृत 'पर्पट', तामिळ 'पाप्पटम' ते 'पापड' असा त्याचा प्रवास फार जुना आहे. थेट बौद्धकाळापासून पापडाचा उल्लेख साहित्यात झालेला दिसतो.

____ ग्रीक राजदूत सेल्युकस आपल्या लिखाणात धान्यांच्या खिचडीचा उल्लेख करतो. मोरोक्कोचा प्रवासी इब्न बटुटा इ.स. १३५० च्या दरम्यान 'किशरी' कशी लोकप्रिय होती हे नमूद करतो.

१


२


३


४


५


६


**घ. इंटरनेटच्या साहाय्याने हा तक्ता पूर्ण करू या.**

| | |
|---|---|
| **कोकण**<br>उपलब्धता : तांदूळ, नाचणी, वरी, हुलगा (कुळीथ), हरभरा, पावटा, नारळ, आंबा, फणस, काजू<br>लोकप्रिय पदार्थ : ........................................<br>............................................................<br>............................................................ | **खानदेश**<br>उपलब्धता : ........................................<br>............................................................<br>............................................................<br>लोकप्रिय पदार्थ : ........................................<br>............................................................<br>............................................................ |
|  | **पश्चिम महाराष्ट्र**<br>उपलब्धता : ........................................<br>............................................................<br>............................................................<br>लोकप्रिय पदार्थ : ........................................<br>............................................................<br>............................................................ |
| **विदर्भ**<br>उपलब्धता : गहू, ज्वारी, तूर, मूग, सोयाबीन, बाजरी<br>लोकप्रिय पदार्थ : ........................................<br>............................................................<br>............................................................ | **मराठवाडा**<br>उपलब्धता : ज्वारी, बाजरी, गहू, तूर, मूग, करडई, हरभरा, शेंगदाणा, तीळ, जवस<br>लोकप्रिय पदार्थ : ........................................<br>............................................................<br>............................................................ |

## ४ मराठी माणूस आणि खवय्येगिरी

**क. ऐकू या.**



**ख. आता पुढील रिकाम्या जागा भरू या.**

“तुला भाजी कोणती आवडेल?”

“अंबाडीची घट्ट गोळा भाजी, वरून घालण्यासाठी लसणीची खमंग आणि झणझणीत फोडणी असेल तरच. शिवाय भाजीला आंबट चव पाहिजे.”

“बरोबर ज्वारीची भाकरी?”

“नाही. तीळ ________________ (अ) बाजरीची खुसखुशीत भाकरी; वर लोण्याचा गोळा.”

“आणि मिरचीचा खर्डा?”

"अं हं! लसणीची कच्चं तेल ________ (आ) तिखट चटणी आणि बुक्कीनं ________ (इ) पांढरा कांदा."
"अरे वा! आणखी काही?"
"ताजं ताक किंवा मडक्यातलं अधमुरं दहीसुद्धा चालेल."
"आत्ता माझ्याकडे जेवढे पैसे आहेत, त्यांत दहाबारा तीळ मिळू शकतील. चालेल?"



**ग. धातुसाधित विशेषणे (खाद्यपदार्थ, स्वयंपाक यांसंदर्भात उजळणी)**

खालील शब्द पाहू या.



| | |
|---|---|
| पिकलेला आंबा | विरघळणारी साखर |
| उकळते तेल | खोवलेला नारळ |
| पेटती चूल | तळलेले पदार्थ |



वरील शब्दांतील 'पिकलेला, विरघळणारी, उकळते, खवलेला / खोवलेला, पेटती, तळलेले' हे शब्द त्यांच्यापुढे येणाऱ्या नामांची विशेषणे आहेत. पण ही विशेषणे 'पिक, विरघळ, उकळ, पेट, खोव, तळ' या धातूंपासून बनलेली आहेत. अशा विशेषणांना 'धातुसाधित विशेषणे' म्हणतात.

**धातुसाधित विशेषणांची आणखी काही उदाहरणे पाहू या.**

| | | |
|---|---|---|
| चिर | + लेला | = चिरलेला कांदा |
| | + लेली | = चिरलेली मिरची |
| | + लेले | = चिरलेले बटाटे |
| | + लेल्या | = चिरलेल्या भाज्या |
| | + लेले / लेलं | = ________ अळू |
| | + लेली | = ________ पाने / पानं |

| | | |
|---|---|---|
| तळ | + लेला | = तळलेला मासा |
| | + लेली | = तळ______ भजी |
| | + लेले | = तळलेले वडे |
| | + लेल्या | = तळ______ पुऱ्या |

| | | |
|---|---|---|
| उकड | + लेला | = उकड______ बटाटा |
| | + लेली | = उकडलेली भाजी |
| | + लेले | = ________ बटाटे |
| | + लेल्या | = उकडलेल्या भाज्या |

| | | |
|---|---|---|
| भाज | + लेला | = भाज______ मका |
| | + लेली | = भाज______ पोळी |
| | + लेले | = भाज______ मांडे |
| | + लेल्या | = भाज______ वड्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कुट | + लेला | = | ------------------------ | मसाला |
| | + लेली | = | ------------------------ | मिरची |
| | + लेले | = | ------------------------ | शेंगदाणे |
| | + लेल्या | = | ------------------------ | बिया |

**याचप्रमाणे,**
मुरलेले लोणचे,
घुसळलेले ताक, फेटलेले
अंडे, विरजलेले दही;
पण वाटली डाळ



**घ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

उदा॰ तळलेला पापड – तळलेली भजी – तळलेले वडे

पहिला विद्यार्थी – ह्या ताटात काय वाढले आहे?
दुसरा विद्यार्थी – तळलेला पापड.
सर्व विद्यार्थी – अच्छा? पण त्यात काही तरी वेगळं दिसतंय.
पहिला विद्यार्थी – तळलेली भजी आहेत ती.
दुसरा विद्यार्थी – नाही तर तळलेले वडे असतील.
सर्व विद्यार्थी – हो हो. तळलेले वडेच आहेत ते.



चिरलेली मिरची - चिरलेला कांदा - चिरलेले बटाटे
भाजलेला मका – भाजलेली भाकरी – भाजलेल्या वड्या
सोललेला बटाटा - सोललेले वाटाणे – सोललेल्या शेंगा
कुटलेला मसाला – कुटलेले दाणे – कुटलेली मिरची



## ५ चमचमीत आणि चुरचुरीत पदार्थ



**करा आणि शिका**

वर्गात असलेल्या विद्यार्थ्यांची तीन गटात विभागणी करा. यातील दोन गट 'अ' आणि 'ब' असे असतील, प्रत्येकी १-४ विद्यार्थी. तिसऱ्या गटात उरलेले सर्व विद्यार्थी वर्तुळात उभे राहतील. खाली दिलेले शब्दांचे फलक वर्तुळातील प्रत्येक विद्यार्थी हातात धरील. आता ध्वनिमुद्रण चालू करावे. 'अ' आणि 'ब' गटातील विद्यार्थी ऐकू आलेल्या शब्दाचा फलक आपल्याकडे घेतील. ज्या गटाकडे जास्त शब्दफलक जमतील तो जिंकेल. (वर्गात कमी विद्यार्थी असल्यास शब्दफलक भिंतीवर लावावेत.)

| | | | |
|---|---|---|---|
| झणझणीत | चौकात | नजर | कटवडा |
| साग्रसंगीत | पदार्थात | महत्त्वाची | स्वैपाकाचं |
| चव | शाम्पल वडा | चाखलेला | बोटं |

**क. ध्वनिफीत ऐकून रिकाम्या जागा भरू या आणि उताऱ्यातील बोलीभाषेतील शब्दांची यादी करून ते शब्द प्रमाण भाषेत लिहू या.**

ताव मारणे | फस्त करणे | हाणणे

कोल्हापुरात जाऊन झणझणीत .............. आणि .............. हाणला नाही, तर त्या गड्याचं काही खरं नाही गड्या! मिसळ आणि रस्सा म्हंजे कोल्हापूरची शान, कोल्हापूरचा मान अन् कोल्हापूरचा अभिमान आसतोय. कोल्हापूरच्या कोंच्यापन चौकात हुभारून नजर टाकली, की मिसळ अन् झणझणीत तांबड्या-पांढऱ्याची चार दोन दुकानं तरी दिसतातच. कोल्हापूरची मिसळ जेवढी फेमस असती, तेवढाच तिथला .............. जागतिक असतोय. कटवडा म्हणून लई ठिकाणी लई प्रकार मिळतात. पण कोल्हापूरला जो कटवडा मिळतो, तेची सर बाकीच्या वड्यांच्या `बा`ला यायची नाही. कटवडा म्हंजे एक साग्रसंगीत कार्यक्रमच असतोय. लई प्रेमानं ते सगळं करावं लागतंय, तरच तो झणझणीतपणा अन् तो रंग त्या पदार्थात उतरतोय. या पदार्थातली महत्त्वाची वस्तू म्हणजे तो ............... तो करायचं एक वेगळंच टेक्निक आसतंय. येकदा का ते टेक्निक हातात बसलं, की स्वैपाकाचं मैदान मारलंच म्हणून समजा. वडा बेष्टपैकी जमला, की मग कटाकडे वळायचं. .............. म्हंजे वड्याबरोबर खायचा कट. कटाची झणझणीत चव अन् त्यात बुडवलेला वडा, म्हंजे एकदम आSSSहा असा प्रकार आसतोय. बाकी तुमच्या कुठल्याबी हाटेलात आन टपरीवर त्यो .............., .............., .............. आन तसलंच काय काय मिळतंय. पन कोल्हापुरी कटवड्याची चव एकदा चाखलेला माणूस त्या तसल्या हाटेलांच्या आणि टपऱ्यांच्या वाऱ्यालासुद्धा हुभारायचा नाही पुढच्या टायमाला. तर, आज शिकू या या कोल्हापुरी कटवड्याचा झणझणीत फार्म्युला. घरी बनवून बघा आणि आम्हाला सांगा. नाय तुम्ही बोटं चाटत ऱ्हायलात, तर कोल्हापूरचं नाव सांगायचं काम नाही. ते तांबड्या-पांढऱ्याचं टेक्निक पुन्हा कधी तरी बघू. काय?

**ख. झणझणीत, चटपटीत... यांसारख्या विशेषणांची यादी करू या.**

**ग. ऐकू या आणि रिकाम्या जागा भरू या.**

कु ------ कु ------ त,     ------ सखु ------ त,

------ टप ------ त,     ------ रचु ------ त,

झ ------ झणीत,     फ ------ फ ------ त,

------ ळबु ------ त,     ------ सर ------ त



**घ. वरील विशेषणांपैकी काहींचा वापर करून एक छानशी कविता रचू या.**

## ६ पान वाढू या.

**क. वाचू या.**

काय वाढले पानावरती, ऐकून घ्यावा थाट संप्रती
धवल लवण हे पुढे वाढले, मेतकूट मग पिवळे सजले
आले लोणचे बहु मुरलेले, लिंबू कागदी रसरसलेले

किसुन आवळे मधूर केले, कृष्णाकाठचे वांगे आणले
खमंग त्याचे भरीत केले, नीरनिराळे चटके नटले
चटण्यांचे बहु नवे मासले, संमेलनची त्यांचे भरले

भिजल्या डाळी नंतर आल्या, काही वाटल्या काही मोकळ्या
काही वाटुन सुरेख तळल्या, कोशिंबिरीच्या ओळी जमल्या
शुभ्र काकड्या होत्या किसल्या, मुळा कोवळा मिरच्या ओल्या

केळी कापून चकत्या केल्या, चिरुन पेरुच्या फोडी सजल्या
एकरूप त्या दह्यात झाल्या, भाज्या आल्या आळु-घोसाळी,
रानकारली वांगी काळी, सुरण तोंडली आणि पडवळी

चुका चाकवत मेथी कवळी, चंदन बटवा भेंडी कवळी
फणस कोवळा हिरवी केळी, काजुगरांची गोडी निराळी
दुधी भोपळा आणि रताळी, किती प्रकारे वेगवेगळी

फेण्या, पापड्या आणि सांडगे, कुणी आणुनी वाढी वेगे
गव्हल्या नकुल्या धवल मालत्या, खिरी तयांच्या शोभत होत्या
शेवयाच्या खिरी वाटल्या, आमट्यांनी मग वाट्या भरल्या
सार गोडसे रातंब्याचे, भरले प्याले मधुर कढीचे
कणीदार बहु तूप सुगंधी, भात वाढण्या थोडा अवधी...



– ग. दि. माडगूळकर

या कवितेत काही शब्द रंगीत आहेत. हे शब्द म्हणजे स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे आहेत.

त्यांची मूळ रूपे अशी –
वाढणे, भरणे, किसणे, वाटणे, तळणे इ.

याचप्रमाणे इतर काही क्रियापदे आहेत –
चिरणे (कांदा चिरणे), खोवणे (नारळ खवणे), ठेचणे (आलं ठेचणे), कुटणे (मसाला कुटणे), भरडणे (दाणे भरडणे), दळणे (धान्य दळणे), भाजणे (भाकरी भाजणे), घुसळणे (ताक घुसळणे), शिजवणे (बटाटा शिजवणे), धुणे (तांदूळ धुणे), वळणे (लाडू वळणे), लाटणे (पोळ्या लाटणे), थापणे (वडे थापणे), कांडणे (तांदूळ कांडणे), सोलणे (काकडी सोलणे), निवडणे (पालेभाज्या निवडणे), तापवणे (दूध तापवणे)

**अ. रिकाम्या जागा भरा.**

१. धान्य : दळणे :: ताक : ------------------------------

२. पोळ्या : लाटणे :: वडे : ------------------------------

३. आले : ठेचणे :: नारळ : ------------------------------

४. दाणे : भरडणे :: तांदूळ : ------------------------------

५. मसाला : कुटणे :: लाडू : ------------------------------

थापणे / कांडणे / वळणे / घुसळणे / खोवणे

**ख. पेशवाई थाट**

नाना फडणीसांनी सवाई माधवराव पेशव्यांच्या प्रथम विवाहप्रसंगी भोजनसमयी पानात खाण्याचे पदार्थ कोठे व कसे वाढावे याबद्दलची वाढपाची पद्धत सुरू केली. पानात वरील बाजूला मध्यभागी जरासं मीठ, मिठाच्या डाव्या बाजूला चटण्या-कोशिंबिरी-लोणची-पापड-भजी-कुरडया व खीर-पुरण असे पदार्थ वाढले जात. मिठाच्या उजव्या बाजूला भाज्या-आमट्या-सार-सांबार व पक्वान्ने असत. पानाच्या मध्यभागी पोळ्या, पुऱ्या व भाताचे प्रकार हे मुख्य अन्नपदार्थ वाढले जात. वाढपाची ती पद्धत महाराष्ट्रात बऱ्याच जुन्या घरांत टिकून आहे.

भोजन वाढपासाठी दीड-दोन हात लांब केळीचे पान, दर पानाच्या बाजूला दहा-बारा द्रोण असत. पानाभोवती रांगोळ्या, बसण्यास व टेकण्यास रुप्याच्या फुलांचे शिसवी पाट, चांदीच्या वाटीत गुलाबपाणी अथवा केशरपाणी (एक पक्वान्न खाल्ल्यावर त्याची चव दुसऱ्या पक्वान्नाला लागू नये म्हणून उजव्या हाताची बोटे स्वच्छ करण्यासाठी), पानात दहा भाज्या - त्यात तोंडली, परवरे, वांगी या भाज्या नित्य असत. तुरीचे वरण, दोन प्रकारचे सांबार, आमटी, दहा प्रकारची लोणची (त्यांतील एक साखरेचे गोड) असे. तीन-चार प्रकारच्या फेण्या, साधे वडे, वाटल्या डाळीचे कढीवडे, साजूक तूप, मध्यम गोड-आंबट मठ्ठा, दोन प्रकारच्या खिरी (शेवयांची व गवल्यांची), सपिठाच्या पूर्ण पोळ्या (पुरण पोळ्या), खिचडी, ओले हरभरे, पापड, सांडगे, चिकवड्या, मिरगोंडे (मिरगुंडे), फळभाजीच्या तळलेल्या काचऱ्या, वीस प्रकारच्या कोशिंबिरी, फळभाज्या, पालेभाज्या, उडदाचे किंवा मुगाचे तळलेले किंवा भाजलेले पापड, तळवडे, पंचामृत, रायती, ताकाची कढी, चाकवताचे सांबार, मसालेदार वांगी, सुरण, पांढरा भोपळा, मेथी किंवा आंबाडीची भाजी, चटण्या, कोशिंबिरीत कोथिंबीर, लसूण, आले, लाल मिरच्या, तीळ, जवस, कारले, आमसुले, हरभऱ्याची डाळ, लिंबे यांचा वापर करत. तसेच, आंब्याच्या लोणच्यांचाही समावेश असे. घीवर, आमरस, श्रीखंड (हे पक्वान्न दुसऱ्या बाजीरावांनी प्रचारात आणले). बासुंदी, केशरी साखरभात, जिलेबी (हे पक्वान्न मुघल बादशाह बाबर याने सर्वप्रथम भोजनात आणले), लाडू, पुरणपोळी (हे पक्वान्न जास्त रूढ होते) अशी गोड पक्वान्ने असत. भोजनोत्तर सात पानांचा प्रसिद्ध कुलपी विडा दिला जाई (पेशवाईत स्त्रियांनाही विडा खाण्याची सवय होती).

अ. तुम्हाला ही मेजवानी कशी वाटली, याची वर्गात चर्चा करू या.

आ. तुम्ही कधी अशा प्रकारची मराठमोळी मेजवानी अनुभवली आहे का? आपल्याला आवडलेल्या मराठी खाद्यपदार्थाबद्दल वर्गात सांगू या.



**टीप**

**जरासा – विकारी विशेषण**

उदा. जरासं मीठ टाकावं लागेल.
जरासाच भात वाढ.






| (तो) भात | (ती) चटणी | (ते) मीठ | (ते) शेंगदाणे | (त्या) भाज्या | (ती) कारली |
|---|---|---|---|---|---|
| जरासा | जराशी | जरासे / जरासं | जरासे | जराशा | जराशी |

## ७ कशाशी, कशाबरोबर ...?

**क. खालील उतारा वाचू या.**

तन्वीने तिच्या ऑफिसमधल्या मैत्रिणीला जेवायला बोलवले आहे. जेवता जेवता त्या दोघींच्या काय गप्पा चालू आहेत पाहू या.



नमिता : तन्वी, अगं आपण जेवायला बसलोय खरं, पण मला लोणचं नाही दिसत कुठेच. तुम्ही नाही का लोणचं खात ?

तन्वी : लोणचं... ई!... मी नाही बाई लोणचं खात. असल्या आंबटचिंबट पदार्थांची नावं जरी ऐकली ना तरी माझ्या अंगावर शिरशिरी येते बाई.

नमिता : हे गं काय? मग आता मी पोळी कशाशी खाऊ?

तन्वी : कशाशी म्हणजे?

नमिता : अगं, म्हणजे पोळीबरोबर काय खाऊ?

तन्वी : हे काय, भाजी आहे की!... तिच्याबरोबर खा ना!



नमिता : हो, ती मी खाईनच गं, पण लोणच्याशिवाय मला पोळी नाही खाववत. चव येते ना चांगली.

तन्वी : बरं, मग असं कर, आमच्याकडे लोणचं तर नाही, पण लसणीची चटणी आहे. ती चालेल का?

नमिता : चटणी, आणि पोळीशी? मुळीच नाही. आम्ही तर भातासोबत चटणी खातो.

तन्वी : भलतंच आहे तुमचं. मग पापड तर तुम्ही भाजीबरोबर खात असाल ना?

नमिता : अय्या!... तुला कसं माहीत? मला तर खूप आवडतो भाजीवर पापड. असा भाजीवर कुस्करून खायचा. पापडाबरोबर भाजीपण कुरकुरीत!

**ख. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

उदा॰ थालीपीठ - लोणच्याशी - चटणीशी

पहिला विद्यार्थी – आज तू डब्यात काय आणलं आहेस?
दुसरा विद्यार्थी - आज मी डब्यात थालीपीठ आणलं आहे.
सर्व विद्यार्थी - अच्छा, मग तू ते कशाशी खाणार आहेस?
दुसरा विद्यार्थी – लोणच्याशी.
पहिला विद्यार्थी – काय, लोणच्याशी? मी तर चटणीशी खातो.
सर्व विद्यार्थी – हो, आम्हीपण चटणीशी खातो.

पुरी – श्रीखंड – बासुंदी
भात – वरण – आमटी
पोहे – दही – दूध
भाकरी – झुणका – चटणी





**टीप :**

**विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये**

**की, किंवा, वा, अथवा, अगर, नाही तर**

१. तुम्ही चहा घेणार **की** कॉफी?
२. मला सरबत **किंवा** लस्सी, काहीही चालेल.
३. कोल्हापुरी मिसळीची सर पुण्याच्या **वा** मुंबईच्या मिसळीला कशी येणार?
४. मी चहा, कॉफी **अथवा** कोणतेही उत्तेजक पेय घेत नाही.
५. भाजी तिखट झाली तर तीत चिंच **अगर** गूळ घालावा, अगर एखादा बटाटा उकडून घालावा.
६. खाईन तर तुपाशी, **नाही तर** उपाशी!
७. असेल तर दिवाळी **नाही तर** शिमगा.
८. गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, **नाही तर** मोडून खाल्ली.

## ८ म्हणी आणि खाद्यपरंपरा.

**क. खालील उतारा वाचू या.**

एका संशोधनानुसार असे सिद्ध झाले आहे की पुरुष दिवसाला साडेचार हजार शब्द बोलतात, तर स्त्रिया वीस हजार शब्द बोलतात. ऑस्ट्रो ह्या अमेरिकन प्राध्यापकाने एका विश्वविद्यालयात एकाच वर्गातल्या पंचवीस विद्यार्थ्यांना कमीत कमी शंभर शब्द लिहायला सांगितले. त्यांना एकूण पाच हजार शब्द मिळाले, पण त्यातही काही पुनरुक्ती असल्याचे आढळून आले. पण एक विशेष गोष्ट त्यांच्या लक्षात आली, ती म्हणजे पुरुषांनी लिहिलेल्या शब्दांमध्ये त्रेपन्न अन्नवाचक शब्द होते तर स्त्रियांनी लिहिलेल्या शब्दांमध्ये एकशे एकोणऐंशी शब्द अन्नवाचक होते.

म्हणी आणि वाक्प्रचार ह्यांचाही वापर पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या तोंडी अधिक होताना दिसून येतो. शिवाय भर म्हणजे ह्या म्हणी आणि वाक्प्रचारांवर खाण्याचाही प्रभाव झालेला आढळून येतो. विविध अन्नपदार्थ, स्वयंपाकघरातील गोष्टी, भाज्या-फळे ह्यांचा वापर सर्रास झालेला आहे. खाद्यपरंपरा आणि म्हणी मराठीत अनेकदा हातात हात घालून चालणाऱ्या मैत्रिणींप्रमाणे वर्षानुवर्षे चालत आलेल्या आहेत. चला, आता अशाच काही म्हणींची ओळख करून घेऊ या.

**ख. ओळख करून घेताना म्हणींच्या त्यांच्या अर्थाशी जोड्या लावू या.**

| म्हणी | अर्थ |
|---|---|
| अ. आधी पोटोबा मग विठोबा. | १. मनात स्वप्ने रंगवणे पण प्रत्यक्षात पदरी निराशा पडणे. |
| आ. ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खात नाहीत. | २. पर्याय नाही म्हणून नाखुशीने एखादी गोष्ट स्वीकारणे. |
| इ. कामापुरता मामा आणि ताकापुरती आजीबाई. | ३. एकाचा राग दुसऱ्यावर काढणे. |
| ई. कोल्हा काकडीला राजी. | ४. क्षुल्लक गोष्टीसाठी मोठा खर्च करणे. |
| उ. खाई त्याला खवखवे. | ५. खोटी स्तुती करणे. |
| ऊ. चणे आहेत तर दात नाहीत, दात आहेत तर चणे नाहीत. | ६. आवडलेल्या गोष्टीचा मर्यादेपेक्षा जास्त फायदा घ्यायचा नसतो. |
| ए. चार आण्याची कोंबडी न् रुपयाचा मसाला. | ७. कितीही बदलण्याचा प्रयत्न केला तरी स्वभावात फरक न पडणे. |
| ऐ. ताट द्यावं पण पाट देऊ नये. | ८. आपले काम साधण्यापुरते नाते लावणे. |
| ओ. तुपात तळलं, साखरेत घोळलं, तरी कारलं कडू ते कडूच. | ९. भोजनाला प्राधान्य देणे, नंतर इतर कामांना. |
| औ. मनात मांडे नि पदरात धोंडे | १०. जो चूक करतो त्यालाच ती टोचत राहते. |
| अं. वड्याचं तेल वांग्यावर | ११. एखाद्या गोष्टीचा लाभ घेण्यासाठी योग्य परिस्थिती न लाभणे. |
| अः. ज्याची खावी पोळी, त्याचीच वाजवावी टाळी | १२. मामुली गोष्ट द्यावी पण महत्त्वाची गोष्ट राखून ठेवावी. |

ग. "आपल्याकडच्या स्त्रियांच्या तोंडी म्हणी आणि वाक्प्रचार ह्यांचाही वापर पुरुषांपेक्षा अधिक झालेला दिसून येतो." या वाक्यावर आपले मत सांगा.

घ. "दिवसाला पुरुष साडेचार हजार शब्द बोलतात, तर स्त्रिया वीस हजार शब्द बोलतात." तुम्हाला काय वाटते? खालील वाक्यांच्या आधारे वर्गात चर्चा करू या.

| | |
|---|---|
| + मी तुमच्या मताशी सहमत आहे. | - असं म्हणता येणार नाही ... |
| + असंही असू शकतं | - हे चुकीचं आहे. |
| + याचबरोबर आपण दुसऱ्या अंगाने विचार केला, तर... | - असं असलं तरीही वस्तुस्थिती वेगळी असू शकते. |
| + मी असं म्हणेन की... | - हे पूर्णपणे स्वीकारता येणार नाही. |
| + माझा दृष्टिकोन असा आहे की... | - मला हे मत पटलेलं नाही. |

## ९ स्वयंपाकात काय येते?

**क. बाजूचे भित्तिपत्र पाहू या.**

अ. या सिनेमाचा विषय काय असू शकेल असे तुम्हाला वाटते?




**ख. आता ही चित्रफीत पाहू या.**

अ. तुम्हाला काय वाटते, या सिनेमात काय घडेल? किती मुख्य पात्रं असतील?

आ. मुख्य स्त्रीपात्राच्या मते 'स्वयंपाक आला', म्हणजे त्यात काय आलं?

**टीप :**

**चतुर्थी – क्रियापद**

जमणे – प्रशांतला स्वयंपाक जमतो.

समजणे – विद्यार्थ्यांना कविता चांगली समजली.

आवडणे – निखिलला भाकरी आवडते.

येणे – त्याला चपात्या येतात.

(पेलणे, मानवणे इ.)

काही क्रियापदे वापरताना ती ज्या नामांशी किंवा सर्वनामांशी संबंधित असतात त्यांना चतुर्थीचे स, ला, ना, प्रत्यय (ए.व. : -स, -ला, -ते; अ.व. : -स, -ला, -ना, -ते) लागतात.

व्याकरण

## करा व शिका




वर्गात महाराष्ट्रातील विविध खाद्यपदार्थ बनवून खाद्यजत्रा साजरी करावी. प्रत्येकाने आपापल्या पदार्थाची पाककृती (साहित्य + कृती + चित्र) लिहून आणावी आणि सर्व पाककृतींची एकत्रित पुस्तिका तयार करावी. प्रत्येकाने आपली पाककृती वर्गासमोर सादर करावी.

## चला, खाद्यजत्रेत फेरी मारा.

खेळासाठी साहित्य – सोंगट्या, फासा

**नियम –**

१. सर्वांनी सोंगट्या सुरुवातीच्या घरात ठेवाव्यात. सहाचे दान पडताच त्या घरातून बाहेर पडता येईल.
२. सोंगटी लाल घरात आल्यास एक घर मागे जावे लागेल.
३. निळ्या घरात आल्यावर एक घर पुढे जाता येईल.
४. एखाद्या खेळाडूची सोंगटी गुलाबी घरात आल्यास त्याच्या लगेच मागे असणाऱ्या खेळाडूने त्या गुलाबी घरात नोंद केलेल्या पदार्थाविषयी प्रश्न विचारायचा. उदा. तो पदार्थ कुठल्या प्रांतातील आहे, तो कशापासून बनवला जातो, त्याची चव कशी असते इ. गुलाबी घरात पोहचलेल्या खेळाडूने योग्य उत्तर दिल्यास त्याला तीन घरे पुढे जाता येईल. उत्तर चुकल्यास तीन घरे मागे जावे लागेल.

अशा प्रकारे जो प्रथम शेवटच्या घरात जाईल, तो खेळ जिंकेल.




## नाम + क्रियापद जोड्या

| नाम + क्रियापद | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|
| आग्रह करणे | हट्ट करणे | आग्रह करून वाढणे हा तर भारतीय संस्कृतीचा भाग. |
| कणीक तिंबणे | बदडून काढणे | काल पकडलेल्या चोराची पोलिसांनी रात्रभर चांगलीच कणीक तिंबली. |

| | | |
|---|---|---|
| आस्वाद घेणे | खाण्याचा आनंद घेणे | बाबूच्या लग्नात सर्व माणसांनी वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेतला. |
| कळी खुलणे | चेहऱ्यावर हास्य उमटणे | ताटातले फराळाचे पदार्थ पाहताच चिमुकल्या सोनलची कळी खुलली. |
| ताव मारणे | खूप खाणे | लग्नाच्या जेवणावर माधवने ताव मारला. |
| तोंडाला पाणी सुटणे | हाव सुटणे | झाडाला लगडलेल्या गाभुळलेल्या चिंचा पाहून मितालीच्या तोंडाला पाणी सुटले. |
| दुधात साखर पडणे | आहे त्याहून अधिक चांगले होणे | राजेश एम. ए. परीक्षेत प्रथम आला आणि त्याला लगेच नोकरी मिळाल्यामुळे जणू दुधात साखर पडली. |
| पोटात कावळे ओरडणे | खूप भूक लागणे | दुपारचे जेवण वेळेवर न मिळाल्याने सुदामच्या पोटात कावळे ओरडू लागले. |
| पोटाला घास मिळणे | खायला अन्न मिळणे | दिवसभर काबाडकष्ट केल्यावर गरिबांच्या पोटाला घास मिळतो. |
| फडशा पाडणे | संपूर्णपणे संपवणे | रविवारी आम्ही दोघांनी डझनभर आंब्यांचा फडशा पाडला. |
| फन्ना उडवणे | लगेच संपवणे | विद्यार्थ्यांनी जेवणाचा अगदी पंधरा मिनिटात फन्ना उडवला. |
| बेगमी करणे | (भविष्यासाठी) साठा करणे | जिग्नेशच्या घरी दर वर्षी उन्हाळ्यात विविध प्रकारच्या कडधान्यांची बेगमी करून ठेवतात. |
| लहर येणे | इच्छा उत्पन्न होणे | गणेशला रात्री आईसक्रीम खायची लहर आली. |
| लोभ वाढणे | हाव वाढणे | जुगारात एकदा पैसे मिळाल्यावर रामण्णाचा पैशाचा लोभ वाढला. |
| हात बसणे | सराव होणे | रोज जेवण बनवून बनवून अमितचा स्वयंपाकावर हात बसला. |

| इतर शब्द + क्रियापद | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|
| अन्नान्न दशा होणे | उपासमारीची पाळी येणे | दुष्काळामुळे शेकडो खेडेगावांतील लोकांची अन्नान्न दशा झाली आहे. |
| अलगद उचलणे | सावकाश उचलणे | दुधावरची साय तुषारने अलगद उचलली. |

| | | |
|---|---|---|
| आडवे होणे | झोपणे | खूप काम केल्यावर आई दुपारी जरा आडवी होते. |
| उतू जाणे | वाहून जाणे | लक्ष न राहिल्याने शेगडीवर असणारे दूध उतू गेले. |
| तुटून पडणे | धावून जाणे | गरमागरम जिलबीवर सगळेच जण तुटून पडले. |
| फस्त करणे | खाऊन संपवणे | • पुढ्यात ठेवलेले पंचवीस लाडू केशवने फस्त केले.<br>• त्याने सगळा केक फस्त केला. |
| वाया घालवणे | फुकट घालवणे | वाढून घेतलेले सगळे पदार्थ न संपवता पाहुण्यांनी अन्न वाया घालवले. |
| वाया जाणे | फुकट जाणे | घरातील अन्न वाया गेलेलं वडिलांना आवडत नाही. |

## व्यक्तिपरिचय

### विठ्ठल कामत (२८ नोव्हेंबर १९५८)

'पंख पसरून आकाश कवेत घेण्याची वृत्ती आणि जिद्द असेल, तर तुम्ही काहीही करू शकता. अगदी काहीही.' ही उक्ती खरी करून दाखवणारे विठ्ठल कामत हे एक प्रथितयश उद्योजक आहेत. 'सत्कार', 'सुरुची', 'सम्राट' 'ऑर्किड' अशासारख्या अनेक कामत ग्रुप ऑफ हॉटेल्समुळे लोकप्रिय झालेल्या विठ्ठल कामत यांनी भारतातच नव्हे, तर जगभरात अनेक उपाहारगृहे चालू केली आहेत.



वडिलांपासून चालत आलेला उपाहारगृहांचा उद्योग विठ्ठल कामत ह्यांनी आपल्या कल्पकता आणि प्रयोगशीलतेच्या जोरावर भरभराटीस आणला. उपाहारगृह या संकल्पनेत त्यांनी अनेक आमूलाग्र बदल घडवून आणले आणि भारतीय उपाहारगृहांना आधुनिक दर्जा दिला. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आपल्या वडिलांच्या उद्योगाला हातभार लावण्यास सुरुवात केली. उमेदीच्या काळात त्यांनी त्यांच्या वडिलांकडून या व्यवसायातले धडे घेतले. जगाचा अनुभव घेण्यासाठी ते युरोपात गेले. त्यांच्या प्रसिद्ध 'इडली ऑर्किड आणि मी' ह्या पुस्तकात त्यांनी या अनुभवाविषयीचा किस्सा सांगितला आहे. लंडन येथे टन्ना यांच्या शान रेस्टॉरंटमध्ये आचारी म्हणून काम करत असताना आपल्या आईची इडली बनवण्याची पद्धती वापरली. कापसासारख्या मऊ इडल्या बनवून तिला 'इंडियन राईस पुडिंग' हे नवे नाव दिले. त्यांनी 'शान' रेस्टॉरंट दाक्षिणात्य पदार्थांसाठी लंडनमध्ये प्रसिद्ध केले.

मेहनत, कल्पकता याबरोबरच पारंपरिक पद्धतींना आधुनिकतेची जोड देऊन त्यांनी पदार्थांमध्ये वेगळेपणा जपला. गिऱ्हाइकांच्या आवडीनिवडी जपत, त्यांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी अनेक क्लृप्त्या लढवल्या. आपल्या उद्योगाचा विस्तार केला. तीन तारांकित, चार तारांकित आणि इतर उपाहारगृहांत अधिक लोकप्रिय ठरलेल्या पंचतारांकित ऑर्किडची स्थापना केली. ऑर्किड हे इकोटेल म्हणजेच पर्यावरण अनुकूल हॉटेल म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांच्या आतापर्यंतच्या ह्या प्रवासाची कथा त्यांनी 'इडली, ऑर्किड आणि मी' ह्या आत्मचरित्रात मांडली आहे.

विठ्ठल कामत हे 'महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळा'चे अध्यक्ष असून, 'हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया'च्या पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष आहेत; याव्यतिरिक्त अनेक शैक्षणिक औद्योगिक समित्यांवर सल्लागार तसंच विविध पदांवर नियुक्त आहेत, त्या सोबतच 'आय.आय.एम.' अहमदाबाद आणि इतर व्यावसायिक महाविद्यालयांतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचं कार्य कामत करत आहेत.

उद्योजक म्हणून ख्यातनाम असलेले कामत हे एक लेखक म्हणूनही प्रसिद्ध आहेत. 'इडली ऑर्किड आणि मी' प्रमाणेच 'उद्योजक होणारच मी' आणि 'यश, अपयश आणि मी' अशा पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे.

'गोल्डन पिकॉक ॲवॉर्ड', 'पाटवा इंटरनॅशनल अचिवर ॲवॉर्ड', 'राजीव गांधी एन्वायर्नमेंट ॲवॉर्ड', तर 'ऑर्किड' साठी 'इकोटेल' हा किताब, असे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो गोळाभात | ती उकडपेंड | ते घोसाळे / घोसाळं, ती घोसाळी |
| तो वडेभात | ती पानगी, त्या पानग्या | ते सांदण, ती सांदणे / सांदणं |
| तो भरडाभात | ती पातोळी, त्या पातोळ्या | ते लवण |
| तो रोडगा, ते रोडगे | ती शेवभाजी | ते मेतकूट |
| तो मांडा, ते मांडे | ती मासळी, त्या मासळ्या | ते पंचामृत |
| तो राजदूत, ते - | ती खाद्यसंस्कृती | ते रताळे, ती रताळी |
| तो हुलगा, ते हुलगे | ती खाद्यशैली | ते सोरकुल |
| तो पावटा, ते पावटे | त्या उसऱ्या | ते सोवळेओवळे / सोवळंओवळं, ती सोवळीओवळी |
| तो रोडगा, ते रोडगे | ती करडई | ते पक्वान्न, ती पक्वान्ने |
| तो खर्डा | ती आंबील | ते मिरगुंड, ती मिरगुंडे |
| तो कटवडा, ते कटवडे | ती फेणी, त्या फेण्या | ते घावन, ती घावने / घावनं |
| तो चंदन बटवा | ती खिरापत, त्या खिरापती | |
| तो रातांबा, ते रातांबे | ती पाटवडी, त्या पाटवड्या | |
| तो द्रोण, ते - | ती पंगत, त्या पंगती | |

| | | |
|---|---|---|
| तो परीघ, ते - | ती अंबाडी | |
| तो सुधारस | ती पारी, त्या पाऱ्या | |
| तो बेत, ते - | ती शेवई, त्या शेवया | |
| तो खाद्यमहोत्सव, ते - | ती आंबोळी, त्या आंबोळ्या | |
| तो खाद्यप्रेमी, ते - | ती बट्टी, त्या बट्ट्या | |
| तो सांडगा, ते सांडगे | ती पातोडी, त्या पातोड्या | |
| तो घारगा, ते घारगे | ती सांजोरी, त्या सांजोऱ्या | |
| तो गव्हला, ते गव्हले | ती गुठळी, त्या गुठळ्या | |
| तो चाकवत | | |

## क्रियापद

| | | |
|---|---|---|
| तिंबणे | वाळवणे | साठवणे |
| खवणे / खोवणे | कुटणे | भरडणे |
| घुसळणे | कांडणे | ठेचणे |

## विशेषण

| | | |
|---|---|---|
| साग्रसंगीत | अधीर | कणीदार |
| भौगोलिक | अनुकूल | कोचदार |
| सुपीक | सात्त्विक | मराठमोळं |
| प्राचीन | खमंग | मसालेदार |
| मऊसूत | साजूक | झणझणीत |
| चटपटीत | कुरकुरीत | कोकणी |
| मालवणी | खानदेशी | कोल्हापुरी |
| मराठवाडी | वऱ्हाडी | |
| सातारी | वैदर्भीय | |

## आता मला हे येतं ...

महाराष्ट्रातील खाद्यसंस्कृतीतील विविधतेबद्दल जाणून घेणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

नामसाधित विशेषणे, धातुसाधित विशेषणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

ध्वन्यानुकारी, नादानुकारी विशेषणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे, प्रश्नशब्द : कशाबरोबर?

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये : की, किंवा, वा, अथवा, अगर, नाहीतर

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

त्यात येते / येतं

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

चतुर्थी + क्रियापद - जमणे, येणे, समजणे, आवडणे, जाणे इ.

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# १

# नागपूर आणि नाशिक



## चला, शिकू या...

- महाराष्ट्रातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे : नागपूर आणि नाशिक
- घरातील = घरातले
- पूरक केवलप्रयोगी अव्यये : की, बरं का, होऽका, आपला, बेटा इ.
- बोलीभाषा
- इतका, इतकी, इतके / इतकं ... की
- तसा, तशी, तसे / तसं ... पण
- हे चालणार नाही, चालवून घेणार नाही...
- 'की' चे वेगवेगळे उपयोग

## १ संत्रे-नगरी नागपूर

**क. वाचू या.**



महाराष्ट्राची हिवाळी राजधानी असलेले नागपूर हे अतिशय झपाट्याने विकसित होत असलेले आणि मुंबई व पुण्यानंतर राज्यातले तिसरे मोठे शहर आहे. अलीकडेच भारतातले सर्वात स्वच्छ शहर म्हणून आणि दुसऱ्या क्रमांकाचे हरित शहर म्हणून नागपूरला मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होत असल्याने महाराष्ट्राच्या विदर्भातल्या व्यावसायिक आणि राजकीय हालचालींचे प्रमुख केंद्र अशीही नागपूरची ओळख आहे. विदर्भात, विशेषत: नागपूर जिल्ह्यात, संत्र्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात असल्याने या शहरातून देशभरात संत्र्यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात होत असतो. यामुळेच संपूर्ण देशात नागपूरची ओळख 'संत्रे-नगरी' अशीही आहे. नागपूर हे दक्षिणमध्य सांस्कृतिक केंद्र आहे. याशिवाय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय नागपुरात असल्याने, तसेच बौद्ध चळवळीचेही नागपूर हेच महत्त्वाचे केंद्र असल्याने राजकीयदृष्ट्यादेखील या शहराचे विशेष महत्त्व आहे.

**ख. ही वाक्ये तुम्ही वरील उताऱ्यात वाचलीत का?**



अ. नागपूर ही महाराष्ट्राची उन्हाळी राजधानी आहे.
आ. तिसरे हरित शहर म्हणून नागपूरला मान्यता मिळाली आहे.
इ. देशभरात नागपूरच्या संत्र्यांचा मोठा सण साजरा केला जातो.
ई. या शहराला राजकीय महत्त्व अजिबात नाही.

**ग. नागपूर शहराबद्दल माहिती गोळा करू या. तुम्हाला नव्याने आढळलेली माहिती कोणती?**

**घ. संवाद ऐकू या.** 

**घरातील = घरातला / ली / ले / ल्या**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पु० | घरातील / घरातला मुलगा | घरातील / घरातले मुलगे |
| स्त्री० | घरातील / घरातली मुलगी | घरातील / घरातल्या मुली |
| नपुं० | घरातील / घरातले / घरातलं बाळ | घरातील / घरातली बाळे / बाळं |

*घर – घरात + ईल = घरातील, घरात + ला = घरातला

**याचप्रमाणे** जग : जगा – जगातील, जगातले
नागपूर : नागपुरा – नागपुरातील, नागपुरातले
नाशिक : नाशका – नाशकातील, नाशकातले

**त्याचप्रमाणे** वागणे : वागण्यातील, वागण्यातला फरक
माणूस : माणसामाणसांतील, माणसामाणसांतले अंतर

**अ. प्रश्न १.क आणि १.घ मध्ये आलेल्या वरील पद्धतीच्या विशेषणांची यादी करू या.**

**आ. आंतरराष्ट्रीय स्तरावर नागपुरी पर्यटन.**

देश आणि महाराष्ट्राच्या पर्यटनाची महती सांगतानाच नागपूरच्या महापौरांनी नागपुरी पर्यटनासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर या (१. क्षेत्र) ........................ उद्योजकांना साद घातली. 'टायगर कॅपिटल ऑफ इंडिया' अशी ओळख असलेल्या नागपूरच्या संस्कृती, परंपरा आणि पर्यटनाची ओळख त्यांनी जगाला करून दिली. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या (२. जग)........................ (३. शहर)........................ महापौर आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे सुमारे ५०० तज्ज्ञ यात सहभागी झाले होते.

**च. संस्कृती. खालील उताऱ्यांशी दिलेल्या चित्रांच्या जोड्या लावू या.**

**१. मारबत महोत्सव**













नागपुरातील मारबत महोत्सव हा या भागातील एक महत्त्वाचा सण आहे. हा सण नागरिकांना वाईट प्रवृत्तींपासून संरक्षण मिळावं यासाठी साजरा केला जातो. या उत्सवाच्या काळात नागपूरचे लोक भुतांपासून स्वतःचा बचाव व्हावा म्हणून देवदूतांना आग्रह करतात आणि वाईट शक्तींचे पुतळे बनवतात. शहराच्या सर्व भागांमधून या पुतळ्यांना मिरवणूक काढून मोठ्या मैदानावर नेले जाते आणि वाईट शक्तींचे प्रतीक समजून एकत्र जाळले जाते. लोक त्या दिवशी नवीन पोशाख व दागिने खरेदी करतात आणि स्त्रिया स्वादिष्ट पदार्थ तयार करतात आणि सर्वांना वाटतात. उत्सवादरम्यान नृत्य, नाटक इत्यादी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**२. कालिदास महोत्सव**

नोव्हेंबर महिन्यात रामटेक आणि नागपूरमध्ये कालिदास महोत्सव साजरा केला जातो. एमटीडीसी आणि नागपूरचे जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा संगीत, नृत्य आणि नाट्य महोत्सव असतो आणि ह्या महोत्सवात ‘कालिदास सन्मान’ हा पुरस्कार कलाकारांना दिला

जातो. कालिदास भारतातील एक महान संस्कृत कवी आणि नाटककार होते. शाकुंतल हे नाटक आणि कुमारसम्भव, ऋतुसंहार, रघुवंश आणि मेघदूत या काव्यांसाठी ते प्रसिद्ध आहेत.

**३. झिरो माईल**

नागपूरमधील 'झिरो माईल' हे भारताच्या मध्यभागी आहे. झिरो माईल मार्कर भारताचे भौगोलिक केंद्र दर्शवतो. ब्रिटिशांनी झिरो माईल स्टोनची स्थापना केली होती. त्यांनी त्या ठिकाणाचा वापर सर्व अंतरे मोजण्यासाठी केला. झिरो माईल स्टोनमध्ये चार घोडे आणि एक वाळूचा खडक असलेला खांब आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी नागपूरला भारताचे केंद्रस्थान म्हणून मान्यता दिली आणि म्हणूनच या बिंदूचा शोध घेतला आणि शून्य मैलाचा दगड म्हणजेच झिरो माईल स्टोनची स्थापना केली. देशाच्या केंद्रस्थानी असल्यामुळे त्यांनी नागपूरला दुसरी राजधानी बनविण्याची योजनादेखील आखली होती.

**४. सीताबर्डी किल्ला**

नागपूर शहराच्या ऐन मध्यभागात सीताबर्डीचा किल्ला आहे. मुधोजीराजे भोसले (द्वितीय) यांनी तो बांधला. किल्ल्याची भव्य इमारत आणि तिथे असलेले गणपतीचे प्राचीन मंदिर प्रसिद्ध आहे. आता किल्ल्याभोवतीचा परिसरही सीताबर्डी म्हणूनच ओळखला जातो. सीताबर्डी हे नागपूरमधील एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र आहे. त्यामुळे या परिसराला पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात.

**अ. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहू या.**

१. वरील माहिती नागपुरातील विविध उत्सवांबद्दल आहे.
२. कालिदास महोत्सवात इतर देशातील कलाकारसुद्धा सहभागी होतात.
३. झिरो माईल मार्कर भारताचा भौगोलिक मध्य दर्शवितो.
४. नागपूरच्या भौगोलिक स्थानामुळे हे शहर महाराष्ट्राची दुसरी राजधानी आहे.
५. १८९७ मध्ये सीताबर्डी एक व्यावसायिक केंद्र म्हणून प्रसिद्ध होते.

**छ. उत्स्फूर्त संवाद साधू या.**

तुम्ही नागपूरला पर्यटनाला गेला आहात. तुमच्या सहाध्यायासोबत वरीलपैकी एखाद्या ठिकाणी जाण्याचा बेत आखत आहात. खाली दिलेल्या प्रश्नांच्या आधारे संवाद साधू या.

- कुठे जाणार आहात?
- का?
- कसे जाणार आहात?
- तिथे जाऊन काय करणार आहात?
- तुमच्यासोबत कोण कोण येणार आहे?

## २ नाशिकची सफर

प्रभु रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या, पवित्र गोदावरीचे उगमस्थान असलेल्या, सप्तशृंगीगड, त्र्यंबकेश्वर यांसारखी धार्मिक स्थळे असलेल्या आणि कुंभमेळ्यामुळे जगप्रसिद्ध असलेल्या नाशिक जिल्ह्याला ऐतिहासिक, धार्मिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. या जिल्ह्याने औद्योगिकीकरणातही प्रगती करून मंत्रभूमी ते यंत्रभूमी अशी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.




**नाशिक येथे सर्वाधिक पर्यटनस्थळे आहेत. वरील नकाशात पर्यटनस्थळे शोधू या व त्यांची यादी करू या.**

### श्री सप्तश्रृंगी गड

श्री सप्तश्रृंगी गड कळवण तालुक्यात आहे. देवीचे मंदिर ७ शिखरांनी वेढलेले आहे. यास महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी 'अर्ध शक्तिपीठ' मानले जाते. देवीची आठ फूट उंचीची मूर्ती पाषाणात कोरलेली असून प्रत्येक बाजूंस ९ असे एकूण १८ हात व त्यांत विविध आयुधे आहेत. 'सप्तश्रृंग' ह्या शब्दाचा अर्थ 'सात शिखरे' असा आहे.



### श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग

श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर गोदावरी नदीचे उगम स्थान असलेल्या ब्रम्हगिरी पर्वताच्या पायथ्याशी वसलेले आहे. त्र्यंबकेश्वर हे १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग. या ज्योतिर्लिंगाचे वैशिष्ट्य म्हणजे या लिंगात ब्रम्हा, विष्णू आणि महेश हे तीन देव असल्याचे मानले जाते, म्हणून याला त्र्यंबकेश्वर म्हटले जाते.



हेमाडपंती पद्धतीचे बांधकाम असलेल्या या मंदिराचे स्थापत्य आणि शिल्पकला हेही या मंदिराचे वैशिष्ट्यच आहे. १२०० वर्षांचा इतिहास असलेल्या या मंदिराचा जीर्णोद्धार नानासाहेब पेशवे यांनी केला. त्याकाळी त्यांनी ३० लाख रुपये खर्च करून मंदिराची डागडुजी केली.

### क. जोड्या लावा

| | |
|---|---|
| अ. ७ शिखरांनी वेढलेले मंदिर | १. सप्तश्रृंग |
| आ. हेमाडपंती पद्धतीचं बांधकाम | २. सप्तश्रृंगी गड |
| इ. सात शिखरे | ३. त्र्यंबकेश्वर |
| ई. ब्रम्हगिरी पर्वताचा पायथा | ४. स्थापत्य आणि शिल्पकला |

ख. चला, नाशिक जिल्ह्याची सफर करून विविध पर्यटनस्थळांची ओळख करून घेऊ या.

ग. तीर्थक्षेत्र म्हणजे काय?
तुम्ही कोणकोणती तीर्थक्षेत्रे पाहिली आहेत?
तुम्हाला त्या परिसराचा आलेला अनुभव
वर्गात सांगू या.



घ. परदेशात तीर्थक्षेत्रांत साजरे होणारे उत्सव तुम्हाला माहीत आहेत का? कुठले?

## ३ केवलप्रयोगी अव्यये

**पूरक केवलप्रयोगी अव्यये**
या शब्दांचा केवळ उत्स्फूर्त उद्गार केला जातो.
ते गाळले तरी वाक्याचे स्वरूप किंवा अर्थ बदलत नाही.

**की, म्हणून, घ्या, मग**

उदा॰ की - जा **की**! / थांब **की**!
म्हणून - त्याला एक अक्षर **म्हणून** येत नाही.
घ्या - हा **घ्या** मी जातो.
मग - राहू द्या तर **मग** आता.

**आणखी काही अव्यये- आपला, बेटा (विकारी)**

उदा॰ मन खूप धाव घेते, पण शरीर **बेटे** साथ देत नाही. / मन खूप धाव घेते, पण देह **बेटा** साथ देत नाही.
वसुधा **आपली** एकटीच पुढे निघून गेली. / सुधीर **आपला** एकटाच पुढे निघून गेला.

क. खालील संवाद ऐकून रिकाम्या जागा भरू या.

"(अ.) ---------------------------- ! आता का थांबलास?"

"हो, जाणारच आहे. मी माझं नाव आधीच नोंदवलं आहे. तुम्ही अडवलं तरी मी नाही ऐकणार. फक्त एका दिवसाचाच तर प्रश्न होता, बाबा, पण तुम्ही (आ.) -------------------- पाठवाल तर खरं !"

"हो, नाहीच पाठवणार. तू माझं ऐकतोस का कधी? मी का ऐकायचं मग तुझं?"

"बाबा, मी कधी नाही ऐकलं तुमचं? मला नाही पटत काही गोष्टी तुमच्या. तेव्हाच असेल फक्त. नाही तर मी अजूनही सगळं तुम्हाला विचारूनच करत असतो. इतर मुलं पहा. तो शेजारचा दिनू बघा. तो स्वतःचे निर्णय कसे स्वतः घेतो. नाही तर मी (इ.) -------------------------- तुमचीच परवानगी घेतोय. साधं एका दिवसाच्या सहलीसाठीपण तुम्ही जायला देत नाही. बाकीच्या गोष्टी राहिल्याच मग."

"तू दुसऱ्यांचं सांगू नकोस मला. मी इतर वेळी तुला नाही म्हणालो नसतो. पण **बेटा,** आम्हाला कोण विचारणार आता! सगळं तुम्हाला ठरवायचं आहे. ठरवा (ई.) ................................. . मी आता काही बोलणार नाही. खुशाल कुठे जायचंय तिथे जा."




"हा (उ.) ................................. चाललोच. मला पैसे द्या. आईनेच सांगितलं आहे तुमच्याकडून घ्यायला."

"हो, देतो ना. पैसे लागले की बाबा काय (ऊ.) ................................. आहेच लगेच काढून द्यायला. एरवी बाबा तर ओरडणारा असतो." (पैसे देत) "हे घे. आणि जास्तीचे राहू देत बरोबर. अडीअडचणीला लागतील."

**ख. आता वरील पूरक केवलप्रयोगी अव्यये वापरून एक संवाद तयार करू या.**



## ४ बोलीभाषा

**क. नागपूर**

**अ. ऐकू या.**

**आ. आपण ऐकलेल्या उताऱ्यात खाली दिलेल्या अर्थांचे शब्द आले आहेत. ते शोधू या.**

१. साठा ...

२. पुष्कळ ...

३. जवळीक ...

४. श्रीमंत ...

५. नेमणे ...




**इ. हा उतारा कसा आहे?**

☐ माहितीपूर्ण ☐ कथात्मक ☐ टीकात्मक

**ख. नाशिक**

**अ. आता खालील उतारा वाचू या आणि महत्त्वाची माहिती अधोरेखित करू या. कोणती? कुठे? कधीपासून?**

**अहिराणी बोलीभाषा**

अहिराणी ही मराठीची एक बोलीभाषा आहे. जळगाव, धुळे आणि नंदुरबार हे तीन जिल्हे, औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्याचा काही भाग आणि नाशिक जिल्ह्याच्या कळवण, सटाणा, मालेगाव व देवळा या तालुक्यांत ती बोलली जाते. या भूप्रदेशाला खानदेश म्हणतात. इथले लोक अहिराणी बोलत असले, तरीही वाचन आणि लेखन यांसाठी ते प्रमाण मराठी वापरतात.




नावाची व्युत्पत्ती – जुन्या खानदेश परिसरात म्हणजे अजिंठ्याचे डोंगर, सातपुड्याचे डोंगर, चांदवडचे डोंगर आणि वाघूर नदी या खाणींच्या प्रदेशात वास्तव्यास असलेले अहिर लोक अहिराणी बोलत. खानदेश परिसरातील अहिरांच्या वास्तव्यामुळे, सत्तेतील त्यांच्या प्राबल्यामुळे, त्या परिसरातील सर्वांच्या बोलीवर अहिराणी बोलीची छाप पडली. यातून खानदेशाचे सामाजिक आणि प्रादेशिक प्रभेद झाले आहेत. प्रदेशानुसार बगलांनी, नंदुरबारी, खाल्यांगी, वर्ल्यांगी, तप्तांगी, डोंगरांगी, जामनेरी हे बोलीभाषांतील प्रादेशिक प्रभेद, तर जातिवाचक बोली ह्या सामाजिक प्रभेदांत मोडतात. खानदेशातील सर्व जातींची बोली ही अहिराणीची छाप असणारी बोली आहे. या सामाजिक प्रभेदांत महाराऊ, भिलाऊ, लाड सिक्की, लेवापाटीदार, गुजरी, इत्यादी सामाजिक प्रभेदाच्या बोली आहेत. खानदेशात बोलली जाते ती खानदेशी, असे असल्याने खानदेशी ही संकल्पना अहिराणी ह्या संकल्पनेहून विशाल आहे.

**आ. हा उतारा कशाबद्दल आहे?**

☐ शहराबद्दल ☐ जिल्ह्याबद्दल ☐ बोलींबद्दल

## ५ शिकू या.



यावर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत कुठे जायचं ह्याचा आम्ही विचार करत होतो. पण चिंटूला ते 'झिरो माईल' का काय ते पाहायचं होतं. त्याच्या शाळेत भूगोलाचा प्रकल्प करताना त्याला ती माहिती मिळाली. तेव्हापासून सारखं आपलं 'नागपूरला जाऊ' 'नागपूरला जाऊ' करतोय. **इतकं** ते झिरो माईलचं खूळ डोक्यात शिरलंय, **की** सारखा त्याचाच जप लावलाय. आणि परवा त्याच्या बाबाने आणि त्याने मिळून ठरवून पण टाकलं. नागपुरात **इतका** उन्हाळा असतो, **की** बाहेरचा कुठलाही माणूस आला तर तो करपून जाईल. मी बाबाला स्पष्ट सांगितलं, "थंडीत जाणं **तसं** ठीक होतं... **पण** उन्हाळ्यात?" तर मला म्हणतो, "मग! उन्हाळा असला तर काय झालं? आपण काही पूर्ण दिवस बाहेर हिंडायचं नाहीये. चिंटूची इच्छा आहे ना? मग जाऊ की!" चिंटूची इच्छा, त्यापुढे कोणाचं काय चालणार म्हणा! "माझं काय... तुम्ही बापलेक फिरा कडकडीत उन्हात. मी बसून राहीन आपली हॉटेलच्या रूममध्ये."

**क. 'इतका, इतकी, इतके / इतकं ... की' चा वापर आपण कशासाठी करतो? बरोबर असलेले पर्याय निवडू या.**

☐ तीव्रता दर्शवण्यासाठी ☐ पात्रता दर्शवण्यासाठी ☐ प्रमाण दाखवण्यासाठी

**ख. आणि 'तसा, तशी, तसे / तसं ... पण' चा वापर आपण कशासाठी करतो? बरोबर असलेले पर्याय निवडू या.**

☐ विधानाची दिशा बदलण्यासाठी
☐ परिस्थितिव्यतिरिक्त इतर शक्यता दर्शवण्यासाठी
☐ कारण दर्शवण्यासाठी

**ग. खालील चित्रमालिकेत संवाद लिहू या.**



## ६ हे चालणार नाही, चालवून घेणार नाही, चालवून घेतले / घेतलं जाणार नाही

| चालणे | हे चालेल. | हे चालणार नाही. |
|---|---|---|
| चालवून घेणे<br>(संयुक्त क्रियापद) | हे चालवून घेऊ. | हे चालवून घेणार नाही. |
| चालवून घेतले / घेतलं जाणे<br>(संयुक्त क्रियापद) | हे चालवून घेतले / घेतलं जाईल. | हे चालवून घेतले / घेतलं जाणार |

## ७ संभाषण करू या.

(उदा. पुस्तक, पेन्सिल, घड्याळ, खडू, पाटी)

अ. पहिला विद्यार्थी – मी हे पुस्तक घरी नेलेलं चालेल का?
दुसरा विद्यार्थी – हो, चालेल ना.
सर्व विद्यार्थी – नाही, हे चालणार नाही.
पहिला विद्यार्थी – का नाही चालणार?
दुसरा विद्यार्थी – मला चालेल, पण ह्यांना नाही चालणार.
सर्व विद्यार्थी – हो हो. हे चालवून घेतलं जाणार नाही...



आ. पहिला विद्यार्थी – मी हे पुस्तक घरी नेलेलं सर चालवून घेतील का?
दुसरा विद्यार्थी – हो, चालवून घेतील ना!
सर्व विद्यार्थी – नाही, सर चालवून घेणार नाहीत.
पहिला विद्यार्थी – का नाही चालवून घेणार?
दुसरा विद्यार्थी – सर चालवून घेतील. पण हे नाही चालवून घेणार.
सर्व विद्यार्थी – हो हो. आम्ही हे चालवून घेणार नाही.

इ. पहिला विद्यार्थी – मी हे पुस्तक घरी नेलेलं चालवून घेतलं जाईल का?
दुसरा विद्यार्थी – हो, हे चालवून घेतलं जाईल ना!
सर्व विद्यार्थी – नाही, हे चालवून घेतलं जाणार नाही.
पहिला विद्यार्थी – का नाही चालवून घेतलं जाणार?
दुसरा विद्यार्थी – मला वाटतं घेतलं जाईल. पण ह्यांना वाटतं, चालवून घेतलं जाणार नाही.
सर्व विद्यार्थी – हो हो. हे चालवून घेतलं जाणार नाही.

## ८ 'की' चे वेगवेगळे उपयोग :

- तुम्ही चहा घेणार **की** कॉफी? (विकल्प)
- पंडित नेहरू म्हणत, **की** आराम हराम आहे. (समुच्चय)
- दोन जिने चढले **की** दळवीकाकूंना दम लागतो. (परिणाम)
- अंधारलं **की** घरी ये. (संकेत)
- मला काही समजलं **की** तुला कळवेन. (संकेत)
- बोल **की** रे आता! (केवलप्रयोगी)
- सात **की** आठ सदस्य उपस्थित होते. (विकल्प)

**९ आपल्याला आपल्या पर्यटनव्यवसायाच्या पुस्तिकेच्या पहिल्या पानासाठी चित्र हवे आहे. आपल्या सहाध्यायासोबत चारपैकी एक चित्र ठरवू या. आपल्याला इतर तीन चित्रे का नकोत ह्यावर आपले मत मांडू या.**













- आपला प्रस्ताव मांडू या व आपले मत स्पष्ट करू या.
- आपल्या सहाध्यायाशी असहमती दर्शवू या.
- एक निर्णय देऊ या.

## १० आता ही चित्रफीत पाहू या.

तुम्हाला कुठली स्थळे आवडली? तुम्हाला कुठे जायला आवडेल? का?

## ११ व्यक्तिपरिचय

### आमटे कुटुंबीय




वर्ध्याच्या एका सधन कुटुंबात जन्म घेऊनही कुष्ठरोग्यांसाठी आपले आयुष्य वेचणारे बाबा आमटे आणि नागपूरच्या सनातनी, कर्मठ कुटुंबात जन्मलेल्या साधनाताई यांचे सहजीवन म्हणजे निव्वळ सेवाव्रत. केवळ हे दोघेच नाही, तर संपूर्ण आमटे कुटुंबच सेवाव्रती. कायद्याचे पदवीधर असणाऱ्या मुरलीधर आमटे यांनी आपले उभे आयुष्य समाजाने बहिष्कृत केलेल्या कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी समर्पित केले आणि साधनाताईंनी त्यांना आयुष्यभर मोलाची साथ दिली. कुष्ठरोग्यांना शारीरिक दु:ख तर होतेच, पण समाजाकडून त्यांना जी अवहेलना आणि आणि उपेक्षा सहन करावी लागत होती ती बाबांना पाहवली नाही. या पीडितांची सेवा हेच आपल्या आयुष्याचे ध्येय मानून १९४९मध्ये बाबा साधनाताईंना घेऊन वरोऱ्याला आले आणि त्यांनी महारोगी सेवा समितीची स्थापना केली. १९५१मध्ये काही कुष्ठरोग्यांना घेऊन आनंदवन स्थापन केले. जंगली श्वापदे, साप, विंचू, अत्यंत निबिड निसर्ग अशा वातावरणात या दोघांनी आपल्यासारखीच सेवाव्रती माणसे जोडली आणि खरेखुरे आनंदवन फुलवले. इथे कुष्ठरोग्यांना केवळ आश्रय नाही, तर आत्मविश्वास आणि आत्मसन्मान दिला गेला. पुढेपुढे केवळ कुष्ठरोगीच नाही, तर अपंग, बेरोजगार, अनाथ, आदिवासी, उपेक्षित अशा सर्वांसाठीच आनंदवन हक्काचे घर बनले. या दुबळ्या जिवांना स्वत:च्या पायांवर उभे राहायला शिकवणारे श्रमवन ठरले.

बाबा आणि ताईंप्रमाणेच त्यांची मुलेही उपेक्षितांच्या दु:खात आपले सुख शोधणारी निघाली. सुखाचे सोपे मार्ग नाकारून त्यांनीही बाबांच्या पावलांवर पाऊल ठेवत सेवाकार्य हेच ध्येय ठरवले. डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा हेमलकसा येथे 'लोकबिरादरी' प्रकल्पाच्या माध्यमातून आदिवासींच्या सेवेसाठी आपले आयुष्य समर्पित केले. त्यांच्यामुळेच गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम जिल्ह्यातील आदिवासींना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली. आरोग्यशिक्षणाशी त्यांची ओळख झाली. हेमलकसा प्रकल्प आदिवासींच्या आयुष्याला नवी दिशा देणारा ठरला. त्यांचा मुलगा डॉ. दिगंत आणि सून डॉ. अनघा यांनी हेमलकसाच्या रुग्णालयाची जबाबदारी सांभाळली आहे. अनिकेत हा दुसरा मुलगा अभियंता आहे. अनिकेत आणि त्यांची पत्नी समीक्षा आमटे लोकबिरादरी प्रकल्पाचे व्यवस्थापन, आर्थिक ताळेबंद आणि शैक्षणिक कामे बघतात.






बाबांचा दुसरा मुलगा डॉ. विकास आणि सून डॉ. भारती आमटे यांनी बाबा आणि साधनाताईंनंतर आनंदवनाचा कार्यभार समर्थपणे पेलला आहे. त्यांच्या सोमनाथ प्रकल्पातली श्रमसंस्कार छावणी म्हणजे देशातील अनेक समाजसेवकांचे प्रेरणास्थान आहे. त्यांची मुले डॉ. शीतल आणि कौस्तुभ आमटे हेसुद्धा आनंदवनाच्या सेवेतच रमलेले आहेत. डॉ. शीतल आमटे यांचा गौतम करजगी यांच्याशी विवाह झाला. ते स्वत: अभियंता आहेत; मात्र, विवाहानंतर 'आनंदवना'तच त्यांनी आपल्या संसाराला सुरवात केली. ते विकलांगांच्या शाळेचे काम पाहतात. कौस्तुभ आणि त्यांची पत्नी पल्लवी आमटे येथे आहेत. पल्लवी आमटे यांनी 'वस्त्र सन्मान' नावाचा उपक्रम सुरू केला आहे. कौस्तुभ स्वत: सी.ए. आहेत. ते व्यवस्थापन बघतात.

बाबांनी दत्तक घेतलेली रेणुका आणि तिचे पती विलास मनोहर हे दोघेही हेमलकसा येथे राहतात. त्यांनाही अजिंक्य आणि मोक्षदा नावाची मुले आहेत. मुलगा दूध डेअरीचे काम बघतो, तर मोक्षदा आनंदनिकेतन महाविद्यालयात प्राध्यापिका आहे.

आमटे परिवारातील तिसऱ्या पिढीला अनेक संधी चालून आल्या; मात्र त्यांनी त्यांचा कधी विचारही केला नाही. ते आनंदवनातच रमले. आणि चौथ्या पिढीवरही याच सेवेच्या व्रताचे संस्कार होत आहेत, आमटे परिवाराच्या समाजसेवेच्या परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी. बाबा आणि ताईंनी लावलेल्या छोट्याशा रोपट्याचा हा वटवृक्ष पुढच्या अनेक पिढ्यांना सेवाव्रत शिकवत राहील.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो महापौर, ते - | ती चळवळ, त्या चळवळी | ते विधिमंडळ, ती विधिमंडळे / विधिमंडळं |
| तो स्तर, ते - | ती मान्यता, त्या - | ते अधिवेशन, ती अधिवेशने / अधिवेशनं |
| तो जिल्हाधिकारी, ते - | ती परिषद, त्या परिषदा | ते उत्पादन, ती उत्पादने / उत्पादनं |
| तो कुंभमेळा, ते कुंभमेळे | ती पार्श्वभूमी, त्या - | ते मुख्यालय, ती मुख्यालये / मुख्यालयं |
| तो वटवृक्ष, ते - | ती खोबण, त्या खोबणी | ते केंद्र, ती केंद्रे / केंद्रं |
| तो भाविक, ते - | ती व्युत्पत्ती, त्या - | ते पर्यटन, ती पर्यटने / पर्यटनं |
| तो शिलालेख, ते - | | ते तीर्थक्षेत्र, ती तीर्थक्षेत्रे / तीर्थक्षेत्रं |
| तो भिख्खू, ते - | | ते कुंड, ती कुंडे / कुंडं |

| | | |
|---|---|---|
| तो प्रभेद, ते - | | ते तीर्थ, ती तीर्थे / तीर्थं |
| तो भरणा | | ते मंदिर, ती मंदिरे / मंदिरं |
| तो अवशेष, ते - | | ते संतुलन, ती संतुलने / संतुलनं |
| तो पदस्पर्श, ते - | | ते सान्निध्य, ती सान्निध्ये / सान्निध्यं |

## क्रियापद

| | | |
|---|---|---|
| उगवणे | आखणे | लाभणे |
| पाळणे | अडवणे | दर्शवणे |

## विशेषण

| | | |
|---|---|---|
| राजकीय | धार्मिक | कोरीव |
| राष्ट्रीय | कडकडीत | आंतरराष्ट्रीय |
| नागपुरी | लाकडी | |

## क्रियाविशेषण

झपाट्याने

## नाम / इतर शब्द + क्रियापद

मान्यता मिळणे, ओळख असणे, ओळख निर्माण करणे, साद घालणे, पावन होणे, पार्श्वभूमी लाभणे, श्रद्धा असणे, परंपरा पाळणे, आयोजित करणे, नाव नोंदवणे, भरणा असणे, छाप पडणे, खूळ डोक्यात शिरणे, जप लावणे, असहमती दर्शवणे



## आता मला हे येतं ...

महाराष्ट्रातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे : नागपूर आणि नाशिक

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

घरातील = घरातले

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

पूरक केवलप्रयोगी अव्यये : की, बरं का, होऽका, आपला, बेटा इ.

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

बोलीभाषा

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

इतका, इतकी, इतके / इतकं ... की

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

तसा, तशी, तसे / तसं ... पण

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

हे चालणार नाही, चालवून घेणार नाही...

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

'की' चे वेगवेगळे उपयोग

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# १० बोधकथा



**चला, शिकू या...**

- बोधकथा व जडणघडण : महत्त्व, संबंध
- जोडशब्द : जमवाजमव, फुलेबिले, वागणेबोलणे इ.
- क्रियाविशेषणे : ताबडतोब, लगेच, एकदम, अचानक, त्वरित
- एकाच केवलप्रयोगी अव्ययाचा वेगवेगळे भाव दर्शवण्यासाठी वापर
- मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यये : चूप / गप इ.
- शक्य क्रियापदे : भूतकाळ, भविष्यकाळ
- तीव्रतादर्शक विशेषणे : निळाशार, काळाभोर इ.
- संख्यावाचक विशेषणे : सर्व मुले, एकेक गोष्ट, दहा-दहाच्या नोटा इ.
- अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे

## १ खालील चित्रे पाहू या.







क ख ग

**क. तुम्हाला माहीत असलेल्या कथा...**

अ. तुम्हाला यातील कोणत्या कथा माहीत आहेत? त्यांपैकी कोणत्याही एका कथेचे वर्णन करा.

आ. तुम्हाला माहीत असलेले बोधकथा लेखक कोणते?

इ. कोणते विषय या कथांमध्ये हाताळले जातात?

ई. मुख्य पात्रे कोण असतात?

उ. तुम्हाला बोधकथा कुठून कळल्या? तुम्ही वाचल्यात की ऐकल्यात?

ऊ. मुलांच्या वाढीत बोधकथांचे काय महत्त्व आहे?

**ख. बोधकथा म्हणजे काय?**

माणूस मुळातच गोष्टीवेल्हाळ. कोणत्याही वयात त्याला गोष्टी ऐकायला आवडतं. फक्त वयानुसार त्या गोष्टींचं स्वरूप बदलत जातं. अगदी लहान असल्यापासूनच त्याचं गोष्टींचं जग तयार होत असतं. लहानपणी मऊ भाताचे छोटे छोटे घास भरवत असताना आई, आजी, ताई, मावशी, आत्या किंवा तत्सम कोणीतरी बाळाला चिऊ-काऊची गोष्ट सांगते-



"एक होता काऊ, आणि एक होती चिऊ. काऊचं घर होतं शेणाचं आणि चिऊचं घर होतं मेणाचं. एकदा काय झालं, खूऽऽऽप मोठ्ठा पाऊस आला आणि काऊचं शेणाचं घर गेलं वाहून. चिऊचं मेणाचं घर राहिलं टिकून. मग काऊ गेला चिऊकडे. चिऊला म्हणाला, 'चिऊताई, चिऊताई, मी तुझ्या घरात येऊ का?' चिऊताई म्हणाली, 'थांब, माझं बाळ झोपलंय.' थोड्या वेळाने काऊ परत चिऊच्या दाराशी गेला आणि म्हणाला, 'चिऊताई, चिऊताई, दार उघड.' चिऊ म्हणाली, 'थांब, माझ्या बाळाला न्हाऊ घालते.' पुन्हा थोड्या वेळाने काऊ म्हणाला, 'चिऊताई, चिऊताई, दार उघड.' चिऊ म्हणाली, 'थांब, माझ्या बाळाला तीट लावते.' ... आणि मग अशा काऊच्या विनवण्या संपायच्या आत बाळाचा भात संपलेला असतो. जसजसं मूल मोठं होत जातं, तसतशी त्याच्या गोष्टींमध्ये भर पडत जाते. भारतातल्या अनेक पिढ्या इसापनीती, पंचतंत्र, जातककथा, तेनाली रामाच्या कथा, अकबर-बिरबलाच्या कथा, वेताळ पंचविशी, सिंहासन-बत्तिशी, अरेबियन नाईट्स अशा एकाहून एक सरस गोष्टींवर पोसल्या आहेत. या कथा मुलाच्या वाढत्या वयात केवळ मनोरंजनाचंच नव्हे, तर

बोधाचंही काम करत असतात, म्हणूनच त्यांना बोधकथा म्हणतात.

सामान्य बोधकथांमधील पात्रे म्हणजे वेगवेगळे प्राणी असतात. या कथेत माणसं येऊ शकतात; पण मुख्यत्वे प्राणीच माणसांसारखे गुण दाखवतात. या कथांतून प्राण्यांबरोबर वारे, पाणी, पर्वत यांसारख्या निसर्गशक्तींचंही मानवीकरण केलं जातं. नीतितत्त्व सांगणाऱ्या रंजक प्राणिकथा असं बोधकथांचं स्थूल स्वरूप आहे. हा बोध धार्मिक अगर आध्यात्मिक प्रकारचा नसून नित्य, लौकिक जीवनाशी संबंधित व व्यवहारोपयोगी असा असतो. त्यामुळेच तो लहानथोर सगळ्यांनाच आवडतो.

'फेबल' या इंग्रजी संज्ञेचा शब्दकोशातील अर्थ कल्पित वा रचलेली गोष्ट असा होतो. ती बोधपर, नीतिपर असावी, हे अभिप्रेत असते. मूळ लॅटिन शब्द 'Fabula' असून त्याचा अर्थ नाट्यपूर्ण कहाणी असा होतो. बोधकथेचा घाट हा चतुरोक्तिपूर्ण, अत्यंत मितभाषी व आशयघन असतो. व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती यांसारख्या कथाघटकांच्या तपशीलपूर्वक विस्तारास त्यात फारसा वाव नसतो. छोट्या छोट्या गोष्टींमधून मार्मिक बोध करणे हेच बोधकथेचं काम.

**ग. जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| अ. गोष्टीवेल्हाळ | १. कल्पित वा रचलेली गोष्ट |
| आ. व्यवहारोपयोगी | २. गोष्टी सांगण्याची आवड असणारा |
| इ. फेबल | ३. विनंत्या |
| ई. विनवण्या | ४. व्यवहारासाठी उपयुक्त |

**घ. खाली दिलेल्या वाक्यांच्या अर्थाचे अचूक वाक्य शोधू या.**

अ. बोधकथा मितभाषी असतात.
 १. बोधकथा खूप लांबीच्या असतात.
 २. बोधकथा लहान असतात.

आ. भारतातल्या अनेक पिढ्या बोधकथांवर पोसल्या आहेत.
 १. भारतात पिढ्यान्‌पिढ्या बोधकथा वाचल्या जातात.
 २. भारतातून अनेक पिढ्यांपूर्वी बोधकथा पुसल्या गेल्या.




**च. काऊ-चिऊची पूर्ण गोष्ट मिळवून ती वर्गासमोर सादर करू या.**

**छ. आता खालील उतारे वाचून प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

प्राचीन काळापासून जगभर लोकशिक्षणासाठी आणि लोकरंजनासाठी बोधकथांचा उपयोग होत आला आहे. तत्कालीन समाजातील सुसंस्कृत व चिंतनशील व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली त्या कथांची **जडणघडण** झाली. भारतातील विष्णुगुप्त आणि ग्रीसमधील इसाप (इ॰ स॰ पू॰ सहावे शतक) हे प्राचीन काळातील आद्य बोधकथाकार मानले जातात.

बोधकथांचा उगम भारतात झाला, असेही एक मत आहे. इ॰ स॰ दुसऱ्या वा तिसऱ्या




शतकातील संस्कृत पंचतंत्र हा बोधकथांचा आद्य संग्रह मानला जातो. या कथांच्या **पानोपानी हलक्याफुलक्या** शैलीत बोध दिलेला आढळतो. तेथून या कथांचा जगभर प्रसार झाला, असे मानण्यात येते. याअगोदरही प्राणिकथा अस्तित्वात असाव्यात. या प्राणिकथा आदर्श मानवी व्यवहाराचे दिग्दर्शन करतात. फार **बारीकसारीक** तपशील जरी या कथांमध्ये नसले, तरी त्यांत पशुपक्षी आपापल्या वर्गांचे संकेत पाळतात; कोल्ह्याची, कावळ्याची धूर्तता, माकडाची चौकसबुध्दी इत्यादी.

इसापच्या काही कथांचा उगम भारतात असावा असे वाटत असले, तरी असे मानले जाते, की प्रत्येक संस्कृतीमध्ये प्राणिकथांतून तत्त्वबोध सांगण्याची सहजप्रेरणा वसत असावी. प्राचीन ग्रीक कवी हेसिअडच्या वर्क्स अँड डेजमधील 'बहिरी ससाणा आणि बुलबुल' ही सर्वांत जुनी बोधकथा असावी (इ. स. पू. आठवे शतक). इसापच्या कथा इ. स. पू. सहाव्या शतकात मोडतात. मध्ययुगात इसापकथांचे पहिले इंग्रजी भाषांतर १७२२ साली प्रसिद्ध झाले.

| **अ. तुम्ही ही विधाने वरील उताऱ्यात वाचलीत का?** | **हो** | **नाही** |
|---|---|---|
| १. विष्णुगुप्त आणि इसाप या दोघांना पहिले बोधकथाकार मानले जाते. | ☐ | ☐ |
| २. प्रत्येक संस्कृतीमध्ये प्राणिकथांतून तत्त्वबोध सांगण्याची सहजप्रेरणा वसते. | ☐ | ☐ |
| ३. 'बहिरी ससाणा आणि बुलबुल' ही पहिली बोधकथा आहे. | ☐ | ☐ |

आधुनिक काळात फ्रान्समध्ये या प्रकारच्या कथांचा विकास झाला. सतराव्या शतकातील ला फोन्तेन याच्या फ्रेंच भाषेतील बोधकथांमध्ये उपरोध आणि नाट्य हे गुण प्रकर्षाने दिसून येतात.

जर्मन बोधकथाकार लेसिंग याच्या 'फॅबेलन' (१७५९) ह्या संग्रहात इसापच्या कथांमधील साधेपणा दिसतो. जोएल चांड्लर हॅरिस (१८४८-१९०८) या अमेरिकन कथाकाराच्या, निग्रो गुलामांच्या लोकसाहित्यावर आधारलेल्या व 'अंकल रेमस' ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा असलेल्या कथा (१८८०) या आधुनिक बोधकथाच होत. रड्यर्ड किपलिंग याच्या 'द जंगल बुक' (१८९४) व 'जस्ट सो स्टोरीज' (१९०२) यांचाही या संदर्भात उल्लेख करता येईल. अमेरिकन विनोदी कथाकार जेम्स थर्बर (१८९४-१९६१) यानेही 'फेबल्स फॉर अवर टाइम' (१८४०) नामक आधुनिक बोधकथा लिहिल्या. जॉर्ज ऑर्वेलने आपल्या 'ॲनिमल फार्म' (१९४५) या राजकीय उपरोधप्रचुर कादंबरीमध्ये बोधकथेच्या वाङ्मयीन गुणधर्मांचा अत्यंत प्रभावी आविष्कार घडवला आहे.




बोधकथांचे चित्रकथांमधून झालेले सादरीकरण किंवा वॉल्ट डिस्नेसारख्या व्यंगपटांच्या माध्यमातून त्यांना मिळालेले एक **आगळेवेगळे** दृश्यरूप यांमुळे त्या अधिक लोकप्रिय ठरल्या, एवढेच नव्हे, तर पुढच्या पिढ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकल्या.

**आ. वरील दोन्ही उताऱ्यांमध्ये आलेली विशेषणे लिहू या.**

------------------------------------------ ------------------------------------------ ------------------------------------------

------------------------------------------ ------------------------------------------ ------------------------------------------

------------------------------------------ ------------------------------------------ ------------------------------------------

**ज. वरील उताऱ्यांतील ठळक केलेले शब्द पाहू या.**

जडणघडण बारीकसारीक पानोपानी हलकाफुलका आगळेवेगळे

नाम – रीतिरिवाज बाजारहाट जमवाजमव
विशेषण – आडवातिडवा बारीकसारीक आंबटचिंबट हलकाफुलका
क्रियाविशेषण – समोरासमोर पानोपानी नित्यनेहमी
क्रियापदांचा नामांसारखा उपयोग – वागणेबोलणे उठणेबसणे

असे आपल्याला माहीत असलेले आणखी जोडशब्द लिहू या.

वेडावाकडा, ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

## २ पुढील कथा वाचू या आणि पुढे दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहू या.



एकदा एक कोंबडीचं पिल्लू आपल्याच तंद्रीत दाणे वेचत होतं. ते इतकं तल्लीन झालं होतं, की आपल्या आई आणि भावंडांपासून दूर आल्याचं त्याला कळलंही नाही. अचानक आभाळात ढग दाटून आले, वारा वाहू लागला आणि एकदम अंधारून आलं. वाऱ्याबरोबर झाडाची पानं गळू लागली आणि त्यातलंच एक पान त्या पिल्लाच्या अंगावर पडलं. अचानक अंगावर काही तरी पडलं हे जाणवून पिल्लू दचकलं. त्यानं वर आभाळाकडे पाहिलं आणि त्याला वाटलं, आभाळाचा तुकडाच आपल्या पाठीवर पडला. हा विचार मनात येताच ते प्रचंड घाबरलं आणि लगेच पळू लागलं. पळताना त्याला एक ससा भेटला. सशानं पिल्लाला विचारलं, "काय झालं पळायला?" पिल्लू त्याला म्हणालं, "काय सांगू तुला? आभाळाचा तुकडा पाठीवर पडला. आपल्याला ताबडतोब पळायला हवं." हे ऐकताच ससोबाही घाबरले आणि तेही पिल्लासोबत पळू लागले. अशाच पद्धतीने बदक, लांडोर, वासरू, असे अनेक प्राणी 'आभाळाचा तुकडा पडला' असं ओरडत पळू लागले. इतक्यात लांबून एका लांडग्यानं त्यांना पळताना पाहिलं. त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. आता पुढचे काही दिवस मस्त मेजवानी मिळणार असा विचार त्याच्या मनात आला. तो त्वरित पुढे झाला आणि त्यानं त्या सगळ्या पळणाऱ्या प्राण्यांना अडवलं...

**क. या उताऱ्यात आलेले गुलाबी रंगातले शब्द वाचू या आणि त्यांचा वाक्यात उपयोग करू या.**

**ख. अचानक एकदम लगेच त्वरित इतक्यात ताबडतोब**
**ही विशेषणे आहेत. – चूक की बरोबर?** ----------------

## ३ जातक कथा

**क. तुम्ही बालपणी जातककथा ऐकल्या आहेत का? कोणत्या?**




राजकुमार सिद्धार्थ म्हणून जन्माला येण्याआधी बुद्धांच्या अनेक जीवनातील जातककथा त्यांच्याशी संबंधित आहेत. इ॰ स॰ पू॰ ४०० आणि २००च्या दरम्यान तयार केलेली, बौद्ध 'मध्य मार्ग' दर्शवणारी ही एक कथानकांची मालिका आहे. कथा मोठे विषय प्रभावी पद्धतीने मांडू शकतात. म्हणूनच जातक कथा, शिलालेख, लोककथा आणि आता कॉमिक पुस्तकांच्या रूपात शेकडो वर्षे टिकून आहेत. प्राचीन भारतातल्या रोजच्या जीवनात आढळणारी ही पात्रे आहेत - प्राणी, राजे, याजक. प्रत्येक गोष्ट ही एका अर्थाने एक संदेशच आहे.

**ख. खालील वैशिष्ट्ये वाचू या व यातील बोधकथेला कोणती योग्य आहेत ते निवडू या.**

- ☐ अ. प्राणी माणसांसोबत बोलतात.
- ☐ आ. कथेतील माणसे सामान्यतः श्रीमंत वा गरीब, सुंदर वा कुरूप, हुशार वा मठ्ठ, चांगली वा वाईट असतात.
- ☐ इ. ह्या कथा जंगलात किंवा राजवाड्यात घडतात.
- ☐ ई. कथेची सुरुवात आणि अंत विशिष्ट पद्धतीने होतो.
- ☐ उ. कथा भूतकाळात असते.
- ☐ ऊ. कथेतील झाडे, पाने फुले बोलू शकतात.
- ☐ ए. आकड्यांचे विशिष्ट महत्त्व असते.
- ☐ ऐ. कथेला तात्पर्य असते व त्यातून बोध मिळतो.
- ☐ ओ. सर्व कथांचा अंत आनंदी असतो.
- ☐ औ. कथांमध्ये जादू ला विशेष महत्त्व दिलेले असते.

**टीप : कधी कधी एकाच केवलप्रयोगी अव्ययाचा वेगवेगळे भाव दर्शवण्यासाठी उपयोग होतो.**

उदा॰ अ) १. वा:! वा:! बाई, मुलाची मनिऑर्डर आली! (हर्षदर्शक)
२. वा:! वा:! छान निबंध लिहिला आहेस तू! (प्रशंसादर्शक)
३. वा:! वा:! मी कसे हे कबूल करेन? (विरोधदर्शक)

ब) १. शी:! काही तरीच बोलला तो सभेत! (विरोधदर्शक)
२. शी:! किती झुरळे आहेत या घरात! (तिरस्कार / घृणादर्शक)

**घ. आता ही वाक्ये पाहू या.**

१. **चूप्!** एक चकार शब्द बोलू नकोस!

२. **गप्!** बाबा काय सांगतायत ते नीट ऐक आधी.

३. **चप्!** मला शहाणपणा शिकवू नकोस.

४. **श्शऽऽ!** हे वाचनालय आहे. इथे मोठ्या आवाजात बोलू नका.




या वाक्यांतील केवलप्रयोगी अव्ययांमधून मौनाचा बोध होतो.
आता हीच अव्यये वापरून काही वाक्ये तयार करू या.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## ४ पंचतंत्र

**क. खालील उतारा वाचू या आणि महत्त्वाच्या माहितीची नोंद करू या.**

सर्वसाधारण समजूत अशी आहे, की पंचतंत्र हे मुलांसाठी लिहिलेले एक बाळबोध गोष्टींचे पुस्तक आहे; पण हा एक मोठा गैरसमज आहे. पंचतंत्र हा मुळात एक वास्तव जीवनात उपयोगी पडणारा व योग्य वाट दाखवणारा ग्रंथ आहे. त्यातील तत्त्वज्ञान साधे सोपे आहे, जीवनाशी सुसंगत आहे व कायमच नीतिमत्तेच्या मार्गाने जाऊन जीवनातील समस्या सोडवणारे आहे. जीवन जगणे ही एक कला असून आयुष्यात योग्य दृष्टिकोनाचे महत्त्व काय हे पंचतंत्र दाखवून देते.

बोलता येणाऱ्या वन्य प्राण्यांच्या या गोष्टींद्वारे विष्णुशर्मा यांनी लहान-थोरांसाठी ज्ञानाचा एक उपयुक्त खजिनाच निर्माण करून ठेवला आहे. पहिल्या-दुसऱ्या शतकात लिहिलेल्या मूळ संस्कृत ग्रंथाची साधारण तिसऱ्या-चौथ्या शतकात अरेबिक भाषेत भाषांतरे झाली. नंतर पैशाची, पहलवी व इतर भारतीय भाषांमध्ये भाषांतरे होत राहिली. त्यात कालानुरूप बदल होत त्याची दोनशेच्या आसपास रूपांतरे झाली.

पंचतंत्राच्या निर्मितीमागची दंतकथा अशी -

अमरशक्ती नावाच्या राजाला तीन पुत्र होते : बहुशक्ती, उग्रशक्ती आणि अनंतशक्ती. त्यांना शिकवण्यासाठी विष्णुशर्मा या विद्वानाला नेमण्यात आले. विष्णुशर्मांनी शहाणपणाच्या व चातुर्याच्या गोष्टी रचल्या. एवढेच नव्हे, तर एका गोष्टीतून दुसरी गोष्ट विणत आणि प्रत्येक गोष्टीचे तात्पर्य देत त्यांनी राजपुत्रांना प्रत्यक्ष जीवनाचे धडे दिले. तेच हे पंचतंत्र. या गोष्टी पाच शीर्षकांखाली विभागल्या आहेत आणि या पाचही भागांत व्यवस्थापन, वैयक्तिक जीवन आणि जगण्यासाठी लागणारा धूर्तपणा शिकवलेला आहे.

मुळात पंचतंत्र याचा अर्थ पाच क्लृप्त्या. पहिल्या 'मित्रभेद' या विभागात चुकीच्या व्यक्तीशी मैत्री करण्याचे परिणाम सांगणाऱ्या कथा आहेत. दुसरा भाग आहे 'मित्रसंप्राप्ती'. यात मैत्रीचे, समविचारी लोकांच्या एकोप्याचे महत्त्व सांगितले आहे. तिसरा 'काकोलुकीयम्' हा भाग सांगतो की पूर्वीच्या शत्रूशी मैत्री कधीच हितकारक नसते. 'लब्धप्रणाश' या भागातल्या कथांमधून प्रसंगावधानाचे महत्त्व सांगितले आहे. पाचव्या म्हणजेच 'अपरीक्षितकारक' या भागात आधी न अनुभवलेल्या समस्येला सामोरे जाताना आवश्यक असलेल्या निर्णयक्षमतेचे महत्त्व पटवून सांगितले आहे.

हा ग्रंथ रंजक कथांद्वारे व्यवहारी जीवन समृद्ध व यशस्वी करण्याचे तंत्र शिकवतो. मनोरंजनातून प्रबोधन हेच या ग्रंथाच्या लोकप्रियतेचे गमक आहे.

**ख. तुम्ही महत्त्वाच्या माहितीची कशी नोंद घेता?**

☐ पूर्ण वाक्य लिहून

☐ होकारार्थी व नकारार्थी शब्दांची नोंद घेऊन

☐ नावे व ठिकाणांची नोंद घेऊन

☐ विशेषणांची नोंद घेऊन

☐ नवे व ठिकाणे महत्त्वाची असतात

☐ विशेषणं महत्त्वाची असतात

☐ सार लक्षात घेऊन



**ग. आपली / स्वतःची आवडती गोष्ट... लिहू या.**



मला ... गोष्ट खूप आवडते. / ... ही मला विशेष भावलेली गोष्ट आहे.
मला ... भीती वाटायची. / मी ...ला बिलकुल घाबरत नसे.
मला दरवेळी / नेहमी असं वाटायचं की ...
माझ्या बालपणी ... / लहानपणी ...
माझे आजी आजोबा / आई बाबा / शिक्षक ...
आता मी पंचतंत्र / जातक कथा / बोधकथा पुस्तकात / इंटरनेटवर वाचते / मुलांना सांगते / सांगतो.



**घ. वाचू या.**

एका माकडाची आणि मगराची गट्टी जमली. नदीच्या एका काठावर राहणाऱ्या मगराला दुसऱ्या काठावरच्या जांभळाच्या झाडावर राहणारे माकड रोज गोडगोड जांभळे खाऊ घालत

असे. तो मगर **खाववतील** तेवढी जांभळे खाऊन उरलेली आपल्या बायकोसाठी घेऊन जात असे. रोज ही अवीट गोडीची जांभळे खाणाऱ्या माकडाचे काळीज किती गोड असेल असा विचार करून मगराची बायको त्याच्याकडे हट्ट करू लागली, की मला त्या माकडाचे काळीज आणून द्या. आपल्या मित्राचे काळीज आणायचा विचारही मगराला **करवत नव्हता**. त्याने मगरीला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण मगर काही तिचा हट्ट सोडायला तयार नव्हती. मगरालाही लाडक्या बायकोचे मन **मोडवेना**. त्याने माकडापाशी पलीकडच्या किनाऱ्यावरील चविष्ट फळांचे असे वर्णन केले की माकडाच्या तोंडाला पाणी सुटले. माकड मगराला म्हणाले, “मला पलीकडच्या किनाऱ्यावरची फळे खाण्याची अनिवार इच्छा झाली आहे. आता ही जांभळे मला **खाववत नाहीत**.” मगराने आनंदाने माकडाला आपल्या पाठीवर बसवले आणि तो आपल्या घराकडे निघाला. पण माकडाच्या मैत्रीमुळे मगराला **राहवले नाही** आणि त्याने माकडाला सगळे खरे खरे सांगितले. माकड त्याला म्हणाले, “अरे, एवढेच ना? देतो की मी तुला माझे काळीज. पण आम्हा माकडांना आपली गोड आणि जड काळजे घेऊन **फिरवत नाही** म्हणून आम्ही ती झाडावर ठेवतो.” मगराला माकडाचे बोलणे खरे वाटले आणि तो माकडाला पुन्हा अलीकडच्या काठावर घेऊन आला. माकड टुणकन उडी मारून झाडावर चढले आणि मगराला म्हणाले, “अरे मूर्ख मगरा, असे कोणी आपले काळीज काढून ठेवेल काय? आणि काढले तर तो जिवंत राहील काय? आपली मैत्री इथेच संपली. पुन्हा मला भेटायला येऊ नकोस.”



**शक्य क्रियापदे (potential verbs)** – भूतकाळी, भविष्यकाळी रूपे

(वर्तमानकाळी रूपे – उजळणी)

• कर्त्याला एखादी क्रिया करणे शक्य आहे किंवा नाही, त्याच्यात ते सामर्थ्य आहे किंवा नाही हे दाखवणारी क्रियापदे.



उदा॰ तिला आता चालवते.
तिला आता चालवत नाही.

(पळ, बोल, कर, निज, पी, दे, घे, ये, ने इ.)

भूतकाळी, भविष्यकाळी रूपे
(अकर्मक क्रियापद- चालणे)

| भूतकाळी रूप | वर्तमानकाळी रूप | भविष्यकाळी रूप |
|---|---|---|
| तिला काल थोडे चालवले. | तिला आता चालवते. | तिला उद्या कदाचित चालवेल. |
| तिला काल चालवले नाही. | तिला आता चालवत नाही. | तिला चालवणार नाही. |

**अकर्मक 'शक्य क्रियापदे' – नपुंसकलिंगी**

उदा॰ चालणे : दीर्घ आजारानंतर मला आता चालवते / चालवतं, पण पळवत नाही.

| सर्वनाम | कर्ता चतुर्थी / तृतीयेत | शक्य क्रियापद (उदाहरणे) |
|---|---|---|
| मी | मला, माझ्याने, माझ्याच्याने | आता चालवत नाही. / आता चालवते / चालवतं. काल चालवले / चालवलं नाही. / काल चालवले / चालवलं. उद्या चालवणार नाही. / उद्या चालवेल.  |
| तू | तुला, तुझ्याने, तुझ्याच्याने | |
| तुम्ही / आपण | तुम्हाला, तुमच्याने, तुमच्याच्याने / आपल्याला, आपल्याने, आपल्याच्याने | |
| तो | त्याला, त्याच्याने, त्याच्याच्याने | |
| ती | तिला, तिच्याने, तिच्याच्याने | |
| ते | त्याला, त्याच्याने, त्याच्याच्याने | |
| आम्ही | आम्हाला, आमच्याने, आमच्याच्याने | |
| ते (अ॰व॰) | त्यांना, त्यांच्याने, त्यांच्याच्याने | |
| त्या (अ॰व॰) | | |
| ती (अ॰व॰) | | |

**सकर्मक 'शक्य क्रियापदे' — कर्माप्रमाणे**

उदा॰ खाणे, पिणे

| | एकवचन | | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| | पु॰ | स्त्री॰ | नपुं॰ | |
| वर्तमानकाळ | वडा खाववत नाही. | गूळपोळी खाववत नाही. | थालीपीठ खाववत नाही. | वडे / गूळपोळ्या / थालीपीठे / थालीपीठं खाववत नाहीत. |
| | सामोसा खाववतो. | पुरणपोळी खाववते. | धिरडे / धिरडं खाववते / खाववतं | सामोसा / पुरणपोळ्या / धिरडी खाववतात. |

व्याकरण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भूतकाळ | वडा खाववला नाही. | गूळपोळी खाववली नाही. | थालीपीठ खाववले / लं नाही. | वडे खाववले नाहीत. गूळपोळ्या खाववल्या नाहीत. थालीपीठे / थालीपीठं खाववली नाहीत. |
| | सामोसा खाववला. | पुरणपोळी खाववली. | धिरडे / धिरडं खाववले / लं. | सामोसे खाववले. पुरणपोळ्या खाववल्या. धिरडी खाववली. |
| भविष्यकाळ | वडा खाववणार नाही. | गूळपोळी खाववणार नाही. | थालीपीठ खाववणार नाही. | वडे / गूळपोळ्या / थालीपीठे / थालीपीठं खाववणार नाहीत. |
| | सामोसा खाववेल. | पुरणपोळी खाववेल. | धिरडे / धिरडं खाववेल. | सामोसे / पुरणपोळ्या / धिरडी खाववतील. |

**टीप : शक्य क्रियापदाचे आणखी एका प्रकारे नकारार्थी रूप होते.**
मला फार **चालवले नाही.** / मला फार **चालवेना.**

याचप्रमाणे
खाणे – खाववले नाही / खाववेना      धावणे – धाववले नाही /
धाववेना बघणे – बघवले नाही / बघवेना
हे रूप सकर्मक आणि अकर्मक दोन्ही प्रकारच्या क्रियापदांना लागू होते.

## ५ चिनी बोधकथा

**ऐकू या आणि पुढील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

**क. तुमच्या मते सम्राटाला कोणता गुण अपेक्षित होता?**

**ख. तुम्ही सम्राट असाल तर उत्तराधिकारी निवडताना तुम्ही कोणता गुण शोधाल?**

**ग. चेंग गोष्ट सांगत आहे असे समजून गोष्ट पुन्हा लिहू या.**



**तीव्रतादर्शक विशेषणे**

एखाद्या विशेषणाची (विशेषत: रंगवाचक विशेषणे) तीव्रता दर्शवण्यासाठी त्याला काही प्रत्यय (suffixes) जोडले जातात. ह्या प्रत्ययांना स्वतंत्रपणे अर्थ असतोच असे नाही.

पांढरा – पांढराफटक, पांढरीफटक, पांढरेफटक / पांढरंफटक, पांढरेफटक, पांढऱ्याफटक, पांढरीफटक

निळा – निळाशार, निळीशार, निळेशार / निळंशार, निळेशार, निळ्याशार, निळीशार / निळाजर्द

काळा – काळाभोर, काळीभोर, काळेभोर / काळंभोर, काळेभोर, काळ्याभोर, काळीभोर

काळा – काळाकुट्ट, काळीकुट्ट, काळेकुट्ट / काळंकुट्ट, काळेकुट्ट, काळ्याकुट्ट, काळीकुट्ट

काळा – काळाकुळकुळीत, काळीकुळकुळीत, काळेकुळकुळीत / काळंकुळकुळीत, काळेकुळकुळीत, काळ्याकुळकुळीत, काळीकुळकुळीत

हिरवा – हिरवागार, हिरवीगार, हिरवेगार / हिरवंगार, हिरवेगार, हिरव्यागार, हिरवीगार / हिरवाजर्द / हिरवाकंच

पिवळा – पिवळाधमक, पिवळीधमक, पिवळेधमक / पिवळंधमक, पिवळेधमक, पिवळ्याधमक, पिवळीधमक / पिवळाजर्द

लाल – लालभडक, लालबुंद, लालचुटुक, लालेलाल

भलामोठा - भलामोठा, भलीमोठी, भलेमोठे / भलंमोठं, भलेमोठे, भल्यामोठ्या, भलीमोठी

***असे आणखी शब्द ह्या यादीत जोडावेत.**

## ६ जर्मन बोधकथा

चित्रातील गोष्टींची नावे माहीत आहेत का तुम्हाला? दिलेल्या जागेत ती लिहा.



जॅकोब आणि विल्हेल्म ग्रीम हे बंधू जर्मनीच्या सांस्कृतिक इतिहासातील महत्त्वाची व्यक्तिमत्त्वे आहेत. परीकथा संग्रहित केल्यामुळे ते प्रसिद्ध आहेत. शिवाय त्यांनी लोकसाहित्यही संकलित केले.



-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------



-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------



-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------



-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

## ७ फ्रेंच बोधकथा

**क. जाँ द ला फोन्तेन**

(जन्म : १६२१ मृत्यू : १६९५)



आजच्या घटकेपर्यंत आपली लोकप्रियता टिकवून असलेल्या या फ्रेंच कवीने पद्यात रचलेल्या कथांना 'फेबल्स' म्हणतात. या कथाप्रकाराचा उपयोग सुरुवातीपासूनच शैक्षणिक साधन म्हणून होत आलेला आहे. ला फोन्तेननेही आपल्या रचना फ्रान्सच्या छोट्या राजपुत्रासाठी रचल्या. फेबल्स म्हणजे काव्यमय असत्य असते, असे त्यानेच म्हणून ठेवले आहे. त्या वाचण्याचे तंत्र शिकावे लागते. एखादे कोडे सोडवावे तशा त्या सोडवून समजून घ्याव्या लागतात. त्या दिसतात तशा नसतात. पुढून-मागून, वरून-खालून, अशा सगळ्या बाजूंनी पाहिल्या, तरच त्यांचे मर्म समजते.

**ख. ही चित्रफीत पाहू या.**

ही चित्रफीत मूक आहे, तर ती पाहून एक बोधकथा लिहू या.

## ८ अंकांचा वापर

**क. पुढील वाक्ये पाहू या.**

लवकर पाचा-पाचांचा गट करा.
आणि प्रत्येकाने दहा-दहाच्या नोटा आणा.
आपण प्रत्येकीने अर्धा-अर्धा लाडू खाऊ या.
आणि आपण किती वाजता भेटू या?
चार-सव्वाचारला?
दरएक तासाचा हिशेब ठेवू या...



**टीप : संख्यावाचक विशेषणे**

**नामाच्या संख्येचा बोध करून देणाऱ्या शब्दांना संख्याविशेषण म्हणतात. वेगवेगळ्या प्रकारे त्यांचा वापर केला जातो.**

- सर्व मुले, एकंदर कारभार, अवघा जनसमुदाय इ॰

उदा॰ संध्याकाळी ८ ची वेळ म्हणजे आजीची गोष्ट सांगण्याची वेळ. तेव्हा सर्व मुले आजीच्या खोलीत जमलीच म्हणून समजा.
त्या संस्थेचा एकंदर कारभार इतका भोंगळ होता की अवघा जनसमुदाय त्रस्त झाला होता.

- एकेक वीर, पाचा-पाचांचा गट, दहा-दहाच्या नोटा, अर्धा-अर्धा लाडू, चार-सव्वाचार, दरएक इ॰

उदा॰ एकेक गोष्ट सांगावी सगळ्यांनी.

**ग. अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे –**

टीप : ज्या क्रियापदांना कर्ता व कर्म दोन्ही नसतात, त्यांना अकर्तृक क्रियापदे म्हणतात. या क्रियापदांचा कर्ता क्रियापदांतच समाविष्ट असतो, तो वेगळा नमूद केलेला नसतो. त्या क्रियापदांमधील भाव हाच त्यांचा गृहीत कर्ता असतो म्हणून त्यांना भावकर्तृक क्रियापदेही म्हणतात.

उदा॰ उजेड होणे = उजाडणे, अंधार होणे = अंधारणे, सांज होणे = सांजावणे इ॰

मळमळणे - अर्धवट शिजवलेले अन्न खाल्ल्यामुळे मला <u>मळमळले</u>.

करमणे – आज घरातले सगळेच बाहेर गेले असल्याने मला <u>करमले नाही.</u>

सांजावणे - घरी येताना लवकर <u>सांजावले</u>.

गडगडणे * - रात्री मात्र खूपच <u>गडगडले</u> .

* गडगडणे हे क्रियापद कर्त्यासह आणि अकर्तृक या दोन्ही प्रकारांनी वापरता येते.

उदा॰ काल रात्री सारखे गडगडत होते.
ढग गडगडत आहेत.


व्याकरण

## व्यक्तिचित्र ... गौतम बुद्ध



एकदा राजपुत्र सिद्धार्थ आणि त्याचा भाऊ देवदत्त बागेत धनुर्विद्येचा सराव करत असता देवदत्ताच्या बाणाने एक हंस जखमी झाला. सिद्धार्थाने त्याला उचलून घेऊन पाणी पाजले. छातीशी कवटाळून प्रेमाने धीर दिला. "मी बाण मारला, त्यामुळे तो हंस माझा आहे," या देवदत्ताच्या विधानावर सिद्धार्थाचे उत्तर होते, "मी त्या हंसाला वाचवले आहे. मारणाऱ्यापेक्षा वाचवणारा श्रेष्ठ असतो, या न्यायाने तो हंस माझा आहे."

इ॰ स॰ पू॰ सहाव्या शतकात लुम्बिनीच्या शुद्धोदन राजाच्या पोटी जन्मलेल्या सिद्धार्थाचा म्हणजेच गौतमाचा बुद्धत्वापर्यंतचा प्रवास बुद्धाच्या शिकवणीइतकाच प्रभावी आहे. लहानपणापासूनच अपार करुणेने भरलेले सिद्धार्थाचे मन राजेशाही भोगविलासांत रमू शकले नाही. आजूबाजूला दैन्य, जरठता, व्याधी, मृत्यू अशा कारणांमुळे दु:खात आकंठ बुडालेले जग त्याला दु:खाच्या मुळाशी घेऊन गेले. त्या दु:खाच्या मुळाचा, म्हणजेच खऱ्या ज्ञानाचा शोध घेण्यासाठी तो पत्नी यशोधरा, मुलगा राहुल यांचा सगळ्या सुखोपभोगांचा त्याग करून बाहेर पडला. दु:खाचे मूळ बाह्य परिस्थितीत नाही तर माणसाच्या अंतर्मनातच आहे याचा साक्षात्कार झाल्यावर तो 'बुद्ध' झाला. ज्या वृक्षाखाली बसला असता त्याला ज्ञानप्राप्ती झाली त्या वृक्षाला 'बोधीवृक्ष' म्हटले जाते. बिहारमधील गया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर उत्तर प्रदेशातील सारनाथ येथे बुद्धांनी आपले पहिले प्रवचन – धम्मचक्रप्रवर्तन – दिले.

'बुद्ध' ही व्यक्ती नव्हे, तर ज्ञानाची अवस्था आहे. दु:खाचे अस्तित्व मान्य करणे आणि त्याचा स्वीकार करणे, हाच दु:खातून मुक्त होण्याचा मार्ग आहे. हा बुद्धाच्या धम्माचा गाभा आहे. शील, समाधी आणि प्रज्ञा ही त्रिसूत्री बौद्ध धम्माचा पाया आहे.

बुद्धांनी आपला उपदेश पाली भाषेत केला आणि नंतर त्यांच्या अनुयायांनी तो पाली भाषेत लिहून त्याचा प्रचार आणि प्रसार केला. यामुळे पाली भाषेच्या विकासाला गती मिळाली. धम्म पुढे नेण्याच्या दृष्टीने आणि कला, शास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान, यांचे शिक्षण आणि प्रसार करण्याच्या हेतूने लेणी, विहार, स्तूप, मठ यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. आज जगातील १८० देशांमध्ये बौद्ध धम्माचे अनुयायी आढळतात.

स्वत:ला कोणत्याही प्रकारे ईश्वराचा अवतार न मानता, कोणताही बाह्य हेतू न बाळगता खऱ्या धर्माची शिकवण देणारा बुद्ध जगात एकमेव मानला जातो.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो तत्त्वबोध | ती बोधकथा, त्या - | ते मानवीकरण |
| तो भेद, ते - | ती प्राणिकथा, त्या - | ते लोकशिक्षण |
| तो उगम, ते - | ती जडणघडण | ते लोकरंजन |
| तो शिलालेख, ते - | ती धूर्तता | ते व्यवस्थापन |
| तो एकोपा | ती चौकसबुध्दी | ते विडंबन, ती विडंबने |
| तो वृद्धापकाळ | ती सहजप्रेरणा, त्या - | ते प्रसंगावधान |
| तो वारसदार, ते - | ती गट्टी | |
| | ती दवंडी, त्या दवंड्या | |

## विशेषण

गोष्टीवेल्हाळ, कल्पित, बोधपर, आध्यात्मिक, पारलौकिक, उल्लेखनीय, वास्तववादी, रंजक, नित्य, लौकिक, व्यवहारोपयोगी, चतुरोक्तिपूर्ण, मितभाषी, आशयघन, अतिप्राचीन, आद्य, अवाजवी, आगळेवेगळे, तल्लीन, कायमस्वरूपी, सर्वसाधारण, बाळबोध, समविचारी, भावी, विलक्षण, कुशल, कनवाळू, भोंगळ

## क्रियापद

पोसणे, उजाडणे, अंधारणे, सांजावणे, मळमळणे, करमणे, गडगडणे

## क्रियाविशेषण

त्वरित, काटेकोरपणे, कालानुरूप, सरतेशेवटी, अनिवार



## नाम + क्रियापद जोड्या

| नाम + क्रियापद | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|
| अंगावर शहारा येणे | अंगावर काटा येणे | पहाटेच्या झुळकेने अंगावर शहारा आला. |
| अवसान गोळा करणे | धीर गोळा करणे | अखेर अवसान गोळा करून मिहीरने अंधाऱ्या गुहेत पाऊल टाकले. |
| उत्सुकता ताणणे | आतुरता निर्माण होणे | काही साहसकथा ऐकताना उत्सुकता ताणली जाते. |
| कान देऊन ऐकणे | लक्षपूर्वक ऐकणे | बाई धडा शिकवत असताना किशोर कान देऊन ऐकत असतो. |
| जीवाचे कान करून ऐकणे | खूप लक्षपूर्वक ऐकणे | गौतम बुद्धांचा उपदेश शिष्य जीवाचे कान करून ऐकत असत. |
| गराडा घालणे | घेराव घालणे | आजी गावावरून आली की मुलांनी तिच्याभोवती गराडा घातलाच म्हणून समजा. |
| टाचणी पडली तरीही आवाज येणे | खूप शांतता असणे | मुख्याध्यापक आले की सतत गोंधळ असणाऱ्या वर्गातही टाचणी पडली तरीही आवाज होईल इतकी शांतता होते. |
| टुमणे लावणे | सतत मागणी करणे | पैशासाठी तेजसने बॉसकडे टुमणे लावले. |
| डोक्यात लख्ख प्रकाश पडणे | पुरेपूर समजणे | सर्वांनी समजावल्यावर शीतलच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. |
| तोंडात बोट घालणे | नवल वाटणे, आश्चर्य वाटणे | रमाच्या घरातील श्रीमंती पाहून शेजारच्यांनी तोंडात बोट घातले. |
| धाडस करणे / दाखवणे | हिंमत दाखवणे | रामजी भर पुरात उडी मारण्याचे धाडस करतो. अंकितने धाडस दाखवून गाडीचा वेग वाढवला. |
| परिवर्तन घडणे | बदल घडणे | लग्नानंतर किशोरमध्ये परिवर्तन झाले. |
| प्रत्यय येणे | अनुभवास येणे | तिच्या उपदेशाचा त्याला लगेचच प्रत्यय आला. |
| प्रोत्साहन मिळणे | उत्तेजन मिळणे | पोहण्याच्या स्पर्धेसाठी रतनला शाळेतून प्रोत्साहन मिळाले. |
| बोध घेणे, होणे | शिकवण घेणे | आपण आपल्याच चुकांमधून बोध घ्यायचा असतो. |

| इतर शब्द + क्रियापद | अर्थ | वाक्यात उपयोग |
|---|---|---|
| अंतर्मुख होणे | स्वतःला तपासून पाहणे | परीक्षेचा निकाल पाहून विद्यार्थी अंतर्मुख झाले. |
| अधीर होणे | उतावीळ होणे | वार्षिक परीक्षेचा निकाल ऐकण्यासाठी सर्व मुले अधीर झाली. |
| आतुर असणे | उत्सुक असणे | सामन्याचा निकाल ऐकण्यास सारेच आतुर होते. |
| आवर्जून सांगणे | जोर देऊन / कळकळीने सांगणे | कचरा कचरापेटीत टाका असे शिक्षक आवर्जून सांगतात. |
| कबूल करणे | मान्य करणे | चोराने गुन्हा कबूल केला. |
| कानोसा घेणे | अंदाज घेणे | चोर घरात आहे का याचा पोलिसांनी कानोसा घेतला आणि मग ते घरात शिरले. |
| ध्यानात येणे | लक्षात येणे | रोहन आज आनंदात आहे हे त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावरून साऱ्यांच्या ध्यानी आले. |
| निराश होणे | हताश होणे | परदेशी जायला न मिळाल्यामुळे मिताली निराश झाली. |
| भारावून जाणे | प्रभावित होणे | त्यांच्या अप्रतिम गोलंदाजीने सारा संघ भारावून गेला. |
| मुखोद्गत असणे | तोंडपाठ असणे | लहानग्या राजूला मारुतिस्तोत्र मुखोद्गत होते. |
| सरत येणे | संपत येणे | रात्र सरत आली नि पहाट झाली. |
| परीक्षेला उतरणे | एखाद्याच्या अपेक्षेप्रमाणे वागणे | प्रामाणिकपणाने वागून चेंग राजाच्या परीक्षेला उतरला. |



## आता मला हे येतं ...

बोधकथा ऐकून घडलेल्या पिढ्या, बोधकथा व जडणघडण- महत्त्व, संबंध

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

जोडशब्द - जमवाजमव, फुलेबिले, वागणेबोलणे इ.

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

क्रियाविशेषणे- ताबडतोब, लगेच, एकदम, अचानक, त्वरित

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

एकाच केवलप्रयोगी अव्ययाचा वेगवेगळे भाव दर्शवण्यासाठी वापर

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यय

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

शक्य क्रियापदे- भूतकाळ, भविष्यकाळ

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

तीव्रतादर्शक विशेषणे- निळाशार, काळाभोर इ.

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

संख्यावाचक विशेषणे- सर्व मुले, एकेक गोष्ट, दहा-दहाच्या नोटा इ.

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



**पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे अनुलेखन**

**पाठ १ : चित्रपट - पाठ्यपुस्तक**

### ३. कॉफी हाऊस

**एक नवाकोरा चित्रपट पाहिल्यानंतर प्रथेप्रमाणे कॉफी हाऊसमध्ये झालेली एक चर्चा.**



**अक्षय** : किती दिवसांनी बरी म्हणता येईल अशी फिल्म पाहिली, नाही? मुख्य नट्यांनी थोडा अभिनय केला असता तर आणखी मजा आली असती.

**संकेत** : हो, यार! पण तरीही मला आवडली फिल्म. म्हणजे फार भारी होती असं नाही, पण... डोक्याला ताप नाही झाला. काय, निधी?

**निधी** : हं.

**अक्षय** : बस? फक्त 'हं'?

**निधी** : कारण मला फिल्म कळली नाही. आपण विनोदी म्हणून बघायला गेलो होतो, तर ती खरंच विनोदी होती का? की दिग्दर्शकाला जे करायचं होतं ते न जमल्यामुळे ती चुकून विनोदी झाली? मला तर एकदाही हसू आलं नाही.

**प्रवीण** : हिचा ना, जरा प्रॉब्लेमच आहे. सगळ्यांनी चांगलं म्हटलं की हिचं नाक वाकडं झालंच!

**निधी** : मी सांगितलं होतं, माझं मत विचारायला?

**अक्षय** : ए, कूल! कूल! भांडू नका. निधी, मला सांग, मी ऐकेन. काय खटकलं तुला?

**निधी** : पहिली गोष्ट म्हणजे कथा. मला नं, ह्या 'तरुण' सिनेमाचा कंटाळा आलाय. म्हणजे चार मुलं घ्यायची. त्यांचे आई-बाप मूर्ख किंवा घटस्फोटित किंवा जुनाट किंवा हुकूमशहा दाखवायचे. मग ही बाळं त्यांच्या विरोधात बंड करणार. जमतील तेवढे वाह्यात उद्योग करणार. पुरेशी माती खाऊन झाली, की 'कुटुंबच महान' असं म्हणत शेवटी त्याच आई-बापांच्या कुशीत शिरणार. आजच्या फिल्ममध्ये मुलांऐवजी चार मुली होत्या, एवढाच फरक. बाकी फॉर्म्युला तोच.

**सुझान** : माझा निधीला पाठिंबा आहे. काय ते संवाद! किती पोरकट! आणि तुम्हीसुद्धा, कुठल्याही फिल्ममध्ये दिलेल्या शिव्या ऐकून खिदळता कसले रे? एवढ्या कसल्या गुदगुल्या होतात तुम्हाला? मोठे व्हा की आता!

**अक्षय** : मला तर निम्मे संवाद ऐकूच आले नाहीत. एकाच वेळी किती वचावचा बोलत होते सगळे!

**प्रवीण** : सुरुवातीला दिसलेली शेजाऱ्यांची पात्रं आणि कॅफेतले वेटर वगैरे नंतर गायबच झाले! गाणीही खास नव्हती.

**संकेत** : गाणी होती? मला आठवतच नाहीये.

**निधी** : आणि ती लग्नं आणि लाखो रुपयांचे कुरूप कपडे आणि शेवटी ते भावुक होण्याचं नाटक...खोटारडेपणा सगळा!

**सुझान** : प्रेक्षक मूर्ख आहेत असं ह्यांना वाटतं का? की आपण खरंच तसे आहोत?

## पाठ २ : विरंगुळा - पाठ्यपुस्तक

### १. विरंगुळा

**झ. संवाद ऐकू या.**

### कंटाळ्याची गरज

**प्रश्न** : सर, तुम्ही इतक्या गोष्टी केल्या; नाटकं, कादंबऱ्या, लघुनिबंध, वृत्तपत्रांसाठी स्तंभलेखन असं चौफेर लेखन, शेती, फुलपाखरांचा अभ्यास, तबला आणि मृदंग वादन, ह्या सगळ्यासाठी आवश्यक असणारं वाचन, तेही चार भाषांमधलं...

**उत्तर** : आवश्यक आणि अनावश्यकही. मी फक्त आवश्यक तेवढंच वाचतो असा कुणाचा समज होऊ नये. माझ्या कामाशी प्रत्यक्ष संबंध नसलेलंही मी खूप वाचत असतो.

**प्रश्न** : तो तुमचा विरंगुळा असतो?

**उत्तर** : तसं म्हणता येईल; पण 'ही विरंगुळ्यासाठी' असं ठरवून मी पुस्तकं निवडत नाही. नुकतंच एक खूप जुनं, जीर्ण पुस्तक फूटपाथवर दिसलं. त्याची मुखपृष्ठासह पहिली काही पानंही नव्हती. केवळ जुनं असल्यामुळे मी ते खरेदी केलं. विषयसुद्धा पाहिला नाही. चाळायला म्हणून काल हातात घेतलं आणि पूर्ण वाचूनच खाली ठेवलं. पहिल्या महायुद्धापूर्वी एका ब्रिटिश प्रवाशानं अतिपूर्वेकडच्या खाद्यसंस्कृतीवर लिहिलेलं झकास पुस्तक निघालं ते. त्यातल्या भाषेचं खास ब्रिटिश वळण आणि ब्रिटिश विनोद असलेलं असं लिखाण बऱ्याच दिवसांनी वाचायला मिळालं. शिवाय लेखकाचं अनेक गोष्टींबद्दलचं अज्ञान आणि तेव्हा ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य मावळत नसल्यामुळे त्याच्यात स्वाभाविकपणे असलेला ब्रिटिश अहंकार जागोजागी वाचायला मिळाला. आज तो आपोआपच विनोदी वाटतो. मजा आली वाचताना. मनाला तरतरी आली. पण काही वेळा अत्यंत अस्वस्थ आणि हताश करणारी चांगली पुस्तकंही हाती लागतात.



**प्रश्न** : अशा वाचनाचा तुम्हाला उपयोग होतो?

**उत्तर** : माहीत नाही. होत असेलही, नसेलही.

**प्रश्न** : असं कसं म्हणता!

**उत्तर** : काय आहे, की आमच्या पिढीला जगण्याची सवड मिळाली. आयुष्यातला प्रत्येक क्षण अर्थपूर्ण असलाच पाहिजे, त्या क्षणाचा काही तरी उपयोग झालाच पाहिजे आणि त्याचा पुरावा जगाला दाखवता आलाच पाहिजे, अशी सक्ती आमच्यावर नव्हती. अनेक गोष्टी आम्ही काहीही हेतू मनात न बाळगता केल्या, करून पाहिल्या. त्यातलं काही आत कुठं तरी राहिलं असेल, बाकीचं उडून गेलं असेल.

**प्रश्न** : तुम्हाला कधी कंटाळा यायचा का? इतकं काम करता तुम्ही...

**उत्तर** : कंटाळा ही माझी गरज आहे. माझं निम्म्याहून अधिक आयुष्य कंटाळण्यात गेलंय.

**प्रश्न** : आं?

**उत्तर** : खरंच! माझ्यासाठी कंटाळा म्हणजे स्वतःकडे पाहण्यासाठी, स्वतःशी संवाद करण्यासाठी किंवा स्वतःला समजून घेण्यासाठी मिळालेली एक संधी असते. अशी संधी मी वारंवार घेत गेलो; आजही घेत असतो. संगीतात – म्हणजे आमच्या काळातल्या संगीतात – चांगला गायक मध्ये मध्ये विराम घेत असे. आधी ऐकलेलं पचवण्यासाठी आणि पुढचं ऐकण्यासाठी श्रोत्यानं स्वतःला तयार करावं म्हणून त्याला दिलेली ती संधी असते. कंटाळा त्या विरामासारखाच असतो. तुमच्या पिढीला कंटाळ्याची भीती वाटते. दरक्षणी काही तरी घडायला हवं ही तुमची गरज आहे. पण ते घडण्यासाठी वेळ देण्याची,

थांबण्याची तुमची तयारी नसते. त्यामुळे सकाळी उठल्यावर दात घासणं हीसुद्धा तुमच्यासाठी एक घटना होते. ती सर्व जगाला कळायला हवी असं तुम्हाला वाटतं आणि तुम्ही ती समाजमाध्यमातून कळवताही. जगण्याकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन वेगळा आहे, आमचा वेगळा आहे, बस, इतकंच!

### पाठ २ : विरंगुळा - पाठ्यपुस्तक

### ३. तर, तरी ...

**ग. लागून गेली मोठी**

**अलका** : ताई, बेला लहान आहे का? कोण तो माणूस, कुठून आला, कुणी पाठवला अशी कसलीही चौकशी न करताच पैसे उसने द्यायचे? कर्णाचा अवतारच लागून गेली की ही!

**ताई** : अगं, देईल तो पैसे परत! थोडी वाट तरी पाहशील की नाही?

**अलका** : झालं! घेतली सुनेची बाजू. लगेच कसा गं पाझर फुटतो तुला, अं? तू गप्प बस! आली मोठी स्त्रीमुक्तीवाली.

**ताई** : स्त्रीमुक्ती? काय संबंध?

**अलका** : संबंध असो की नसो, पण बेलानं तुला विचारलं तरी होतं पैसे देण्याआधी?

**ताई** : नाही बाई! तिचे पैसे, तिनं दिले. मी कशाला मध्ये...

**अलका** : वा S ! तिचे पैसे! मोठी मालकीणच लागून गेली! अगं, तू सासू नं तिची? ताई, तू नं, बावळट आहेस अगदी.

**ताई** : पुरे, अलका! बेला कोण लागून गेलीय अन् मी कोण मोठी आले आहे, ह्याची चर्चा करायला आली आहेस का तू? टीव्हीवरच्या मालिका बघणं कमी कर, जास्त चांगले विचार सुचतील तुला बोलायला.

### पाठ २ : विरंगुळा - अभ्यासपुस्तक

### ३. ऐका. – कंटाळा

आताशा मी फक्त रकाने दिवसांचे भरतो
चाकोरीचे खरडून कागद सहीस पाठवतो
व्याप नको मज कुठलाही अन् ताप नको आहे
उत्तर कुठले मुळात मजला प्रश्न नको आहे
या प्रश्नांशी अवघ्या परवा करार मी केला
मी न छळावे त्यांना, त्यांनी छळू नये मजला
बधिरतेच्या पुंगीवर मी नागोबा डुलतो
आता आता छाती केवळ भीती साठवते
डोंगर बघता उंची नाही, खोली आठवते
आता कुठल्या दिलखुश गप्पा उदार गगनाशी
आता नाही रात्रही उरली पूर्वीगत हौशी
बिलंदरीने कलंदरीची गीते मी रचतो
कळून येता जगण्याची या इवलीशी त्रिज्या
उडून जाती अत्तरापरी जगण्याच्या मौजा



दारी नाही फिरकत कुठला नवा छंद-चाळा
राखण करीत बसतो येथे सदैव कंटाळा
कंटाळ्याचा देखील आता कंटाळा येतो

**- संदीप खरे**

## पाठ ३ : भेटीगाठी - पाठ्यपुस्तक

**६. संवाद ऐकू या.**

**विनंती**

### भेटीचा योग

**माधव आबनावे** : नमस्कार, सर. माझं चुकत नसेल तर ... आपण विश्वास कुबेर...?

**विश्वास कुबेर** : होय. आपण...?

**माधव आबनावे** : नाही नाही, आपली ओळख नाहीये. म्हणजे कधी भेट झालेली नाहीये, पण कधीपासून भेटायचं होतं. तसा मी एकदोनदा प्रयत्नही करून पाहिला, पण जमलं नाही. आज योगायोगानं भेट होतेय. मी माधव आबनावे. ह्याच विद्यापीठात शिकवतो, पण सध्या प्रबंध पूर्ण करण्यासाठी रजा घेतलीय."

**विश्वास कुबेर** : डॉक्टरेट करताहात?

**माधव आबनावे** : होय. त्याच संदर्भात भेट मिळू शकेल का?

**विश्वास कुबेर** : आज कठीण आहे हो! दोन-तीन भेटी आधीपासूनच ठरल्या आहेत ...

**माधव आबनावे** : प्लीज, सर. अर्धाच तास. कारण पुन्हा भेटीचा योग येईल न येईल ...

**विश्वास कुबेर** : एकदम भेटीचा योग वगैरे! होईल हो आपली भेट; काळजी करू नका.

**माधव आबनावे** : तसं नाही, सर, पण दोन महिन्यांत मला प्रबंध पुरा करायचाय म्हणून म्हटलं.

**विश्वास कुबेर** : बरं, बरं. कधी भेटू या? रात्री उशिरा चालेल?

**माधव आबनावे** : किती वाजता आणि कुठं भेटायचं?

**विश्वास कुबेर** : इथंच, दहानंतर.

**माधव आबनावे** : मी पाच मिनिटं अगोदरच इथं असेन, धन्यवाद, सर!

## पाठ ४ : 'श' शिक्षणाचा - पाठ्यपुस्तक

### अरे, बाप रे! परीक्षा!

**ख. ऐकू या.**



**मंजूषा** : फक्त आठ दिवस राहिलेत परीक्षेला. जाम टेन्शन आलंय मला.

**मयूर** : अगं, त्यात टेन्शन काय घ्यायचं! परीक्षा तर दर वर्षी असते.

**मंजूषा** : हो, पण ही वार्षिक परीक्षा आहे आणि आपण नववीत आहोत, बरं का!

**मयूर** : माहितीये गं मला. तरीही त्यात टेन्शन घेण्यासारखं काय आहे, सांग.

**मंजूषा** : भूमिती आणि रसायनशास्त्र. मला तर हल्ली स्वप्नंही ह्याच दोन विषयांची पडतात.

**मयूर** : हात्तिच्या! एवढंच ना. भूमितीसाठी मी आहे की मग. माझा सर्वांत आवडता विषय. आणि आपले साळुंखे सर रसायनशास्त्राचे जादा वर्गही घेणार आहेत या रविवारी. तू

चलच. चांगली उजळणी होईल आपली. शिवाय तुझ्या काही शंका असतील तर त्याही विचार तेव्हाच.

**मंजूषा** : हं... तसं करू शकतो. आणि बीजगणित? म्हणजे भूमितीपेक्षा सोपं वाटतं मला बीजगणित, पण जरा त्याचाही सराव आपण एकत्र करू या का?

**मयूर** : डन. पण या बदल्यात तुला भूगोल आणि हिंदीसाठी मला मदत करावी लागेल. मागच्या वेळी काठावर पास झालो होतो मी हिंदीत, ठाऊक आहे ना?

**मंजूषा** : आठवतंय की! आणि संस्कृतचं काय? झालाय वाटतं अभ्यास?

**मयूर** : हिंदीहून सोपंय गं संस्कृत. म्हणजे मला तरी सोपं जातं. क्लास लावलाय ना संस्कृतसाठी.

**मंजूषा** : हं. हिंदी-संस्कृतमध्ये मला नेहमी हिंदीच सोपी वाटते. पण संस्कृतचाही तसा अभ्यास झालाय माझा. सराव मात्र एकत्र करू.

**मयूर** : ठरलं तर मग. उद्यापासून करू सुरुवात आपल्या एकत्र अभ्यासाला.

## पाठ ५ : अतुल्य भारत - पाठ्यपुस्तक

### १. भारताविषयी

**ख. ऐकू या.**

**भारतातील काही आश्चर्ये**

- भारत देश हा आकारानं मोठा असल्याकारणाने देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सूर्योदयाची म्हणजेच सूर्य उगवण्याची वेळ वेगवेगळी असते. भारतातील सेव्हन सिस्टर्स म्हणजेच भारताच्या ईशान्येकडील राज्यांत सर्वांत आधी सूर्यदर्शन होते. भारताच्या अरुणाचल प्रदेश ह्या प्रांतातील दोंग या छोट्याशा गावी सूर्यकिरणे सर्वप्रथम पडतात. समुद्रसपाटीपासून १२४० मी॰ उंचीवर असलेल्या व लोहित आणि सती या नद्यांच्या संगमावर वसलेल्या या गावात भारतातील इतर शहरांच्या तुलनेत सर्वसाधारणपणे एक ते दीड तास आधी सूर्योदय होतो. नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या गावातील सूर्योदय पाहण्यासाठी पर्यटक नेहमीच गर्दी करतात.



- दळणवळणाची पुरेशी साधने उपलब्ध नसल्याने १९६३ मध्ये भारताचे पहिले रॉकेट अर्थात अग्निबाण सायकलवरून नेण्यात आले होते.
- जगातील सर्वात उंचीवर बांधण्यात आलेले क्रिकेटचे मैदान भारताच्या उत्तरेकडे असलेल्या हिमाचल प्रदेशातील चैल येथे आहे. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून २४४४ मी॰ उंचीवर आहे.
- भारतातील सर्वांत उंच ठिकाण म्हणजे समुद्रसपाटीपासून २८,१६९ फूट उंचीवर असलेले कांचनगंगा शिखर, तर समुद्रसपाटीपासून सर्वांत खाली असलेला भारतातील भूभाग म्हणजे केरळमधील कुट्टनाड. येथे समुद्रसपाटीपासून ४ ते १० फूट खाली भातशेती केली जाते.
- राजमा-भात हा उत्तर भारतातील लोकप्रिय खाद्यप्रकार. पण हे राजम्याचे दाणे भारतीय नसून मेक्सिकोची देणगी आहे. आणि जो बटाटा आपण अगदी उपवासालाही खातो, तो तर पोर्तुगालमधून भारतात आला.
- भारतात १६५२ भाषा व पोटभाषा बोलल्या जातात. त्यांपैकी भारतीय घटनेने २२ भाषांना अधिकृत प्रादेशिक भाषांचा दर्जा दिला आहे. भारतात सर्वाधिक म्हणजे ४१% लोकांकडून बोलली जाणारी भाषा म्हणजे हिंदी. तीखालोखाल दुसऱ्या क्रमांकावर बंगाली, तिसऱ्या क्रमांकावर तेलुगू आणि चौथ्या क्रमांकावर मराठी आहे.

## पाठ ५ : 'श' शिक्षणाचा - अभ्यासपुस्तक

**४. क. ध्वनिफीत ऐकून रिकाम्या जागा भरा.**

अजिंक्य भारत, अजिंक्य जनता ललकारत सारे
ध्वज विजयाचा उंच धरा रे
उंच धरा रे, उंच धरा रे, उंच धरा रे

मातीमधल्या कणांकणांतुन स्वातंत्र्याचे घुमते गायन
प्रगतीचे रे पाऊल पुढले संघटनेचा मंत्र जपा रे
ध्वज ...

भाग्यवान ते जवान सगळे हासत खेळत रणी झुंजले
स्वातंत्र्यास्तव मरण जिंकले मान राखला मातृभूमीचा रे
ध्वज ...

इतिहासाच्या पानोपानी बलिदानाची घुमती गाणी
धनदौलत रे देऊ उधळून पराक्रमाचे गीत गाउ या रे
ध्वज ...

- योगेश्वर अभ्यंकर

## पाठ ६ : घरकुल - पाठ्यपुस्तक

### १. माझं घर

**ज. ऐकू या व गाळलेल्या जागा भरू या.**

घर असावे घरासारखे
घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती
तिथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती नाती
त्या शब्दांना अर्थ असावा
नकोच नुसती वाणी
सूर जुळावे परस्परांचे
नकोत नुसती गाणी
त्या अर्थाला अर्थ असावा
नकोत नुसती नाणी
अश्रूंतुनही प्रीत झरावी
नकोच नुसते पाणी
या घरट्यांतुन पिलू उडावे
दिव्य घेउनी शक्ती
आकांक्षांचे पंख असावे
उंबरठ्यावर भक्ती



- विमल लिमये

### पाठ ६ : घरकुल - पाठ्यपुस्तक

### ४. आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास...

**क. पुढील संवाद ऐकू या व गाळलेल्या जागा भरू या.**

**आसिफ :** आणखी रद्दी कुठे असेल तर दे गं जरा.
**नुरी :** काय रे आसिफ, आधीच इतका पसारा आहे घरात, तशात तू रद्दी काय काढून बसलायस!

**आई :** शानू, चल, पटकन घर आवरून घेऊ. पाहुणे येतीलच आता.
**शनाया :** काय गं आई! दिवाळीमुळे आधीच काही अभ्यास झाला नाहीये, त्यात आता पाहुणे कुठे येतायत मध्येच?

**चारू :** आज संध्याकाळी नवीन पडदे आणायला जायचंय. तेव्हा लवकर ये.
**परेश :** नवीन पडदे? आधीच इतका खर्च झालाय या महिन्यात, त्यात नवीन पडदे कशाला? नंतर बघू.

**आजी :** माझं शेगावचं तिकीट काढून दे की रे जरा!
**चैतन्य :** आजी, मला आधीच खूप उशीर झालाय. तशात तू तिकिटाचं काय घेऊन बसलीयस मघापासून. ऑफीसमधून फोन करतो. तेव्हा बोलू.

### पाठ ७ : दगडांच्या देशा - पाठ्यपुस्तक

### २. किल्ला : संरचना

**क. ऐकू या व योग्य पर्याय निवडू या.**

#### किल्ल्याचे भाग

**तिथी :** दादा, मी मघाशी किल्ल्यांवरचा एक ब्लॉग वाचला इंटरनेटवर. कसलं मस्त वर्णन लिहिलं होतं त्यांनी... आणि चित्रंसुद्धा इतकी छान होती... प्रत्येक किल्ला नीट पाहिला म्हणजे किती नवीन नवीन गोष्टी कळतात ना! मला त्यात काही नवीन शब्द वाचायला मिळाले. मी मागे दोन-तीन ट्रेक केले, पण ही नावं मी कधी ऐकली नव्हती.
**तन्मय :** अगं, आता बऱ्याच किल्ल्यांची पडझड झाली आहे. त्यामुळे आपल्याला नेमके सगळे भाग नाही कळून येत. पण एखाद्या किल्ल्याचे बऱ्यापैकी अवशेष आढळतात. त्यांना ती ती नावं प्रचलित असतात. तुला माहितेय का, कोणताही किल्ला त्या वेळी सरसकट नाही बांधायचे. किल्ला बांधत असताना किंवा किल्ला बांधणीची जागा हेरत असताना विशेष काळजी घेतली जायची. आणि त्यानुसार किल्ला बांधलेल्या जागेचे चार भाग पडतात.
**तिथी :** ते कोणते?
**तन्मय :** सर्वात पहिला लक्षात घ्यायचा भाग म्हणजे घेरा. किल्ल्याच्या पायथ्याशी गाव असतं त्यालाच घेरा म्हणतात. या गावात वस्तीबरोबरच आपल्याला काही ऐतिहासिक गोष्टीदेखील पाहायला मिळतात. बहुतेकदा ह्या ठिकाणी वीरगळ, दगडांत कोरलेले सतीचे हात आणि समाध्या पाहायला मिळतात.



**तिथी** : हो, बरोबर... मी मघाशी जो ब्लॉग वाचला ना, त्यात ह्याचा उल्लेख होता. पण वीरगळ म्हणजे नक्की काय?

**तन्मय** : युद्धात कामी आलेल्या वीरांच्या सन्मानासाठी वीरगळ उभारले जायचे. आणि या वीरांबरोबर सती गेलेल्या त्यांच्या स्त्रियांच्या स्मृतिशीला उभारल्या जायच्या. त्यावर स्त्रीचा चुडा भरलेला हात कोरलेला असायचा. बरं, हा झाला एक भाग, आणि त्याच्याशी संबंधित इतिहासाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या गोष्टी. आता पुढचा भाग म्हणजे मेट.

**तिथी** : मेट म्हणजे नक्की काय? आणि तिचे प्रयोजन काय?

**तन्मय** : एखाद्या किल्ल्यावर जाण्यासाठी अनेक वाटा, पायवाटा, चोरवाटा असतात. त्या वाटांनी शत्रूचे गुप्तहेर किंवा घेऱ्यातील पहारा चुकवून आडमार्गाने किल्ल्यात प्रवेश करणारे फितूर यांना हटकण्यासाठी डोंगरउतारावरच्या सोंडावर, साधारण डोंगराच्या मध्यभागी कायमस्वरूपी घरे बांधली जायची. तिथे पहारेकरी तैनात केले जायचे. त्या चौकीनाक्याला मेट असे म्हणतात.

**तिथी** : अच्छा, म्हणजे किल्ल्याच्या संरक्षणासाठी अशी व्यवस्था असायची.

**तन्मय** : हो. आता उरले दोन महत्त्वाचे भाग. ते तर तुला माहीत आहेतच.

**तिथी** : मग ते नक्कीच बालेकिल्ला आणि माची असणार... हो ना? ते तर मी मागे राजगडच्या ट्रेकवेळी पाहिले आहेत.

**तन्मय** : हो, अगदी बरोबर. किल्ल्यातील सर्वात उंच व संरक्षित भाग म्हणजे बालेकिल्ला. बालेकिल्ला हा गडाचा महत्त्वाचा भाग, तसेच प्रमुख व्यक्तींची राहण्याची जागा. डोंगराला जो पुढे आलेला निमुळता भाग असतो, तो म्हणजे माची. बालेकिल्ल्याच्या खाली लांब गेलेले डोंगराचे पठार किंवा डोंगरसोंडेवरील तटबंदीयुक्त भागाला माची म्हणतात.

**तिथी** : अरे वा! दादा, तुला तर खूप माहिती आहे किल्ल्यांविषयी. किती सोप्या शब्दात समजावून सांगितलंस!

**तन्मय** : अगं, हे भाग किल्ल्याचे महत्त्वाचे भाग असतात. किल्ला पाहताना ही ठिकाणे लक्षात घेतली पाहिजेत.

**तिथी** : हो, खरंच आहे. पुढच्या वेळी मी ही सगळी नावं लक्षात ठेवेन आणि संपूर्ण किल्ला नीट बघेन.

**पाठ ८ : खाद्यसंस्कृती - पाठ्यपुस्तक**

### ३. लोकप्रिय खाद्यपदार्थ

**क. ऐकू या व रिकाम्या जागा भरू या.**

काही सण आणि पदार्थ यांचं नातं अतूट असतं. होळी म्हटली की पुरणाची पोळी, संक्रांतीला तिळाचे लाडू  तसं गणेश चतुर्थीला मोदक हे समीकरण इतकं घट्ट आहे की गणपतीबाप्पांच्या नुसत्या स्मरणानेही अनेकांच्या डोळ्यांसमोर २१ मोदकांचं ताट तरळू लागतं.

**पाठ ८ : खाद्यसंस्कृती - पाठ्यपुस्तक**

### ४. मराठी माणूस आणि खवय्येगिरी



**क. खालील उतारा ऐकू या आणि वाचू या.**

"तुला भाजी कोणती आवडेल?"
"अंबाडीची घट्ट गोळा भाजी, वरून घालण्यासाठी लसणीची खमंग आणि झणझणीत फोडणी असेल तरच. शिवाय भाजीला आंबट चव पाहिजे."
"बरोबर ज्वारीची भाकरी?"
"नाही. तीळ लावलेली बाजरीची खुसखुशीत भाकरी; वर लोण्याचा गोळा."
"आणि मिरचीचा खर्डा?"
"अं हं! लसणीची कच्चं तेल घातलेली तिखट चटणी आणि बुक्कीनं फोडलेला पांढरा कांदा."
"अरे वा! आणखी काही?"
"ताजं ताक किंवा मडक्यातलं अधमुरं दहीसुद्धा चालेल."
"आत्ता माझ्याकडे जेवढे पैसे आहेत, त्यांत दहाबारा तीळ मिळू शकतील. चालेल?"

**पाठ ८ : खाद्यसंस्कृती - पाठ्यपुस्तक**

### ५. चमचमीत आणि चुरचुरीत पदार्थ

**करा आणि शिका**

कोल्हापुरात जाऊन झणझणीत मिसळ आणि तांबडा-पांढरा रस्सा हाणला नाही, तर त्या गड्याचं काही खरं नाही गड्या! मिसळ आणि रस्सा म्हंजे कोल्हापूरची शान, कोल्हापूरचा मान अन् कोल्हापूरचा अभिमान आसतोय. कोल्हापूरच्या कोंच्यापन चौकात हुभारून नजर टाकली, की मिसळ अन् झणझणीत तांबड्या-पांढऱ्याची चार दोन दुकानं तरी दिसतातच. कोल्हापूरची मिसळ जेवढी फेमस असती, तेवढाच तिथला कटवडा जागतिक असतोय. कटवडा म्हणून लई ठिकाणी लई प्रकार मिळतात. पण कोल्हापूरला जो कटवडा मिळतो, तेची सर बाकीच्या वड्यांच्या 'बा'ला यायची नाही. कटवडा म्हंजे एक साग्रसंगीत कार्यक्रमच असतोय. लई प्रेमानं ते सगळं करावं लागतंय, तरच तो झणझणीतपणा अन् तो रंग त्या पदार्थात उतरतोय. या पदार्थातली महत्त्वाची वस्तू म्हणजे तो वडा. तो करायचं एक वेगळंच टेक्निक आसतंय. येकदा का ते टेक्निक हातात बसलं, की स्वैपाकाचं मैदान मारलंच म्हणून समजा. वडा बेष्टपैकी जमला, की मग कटाकडे वळायचं. कट म्हंजे वड्याबरोबर खायचा कट. कटाची झणझणीत चव, अन् त्यात बुडवलेला वडा, म्हंजे एकदम आssssहा असा प्रकार आसतोय. बाकी तुमच्या कुठल्याबी हाटेलात आन टपरीवर त्यो उसलवडा, शाम्पल वडा, वडा-सांबार आन् तसलंच काय काय मिळतंय. पन कोल्हापुरी कटवड्याची चव एकदा चाखलेला माणूस त्या तसल्या हाटेलांच्या आणि टपऱ्यांच्या वाऱ्यालासुद्धा हुभारायचा नाही पुढच्या टायमाला. तर, आज शिकू या या कोल्हापुरी कटवड्याचा झणझणीत फार्म्युला. घरी बनवून बघा आणि आम्हाला सांगा. नाय तुम्ही बोटं चाटत ऱ्हायलात, तर कोल्हापूरचं नाव सांगायचं काम नाही. ते तांबड्या-पांढऱ्याचं टेक्निक पुन्हा कधीतरी बघू. काय?



**पाठ ८ : खाद्यसंस्कृती - पाठ्यपुस्तक**

### ५. चमचमीत आणि चुरचुरीत पदार्थ

**ग. ऐकू या आणि रिकाम्या जागा भरू या.**

कुरकुरीत, खुसखुशीत, चटपटीत, चुरचुरीत, झणझणीत, फळफळीत, बुळबुळीत, रसरशीत

### पाठ ८ : खाद्यसंस्कृती - अभ्यासपुस्तक

### १०. पान वाढू या.

**ख. ‘पान’ संकल्पना. संवाद ऐकू या आणि खालील पानाच्या आकृतीत योग्य पदार्थ योग्य ठिकाणी वाढू या.**

आज समृद्धीच्या घरी गणेशपूजन आहे. घरी सगळे पाहुणे आले आहेत. समृद्धी उत्साहाने सर्व कामात मदत करतेय. भटजींनी पूजा सांगितली आणि समृद्धीने सर्वांना प्रसाद वाटला. पूजा संपली. आता काय करायचं बरं... समृद्धीला मोठा प्रश्न पडला. म्हणून तिने बाबांना विचारलं.

“मी आता काय करू, बाबा?”



बाबादेखील मुद्दाम विचार करण्याचा आव आणत म्हणाले. “तू की नाही आता सर्व पाहुण्यांना तीर्थ - प्रसाद वाट.”

“झालं की वाटून कधीच.” समृद्धी उत्तरली.

“बरं, मग आता काय करशील... तू खेळायला जा.”

“नाही, मला काही तरी काम द्या. मी आज सर्वांना मदत करणार.”

“अच्छा, मग एक काम कर. आता इथे जेवायला पंगत बसेल. तू आत जाऊन आई आणि काकूला मदत कर.“

मदत कर म्हणताच समृद्धी टुणकन उडी मारून स्वयंपाकघरात गेली. आत आई आणि काकू जेवण वाढायची तयारी करत होत्या. मोठी ताटं, वाट्या, बऱ्या... खूप गर्दी होती सगळीकडे. समृद्धी म्हणाली,

“आई, मी तुम्हाला मदत करते. मला काही तरी काम द्या ना...”

“अरे वा...! समृद्धी गुणी बाळ आहे. तू काय करणार आता... ही पानं घे बरं...”

काकूंनी असं म्हटल्याबरोबर समृद्धी पानं शोधू लागली. तिची तारांबळ पाहून काकू आणि आई हसू लागल्या. काकूंनी सांगितलं,

“समृद्धी ती ताटं घे. त्यालाच ‘पानं घेणे’ असं म्हटलं जातं. पूर्वी केळीच्या, पपईच्या पानावर जेवण वाढलं जाई. म्हणून तसं बोललं जातं.”

समृद्धीने सांगितल्याप्रमाणे केलं. मग काकू आणि आई तयार केलेले पदार्थ ‘पाना’त वाढू लागल्या. काकू म्हणाल्या “समृद्धी, तुला मदत करायची आहे ना. आता आम्ही दोघी पानं कशी वाढतो तिथे लक्ष देऊन पहा.”

समृद्धीला एक एक गोष्टी आज नव्यानेच कळत होत्या. तीही कुतूहलानं मांडी घालून त्यांच्या बाजूला बसून पाहू लागली.

“जेवताना काय असावं, कसं असावं आणि पानात त्याची जागा कुठे असावी ह्याबाबत आपल्या महाराष्ट्रात एक शिस्त आहे.” काकू सांगू लागल्या. “पान वाढताना सगळ्या गोष्टी नीट वाढल्या पाहिजेत.”

आईदेखील काकूंनी सांगितल्याप्रमाणे करत होती. त्या दोघी वाढू लागल्या.

“सर्वात आधी पानाच्या वरच्या बाजूला जरासं मीठ आणि लिंबू वाढायचं. पानात मध्यभागी भाताची मूद वाढायची. मग त्यावर वरण, तूप वाढायचं.”

“पोळी देखील मध्येच. हो ना, वहिनी?” आईने विचारले.

“हो. भाकरी किंवा पोळी जे काही असेल तेही मध्येच वाढ.”

“आणि मग भाजी आणि कोशिंबीर कुठे वाढणार?” समृद्धीनं विचारलं.

“हो सांगते, थांब. भाज्या उजव्या बाजूला वाढायच्या.” काकू म्हणाल्या.

"आणि कोशिंबीर, चटणी, रायतं डाव्या बाजूला." आई म्हणाली.
"अरे वा. माझी आवडती शेवयाची खीरपण आहे. ती कुठे वाढणार आता?"
"सर्व गोड पदार्थ दोन्ही बाजूंच्या मध्यभागी वाढायचे. म्हणजे पक्वान्न, खीर, दही वगैरे."
"बघ आता ताट कसं सुरेख दिसतंय की नाही?"
"हो ना. सगळ्या गोष्टी कशा नीट वाढल्या गेल्या आहेत. पण काकू, असं का वाढलं जातं?"
"समृद्धी, त्याचं एक शास्त्र असतं. माणसं सहसा उजव्या हाताने जेवतात ना. म्हणून उजवीकडे मुख्य पदार्थ वाढले जातात."
"अच्छा, आता मला समजलं. आतापासून आम्ही दररोज असंच जेवणार."

### पाठ ९ : महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : नागपूर आणि नाशिक - पाठ्यपुस्तक

#### १. संत्रानगरी नागपूर

**घ. संवाद ऐकू या.**




**शुभा** : हॅलो नीता, शुभा बोलतेय.
**नीता** : अरे व्वा, <u>कॅनडातला</u> सूर्य आज लवकर उगवलेला दिसतोय!
**शुभा** : अगं, मस्त बातमी सांगायचीय, आम्ही नागपूरला फ्लॅट घेतला.
**नीता** : अभिनंदन! नागपूरला घर घ्यायचं कसं काय आलं मनात?
**शुभा** : अगं, राजूचं बालपण नागपुरातलं. त्यामुळे त्याचं स्वप्नच होतं. आता गप्पांचे विषय नागपुरातली संत्री, नागपुरातले नमकीन, झणझणीत रस्सा, अंबाझरी तलावाकाठचा फेरफटका हेच असतात.
**नीता** : मस्त गं! आणि नागपुरातली कडाक्याची थंडी ... आता थंडी पाहूनच ये नागपूरला. आम्हीही मुंबईहून येतो तिकडे. रामटेक ते धरमपेठ सगळं पालथं घालू. पुन्हा एकदा अभिनंदन. ...

### पाठ ९ : महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : नागपूर आणि नाशिक - पाठ्यपुस्तक

#### ३. केवलप्रयोगी अव्यये

**क. खालील संवाद ऐकून रिकाम्या जागा भरू या.**

"जा की ! आता का थांबलास?"
"हो, जाणारच आहे. मी माझं नाव आधीच नोंदवलं आहे. तुम्ही अडवलं तरी मी नाही ऐकणार. फक्त एका दिवसाचाच तर प्रश्न होता, बाबा, पण तुम्ही म्हणून पाठवाल तर खरं !"
"हो, नाहीच पाठवणार. तू माझं ऐकतोस का कधी? मी का ऐकायचं मग तुझं?"
"बाबा, मी कधी नाही ऐकलं तुमचं? मला नाही पटत काही गोष्टी तुमच्या. तेव्हाच असेल फक्त. नाही तर मी अजूनही सगळं तुम्हाला विचारूनच करत असतो. इतर मुलं पहा. तो शेजारचा दिनू बघा. तो स्वतःचे निर्णय कसे स्वतः घेतो. नाही तर मी आपला तुमचीच परवानगी घेतोय. साधं एका दिवसाच्या सहलीसाठीपण तुम्ही जायला देत नाही. बाकीच्या गोष्टी राहिल्याच मग."
"तू दुसऱ्यांचं सांगू नकोस मला. मी इतर वेळी तुला नाही म्हणालो नसतो. पण, बेटा, आम्हाला कोण विचारणार आता. सगळं तुम्हाला ठरवायचं आहे. ठरवा मग. मी आता काही बोलणार नाही. खुशाल कुठे जायचंय तिथे जा."
"हा घ्या चाललोच. मला पैसे द्या. आईनेच सांगितलं आहे तुमच्याकडून घ्यायला."

"हो, देतो ना. पैसे लागले की बाबा काय आपला आहेच लगेच काढून द्यायला. एरवी बाबा तर ओरडणारा असतो." (पैसे देत) "हे घे. आणि जास्तीचे राहू देत बरोबर. अडीअडचणीला लागतील."

**पाठ ९ : महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : नागपूर आणि नाशिक - पाठ्यपुस्तक**

### ४. बोलीभाषा

**क. नागपूर**

**अ. ऐकू या.**




वऱ्हाडी, हळबी, नागपुरी या बोलींचे वेगळेपण म्हणजे त्यांच्या शब्दसंग्रहात हिंदी शब्दांचा भरणा विपुल प्रमाणात आहे. इंग्रजांच्या काळातील या मध्यप्रांतात हिंदी व मराठी भाषिक इथे एकत्र राहत होते. हिंदी भाषेच्या क्षेत्राचेही वऱ्हाडी बोलीला सान्निध्य आहे. तसेच जुन्या मराठीचे अवशेष वऱ्हाडी बोलीच्या सर्वनामांत कायम आहेत. (उदा॰ ही, जी, ती, ऐवजी, हे, जे, ते) मले, तुले, मज, तुज – द्वितीया-चतुर्थी तसेच तृतीयेची रूपे – म्या, तू, त्वा इ॰ डॉ॰ कोलत्यांच्या लेखनात तर त्यांनी मीने, तूने असा `ने` चा प्रत्यय, मी, तू, सर्वनामांना योजलेला दिसतो. 'करून राह्यला' 'निजून राह्यला' 'करूनशान' 'जेवूनशान' असे वैदिक संस्कृतशी नाते सांगणारा प्रत्यय, 'काय' ऐवजी 'काव्हून' 'काम्हून' अशी बोली रूपे. अशा वेगळेपणाने वऱ्हाडी बोली लक्ष वेधून घेते. वऱ्हाडी बोलीत स्त्रियांच्या तोंडीही 'मी जातो' 'मी करतो' असे प्रयोग असतात. एके काळच्या समृद्ध ग्रंथनिर्मिती असलेल्या वऱ्हाडी बोलीतील शब्दसंग्रहही विपुल क्षेत्रांना स्पर्श करणारा आहे.

**पाठ ९ : महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : नागपूर आणि नाशिक - अभ्यासपुस्तक**

### १. लॉजिस्टिक हबने बदलेल नागपूरचे अर्थशास्त्र.

**क. बातमी ऐकून स्वाध्याय सोडवा.**

देशाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूरचे अर्थशास्त्र बदलवण्याची ताकद लॉजिस्टिक हबमध्ये आहे. मात्र शहराचे अर्थशास्त्र बदलवण्यासाठी पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्याची गरज आहे. मेट्रोसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प नागपुरात उभे राहत आहेत. त्यामुळे विकासाचे मॉडेल म्हणून नागपूरचा ठसा देशपातळीवर उमटेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**पाठ १० : बोधकथा - पाठ्यपुस्तक**

### ४. चिनी बोधकथा

**रिकामी कुंडी**

वृद्धापकाळाने आपली राजसत्ता उमद्या, हुशार, प्रामाणिक मुलाकडे सोपवावी या हेतूने चीनच्या राजाने भावी वारसदार नेमण्यासाठी राज्यात दवंडी पिटवली. राजा निपुत्रिक होता, त्याला झाडापानांचे विलक्षण वेड होते. त्याची दवंडी अशी होती की, "ज्या मुलाचे राजा होण्याचे स्वप्न आहे त्याने राजवाड्यात येऊन बी घेऊन जावे. पुढच्या सहा महिन्यात जो मुलगा सर्वोत्कृष्ट निकाल देईल तो राजमुकुट धारण करेल."

राज्यात एकच उत्साह पसरला. राजवाड्याबाहेर मुलांची भलीमोठी रांग लागली. त्या मुलांमध्ये चेंगही होता. अतिशय कुशल बागवान म्हणून त्याची ख्याती होती. चेंगबरोबर अनेक मुलं त्यांच्या मुठीत राजा होण्याचं स्वप्न घेऊन घरी परतली.
प्रत्येकाने मिळालेली बी कुंडीत रुजवायला ठेवली. काहींना जाणकार पालकांनी मार्गदर्शन केले. चेंगनेही कुंडीत तळाशी मोठे दगड, त्यावर बारिक रेत, सुपीक ओलसर काळी माती घालून बी पेरली. त्यावर अलगद हलकी माती पेरली.
गावातल्या चेऊन या मुलाने लावलेली बी रुजली अशी बातमी गावभर पसरली. त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. पाठोपाठ मन्चू, वॉंग यांच्या कुंड्यांत चिमुकली रोपटी डुलू लागली. पण अफसोस, चेंगच्या कुंडीत काहीच रुजले नव्हते.
लवकरच गावातल्या चेंग सोडून सगळ्याच मुलांच्या कुंडीत बी अंकुरली. घराच्या अंगणात उबदार सूर्यप्रकाशात सगळ्यांची झाडे जोमाने वाढू लागली. प्रत्येक मुलगा स्वतःच्या झाडाची जातीने रखवाली करू लागला.
चेंग गोंधळला. त्याने पुन्हा आपली बी दुसऱ्या कुंडीत लावली. काळजीपूर्वक सुपीक काळीभोर माती वापरली. पण तरीही त्याची बी अंकुरत नव्हती.
इतर सगळ्या कुंड्यांमधील झाडे जोमाने वाढत होती. चेंगची रिकामी कुंडी पाहून सगळे त्याला हिणवू लागले, “चेंगही त्या कुंडीसारखाच रिकामा आहे”. चेंग निराश झाला. त्याच्यातला कनवाळू, झाडांवर प्रेम करणारा बागवान त्याला स्वस्थ बसू देईना. त्याने माशांचे खत वापरून माती अधिक सुपीक बनवली व पुन्हा बी पेरली. पण काहीच उपयोग झाला नाही. सरतेशेवटी ६ महिन्यांनंतर, प्रत्येक मुलगा आपल्या जोमाने वाढलेल्या झाडांच्या कुंड्या घेऊन राजवाड्यात हजर झाला. प्रत्येकाच्याच डोळ्यात भावी राजाचे स्वप्न होते.
चेंगची कुंडी मात्र झाड न रुजलेली होती. झाडांचे निरीक्षण करत राजा चेंगजवळ पोहचला. त्याने चढ्या आवाजात चेंगला विचारले, “तुझी कुंडी रिकामी कशी?” चेंगने रडकुंडीला येऊन त्याने केलेले सर्व प्रयत्न सांगितले. राजा हसला. इतरांकडे बघून तो म्हणाला, “तुमच्या कुंड्यांमध्ये झाडे कशी रुजून आली, हेच आश्चर्य आहे. कारण सगळ्यांना दिलेल्या बिया शिजवलेल्या होत्या”. प्रामाणिक चेंगने राजाचा पण जिंकला होता.

## माय मराठी – पातळी ४ : अंतिम परीक्षा

### दृक्-श्राव्य परीक्षा

### १. श्रवणकौशल्य

**बांधा घर चार तासांत, एका लाखात!**



मुंबई-पुण्यात आम जनतेची घरासाठी होणारी परवड सगळ्यांनाच माहीत आहे. आपलं हक्काचं घर मिळवण्यात लोकांचा जन्म जातो! ह्या समस्येवर आधारित ‘घरोंदा’ हा हिंदी किंवा ‘मुंबईचा जावई’, ‘डबल सीट’ हे मराठी चित्रपट तुम्ही कदाचित पाहिले असतील. ज्यांचं घर आहे असे लोकही पुरामुळे, भूकंपामुळे, त्सुनामीमुळे किंवा युद्धामुळे एका रात्रीत रस्त्यावर येतात. काही वर्षांपूर्वीच डोंगर ढासळून माळीण गाव एका रात्रीत उद्ध्वस्त झालं

होतं, हे तुम्हाला आठवतच असेल!
'आयकिया' (Ikea) नावाच्या एका फर्निचर बनवणाऱ्या कंपनीनं यावर नामी उपाय शोधून काढला आहे. ही कंपनी फर्निचरला लागणारे सगळे सुटे भाग विकते. गिऱ्हाइकानं ते सुटे भाग घरी न्यायचे आणि जोडायचे, की लगेच फर्निचर तयार! ह्याच अनुभवावर या कंपनीनं चार तासात २०० चौरस फूट घर उभं करता येईल असं एक डिझाईन तयार केलंय.
या घराचे एकूण ६८ सुटे भाग आहेत. घराच्या भिंती आणि छप्पर प्लास्टिकचं आहे आणि सांगाडा स्टील ट्यूबनं बनवलाय. इतकंच नव्हे, तर घराच्या छपरावर सौरऊर्जेची निर्मितीही होते. हे सर्व सुटे भाग जोडून घर उभं करायला फक्त चार तास आणि दोन मिनिटं लागतात. घराची किंमतदेखील एक लाखाच्या आत आहे.
तुमच्या मनात कदाचित शंका येईल की असं घर तकलादू असेल. पण तसं नाही. घराच्या भिंती सहजासहजी तुटण्यासारख्या नाहीत. सीरियासारख्या अराजकग्रस्त देशात निर्वासितांसाठी नवीन गावं अशी घरं वापरूनच वसवलेली आहेत.
चला तर मग, आता फक्त मोकळी जागा बघा आणि चार तासांत बांधून टाका घर!!!

**माय मराठी – पातळी ४ : अंतिम परीक्षा**

### दृक्-श्राव्य परीक्षा

#### २. श्रुतलेखन

ही पर्वतांची रांग दूरवरून मोठी मोहक दिसत आहे. तिचे जवळून दर्शन घेण्याचा मोह टाळता येत नाही. पण जसजसे जवळ जावे तसतसे तिचे उग्र आणि रौद्र रूप जाणवून छातीत धडकी भरते आहे.



आम्ही एका कड्याच्या टोकावर उभे आहोत. खाली खोल दरी आहे आणि नदीचा प्रवाह वळणे घेत वाहतो आहे. तो कुठे ऐसपैस पसरलेला दिसत आहे, तर कुठे त्याने अंग चोरले आहे. सूर्याचे बिंब तांबूस होऊ लागले आहे आणि संध्याकाळचा हलका गारवा हवेत जाणवत आहे.
आता खाली उतरायचे आहे. ह्या डोंगरात चालताना पाय ठरत नाही. कुठे वाळू, तर कुठे गोटे वाटेत येत आहेत. पुढे टाकण्यासाठी एक पाय उचलला की दुसरा घसरत आहे. आधाराला एखादा गवताचा झुबका मिळत आहे; पण तोच उपटून हातात येईल अशी भीती वाटत आहे. आमच्या धसमुसळ्या हालचालींनी दचकलेली पाखरे पंख फडफडवत आकाशात भरारी घेत आहेत आणि आपली नाराजी प्रकट करत आहेत. जीव मुठीत धरून आणि आठवेल त्या देवाचे नाव घेऊन आम्ही एकेक पाऊल उचलत आहोत.

# शब्दसंग्रह

हिरवा रंग : नामांचे सामान्यरूप　　निळा रंग : इंग्रजीमधील अर्थ　　लाल रंग : हिंदीमधील अर्थ

| | शब्द / वाक्य<br>word / sentence | अर्थ<br>meaning |
|---|---|---|

## पाठ १ - चित्रपट

| | | |
|---|---|---|
| १ | तो कुल्ला, ते कुल्ले<br>कुल्ल्या-, कुल्ल्यां- | buttock, hip<br>नितंब, कमर के नीचे पीठ की ओर का मांसल भाग, चूतड |
| २ | तो छायाप्रकाश<br>छायाप्रकाशा- | chiaroscuro, the treatment of light and shade in drawing and painting<br>छायाप्रकाश, अंधकार और प्रकाश, चित्रकला में छायाप्रकाश दिखाना |
| ३ | तो विस्तार, ते -<br>विस्तारा-, विस्तारां- | expansion, growth<br>विस्तार, फैलाव, लंबाई-चौडाई |
| ४ | तो छायाचित्रकार, ते -<br>छायाचित्रकारा-, छायाचित्रकारां- | photographer, cinematographer, lensman<br>फोटो या फिल्म कॅमरे में उतारने वाला, फोटोग्राफर/ कॅमरामन |
| ५ | तो पटकथाकार, ते -<br>पटकथाकारा-, पटकथाकारां- | screenplay writer<br>चित्रपटकथाकार, फिल्म के लिए कहानी लिखनेवाला |
| ६ | तो वेषभूषाकार, ते -<br>वेषभूषाकारा-, वेषभूषाकारां- | costume designer<br>वेषभूषाकार, फिल्म या नाटक के पात्रों के पोशाक बनानेवाला |
| ७ | तो नेपथ्यकार, ते -<br>नेपथ्यकारा-, नेपथ्यकारां- | set designer<br>नेपथ्यकर्ता, फिल्म या नाटक के लिए अनुकूल दृश्यरचना करने वाला |
| ८ | तो निर्मिती व्यवस्थापक, ते -<br>निर्मितिव्यवस्थापका-,<br>निर्मितिव्यवस्थापकां- | production manager / controller<br>निर्माण व्यवस्थापक, फिल्म या नाटक के निर्माण का प्रबंध करने वाला |
| ९ | तो अवकाश, ते -<br>अवकाशा-, अवकाशां- | space<br>जगह, स्थान, अवकाश |
| १० | तो विस्तृतकोन, ते -<br>विस्तृतकोना-, विस्तृतकोनां- | wide angle<br>कोन, कोना |

पाठ १

| | | |
|---|---|---|
| ११ | तो बोलपट, ते -<br>बोलपटा-, बोलपटां- | talkies<br>बोलता सिनेमा, टॉकी फिल्म, ध्वनिसहित चलचित्र |
| १२ | तो मूकपट, ते -<br>मूकपटा-, मूकपटां- | silent movie<br>मूक सिनेमा, ध्वनिरहित चलचित्र |
| १३ | तो छेद, ते -<br>छेदा-, छेदां- | cut<br>काटने या छेदने की क्रिया |
| १४ | तो वितरक, ते -<br>वितरका-, वितरकां- | (film) distributor<br>वितरण करने वाला, बाँटनेवाला, वितरक |
| १५ | ट्याहाँऽऽ करणे | scream, the first sound of baby’s crying<br>जनम के बाद मुँह से पहली (रोने की) आवाज निकलना |
| १६ | बोबडे बोलणे | to babble<br>तुतलाना |
| १७ | बेसावधपणे | neglectfully, unconsciously, being unaware<br>असावधानी से, लापरवाही से |
| १८ | तो अपराधीपणा | guilt conscience<br>अपराधी भाव, स्वयं को दोषी मानना |
| १९ | तो हिरमोड<br>हिरमोडा-, हिरमोडां- | despair, being crestfallen<br>दिल टूटना |
| २० | बजावणे | to warn, enforce, enjoin<br>चेतावनी / आदेश देना |
| २१ | अविभाज्य | integral, inseparable<br>अविभाज्य, जो बाँटा न जा सके, जो अलग किया न जा सके |
| २२ | तो व्याप, ते -<br>व्यापा-, व्यापां- | concern, extent, load of work<br>जिम्मेदारी, कार्यविस्तार |
| २३ | ती हुक्की,<br>हुक्की- | whim, sudden desire, caprice<br>तलब, इच्छा |
| २४ | तो युक्तिवाद, ते -<br>युक्तिवादा-, युक्तिवादां- | argument, contention, reasoning<br>तर्क-विचारयुक्त बहस |
| २५ | तो धाक<br>धाका- | awe<br>दबदबा, धाक |

| | | |
|---|---|---|
| २६ | वेढून टाकणे | to encircle, girth, surround, besiege, beleaguer<br>चारों तरफ से घेर लेना |
| २७ | तो धसका, ते धसके<br>धसक्या-, धसक्यां- | fright, fear<br>मन में बैठा डर, खौफ़ |
| २८ | तो संयम, ते -<br>संयमा-, संयमां- | control<br>संयम, रोक, नियंत्रण |
| २९ | झिंगाट | something done with full joy and gusto, losing control over oneself<br>बेहोश / मदहोश किया (नाच, मौज मस्ती इ.) |
| ३० | निगडित | relevant, concerning, tied, attached<br>संबंधित, संबंध रखनेवाला, जोड़ा हुआ |
| ३१ | जम बसवणे | to be successful in relevant work, to establish oneself in selected work, to settle in an office<br>काम अच्छी तरह चलाने में कामयाब होना / सफल होना |
| ३२ | ते बलस्थान, ती बलस्थाने<br>बलस्थाना-, बलस्थानांना- | strength, mainstay<br>किसी की पहचान जिससे बनती वह उसका सर्वश्रेष्ठ गुण या सामर्थ्य |
| ३३ | तो ध्यास, ते -<br>ध्यासा-, ध्यासां- | yearning, obsession<br>ठान, दृढ निश्चय / संकल्प |
| ३४ | ती प्रतिमा, त्या -<br>प्रतिमे-, प्रतिमां- | image<br>प्रतिमा, चित्र, तस्वीर |
| ३५ | ती कसरत, त्या कसरती<br>कसरती-, कसरतीं- | acrobatics, exercise<br>कलाबाज़ी, शारीरिक खेल |
| ३६ | ती निर्मितिप्रक्रिया, त्या -<br>निर्मितिप्रक्रिये-, निर्मितिप्रक्रियां- | production process, procedure<br>निर्माण प्रक्रिया |
| ३७ | ती चित्रनिर्मिती<br>चित्रनिर्मिती-, चित्रनिर्मित्यां- | film production<br>चित्र या फिल्म का निर्माण |
| ३८ | ती संहिता, त्या -<br>संहिते-, संहितां- | script<br>स्क्रिप्ट |
| ३९ | ती मंदगती<br>मंदगती- | slow motion<br>मंद गति |

| | | |
|---|---|---|
| ४० | ती चमत्कृती, त्या चमत्कृती / चमत्कृत्या<br>चमत्कृती-, चमत्कृतीं-, चमत्कृत्यां- | magic, miracle<br>चमत्कार, विलक्षण बात |
| ४१ | ती लोकजागृती<br>लोकजागृती- | public awareness<br>जनजागृति, लोगों को सावधान करने का काम |
| ४२ | ती अढी, त्या अढ्या<br>अढी-, अढ्यां | bitterness, grudge, malice<br>कड़वाहट, रोष, पूर्वाग्रह, कटुता |
| ४३ | गांभीर्याने | seriously<br>गंभीरता से |
| ४४ | ती उलघाल, त्या उलघाली<br>उलघाली-, उलघालीं- | anguish<br>बेचैनी, व्याकुलता |
| ४५ | ती कलात्मकता<br>कलात्मकते- | artistry<br>कलात्मकता |
| ४६ | ती कल्पकता<br>कल्पकते- | innovativeness, imagination<br>कल्पनाशक्ति |
| ४७ | ते नेपथ्य, ती नेपथ्ये / नेपथ्यं<br>नेपथ्या-, नेपथ्यां- | set design<br>नाटक या फिल्म में कहानी के अनुरूप बनाया दृश्य |
| ४८ | ते पार्श्वसंगीत<br>पार्श्वसंगीता- | background music<br>पार्श्वसंगीत |
| ४९ | ते संज्ञापन, ती संज्ञापने / संज्ञापनं<br>संज्ञापना-, संज्ञापनां- | mass communication<br>संपर्क, दूरसंचार, संदेश या समाचार लोगों तक पहुँचाने का काम |
| ५० | ते छायाचित्रण, ती छायाचित्रणे / छायाचित्रणं<br>छायाचित्रणा-, छायाचित्रणां- | photography / cinematography<br>छायाचित्र या फिल्म बनाने का काम, छायाचित्रण, फ़ोटोग्राफी |
| ५१ | ते भिंग, ती भिंगे / भिंगं<br>भिंगा-, भिंगां- | lens<br>लेंस, चश्मे में लगाया शीशे का टुकड़ा |
| ५२ | ते समीपदृश्य, ती समीपदृश्ये / समीपदृश्यं<br>समीपदृश्या-, समीपदृश्यां- | closeup, close shot<br>क्लोज़-अप |

| | | |
|---|---|---|
| ५३ | ते संकलन, ती संकलने / संकलनं<br>संकलना-, संकलनां- | editing<br>संकलन |
| ५४ | ते आशयसूत्र, ती आशयसूत्रे / आशयसूत्रं<br>आशयसूत्रा-, आशयसूत्रां- | plot<br>कहानी का मुख्य विषय, प्रमुख सूत्र |
| ५५ | ते चित्रीकरण, ती चित्रीकरणे / चित्रीकरणं<br>चित्रीकरणा-, चित्रीकरणां- | (film) shooting<br>शूटिंग, चित्रीकरण |
| ५६ | ते उपशीर्षक, ती उपशीर्षके / उपशीर्षकं<br>उपशीर्षका-, उपशीर्षकां- | subtitle<br>फिल्म के निचले हिस्से में छापा संवादों का अनुवाद, सबटाइटल |
| ५७ | ते चलच्चित्र, ती चलच्चित्रे / चलच्चित्रं<br>चलच्चित्रा-, चलच्चित्रां- | cinematography<br>चलचित्र |
| ५८ | ते दूरदृश्य, ती दूरदृश्ये / दूरदृश्यं<br>दूरदृश्या-, दूरदृश्यां | wide shot<br>दूरवर्ती दृश्य, लॉन्ग शॉट |
| ५९ | ते ध्वनिसंकलन, ती ध्वनिसंकलने / ध्वनिसंकलनं<br>ध्वनिसंकलना-, ध्वनिसंकलनां- | sound editing<br>श्राव्य संपादन |
| ६० | ते हत्याकांड, ती हत्याकांडे / हत्याकांडं<br>हत्याकांडा, हत्याकांडां- | bloodshed, massacre<br>हत्या या खून की घटना |
| ६१ | ती चिकाटी<br>चिकाटी- | diligence, perseverance, tenacity<br>संकटो कें बावजूद डटे रहने की मानसिकता, लगन, दृढनिश्चय |
| ६२ | भरीव | solid, substantial<br>कसदार, ठोस, सघन |
| ६३ | ते शेततळे, ती शेततळी<br>शेततळ्या-, शेततळ्यांना- | a pond made in field<br>खेत में (बनाया गया) छोटा तालाब |
| ६४ | उचलून धरणे | to support, to uphold<br>समर्थन करना, पुष्टि करना |

पाठ ९

| | | |
|---|---|---|
| ६५ | खरचटणे | to get bruised<br>खरोंच लगना, छिलना |
| ६६ | डोक्याला ताप होणे | to be bothered, tensed<br>परेशान होना |
| ६७ | नाक वाकडे होणे | to be unhappy about something<br>नाराज होना |
| ६८ | खटकणे | to be bothered, offended by something, to disapprove of something<br>खटकना, चुभना, बुरा लगना |
| ६९ | घटस्फोटित | divorced<br>तलाकशुदा |
| ७० | जुनाट | outdated, worn out<br>पुराना, जीर्ण-शीर्ण, बेकार |
| ७१ | तो लघुपट, ते -<br>लघुपटा-, लघुपटां- | short film<br>लघु फिल्म |
| ७२ | तो इसम, ते -<br>इसमा-, इसमां- | individual, person, guy<br>मनुष्य, व्यक्ति, इन्सान, बंदा |
| ७३ | तो आघात, ते -<br>आघाता-, आघातां- | shock, hit<br>आघात, प्रहार, ठोकर |
| ७४ | तो आयटम डान्स, ते -<br>आयटम डान्स-, आयटम डान्स- | item (dance) number<br>हिंदी सिनेमा में दिखाया जानेवाला कहानी से अलग भड़कीला नृत्य |
| ७५ | पोरकट | kiddish, childish<br>बचकाना, बच्चे जैसा |
| ७६ | ती गुदगुली, त्या गुदगुल्या<br>गुदगुली-, गुदगुल्यां- | tickle, tickling<br>गुदगुदी |
| ७७ | वचावचा बोलणे | to keep on talking loudly, to talk blah blah blah<br>ऊँची आवाज़ में लगातार बातें करना |
| ७८ | भावुक | sentimental, emotional<br>भावुक, भावनापूर्ण, भावाकुल |

पाठ ९

| | | |
|---|---|---|
| ७९ | तो खोटारडेपणा<br>खोटारडेपणा- | dishonesty, untruthfulness<br>झूठापन, असत्यता |
| ८० | ते बंड, ती बंडे<br>बंडा-, बंडां- | rebellion, revolt, insurgency<br>बग़ावत, विद्रोह |
| ८१ | वाह्यात वागणे | to behave in an uncivil manner<br>वाहियात / बेहुदा हरकतें करना |
| ८२ | माती खाणे | to commit a mistake, to commit an immoral act<br>ग़लत काम करना, ग़लती करना, नुकसान पहुँचाना |
| ८३ | कुशीत शिरणे | to go in someone's arms, to hug<br>आलिंगन / गोद में जा बैठना |
| ८४ | ती उपस्थिती<br>उपस्थिती- | presence, attendance<br>उपस्थिती, हाज़िरी |
| ८५ | आ वासणे | to open mouth in awe, to be awestruck, to be / stand agape with<br>आश्चर्य से मुँह खुला का खुला रह जाना |
| ८६ | पत्ता असणे | to know, to have the information<br>पता होना, मालूम होना |
| ८७ | खळबळ उडणे | upheaval / turmoil / sensation to break out<br>हलचल मचना |
| ८८ | त्या शंकाकुशंका (सामान्यतः नेहमी अ.व. वापर)<br>शंकाकुशंकां- | apprehensions, doubts, qualms<br>शंका, आशंका, संशय, शक |
| ८९ | तो रसभंग<br>रसभंगा- | feeling distasteful<br>आनंद लेने में आनेवाली बाधा, रसभंग |
| ९० | यथार्थ | accurate, exact, valid<br>जैसा होना चाहिये ठीक वैसा, उचित |
| ९१ | शास्त्रशुद्ध | scientific<br>वैज्ञानिक |
| ९२ | एकटक पाहणे | to gaze, stare<br>ताकना, ध्यानपूर्वक देखते रहना |

| | | |
|---|---|---|
| ९३ | अवाक | astounded, dumbstruck, speechless<br>अवाक, चकित |
| ९४ | ती जरब, त्या जरबा<br>जरबे-, जरबां- | commanding influence, awe, fear<br>डर, भय, दहशत |
| ९५ | खिळवणे | to confine, engage, rivet, to nail to the ground<br>एक जगह बाँध रखना, हिलने न देना |
| ९६ | व्यापणे | to cover, permeate, spread<br>फैलना, फैलाना, भर देना |
| ९७ | अजरामर | eternal, immortal, ever youthful<br>अमर, चिरंजीव |
| ९८ | तो उसूल, ते उसूल<br>उसुला-, उसुलां- | principle, maxim, norm<br>उसूल, नियम, रीत |
| ९९ | बोटांवर नाचवणे | to make someone dance to your tune<br>ऊँगली के इशारों पर नचाना |
| १०० | वैतागणे | to be fed up with, to grow tired of, to be annoyed with<br>परेशान होना, चिड़चिड़ा होना, हैरान होना |
| १०१ | रचणे | to create, shape, mould, to arrange, to set<br>रचना करना, बनाना, निर्माण करना |
| १०२ | झुगारणे | to defy, disregard, to overthrow<br>ठुकराना, ठोकर मारना, दुतकारना |
| १०३ | आजमावणे | to test, try out<br>आज़माना, जाँचना, परखना |
| १०४ | धजणे | to dare, to have the chutzpah to<br>हिम्मत होना / करना / जुटाना, साहस होना |
| १०५ | खिदळणे | to laugh loudly, to break with a guffaw<br>ठहाका लगाना, खुले मुँह से जोर जोर से हँसना |
| १०६ | मावणे | to fit in, adjust to fit<br>समाना, ऐंठना, ठीक नाप का होना |
| १०७ | वगळणे | leave out<br>काटना, हटाना, निकाल देना |

| | | |
|---|---|---|
| १०८ | गुंतवणे | to invest<br>(पैसों की) लागत होना, (पैसा) लगाना |
| १०९ | पत्करणे | to accept<br>स्वीकार करना |
| ११० | गात सुटणे | to go on singing<br>बिना रुके लगातार गाते रहना |
| १११ | यांत्रिक | mechanical<br>यंत्र से संबंधित, यंत्र की तरह |
| ११२ | कृष्णधवल | black and white<br>काला और सफ़ेद |
| ११३ | स्थिर | stable<br>स्थिर, निश्चल, शांत |
| ११४ | अरसिक | uncultivated, uninterested, lowbrow<br>रूखे स्वभाव का, कला का आनंद लेने में असमर्थ |
| ११५ | स्वाभाविक | inherent, innate, natural<br>स्वाभाविक |
| ११६ | तुच्छ | low, petty, worthless<br>तुच्छ, क्षुद्र, हीन, घटिया |
| ११७ | उथळ | shallow, superficial<br>उथला, कम गहरा |
| ११८ | चमकदार | shining, glowing<br>चमकीला, चमकवाला, चमकदार |
| ११९ | त्रिवेणी | confluence of three rivers<br>वह स्थान जहाँ तीन नदियाँ मिलती हैं |
| १२० | खिदिखिदी (हसणे) | chuckling<br>गुदगुदी होने पर जैसी हँसी आती है उसकी आवाज़ |
| १२१ | एकंदर | total, sum<br>कुल मिलाकर, सब मिलाकर |
| १२२ | यथावकाश | gradually, at one's leisure<br>समय मिलने पर, अपनी सुविधा से |

| | | |
|---|---|---|
| १२३ | तुफान | a storm, figure of speech for 'a lot'<br>तूफान, आलंकारिक अर्थ : बहुत ज्यादा, प्रचंड |
| १२४ | धडधडत | with the sound of a fast train<br>तेज़ चलने वाली रेल गाड़ी जैसी आवाज़ करते हुए |
| १२५ | ते दडपण, ती दडपणे / दडपणं<br>दडपणा-, दडपणां- | constraint, pressure<br>दबाव, बोझ |
| १२६ | ते सामर्थ्य, ती सामर्थ्ये / सामर्थ्यं<br>सामर्थ्या-, सामर्थ्यां- | stamina, strength, vigour<br>शक्ति, सामर्थ्य, बल |

## पाठ २ - विरंगुळा



| | | |
|---|---|---|
| १२७ | प्रचलित | conventional, popular, prevalent, in vogue<br>प्रचलित, व्यवहार में जिसका उपयोग होता हो, चलनसार |
| १२८ | परी (उदा. त्याच्या परीने...)<br>परी-, परीं- | way, method; as per capability, withing one's limits<br>ढंग, पद्धति, रिवाज; कुव्वत |
| १२९ | पन्हे<br>पन्ह्या- | a light juice made of raw mango pulp mixed with jaggery<br>उबाले हुए हरे आम का मांसल भाग और गुड मिलाके बनाया पेय / शरबत |
| १३० | ते वाटप, ती वाटपे / वाटपं<br>वाटपा-, वाटपां- | allocation, distribution<br>बाँटना |
| १३१ | किरकिरणे | to grumble<br>'किर किर' जैसी हल्का ध्वनि निर्माण करना; दबी आवाज में लगातार नाखुशी जताना |
| १३२ | तो मृदंग, ते -<br>मृदंगा-, मृदंगां- | a kind of a drum<br>ढ़ोल की तरह का एक तालवाद्य |
| १३३ | जीर्ण | ragged, shredded, tattered, old<br>बहुत फटा-पुराना |
| १३४ | झकास | excellent, fine, great<br>बहुत अच्छा, बढ़िया |
| १३५ | ती तरतरी<br>तरतरी- | liveliness, energy, vivacity<br>उत्साह, फुर्ती |

| | | |
|---|---|---|
| १३६ | व्यतिरिक्त | apart from, except<br>सिवाय, अलावा |
| १३७ | देव देव करणे | to be busy with religious activities, to spend a lot of time with rituals and worship etc.<br>धार्मिक कार्य में व्यस्त रहना |
| १३८ | ठाम | firm, confirmed, unwavering<br>पक्का, ठोस |
| १३९ | नकोसे असणे | to be disinterested, being unwanted<br>इच्छा न होना, मन / जी न करना |
| १४० | ताटकळणे | to be kept waiting<br>लंबी देर तक इंतजार करते रहना |
| १४१ | चुकणे | to miss (an oppurtunity), to commit an error<br>मौका गँवाना, चूकना |
| १४२ | डोळे तारवटणे | unable to open eyes on account of insufficient sleep<br>नींद पूरी न होने से आँखें खुली रखने में दिक्कत होना |
| १४३ | सपाटून | heavily<br>जोरों से, खूब, बहुत ज्यादा |
| १४४ | हमखास | without fail, certainly<br>निस्संदेह, बिना चूके, यकीनन, अवश्य |
| १४५ | ती तारांबळ<br>तारांबळी- | hurry, consternation<br>हड़बड़ी, जल्दबाजी, घबराहट, उतावली |
| १४६ | परतीचा (उदा॰ प्रवास) | of the return journey<br>वापसी का |
| १४७ | बिनसणे | to have a disagreement, to be spoilt<br>बात बिगड़ना, अस्तव्यस्त होना |
| १४८ | निग्रही | resolute, firm, determined<br>आग्रही, हठ करने वाला, जिद्दी, अड़ियल |
| १४९ | गोबरा | chubby<br>गोल और मांसल (चेहरा, गाल), गुदगुदा |

| | | |
|---|---|---|
| १५० | विरघळणे | to dissolve<br>घुल जाना |
| १५१ | सत्कारणी | for good purpose<br>अच्छे काम के लिए |
| १५२ | कर्णाचा अवतार | generous like Karna (a character in the Indian epic, Mahabharata)<br>कर्ण जैसा दानशील / उदार |
| १५३ | पाझर फुटणे | to feel love for someone, to ooze<br>पत्थर से पानी निकलना; किसी के प्रति प्यार उमड़ आना |
| १५४ | सुरळीत | smooth, without any problem<br>आसान, बिना किसी बाधा / विघ्न के, बिना अड़चन |
| १५५ | सरणे | to be finished, to lapse<br>खत्म होना, समाप्त होना |
| १५६ | तो मनोविनोद, ते -<br>मनोविनोदा-, मनोविनोदां- | entertainment<br>मनोरंजन, मनबहलाव |
| १५७ | तो फणकारा, ते फणकारे<br>फणकाऱ्या-, फणकाऱ्यां- | anger, fit of fury<br>गुस्सा, क्रोध |
| १५८ | तो निग्रह, ते निग्रह<br>निग्रहा-, निग्रहां- | resoluteness, firmness<br>जिद, हठ, आग्रह, निश्चय |
| १५९ | तो संभ्रम, ते संभ्रम<br>संभ्रमा-, संभ्रमां- | confusion<br>विचारों में उत्पन्न हुई भूल-चूक, गड़बड़ |
| १६० | तो विराम, ते -<br>विरामा-, विरामां- | pause, rest, repose<br>कुछ क्षणों का विश्राम, ठहराव |
| १६१ | तो शोधनिबंध, ते -<br>शोधनिबंधा-, शोधनिबंधां- | thesis / research paper<br>शोध के बारे में लिखा निबंध, थिसिस / रिसर्च पेपर |
| १६२ | तो विसावा<br>विसाव्या- | respite, rest, relaxation<br>आराम, विश्राम |
| १६३ | तो त्रागा<br>त्राग्या- | tantrum, annoyance<br>चिड़चिड़ाहट, क्रोध |
| १६४ | ती घोडेस्वारी, त्या घोडेस्वाऱ्या<br>घोडेस्वारी-, घोडेस्वाऱ्यां- | horse riding<br>घुड़सवारी |

| | | |
|---|---|---|
| १६५ | ती हस्तकला, त्या -<br>हस्तकले-, हस्तकलांना- | handicraft<br>हस्तकला |
| १६६ | ती शेरेबाजी<br>शेरेबाजी- | taunting<br>टिप्पणीकारी, ताने मारना / देना |
| १६७ | ती टिंगलटवाळी, त्या टिंगलटवाळ्या<br>टिंगलटवाळी-, टिंगलटवाळ्यां- | mockery, ridicule, hoax<br>उपहास, मजाक (उड़ाना) |
| १६८ | ती कार्यपद्धती, त्या -<br>कार्यपद्धती-, कार्यपद्धतीं- | method, procedure<br>कार्यपद्धति, कार्य करने का तरीका |
| १६९ | ती बैठक, त्या बैठका<br>बैठकी-, बैठकां- | sitting<br>बैठक |
| १७० | ती कुवत<br>कुवती- | capability<br>क्षमता, योग्यता, शक्ति |
| १७१ | ती द्विरुक्ती, त्या द्विरुक्त्या<br>द्विरुक्ती-, द्विरुक्त्यां- | tautology, repetition<br>एक ही बात दो बार कहना, दो बार कही गयी बात |
| १७२ | ती तिन्हीसांज, त्या तिन्हीसांजा<br>तिन्हीसांजे-, तिन्हीसांजां- | dusk<br>साँझ, दिन ढलने का समय, गौधूली |
| १७३ | ते सत्र, ती सत्रे<br>सत्रा-, सत्रां- | session<br>सत्र, नियत कालावधि |
| १७४ | ते स्तंभलेखन<br>स्तंभलेखना- | newspaper column writing<br>दैनिक पत्रिका के विशिष्ट पृष्ठ पर और विशिष्ट दिन छापा जानेवाला लेखन |
| १७५ | डुगडुगणे | to wobble<br>डगमगाना, हिलना-डुलना, लड़खड़ाना, विचलित होना |
| १७६ | (पुस्तक इ॰) चाळणे | to browse (through a book)<br>पुस्तक आदि के पन्ने जल्दी से पलटते हुए नजर डालना / बीचबीच में थोड़ा पढ़ लेना |
| १७७ | झटकणे | shake off, flap off<br>झटका देकर दूर हटाना |
| १७८ | झंगड | gong, eccentric, bizarre<br>विक्षिप्त |

पाठ २

## पाठ ३ - भेटीगाठी

| | | |
|---|---|---|
| १७९ | तो प्रतिसाद, ते -<br>प्रतिसादा-, प्रतिसादां- | reaction, response, echo<br>प्रतिक्रिया |
| १८० | तो अभिजनवर्ग, ते -<br>अभिजनवर्गा-, अभिजनवर्गां- | elite / aristocratic class<br>अभिजात वर्ग |
| १८१ | तो अहंकार<br>अहंकारा- | ego<br>अहम्, अहंकार |
| १८२ | तो जोम<br>जोमा- | vigour, vitality, zest<br>शक्ति, जोश, उत्साह, आवेश |
| १८३ | ती साद<br>सादे- | call<br>पुकार, आवाहन, बुलावा |
| १८४ | ती नालस्ती<br>नालस्ती- | calumny, slander, condemnation<br>निंदा, बुराई, बदनामी |
| १८५ | ती तपःसाधना<br>तपःसाधने- | hard work, penance<br>कठोर परिश्रम, घोर तपस्या |
| १८६ | ती अंगलट<br>अंगलटी- | body type<br>शरीर रचना (दुबली, मोटी इ.) |
| १८७ | ती निरोपानिरोपी<br>निरोपानिरोपी- | the activity of passing messages<br>संदेश लेने-देने का सिलसिला |
| १८८ | ते केंद्रस्थान, ती केंद्रस्थाने<br>केंद्रस्थाना-, केंद्रस्थानां- | centre point<br>केन्द्रबिंदु, मध्य भाग |
| १८९ | फुणफुणणे | to talk in suppressed tone out of anger<br>गुस्से में दबी आवाज़ में बोलते जाना |
| १९० | फडकावणे | to wave, to hoist<br>कागज, कपड़ा, जैसी चीज ऊँची उठाकर जोर से हिलाना |
| १९१ | भारणे | to influence<br>प्रभावित होना, गहरे प्रभाव में आना, गहरा असर होना |
| १९२ | गहिवरणे | to become emotional, to have tears in the eyes out of happiness, to be choked with emotions<br>भावाकुल होना, गद्‌गद होना, भावुक होना, खुशी से आँखे भर आना |

| | | |
|---|---|---|
| १९३ | घुसमटणे | to suffocate<br>साँस लेने में तकलीफ होना, साँस गले में अटक जाना |
| १९४ | नोंदवणे | to register<br>दर्ज़ करवाना, लिखना |
| १९५ | चाचरत | falteringly<br>हिचकिचाते हुए |
| १९६ | आवाज चढवणे | to raise one's voice<br>आवाज़ ऊँची करना, ऊँची आवाज़ में नाराजी / गुस्सा जताना |
| १९७ | चेहरा पडणे | to feel ashamed, to be crestfallen<br>शरमिंदा होना, फजीहत होना, चेहरे का रंग उडना / फीका पडना |
| १९८ | पारा चढणे | to lose temper, to be very angry<br>बहुत गुस्सा होना, गुस्से से बेहाल होना |
| १९९ | पारा उतरणे | to cool down (after being angry)<br>गुस्सा ठंडा होना, शांत हो जाना |
| २०० | काढता पाय घेणे | to leave, to get going<br>चलते बनना, खिसक लेना |
| २०१ | रमणे | to take delight<br>आनंद लेना, मजा लेना, प्रसन्नता का अनुभव करना |
| २०२ | पडीक असणे | to spend more time at a place without doing anything<br>किसी जगह दिन का ज्यादा से ज्यादा वक्त गुजारना, वहीं पड़े रहना |
| २०३ | मणामणाचे ओझे | (मण = a measure of weight. १ मण = 37 kilos) a lot of burden<br>(मण = वस्तु नापने का पुराना नाप. १ मण = करीब ३७ किलोग्राम) एक से अधिक मण बोझ |
| २०४ | वाहून नेणे | to carry weight from one place to another<br>बोझ एक स्थान से दूसरे स्थान ले जाना, ढ़ोना |
| २०५ | केविलवाणा / णी / णे | pitiful, piteous<br>दीन, दयनीय, गरीब |

२०६ वाट धरणे — to take a way
रस्ता पकडना

२०७ सर्रास — without hesitation
बिना हिचकिचाहट, सहजता से

२०८ आभासी — virtual
जो वास्तव लगता है पर नहीं होता, मिथ्या

२०९ ती तत्परता
तत्परते- — promptness
तत्परता, दक्षता, तेजी, उत्सुकता

२१० चढ्या आवाजात बोलणे — to talk with raised voice
ऊँची आवाज में जोर दे कर बोलना

२११ बावरणे — to be scared
कुछ घबराहट सी होना, ड़र सा लगना

२१२ ते महावितरण
महावितरणा- — electricity supplying company run by the Maharashtra State Government
महाराष्ट्र सरकार की बिजली वितरण आस्थापना / कंपनी / विभाग



२१३ ते टोपण, ती टोपणे
टोपणा-, टोपणां- — cap of a pen etc.
टोपी जैसा छोटा ढ़क्कन (पेन, पेन्सिल आदि वस्तुओं का)

२१४ उभ्या जन्मात — in entire lifetime
पूरे जनम में, जन्म होने से लेकर आज तक

२१५ ओशाळणे — to be abashed, to be ashamed
गलती का अहसास होने पर लज्ज़ित होना

२१६ ती कणीक
कणके- — dough
गेहूँ का आटा

२१७ कृश — feeble
दुबला-पतला, कमजोर

२१८ बांधणी — structure, binding
रचना

२१९ मनोभावे — heartily, with love
मन से, दिल से

| | | |
|---|---|---|
| २२० | गृहीतागमा | a female degree holder from S.N.D.T. University<br>एस.एन.डी.टी. विश्वविद्यालय की बी.ए. समकक्ष पदवीधारिका |
| २२१ | लोकविलक्षण | unusual, uncommon<br>आम लोगों से अलग और विलक्षण |
| २२२ | गंगोत्री | the source of river Ganga<br>गंगा नदी का उगम स्थान |

## पाठ ४ - 'श' शिक्षणाचा

| | | |
|---|---|---|
| २२३ | शैक्षणिक | educational<br>शैक्षणिक |
| २२४ | शालेय | of school<br>पाठशाला का |
| २२५ | वार्षिक | annual<br>वार्षिक / सालाना |
| २२६ | ती सहामाही, त्या सहामाह्या<br>सहामाही-, सहामाह्यां- | semester (examination) of six months<br>छ:माह (परीक्षा) |
| २२७ | ती चाचणी, त्या चाचण्या<br>चाचणी-, चाचण्यां- | test<br>परीक्षा |
| २२८ | शालान्त | school ending ($10^{th}$ standard)<br>शालान्त (दसवी कक्षा) |
| २२९ | तो उपक्रम, ते -<br>उपक्रमा-, उपक्रमां- | activity, venture, undertaking<br>उपक्रम |
| २३० | ती बालवाडी, त्या बालवाड्या<br>बालवाडी-, बालवाड्यां- | kindergarten<br>शिशु विहार |
| २३१ | ती अंगणवाडी, त्या अंगणवाड्या<br>अंगणवाडी-, अंगणवाड्यां- | child care centre<br>आँगनवाड़ी |
| २३२ | अनिवार्य | mandatory, unavoidable<br>अनिवार्य |
| २३३ | तो अभ्यासक्रम, ते -<br>अभ्यासक्रमा-, अभ्यासक्रमां- | syllabus<br>पाठ्यक्रम |

| | | |
|---|---|---|
| २३४ | अभिनव | novel, innovative<br>नया, अभिनव |
| २३५ | तो प्रयोग, ते -<br>प्रयोगा-, प्रयोगां- | experiment<br>प्रयोग, जाँच |
| २३६ | अनुभवाधिष्ठित | empirical<br>अनुभव के आधार से |
| २३७ | तो प्रस्ताव, ते -<br>प्रस्तावा-, प्रस्तावां- | proposal<br>प्रस्ताव |
| २३८ | तो मानसोपचारतज्ज्ञ, ते -<br>मानसोपचारतज्ज्ञा-,<br>मानसोपचारतज्ज्ञां- | psychiatrist<br>मनोरोगचिकित्सक |
| २३९ | तो समुपदेशक, ते -<br>समुपदेशका-, समुपदेशकां- | counsellor<br>परामर्शदाता |
| २४० | ते गमक, ती गमके / गमकं<br>गमका-, गमकां- | secret, hidden matter<br>रहस्य |
| २४१ | ते कौशल्य, ती कौशल्ये / कौशल्यं<br>कौशल्या-, कौशल्यां- | skill<br>कौशल्य |
| २४२ | ते आव्हान, ती आव्हाने / आव्हानं<br>आव्हाना-, आव्हानां- | challenge<br>चुनौती |
| २४३ | निवडणे | to choose, to select<br>चुनना |
| २४४ | वाव मिळणे | to get a chance / an opportunity, to get room / space<br>अवसर मिलना |
| २४५ | तो न्यूनगंड, ते -<br>न्यूनगंडा-, न्यूनगंडां- | inferiority complex<br>हीनमन्यता |
| २४६ | तो सुधारक, ते -<br>सुधारका-, सुधारकां- | reformer<br>सुधारक |
| २४७ | तो आशय, ते -<br>आशया-, आशयां- | meaning, gist<br>मतलब, आशय, अर्थ |

पाठ ४

२४८ ती शाखा, त्या -
शाखे-, शाखां-
branch
शाखा

२४९ वाट खुली होणे
opening of the way / doors
रास्ते खुलना

२५० ती क्षमता, त्या -
क्षमते-, क्षमतां-
capacity
क्षमता

२५१ क्षमता पणाला लावणे
to use one's capacity fully
क्षमता का पूरा उपयोग करना

२५२ आव्हानात्मक
challenging / defying
चुनौतीपूर्ण

२५३ ते ध्येय, ती ध्येये / ध्येयं
ध्येया-, ध्येयां-
goal, aim
उद्दिष्ट

२५४ ती सद्य:स्थिती
सद्य:स्थिती-
present situation
वर्तमान स्थिति

२५५ ती सर्जनशीलता
सर्जनशीलते-
creativity
नवनिर्माण क्षमता

२५६ ती प्रमाणबद्धता
प्रमाणबद्धते-
proportionateness
अनुपात

२५७ तो विश्लेषक, ते -
विश्लेषका-, विश्लेषकां-
analyst
चिकित्सक

२५८ ती ज्ञानभाषा, त्या -
ज्ञानभाषे-, ज्ञानभाषां-
medium of knowledge transmission
ज्ञानभाषा

२५९ ती कलात्मकता
कलात्मकते-
artistry
कला कौशल्य

२६० ती ग्रहणक्षमता
ग्रहणक्षमते-
grasping power, comprehension
ग्रहण क्षमता

२६१ ती दुरवस्था
दुरवस्थे-
bad condition
बुरे हालात

२६२ किंमत मोजणे
to pay for
कीमत चुकाना

| | | |
|---|---|---|
| २६३ | जाणीव ठेवणे | to be aware of<br>एहसास होना |
| २६४ | ती कारणमीमांसा, त्या -<br>कारणमीमांसे-, कारणमीमांसां- | analysis of reasons<br>कारण विश्लेषण |
| २६५ | ती मुहूर्तमेढ, त्या मुहूर्तमेढी<br>मुहूर्तमेढी-, मुहूर्तमेढीं- | an auspicious beginning<br>किसी अच्छे उपक्रम की शुरुआत |
| २६६ | दाखल करणे | to submit / admit<br>दाखिल करना / कराना |
| २६७ | वाणिज्य | commerce<br>वाणिज्य |
| २६८ | ते रसायनशास्त्र<br>रसायनशास्त्रा- | chemistry<br>रसायनशास्त्र |
| २६९ | ती भूमिती<br>भूमिती- | geometry<br>भूमिती |
| २७० | ते बीजगणित<br>बीजगणिता- | algebra<br>बीजगणित |
| २७१ | ते मानसशास्त्र<br>मानसशास्त्रा- | psychology<br>मनोविज्ञान |
| २७२ | ती शिल्पकला, त्या -<br>शिल्पकले-, शिल्पकलां- | sculpture<br>शिल्पकला |
| २७३ | ती स्थापत्यकला, त्या -<br>स्थापत्यकले-, स्थापत्यकलां- | architecture<br>स्थापत्यकला |
| २७४ | ती जैवसांख्यिकी<br>जैवसांख्यिकी- | biostatistics<br>जैवसांख्यिकी |
| २७५ | ते भूगर्भशास्त्र<br>भूगर्भशास्त्रा- | geology<br>भूगर्भविद्या |
| २७६ | ते प्राणिशास्त्र<br>प्राणिशास्त्रा- | zoology<br>प्राणिविज्ञान |
| २७७ | ते नेपथ्यशास्त्र<br>नेपथ्यशास्त्रा- | study of backstage designing<br>नेपथ्य विज्ञान |

| | | |
|---|---|---|
| २७८ | ते पर्यावरणशास्त्र<br>पर्यावरणशास्त्रा- | environmental science<br>पर्यावरण विज्ञान |
| २७९ | भार उचलणे | to carry a load, to accept the responsibility<br>बोझ उठाना |
| २८० | मदतीला धावून जाणे | to help promptly<br>सहायता के लिए दौड़ पड़ना |
| २८१ | ते ब्रीद, ती ब्रीदे / ब्रीदं<br>ब्रीदा-, ब्रीदां- | motto<br>आदर्श वाक्य |
| २८२ | ते ब्रम्हज्ञान<br>ब्रह्मज्ञाना- | knowledge of the Ultimate Truth<br>ब्रम्हज्ञान |
| २८३ | ते शुल्क<br>शुल्का- | cost / fees<br>शुल्क, कीमत |
| २८४ | तो अभिकल्प, ते -<br>अभिकल्पा-, अभिकल्पां- | design<br>अभिकल्प, डिजाईन |
| २८५ | ते ध्वनिमुद्रण, ती ध्वनिमुद्रणे / ध्वनिमुद्रणं<br>ध्वनिमुद्रणा-, ध्वनिमुद्रणां- | audio recording<br>ध्वनिमुद्रण |
| २८६ | ते माध्यम, ती माध्यमे<br>माध्यमा-, माध्यमां- | medium<br>माध्यम |
| २८७ | ते मनन<br>मनना- | contemplation<br>मनन, चिंतन |
| २८८ | ते प्रबोधन, ती प्रबोधने<br>प्रबोधना-, प्रबोधनां- | enlightenment<br>प्रबोधन |
| २८९ | आठवडाभर | for the whole week<br>हफ्ता भर |
| २९० | प्रामुख्याने | mainly<br>मुख्य रूप से |
| २९१ | छाप पाडणे | to impress<br>छाप जमाना |
| २९२ | साधारणपणे | generally<br>साधारणतया स्वरूप से |

| | | |
|---|---|---|
| २९३ | विद्रूप | ugly, deformed<br>बदसूरत |
| २९४ | अमानुष | inhuman<br>अमानुष |
| २९५ | अस्पृश्य | untouchable<br>अछूत |
| २९६ | चातुर्वर्ण्य | the four classes of ancient Indian society<br>प्राचीन भारतीय संस्कृति के चार वर्ण |
| २९७ | अर्वाच्य | vulgar<br>अश्लील |
| २९८ | ते योगदान<br>योगदाना- | contribution<br>योगदान |
| २९९ | संपादन करणे | to gain, achieve; to edit<br>संपादन करना, हासील करना; संपादित करना |
| ३०० | स्थापना करणे | to establish, to found<br>स्थापना करना |
| ३०१ | उपभोगणे | to enjoy<br>आनंद उठाना |
| ३०२ | पिचणे | to suffer, to crack<br>पिसना |
| ३०३ | निखाऱ्यांवरून चालावे लागणे | to face hardship, to be forced to walk on burning cinders<br>अंगारों पर चलना पडना |
| ३०४ | धैर्याने तोंड देणे | to face (trouble) with courage<br>हिम्मत से सामना करना |
| ३०५ | झटणे | to strive / struggle<br>कठोर परिश्रम करना |
| ३०६ | विचारांची ज्योत उजळणे | to enlighten one's thoughts<br>किसी के विचार सामने आना |
| ३०७ | काटकसरी | economical, thrifty<br>खींच तान कर खर्च / इस्तेमाल करने वाला, मितव्ययी |

| | | |
|---|---|---|
| ३०८ | ओढवणे | to befall<br>(कठिनाई से) गुजरना, सिर पर ओले पड़ना |
| ३०९ | स्वावलंबी | self-dependent<br>आत्मनिर्भर |
| ३१० | शीलवान | of a good character<br>शीलवान, अच्छे चरित्र वाला |
| ३११ | संकटांना निमंत्रण देणे | to invite trouble<br>संकट को निमंत्रण देना |
| ३१२ | अडवणे | to obstruct / prevent<br>अटकाना / रोकना |
| ३१३ | द्रष्टा | a visionary<br>द्रष्टा, भविष्य की सही कल्पना करने वाला |
| ३१४ | दखल घेणे | to notice<br>ध्यान देना |
| ३१५ | सातत्याने | persistently<br>लगातार |
| ३१६ | प्रेमाने नांदणे | to live happily<br>मिलजुल कर रहना |
| ३१७ | शेवटपर्यंत | till the end<br>अंत तक |
| ३१८ | रस घेणे | to take interest<br>रुचि लेना |
| ३१९ | सातत्य राखणे | to keep persistence, to maintain continuity<br>दृढ़ता रखना |
| ३२० | ध्येयाने झपाटणे | obsessed with goal<br>लक्ष्य पाने की धुन सवार होना |
| ३२१ | एकमताने | unanimously<br>एकमत से |
| ३२२ | ती निष्ठा, त्या -<br>निष्ठे-, निष्ठां- | loyalty<br>निष्ठा |

| | | |
|---|---|---|
| ३२३ | कृतज्ञतापूर्वक | gratefully<br>कृतज्ञतापूर्वक |
| ३२४ | उद्गारणे | to exclaim<br>आश्चर्य व्यक्त करना |
| ३२५ | लोकां सांगे ब्रम्हज्ञान, स्वत: कोरडे पाषाण | in spite of being an empty vessel oneself, one keeps teaching others.<br>खुद निर्बुद्धि होने के बावजूद औरों को ज्ञान बाँटना |

## पाठ ५ - अतुल्य भारत



| | | |
|---|---|---|
| ३२६ | अतुल्य | unparalleled<br>अतुल्य |
| ३२७ | तो झेंडा, ते झेंडे<br>झेंड्या-, झेंड्यां- | a flag<br>झंडा |
| ३२८ | तो संगम, ते -<br>संगमा-, संगमां- | a union, conflux<br>संगम |
| ३२९ | सांस्कृतिक | cultural<br>सांस्कृतिक |
| ३३० | राष्ट्रीय | national<br>राष्ट्रीय |
| ३३१ | आंतरराष्ट्रीय | international<br>अंतरराष्ट्रीय |
| ३३२ | राजकीय | political<br>राजनैतिक |
| ३३३ | तो अग्निबाण, ते -<br>अग्निबाणा-, अग्निबाणां- | a rocket<br>अग्निबाण, रॉकेट |
| ३३४ | खडतर | hard<br>कठिनाई भरा |
| ३३५ | तो भूभाग, ते -<br>भूभागा-, भूभागां- | terrain<br>इलाक़ा |
| ३३६ | तो दाणा, ते दाणे<br>दाण्या-, दाण्यां- | grain<br>दाना |

| | | |
|---|---|---|
| ३३७ | तत्कालीन | the then, of those times<br>तत्कालीन |
| ३३८ | सक्षम | capable<br>सक्षम |
| ३३९ | तो इतिहासकार, ते -<br>इतिहासकारा-, इतिहासकारां- | historian<br>इतिहासकार |
| ३४० | अधिकृत | formal / official<br>औपचारिक / कार्यालयीन |
| ३४१ | तो भिक्खू, ते -<br>भिक्खू-, भिक्खूं- | a Buddhist monk<br>बौद्ध भिक्षु |
| ३४२ | रेशमी | silky<br>रेशमी |
| ३४३ | कोरीव | carved<br>तराशा हुआ |
| ३४४ | तो वंश, ते -<br>वंशा-, वंशां- | race<br>वंश |
| ३४५ | तो ठसा, ते ठसे<br>ठशा-, ठशां- | impression / stamp<br>प्रभाव / निशान |
| ३४६ | प्रादेशिक | regional<br>प्रादेशिक |
| ३४७ | तो किनारा, ते किनारे<br>किनाऱ्या-, किनाऱ्यां- | shore, bank<br>किनारा |
| ३४८ | तो प्राणायाम<br>प्राणायामा- | breathing exercise<br>प्राणायाम |
| ३४९ | ते पुनर्निर्माण<br>पुनर्निर्माणा- | re-construction<br>पुनर्निर्माण |
| ३५० | तो मतभेद, ते -<br>मतभेदा-, मतभेदां- | difference of opinions<br>मतभेद |
| ३५१ | ती समुद्रसपाटी<br>समुद्रसपाटी- | sea-level<br>समुद्र की सतह |

पाठ ९

| | | |
|---|---|---|
| ३५२ | ती देणगी, त्या देणग्या<br>देणगी-, देणग्यां- | donation<br>चंदा |
| ३५३ | निर्णायक | deciding, decisive<br>निर्णायक |
| ३५४ | ती भातशेती<br>भातशेती- | rice fields, paddy fields / cultivation<br>चावल के खेत / खेती |
| ३५५ | ती पोटभाषा, त्या -<br>पोटभाषे-, पोटभाषां- | dialect<br>बोली |
| ३५६ | ती सुरक्षा<br>सुरक्षे- | safety<br>सुरक्षा |
| ३५७ | परदेशी / परराष्ट्रीय / परकीय | foreign<br>विदेशी |
| ३५८ | ती यातना, त्या -<br>यातने-, यातनां- | torture<br>यातना |
| ३५९ | ती उलाढाल, त्या उलाढाली<br>उलाढाली-, उलाढालीं- | turnover<br>टर्नओव्हर, विक्रय राशि |
| ३६० | ती मूर्तिकला, त्या -<br>मूर्तिकले-, मूर्तिकलां- | sculpture<br>मूर्तिकला |
| ३६१ | ती कलाशैली, त्या -<br>कलाशैली-, कलाशैलीं- | art style<br>कलाशैली |
| ३६२ | ती चेहरेपट्टी, त्या चेहरेपट्ट्या<br>चेहरेपट्टी-, चेहरेपट्ट्यां- | facial structure<br>चेहरे का नक्शा |
| ३६३ | ती बनावट, त्या बनावटी<br>बनावटी-, बनावटीं- | structure<br>रचना |
| ३६४ | ती टोळी, त्या टोळ्या<br>टोळी-, टोळ्यां- | group, gang<br>टोली, गुट |
| ३६५ | ती खिंड, त्या खिंडी<br>खिंडी-, खिंड्यां- | pass<br>घाटी |
| ३६६ | ती स्वीकारार्हता<br>स्वीकारार्हते- | fit to be accepted, acceptability<br>स्वीकृत होने की पात्रता |

| | | |
|---|---|---|
| ३६७ | ती मालमत्ता<br>मालमत्ते- | property<br>जायदाद |
| ३६८ | ती आपत्ती, त्या -<br>आपत्ती-, आपत्तीं- | disaster, catastrophe, calamity<br>आपात स्थिति |
| ३६९ | ती कसोटी, त्या कसोट्या<br>कसोटी-, कसोट्यां- | test<br>कसौटी |
| ३७० | ती प्रतिमा, त्या -<br>प्रतिमे-, प्रतिमां- | image<br>प्रतिमा |
| ३७१ | चोख | accurate<br>एकदम सही, सटीक |
| ३७२ | संकुचित | narrow<br>संकुचित |
| ३७३ | ती विचारसरणी, त्या -<br>विचारसरणी-, विचारसरणीं- | way of thinking<br>विचार पद्धति |
| ३७४ | सर्वाधिक | maximum<br>ज्यादा से ज्यादा |
| ३७५ | ते स्वातंत्र्य<br>स्वातंत्र्या- | independence<br>स्वतंत्रता |
| ३७६ | सार्वभौम | sovereign<br>सार्वभौम |
| ३७७ | ते शिखर, ती शिखरे<br>शिखरा-, शिखरां- | peak, pinnacle, summit, acme<br>शिखर |
| ३७८ | ते धोरण, ती धोरणे / धोरणं<br>धोरणा-, धोरणां- | policy<br>नीति |
| ३७९ | ते स्वहित<br>स्वहिता- | self-interest, welfare of oneself<br>खुद का भला |
| ३८० | ते परहित<br>परहिता- | welfare of others<br>दूसरों का भला |
| ३८१ | ते शतक, ती शतके / शतकं<br>शतका-, शतकां- | century<br>शतक |

| | | |
|---|---|---|
| ३८२ | ते उत्खनन, ती उत्खनने / उत्खननं<br>उत्खनना-, उत्खननां- | excavation<br>उत्खनन, खुदाई |
| ३८३ | ते तत्त्वज्ञान<br>तत्त्वज्ञाना- | philosophy<br>तत्त्वविज्ञान, फ़लसफ़ा |
| ३८४ | ते पाक्षिक, ती पाक्षिके<br>पाक्षिका-, पाक्षिकां- | fortnightly<br>पखवाड़े में प्रकाशित होने वाला |
| ३८५ | ते युद्ध, ती युद्धे / युद्धं<br>युद्धा-, युद्धां- | war<br>युद्ध |
| ३८६ | ते पुनर्वसन<br>पुनर्वसना- | rehabilitation<br>पुनर्वास |
| ३८७ | शेकडो | hundreds<br>सैंकड़ो |
| ३८८ | तात्पुरता | temporary<br>अस्थायी |
| ३८९ | विकसित | developed<br>विकसित |
| ३९० | अखेर | end<br>अंत |
| ३९१ | खस्ता खाणे | to suffer, to work hard<br>कठिनाइयाँ झेलना |

**पाठ ६ - घरकुल**



| | | |
|---|---|---|
| ३९२ | तो घरमालक, ते -<br>घरमालका-, घरमालकां- | houseowner / landlord<br>घरमालिक |
| ३९३ | तो साक्षीदार, ते -<br>साक्षीदारा-, साक्षीदारां- | witness<br>गवाह |
| ३९४ | तो जिव्हाळा<br>जिव्हाळ्या- | affection<br>प्यार |
| ३९५ | जुळणे<br>(नाते, मने, विचार इ.) | to match (relations, minds, thinking etc.)<br>जुड़ना / मिलना (संबंध, मन, विचार) |

| | | |
|---|---|---|
| ३९६ | ती साथ, त्या साथी<br>साथी-, साथीं- | company<br>साथ, संगत |
| ३९७ | तो अर्थ (पैसा)<br>अर्था- | money<br>पैसा |
| ३९८ | ती वाणी<br>वाणी- | voice, speech<br>वाणी, बोली |
| ३९९ | ती आकांक्षा, त्या -<br>आकांक्षे-, आकांक्षां- | aspiration, ambition<br>आकांक्षा |
| ४०० | तो पंख, ते -<br>पंखा-, पंखां- | wing<br>पर, पंख |
| ४०१ | ती प्रीत<br>प्रीती- | love<br>प्यार |
| ४०२ | तो उंबरठा, ते उंबरठे<br>उंबरठ्या-, उंबरठ्यां- | threshold<br>दहलीज |
| ४०३ | ती भक्ती<br>भक्ती- | faith, devotion<br>भक्ति |
| ४०४ | तो आसरा, ते आसरे<br>आसऱ्या-, आसऱ्यां- | support, shelter<br>आसरा, आधार |
| ४०५ | तो आश्रय<br>आश्रया- | shelter<br>आश्रय, आसरा |
| ४०६ | तो वाडा, ते वाडे<br>वाड्या-, वाड्यां- | a mansion<br>हवेली |
| ४०७ | तो टेकू, ते -<br>टेकू-, टेकूं- | a prop, support<br>टेक |
| ४०८ | तो दरवान, ते -<br>दरवाना-, दरवानां- | a doorkeeper<br>दरबान |
| ४०९ | कंटाळवाणा | boring, irksome<br>उबाऊ |
| ४१० | एकसुरी | monotonous<br>नीरस |

पाठ ३

| | | |
|---|---|---|
| ४११ | तो उल्हास<br>उल्हासा- | excitement<br>उत्साह |
| ४१२ | तो सुटसुटीतपणा<br>सुटसुटीतपणा- | comfort, being easy to handle<br>खुलापन |
| ४१३ | ती सजावट, त्या सजावटी<br>सजावटी-, सजावटीं- | decoration<br>सजावट |
| ४१४ | नीटनेटका | tidy, neat<br>साफसुथरा |
| ४१५ | प्रसन्न | cheerful, pleasant, pleased<br>प्रसन्न |
| ४१६ | अवजड | heavy<br>भारी |
| ४१७ | आटोपशीर | compact<br>संक्षिप्त |
| ४१८ | मोकळा | spare, free, empty, loose<br>खुला, खाली |
| ४१९ | तो कोपरा, ते कोपरे<br>कोपऱ्या-, कोपऱ्यां- | corner<br>कोना |
| ४२० | ती फुलदाणी, त्या फुलदाण्या<br>फुलदाणी-, फुलदाण्यां- | vase, flowerpot<br>फूलदान |
| ४२१ | ती बरणी, त्या बरण्या<br>बरणी-, बरण्यां- | a container, jar<br>बरनी |
| ४२२ | तो गालिचा, ते गालिचे<br>गालिच्या-, गालिच्यां- | a carpet<br>कालीन |
| ४२३ | मांडणे | to arrange<br>ठीक से जगह पर लगाना |
| ४२४ | सटकणे | to slip off<br>(किसी वस्तु का) फिसलना |
| ४२५ | झेलणे | to catch<br>गिरती चीज पकड़ना |

| | | |
|---|---|---|
| ४२६ | वाचवणे | to save (life / money)<br>बचाना |
| ४२७ | पाडणे | to fell to make something fall<br>गिराना |
| ४२८ | फोडणे | to break (transitive)<br>फोड़ना |
| ४२९ | फुटणे | to break (intransitive)<br>फूटना |
| ४३० | मोडणे | to break, to bend<br>टूटना / तोड़ना, मोड़ना |
| ४३१ | तो दिवाणखाना, ते दिवाणखाने<br>दिवाणखान्या-, दिवाणखान्यां- | living room<br>बैठक |
| ४३२ | ती रचना, त्या -<br>रचने-, रचनां- | arrangement, setting, composition<br>रचना |
| ४३३ | ती रंगसंगती<br>रंगसंगती- | colour composition<br>रंगों की रचना |
| ४३४ | गडद | dark<br>गहरा |
| ४३५ | काळजीपूर्वक | carefully<br>ध्यान से, सावधानी से |
| ४३६ | ती तसबीर, त्या तसबिरी<br>तसबिरी-, तसबिरीं- | a portrait / painting / photo-frame<br>तस्वीर |
| ४३७ | नाजूक | delicate<br>नाजुक |
| ४३८ | खर्चीक | extravagant, spendthrift, magnificent<br>खर्चीला |
| ४३९ | नक्षीदार | decorative<br>नक्काशीदार |
| ४४० | भग्न | broken<br>फूटा हुआ / भग्न |

| | | |
|---|---|---|
| ४४१ | ती खोली, त्या खोल्या<br>खोली-, खोल्यां- | a room<br>कमरा |
| ४४२ | ती चादर, त्या चादरी<br>चादरी-, चादरीं- | bedsheet<br>चादर / चद्दर |
| ४४३ | ती गादी, त्या गाद्या<br>गादी-, गाद्यां- | mattress<br>गद्दा |
| ४४४ | तो व्हरांडा, ते व्हरांडे<br>व्हरांड्या-, व्हरांड्यां- | veranda<br>बरामदा |
| ४४५ | ती प्रसन्नता<br>प्रसन्नते- | happiness, being blessed<br>प्रसन्नता |
| ४४६ | तो भपका, ते भपके<br>भपक्या-, भपक्यां- | ostentation, show, pomp<br>दिखावा |
| ४४७ | तो अभ्रा, ते अभ्रे<br>अभ्र्या-, अभ्र्यां- | pillow-cover<br>गिलाफ |
| ४४८ | तो पडदा, ते पडदे<br>पडद्या-, पडद्यां- | curtain<br>पर्दा |
| ४४९ | कंटाळणे | to get bored<br>ऊब जाना |
| ४५० | बदलणे | to change, to transform<br>बदलना |
| ४५१ | बदलवणे | to make something / someone change<br>बदलवाना |
| ४५२ | तो निवारा, ते निवारे<br>निवाऱ्या-, निवाऱ्यां- | shelter<br>आसरा |
| ४५३ | ती आपुलकी<br>आपुलकी- | affection<br>अपनापन |
| ४५४ | ती समजूत, त्या समजुती<br>समजुती-, समजुतीं- | belief<br>मान्यता, धारणा |
| ४५५ | ती सुरक्षितता<br>सुरक्षितते- | safety<br>सुरक्षा |

| | | |
|---|---|---|
| ४५६ | हलवणे | to move / shake (transitive)<br>हिलाना |
| ४५७ | ते तोरण, ती तोरणे / तोरणं<br>तोरणा-, तोरणां- | festoon<br>मेहराब |
| ४५८ | ते छप्पर, ती छपरे / छपरं<br>छपरा-, छपरां- | a roof<br>छत |
| ४५९ | ती कूस, त्या कुशी<br>कुशी-, कुशीं- | left or right side of the body<br>बाजू |
| ४६० | दत्तक | adoption<br>गोद लिया हुआ |
| ४६१ | ती सुसूत्रता | coherence<br>सुसंगतता |
| ४६२ | तो दंडक, ते -<br>दंडका-, दंडकां- | rule<br>नियम |
| ४६३ | तो वारसाहक्क<br>वारसाहक्का- | hereditary right<br>आनुवांशिक अधिकार |
| ४६४ | तो स्नेह<br>स्नेहा- | affection<br>स्नेह |
| ४६५ | ती बालक्रीडा, त्या -<br>बालक्रीडे-, बालक्रीडां- | child's play / actions<br>बाल लीला |
| ४६६ | ती कुटुंबसंस्था, त्या -<br>कुटुंबसंस्थे-, कुटुंबसंस्थां- | family system<br>परिवार संस्था |
| ४६७ | सर्वमान्य | accepted by all<br>सबके द्वारा मान्य किया हुआ |
| ४६८ | उत्क्रांत | evolved<br>विकसित |
| ४६९ | चक्रीय | circular (motion)<br>वृत्तीय (गति) |
| ४७० | एकेकटा | one by one, alone<br>अकेला |

| | | |
|---|---|---|
| ४७१ | ती कुटुंबरचना, त्या -<br>कुटुंबरचने-, कुटुंबरचनांचा | family structure<br>परिवार की रचना |
| ४७२ | ते घरपण<br>घरपणा- | homeliness<br>घरपन |
| ४७३ | ते घरदार, ती घरेदारे / घरंदारं<br>घरादारा- / घरादारां- | household<br>घरबार |
| ४७४ | ते सहजीवन<br>सहजीवना- | co-existence<br>सहजीवन |
| ४७५ | ती देखरेख, त्या देखरेखी<br>देखरेखी-, देखरेखीं- | watch, supervision<br>पहरा, निगरानी |
| ४७६ | ते घरकुल, ती घरकुले / घरकुलं<br>घरकुला-, घरकुलां- | home<br>घरौंदा |
| ४७७ | ती चूल, त्या चुली<br>चुली-, चुलीं- | earthen stove<br>चूल्हा |
| ४७८ | ते भाडे / भाडं, ती भाडी<br>भाड्या-, भाड्यां- | rent<br>भाड़ा |
| ४७९ | ते कर्ज, ती कर्जे / कर्जं<br>कर्जा-, कर्जां- | loan<br>कर्जा |
| ४८० | ते घरटे / घरटं, ती घरटी<br>घरट्या-, घरट्यां- | nest<br>घोंसला |
| ४८१ | ते पिलू, ती पिले<br>पिला-, पिलां- | little one (of animals and birds)<br>बच्चा (पशु-पक्षियों का) |
| ४८२ | ती राखण, त्या राखणी<br>राखणी-, राखणीं- | charge, care, custody<br>निगरानी |
| ४८३ | ते वास्तव्य, ती वास्तव्ये / वास्तव्यं<br>वास्तव्या-, वास्तव्यां- | stay, sojourn<br>मुकाम |
| ४८४ | ते नंदनवन, ती नंदनवने / नंदनवनं<br>नंदनवना-, नंदनवनां- | garden of heaven, paradise<br>स्वर्ग |

४८५ ते न्हाणीघर, ती न्हाणीघरे / न्हाणीघरं — bathroom
न्हाणीघरा-, न्हाणीघरां- — स्नानघर

## पाठ ७ - दगडांच्या देशा

४८६ तो भुईदुर्ग, ते - — fort at the ground level
भुईदुर्गा-, भुईदुर्गां- — जमीन पर बंधा हुआ किला

४८७ तो जलदुर्ग, ते - — fort in water
जलदुर्गा-, जलदुर्गां- — पानी में बंधा हुआ किला

४८८ तो गिरिदुर्ग, ते - — fort on the mountain
गिरिदुर्गा-, गिरिदुर्गां- — पर्वत पर बंधा हुआ किला

४८९ प्रचलित — prevalent
प्रचलित

४९० तो आचार्य, ते - — teacher
आचार्या-, आचार्यां- — आचार्य, गुरु

४९१ तो निवास, ते - — residence
निवासा-, निवासां- — निवास, रहने की जगह

४९२ तो विहार, ते - — a monastery
विहारा-, विहारां- — मठ

४९३ हेरणे — to spot
पता लगाना

४९४ ती पूर्वसूचना, त्या - — intimation
पूर्वसूचने-, पूर्वसूचनां- — इत्तिला, पूर्वसूचना

४९५ ती डागडुजी — repair
डागडुजी- — मरम्मत

४९६ रोवणे — to set, implant, fix by digging
गाड़ना

४९७ रुजवणे — to sow, to inculcate, to plant
बोना

४९८ ती पर्वतरांग, त्या पर्वतरांगा — range of mountains, sierra
पर्वतरांगे-, पर्वतरांगां- — वादियाँ

| | | |
|---|---|---|
| ४९९ | प्रतिकार करणे | to resist<br>प्रतिकार करना |
| ५०० | कामी येणे | to be of use / to serve, to die in battle<br>काम आना |
| ५०१ | ती गुहा, त्या -<br>गुहे-, गुहां- | cave<br>गुफा |
| ५०२ | ती उपयुक्तता<br>उपयुक्तते- | utility<br>उपयोगिता |
| ५०३ | धाव घेणे | to run to help<br>दौड़ जाना |
| ५०४ | वेग येणे | to pick up speed<br>गति पकड़ना |
| ५०५ | निमुळता | tapering<br>नीचे से ऊपर पतला होता हुआ |
| ५०६ | तैनात करणे | to deploy<br>तैनात करना |
| ५०७ | ते प्रवेशद्वार, ती प्रवेशद्वारे<br>प्रवेशद्वारा-, प्रवेशद्वारां- | entrance<br>प्रवेश द्वार |
| ५०८ | अवर्णनीय | beyond description, indescribable<br>वर्णन से परे, अवर्णनीय |
| ५०९ | ते संवर्धन, ती संवर्धने<br>संवर्धना-, संवर्धनां- | development, rearing up<br>संवर्धन, विकास करना |
| ५१० | ती पडझड, त्या पडझडी<br>पडझडी-, पडझडीं- | downfall, dilapidation<br>पतन |
| ५११ | तो अवशेष, ते -<br>अवशेषा-, अवशेषां- | remains, ruins<br>अवशेष |
| ५१२ | ते पुरातत्त्वशास्त्र<br>पुरातत्त्वशास्त्रा- | archaeology<br>पुरातत्त्व विद्या |
| ५१३ | होतकरू | promising<br>होनहार |

| | | |
|---|---|---|
| ५१४ | ते रणक्षेत्र, ती रणक्षेत्रे / रणक्षेत्रं<br>रणक्षेत्रा-, रणक्षेत्रां- | battlefield<br>रणभूमि |
| ५१५ | ते नक्षत्र, ती नक्षत्रे / नक्षत्रं<br>नक्षत्रा-, नक्षत्रां- | constellation<br>नक्षत्र |
| ५१६ | वैभवसंपन्न | rich, wealthy, affluent<br>अमीर |
| ५१७ | ते लेणे / लेणं, ती लेणी<br>लेण्या-, लेण्यां- | artistic cave, sculpture in the cave<br>कलात्मक गुफा |
| ५१८ | स्फूर्तिशाली | inspiring<br>प्रेरणादायक |
| ५१९ | भूषणास्पद | creditable<br>श्रेयस्कर |
| ५२० | तोलणे | to weigh / balance<br>तोलना |
| ५२१ | ज्वलंत | blazing<br>ज्वलंत, प्रबल |
| ५२२ | रोमहर्षक | exciting, thrilling<br>रोमांचकारी |
| ५२३ | सरसकट | indiscriminately, altogether<br>बिना किसी भेद किये सभी को |
| ५२४ | आडमार्ग | unusual way, detour<br>उपमार्ग |
| ५२५ | स्मरणार्थ | in memory of someone<br>याद में |
| ५२६ | भर देणे | to emphasise<br>जोर देना |
| ५२७ | आत्मसात करणे | to imbibe<br>आत्मसात करना |
| ५२८ | पराकोटीला जाणे | to reach its peak<br>चरमसीमा तक पहुँचना |

## पाठ ८ - खाद्यसंस्कृती

५२९ तो राजदूत, ते - राजदूता- | ambassador | राजदूत

५३० तो द्रोण, ते - द्रोणा-, द्रोणां- | bowl made of dry leaves | सूखे पत्तों से बनी कटोरी

५३१ तो परीघ, ते - परीघा-, परीघां- | circumference | घेरा, परिधि

५३२ तो बेत, ते - बेता-, बेतां- | plan | योजना

५३३ तो खाद्यमहोत्सव, ते - खाद्यमहोत्सवा-, खाद्यमहोत्सवां- | food festival | भोजन महोत्सव

५३४ तो खाद्यप्रेमी, ते - खाद्यप्रेमी-, खाद्यप्रेमीं- | foody / foodie, gourmet | भोजनप्रेमी

५३५ ती खाद्यसंस्कृती खाद्यसंस्कृती- | food culture | भोजन संस्कृती

५३६ तिंबणे | to knead | गूँदना

५३७ खवणे | to grate | खिसना

५३८ घुसळणे | to churn | मथना

५३९ वाळवणे | to dry in the sun | धूप में सुखाना

५४० कुटणे | to pound | कूटना

५४१ साठवणे | to store | खाद्यपदार्थ व पेय पदार्थ लंबे समय के लिये डाल कर या भर कर रखना / स्टोर करना

५४२ भरडणे | to grind | पिसना

| | | |
|---|---|---|
| ५४३ | ठेचणे | to crush<br>कुचलना |
| ५४४ | भौगोलिक | geographic<br>भौगोलिक |
| ५४५ | सुपीक | fertile<br>उपजाऊ |
| ५४६ | अधीर | excited, impatient<br>उत्तेजित |
| ५४७ | अनुकूल | conducive, favourable<br>अनुकूल |
| ५४८ | प्राचीन | ancient<br>प्राचीन |
| ५४९ | मऊसूत | very soft<br>नरम |
| ५५० | चटपटीत | spicy<br>तीखा, चटपटा |
| ५५१ | खमंग | savoury, tasty, well-spiced<br>स्वादिष्ट व मसालेदार |
| ५५२ | कुरकुरीत | crispy<br>कुरकुरा |
| ५५३ | झणझणीत | very spicy<br>तीखा |
| ५५४ | आग्रह करणे | to plead, insist<br>अनुरोध करना |
| ५५५ | फडशा पाडणे | to finish<br>ख़त्म करना |
| ५५६ | वाया घालवणे | to waste<br>बरबाद करना |

## पाठ ९ महाराष्ट्रातील प्रमुख शहरे - नागपूर आणि नाशिक

| | | |
|---|---|---|
| ५५७ | तो महापौर, ते -<br>महापौरा- | mayor<br>महापौर, मेयर, नगराध्यक्ष |
| ५५८ | तो स्तर, ते -<br>स्तरा-, स्तरां- | level, stratum, layer<br>स्तर |
| ५५९ | तो भाविक, ते -<br>भाविका-, भाविकां- | devotee<br>भक्त, उपासक |
| ५६० | ती चळवळ, त्या चळवळी<br>चळवळी-, चळवळीं- | movement<br>आंदोलन |
| ५६१ | ती मान्यता, त्या -<br>मान्यते- / मान्यतां- | approval / recognition, consent<br>मान्यता |
| ५६२ | ती पार्श्वभूमी<br>पार्श्वभूमी- | background<br>पृष्ठभूमि |
| ५६३ | ती व्युत्पत्ती<br>व्युत्पत्ती- | derivation, etymology<br>उत्पत्ति |
| ५६४ | ते अधिवेशन, ती अधिवेशने / अधिवेशनं<br>अधिवेशना-, अधिवेशनां- | session<br>अधिवेशन |
| ५६५ | ते उत्पादन, ती उत्पादने / उत्पादनं<br>उत्पादना-, उत्पादनां- | produce, product, production<br>उत्पादन |
| ५६६ | ते मुख्यालय, ती मुख्यालये / मुख्यालयं<br>मुख्यालया-, मुख्यालयां- | headquarter<br>मुख्यालय |
| ५६७ | ते तीर्थक्षेत्र, ती तीर्थक्षेत्रे / तीर्थक्षेत्रं<br>तीर्थक्षेत्रा-, तीर्थक्षेत्रां- | pilgrimage, shrine<br>तीर्थस्थान |
| ५६८ | ते कुंड, ती कुंडे / कुंडं<br>कुंडा-, कुंडां- | pond<br>कुंड |
| ५६९ | ते संतुलन, ती संतुलने / संतुलनं<br>संतुलना-, संतुलनां- | balance<br>संतुलन |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७० | ते सान्निध्य<br>सान्निध्या- | company, vicinity, proximity | संगति |
| ५७१ | धार्मिक | religious | धार्मिक |
| ५७२ | लाकडी | wooden | लकड़ी से बना हुआ |
| ५७३ | कडकडीत | very strong, crisp | कड़ा |
| ५७४ | उगवणे | to rise | उगना |
| ५७५ | पाळणे | to follow, to rear | अनुसरण करना, पालना |
| ५७६ | आखणे | to draw, to chalk out | चित्र बनाना |
| ५७७ | लाभणे | to gain | प्राप्त करना |
| ५७८ | दर्शवणे | to show | दिखाना |
| ५७९ | झपाट्याने | fast | तेजी से |
| ५८० | मान्यता मिळणे | to get recognition | मान्यता प्राप्त होना |
| ५८१ | पावन होणे | to become holy, sacred | शुद्ध होना |
| ५८२ | साद घालणे | to call out | पुकारना |
| ५८३ | आयोजित करणे | to organize | आयोजित करना |
| ५८४ | परंपरा पाळणे | to follow tradition | परंपरा का पालन करना |

५८५ श्रद्धा असणे — to have Faith in
श्रद्धा होना

५८६ छाप पडणे — to be impressed
प्रभावित होना

५८७ जप लावणे — to harp upon
रट लगाना

## पाठ १० - बोधकथा

५८८ ती बोधकथा, त्या -
बोधकथे-, बोधकथां- — parable
बोध कथा

५८९ गोष्टीवेल्हाळ — story-lover
कथाप्रेमी

५९० बाळबोध — simple
साधारण, सामान्य

५९१ ती रूपककथा, त्या -
रूपककथे-, रूपककथां- — allegory
रूपक कथा

५९२ ती पुराणकथा, त्या -
पुराणकथे-, पुराण कथां- — myth
पुराण कथा



५९३ ती अद्‌भुतकथा, त्या -
अद्‌भुतकथे-, अद्‌भुतकथां- — fantastic tale
अद्‌भुत कथा

५९४ ती प्राणिकथा, त्या -
प्राणिकथे-, प्राणिकथां- — fable
प्राणी कथा

५९५ ती दृष्टांतकथा, त्या -
दृष्टांतकथे-, दृष्टांतकथां- — parable
दृष्टांत कथा

५९६ तल्लीन — engrossed, rapt
तल्लीन, मग्न

५९७ ती जडणघडण
जडणघडणी- — formation
गठन, निर्माण

५९८ आगळेवेगळे — different, unique
असाधारण

५९९ सर्वसाधारण — general
सर्वसाधारण

| | | |
|---|---|---|
| ६०० | कालानुरूप | according to the times<br>कालानुरूप, कालानुसार |
| ६०१ | ती धूर्तता<br>धूर्तते- | cunningness<br>धूर्तता |
| ६०२ | विलक्षण | unusual / remarkable<br>विलक्षण |
| ६०३ | ती चौकसबुध्दी<br>चौकसबुध्दी- | curiosity<br>जिज्ञासा |
| ६०४ | कुशल | skilful<br>कुशल |
| ६०५ | कनवाळू | kind, compassionate<br>दयालु |
| ६०६ | भोंगळ | messy<br>अस्तव्यस्त |
| ६०७ | ती सहजप्रेरणा, त्या –<br>सहजप्रेरणे-, सहजप्रेरणां- | instinct<br>सहज प्रेरणा |
| ६०८ | ती गट्टी<br>गट्टी- | close friendship<br>गहरी दोस्ती |
| ६०९ | ती दवंडी, त्या दवंड्या<br>दवंडी-, दवंड्यां- | proclamation, announcement done in old fashion<br>घोषणा |
| ६१० | चतुरोक्तिपूर्ण | witty<br>चतुराईपूर्ण |
| ६११ | मितभाषी | taciturn<br>मितभाषी |
| ६१२ | आशयघन | meaningful, significant<br>अर्थपूर्ण |
| ६१३ | अतिप्राचीन | very ancient<br>अति प्राचीन |
| ६१४ | आद्य | initial, original<br>आद्य, प्रारंभिक |

| | | |
|---|---|---|
| ६१५ | अवाजवी | unreasonable, excessive<br>गलत तरीके से अत्यधिक |
| ६१६ | तो कथनप्रकार, ते -<br>कथनप्रकारा-, कथनप्रकारां- | type of narrative<br>कथनप्रकार |
| ६१७ | तो भेद, ते -<br>भेदा-, भेदां- | difference<br>भेद, फरक |
| ६१८ | कायमस्वरूपी | permanent<br>स्थायी |
| ६१९ | तो एकोपा<br>एकोप्या- | harmony, unity<br>सामंजस्य |
| ६२० | तो वृद्धापकाळ<br>वृद्धापकाळा- | old age<br>वृद्धकाल |
| ६२१ | भावी | future, would-be<br>भावी |
| ६२२ | तो वारसदार, ते -<br>वारसदारा-, वारसदारां- | inheritor<br>वारिस |
| ६२३ | त्वरित | immediately<br>तुरन्त |
| ६२४ | समविचारी | like-minded<br>समविचारी |
| ६२५ | ते साधर्म्य, ती साधर्म्ये / साधर्म्यं<br>साधर्म्या-, साधर्म्यां- | similarity<br>समानता |
| ६२६ | ते नीतितत्त्व, ती नीतितत्त्वे / नीतितत्त्वं<br>नीतितत्त्वा-, नीतितत्त्वां- | ethics<br>नैतिक मूल्य |
| ६२७ | ते बोधतत्त्व, ती बोधतत्त्वे / बोधतत्त्वं<br>बोधतत्त्वा-, बोधतत्त्वां- | moral, principles<br>नैतिक मूल्य |
| ६२८ | ते मानवीकरण<br>मानवीकरणा- | humanization<br>मानवीकरण |

| | | |
|---|---|---|
| ६२९ | ते लोकशिक्षण<br>लोकशिक्षणा- | public education<br>जनशिक्षा |
| ६३० | ते लोकरंजन<br>लोकरंजना- | public entertainment<br>लोकरंजन |
| ६३१ | ते व्यवस्थापन<br>व्यवस्थापना- | management<br>व्यवस्थापन |
| ६३२ | ते विडंबन, ती विडंबने / विडंबनं<br>विडंबना-, विडंबनां- | parody<br>हास्यानुकृति |
| ६३३ | ते प्रसंगावधान<br>प्रसंगावधाना- | presence of mind<br>बुद्धितत्परता |
| ६३४ | उजाडणे | to dawn<br>दिन उगना |
| ६३५ | अंधारणे | to become dark<br>अंधेरा होना |
| ६३६ | सांजावणे | when the sun sets, when it is evening<br>दिन ढ़लना |
| ६३७ | मळमळणे | to feel nausea<br>जी मिचलाना |
| ६३८ | करमणे | to feel at ease<br>जी लगना |
| ६३९ | गडगडणे | to thunder<br>बादल गरजना |
| ६४० | काटेकोरपणे | meticulously<br>बारीकी से |
| ६४१ | सरतेशेवटी | at the end / at last<br>अंत में |

# व्याकरण आराखडा

## क्रियापद

| | |
|---|---|
| १ | संयुक्त क्रियापद |
| २ | क्रियापद-नाम + सप्तमी |
| ३ | उद्देशार्थक काळ |
| ४ | प्रयोजक क्रियापदे |
| ५ | चतुर्थी-क्रियापद |
| ६ | शक्य क्रियापदे |
| ७ | अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे |

## प्रयोग

| | |
|---|---|
| ८ | कर्तरी प्रयोग |
| ९ | कर्मणी प्रयोग |
| १० | भावे प्रयोग |
| ११ | कर्ता-कर्म-क्रियापद संबंध |

## विशेषणे

| | |
|---|---|
| १२ | विशेषणांचा नामांसारखा वापर |
| १३ | क्रमवाचक संख्याविशेषणे |
| १४ | विशेष नाम + ई = विशेषण |
| १५ | धातुसाधित विशेषणे |
| १६ | तीव्रतादर्शक विशेषणे |
| १७ | संख्यावाचक विशेषणे |

## अव्यये


| | |
|---|---|
| १८ | 'तर' – विविध उपयोग |
| १९ | 'तरी' – विविध उपयोग |
| २० | नामसाधित कालवाचक क्रियाविशेषणे |
| २१ | परिणामबोधक उभयान्वयी अव्यये |
| २२ | कालवाचक क्रियाविशेषण अव्यये |
| २३ | संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये |
| २४ | तुलनावाचक शब्द |
| २५ | उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये |
| २६ | शब्दयोगी पदे - आधी, पूर्वी, भर (कालवाचक) |
| २७ | समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये |
| २८ | विरोधसूचक उभयान्वयी अव्यये |
| २९ | 'म्हणजे'चे वेगवेगळे उपयोग |
| ३० | तृतीयेचा प्रत्यय '-ने', शब्दयोगी पद '-मुळे' |
| ३१ | विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये |
| ३२ | पूरक केवलप्रयोगी अव्यये |
| ३३ | 'की' चे वेगवेगळे उपयोग |


## नाम-सर्वनाम


| | |
|---|---|
| ३४ | आत्मवाचक सर्वनामे |

## क्रियापदे (verbs)

**१** (पाठ १) धातुसाधित + साहाय्यक क्रियापद = 'संयुक्त क्रियापद' (verbal compounds)

| | मुख्य क्रियापदे (main verbs) | साहाय्यक क्रियापदे (auxiliary verbs) |
|---|---|---|
| धातू + ऊ | करू, खाऊ, चालू... | शकणे, लागणे, इच्छिणे, पाहणे, देणे, धजणे |
| धातू + ऊन | करून, खाऊन, चालून... | येणे, पाहणे, टाकणे, जाणे, चुकणे, बघणे, ठेवणे, बसणे, घेणे, देणे |
| धातू + ता | करता, खाता, पोहता... | येणे |
| विध्यर्थी रूपे | करावा, करावी, करावे / करावं, खावा, खावी, खावे / खावं चालावे / चालावं... | लागणे |
| धातू + त | करत, खात... | येणे, जाणे, राहणे, बसणे |
| भूतकाळी रूपे | केला, केली, केले, केल्या, खाल्ला, खाल्ली, खाल्ले, खाल्ल्या... | पाहिजे, जाणे |
| धातू + आयला | करायला, खायला... | पाहिजे, जाणे, लागणे, जमणे, घेणे, देणे, आवडणे |
| धातू + ता, ती, ते / तं, त्या | चालता, चालती, चालते / चालतं, चालत्या... | होणे (चालती झाली.) (बोलता हो.) |

पण, दोन क्रियापदे एकत्र आली म्हणजे प्रत्येक वेळी ती संयुक्त क्रियापदेच असतात असे मात्र नाही. उदा॰ मुंग्यांची रांग तुला दिसत नाही? मग चष्मा <u>लावून बघ.</u>

ह्या वाक्यात 'लावणे' आणि 'बघणे' ह्या दोन्ही क्रियांचा स्वतंत्र बोध होत आहे (चष्मा लाव, मुंग्यांची रांग बघ), म्हणून हे संयुक्त क्रियापद नाही. वाक्यातील क्रियापदांमधून कोणत्याही <u>**एकाच**</u> क्रियेचा बोध झाला तरच ते **संयुक्त क्रियापद** होते.

**२** (पाठ २) क्रियापद-नाम + सप्तमी (gerund + locative)

| क्रियापद-नाम | सामान्यरूप + त | क्रियापद-नामाचे सप्तमीचे रूप | |
|---|---|---|---|
| करणे | करण्या + त | करण्यात | मला अभिनय करण्यात / करण्यामध्ये रस आहे. |
| देणे | देण्या + त | देण्यात | |

**अशीच रचना नाम वापरूनही होते.**

| | |
|---|---|
| आदित्यला बुद्धिबळ आवडते. | आदित्यला बुद्धिबळात / बुद्धिबळामध्ये रस आहे. |
| सुरिंदरला संगीताची आवड आहे. | सुरिंदरला संगीतामध्ये रस आहे. |

## ३ (पाठ २) उद्देशार्थक काळ (prospective tense)

| | |
|---|---|
| धातू + णार + असणे | केशव बसणार आहे. (वर्त.)<br>केशव बसणार होता. (भूत.)<br>केशव बसणार असेल. (भवि.) |
| कर्त्याने जर साहाय्यक क्रियापदाचा वापर केला नाही, तर कृती करण्यामागील उद्देश पक्का असल्याचे आणि ती करण्याची शक्यता अधिक असल्याचे स्पष्ट होते. | केशव काम करणार. |

## ४ (पाठ ६) प्रयोजक क्रियापदे (causal verbs)

| १. मूळ धातू + वणे = प्रयोजक क्रियापद | २. मूळ धातूशी सादृश्य दाखवणारी प्रयोजक क्रियापदे | ३. मूळ धातूपेक्षा वेगळी असणारी प्रयोजक क्रियापदे |
|---|---|---|
| वाचणे – वाचवणे (जीव) | लागणे - लावणे | खाणे - भरवणे |
| याचप्रमाणे –<br>ऐकणे-ऐकवणे<br>बसणे-बसवणे<br>हसणे-हसवणे<br>रडणे-रडवणे<br>खेळणे-खेळवणे<br>संपणे-संपवणे<br>पसरणे-पसरवणे<br>झोपणे-झोपवणे<br>रंगणे, रंगवणे इ. | याचप्रमाणे –<br>तुटणे-तोडणे<br>पिणे-पाजणे<br>फिटणे-फेडणे<br>फुटणे-फोडणे<br>तरणे-तारणे इ. | याचप्रमाणे –<br>निघणे-काढणे<br>येणे-आणणे<br>बघणे-दाखवणे<br>जाणे-पाठवणे / नेणे / घालवणे / हाकलणे* इ. |
| बबन बुडता बुडता वाचला.<br>- मधूने बबनला बुडताना वाचवले. | त्यांच्या घराची पार वाट लागली.<br>- दारूने त्या घराची पार वाट लावली. | - आमची नलू दूध-चपाती अगदी आवडीने खाते.<br>- नलूला कधी-कधी आई भरवते. |

* 'हाकलणे' व 'हाकलवणे' अशी दोन्ही प्रयोजक रूपे संभवतात.

### अपवाद

- असणे, खोकणे, शिंकणे, विंचरणे, वापरणे, धुणे इ. धातूंची प्रयोजक रूपे वापरण्याची आवश्यकताच नसते.
- 'जाणवणे' हे 'जाणणे'चे प्रयोजक क्रियापद नाही.
- प्रयोजक रूप होत असले तरी ती वापरले जात नाही.

| | |
|---|---|
| लिहिते - ~~लिहवते~~ - लिहून घेते | चैताली पत्र लिहिते. आई चैतालीकडून पत्र लिहून घेते. |

- काही धातूंचे प्रयोजक रूप होताना कोणताही फरक नाही.

| | |
|---|---|
| मोडणे - मोडणे | वाऱ्यामुळे फांदी मोडली. बबनने फांदी मोडली. |

- काही धातूंची दोन प्रयोजक रूपे होतात.

| | |
|---|---|
| सांडणे - सांडणे / सांडवणे | तिच्या हातून चहा सांडला. तिने चहा सांडला / सांडवला. |
| पडणे - पाडणे / पाडवणे | सानिकाच्या हातून तसबीर पडली. सानिकाने तसबीर पाडली / पाडवली. |

- काही धातूंची प्रयोजक रूपे वेगवेगळ्या पद्धतींनी होतात आणि अर्थच्छटाही बदलते.

| | | |
|---|---|---|
| होणे - करणे / व्हायला लावणे / व्हायला भाग पाडणे | तो मंत्री झाला. | पक्षाने त्याला मंत्री केले.<br>पक्षाने त्याला मंत्री व्हायला लावले.<br>पक्षाने त्याला मंत्री व्हायला भाग पाडले. |

### ५ (पाठ ८) चतुर्थी-क्रियापद (dative verbs)

जमणे – प्रशांतला स्वयंपाक जमतो.
समजणे – विद्यार्थ्यांना कविता चांगली समजली.
आवडणे – निखिलला भाकरी आवडते.
येणे – त्याला चपात्या येतात.
(पेलणे, मानवणे इ.)
काही क्रियापदे वापरताना ती ज्या कर्त्यांशी संबंधित असतात त्यांना चतुर्थीचे स, ला, ना, प्रत्यय (ए.व. : -स, -ला, -ते; अ.व. : -स, -ला, -ना, -ते) लागतात.

### ६ (पाठ १०) शक्य क्रियापदे (potential verbs)

अकर्मक क्रियापद – चालणे

| वर्तमानकाळी रूप | भूतकाळी रूप | भविष्यकाळी रूप |
|---|---|---|
| तिला आता चालवते. | तिला काल थोडे चालवले. | तिला उद्या कदाचित चालवेल. |
| तिला आता चालवत नाही. | तिला काल चालवले नाही. | तिला चालवणार नाही. |

याचप्रमाणे : पळ, बोल, कर, निज.
पण, पी, दे, घे, ये, जा, ने इ. एकाक्षरी क्रियापदांना 'वव' असा प्रत्यय लागतो.
उदा. पिववणे, देववणे, घेववणे, येववणे, जावावणे, नेववणे इ.

**अकर्मक 'शक्य क्रियापदे' – नपुंसकलिंगी**

उदा. चालणे : दीर्घ आजारानंतर मला आता चालवते / चालवतं, पण पळवत नाही.

| सर्वनाम | कर्ता चतुर्थी / तृतीयेत | शक्य क्रियापद (उदाहरणे) |
|---|---|---|
| मी | मला, माझ्याने, माझ्याच्याने | आता चालवत नाही. / आता चालवते / चालवतं.<br>काल चालवले / चालवलं नाही. / काल चालवले / चालवलं.<br>उद्या चालवणार नाही. / उद्या चालवेल. |
| तू | तुला, तुझ्याने, तुझ्याच्याने | |
| तुम्ही / आपण | तुम्हाला, तुमच्याने, तुमच्याच्याने / आपल्याला, आपल्याने, आपल्याच्याने | |
| तो | त्याला, त्याच्याने, त्याच्याच्याने | |
| ती | तिला, तिच्याने, तिच्याच्याने | |
| ते | त्याला, त्याच्याने, त्याच्याच्याने | |
| आम्ही | आम्हाला, आमच्याने, आमच्याच्याने | |
| ते (अ.व.) | त्यांना, त्यांच्यानी, त्यांच्याच्यानी | |
| त्या (अ.व.) | | |
| ती (अ.व.) | | |

**सकर्मक 'शक्य क्रियापदे' - कर्माप्रमाणे**

उदा. खाणे, पिणे

| | एकवचन | | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्री. | नपुं. | |
| वर्तमानकाळ | वडा खाववत नाही. | गूळपोळी खाववत नाही. | थालीपीठ खाववत नाही. | वडे / गूळपोळ्या / थालीपीठे / थालीपीठं खाववत नाहीत. |
| | सामोसा खाववतो. | पुरणपोळी खाववते. | धिरडे / धिरडं खाववते / खाववतं | सामोसे / पुरणपोळ्या / धिरडी खाववतात. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भूतकाळ | वडा खाववला नाही. | गूळपोळी खाववली नाही. | थालीपीठ खाववले / लं नाही. | वडे खाववले नाहीत. गूळपोळ्या खाववल्या नाहीत. थालीपीठे / थालीपीठं खाववली नाहीत. |
| | सामोसा खाववला. | पुरणपोळी खाववली. | धिरडे / धिरडं खाववले / लं. | सामोसे खाववले. पुरणपोळ्या खाववल्या. धिरडी खाववली. |
| भविष्यकाळ | वडा खाववणार नाही. | गूळपोळी खाववणार नाही. | थालीपीठ खाववणार नाही. | वडे / गूळपोळ्या / थालीपीठे / थालीपीठं खाववणार नाहीत. |
| | सामोसा खाववेल. | पुरणपोळी खाववेल. | धिरडे / धिरडं खाववेल. | सामोसे / पुरणपोळ्या / धिरडी खाववतील. |

टीप : शक्य क्रियापदाचे आणखी एका प्रकारे नकारार्थी रूप होते.
मला फार **चालवले नाही**. / मला फार **चालवेना**.
याचप्रमाणे
खाणे – खाववले नाही / खाववेना (ए॰व॰) / खाववले नाहीत / खाववेनात (अ॰व॰)
धावणे – धाववले नाही / धाववेना

**७** **(पाठ १०) अकर्तृक / भावकर्तृक क्रियापदे**

ज्या क्रियापदांना कर्ता व कर्म दोन्ही नसतात, त्यांना अकर्तृक क्रियापदे म्हणतात. त्या क्रियापदांमधील भाव हाच त्यांचा गृहीत कर्ता असतो म्हणून त्यांना भावकर्तृक क्रियापदेही म्हणतात.
उदा॰ उजाडणे, अंधारणे, सांजावणे इ॰

**प्रयोग (voice)**
**(हिरवा रंग – कर्त्याप्रमाणे बदल, निळा रंग – कर्माप्रमाणे बदल, गुलाबी रंग – तटस्थ)**

**८** **(पाठ ३) कर्तरी प्रयोग**

| | |
|---|---|
| मनोज सिनेमा पाहतो.<br>वैशाली सिनेमा पाहते.<br>बाळ सिनेमा पाहते / पाहतं.<br>लोक सिनेमा पाहतात. | } कर्ता बदलला की क्रियापदाचे रूप बदलते.<br>(कर्तरी प्रयोग) |

## ९ (पाठ ३) कर्मणी प्रयोग

| | |
|---|---|
| रामने आंबा खाल्ला.<br>रामने आंबे खाल्ले.<br>रामने कैरी खाल्ली.<br>रामने लोणचे खाल्ले / लोणचं खाल्लं. | } कर्म बदलले की क्रियापदाचे रूप बदलते. (कर्मणी प्रयोग) |

## १० (पाठ ३) भावे प्रयोग (impersonal voice)

| अकर्मक | सकर्मक | भावे प्रयोग |
|---|---|---|
| शिक्षकाने वेळेवर शाळेत यावे.<br>शिक्षिकेने वेळेवर शाळेत यावे. | शिक्षकाने विद्यार्थ्याला बोलावले.<br>शिक्षकांनी विद्यार्थ्याला बोलावले.<br>शिक्षिकेने विद्यार्थ्याला बोलावले.<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बोलावले.<br>शिक्षकांनी विद्यार्थिनींना बोलावले. | कर्ता किंवा कर्म काहीही बदलले तरी क्रियापदाच्या रूपात बदल होत नाही. |

## ११ (पाठ ३) कर्ता-कर्म-क्रियापद संबंध (subject-object-verb relation)

मराठीत क्रियापदाचे रूप बरेचदा कर्त्याप्रमाणे चालते.

मात्र पुढील रचनांमध्ये सकर्मक क्रियापद कर्माप्रमाणे चालते.

१. सामान्य भूतकाळ (Simple Past Tense) २. पूर्ण काळ (Perfect Tense)

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| सामान्य | मी पत्र लिहितो / लिहिते. | मी पत्र लिहिले. | मी पत्र लिहीन. |
| | तू पत्र लिहितोस / लिहितेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिता. | तू पत्र लिहिलेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिले / त. | तू पत्र लिहिशील.<br>तुम्ही / आपण पत्र लिहाल. |
| | भाऊ मुलाला पत्र लिहितो. | भावाने मुलाला पत्र लिहिले. | भाऊ मुलाला पत्र लिहील. |
| अपूर्ण | मी पत्र लिहीत आहे. | मी पत्र लिहीत होतो / होते. | मी पत्र लिहीत असेन. |
| | तू पत्र लिहीत आहेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत आहात. | तू पत्र लिहीत होतास / होतीस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत होता / त. | तू पत्र लिहीत असशील.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत असाल. |
| | भाऊ मुलाला पत्र लिहीत आहे. | भाऊ मुलाला पत्र लिहीत होता. | भाऊ मुलाला पत्र लिहीत असेल. |

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्ण | मी पत्र लिहिले आहे. | मी पत्र लिहिले होते. | मी पत्र लिहिले असेल. |
| | तू पत्र लिहिले आहेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिले आहे / त. | तू पत्र लिहिले होतेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहिले होते / त. | तू पत्र लिहिले असशील. |
| | भावाने मुलाला पत्र लिहिले आहे. | भावाने मुलाला पत्र लिहिले होते. | भावाने मुलाला पत्र लिहिले असेल. |
| रीति | मी पत्र लिहीत असतो / असते. | मी पत्र लिहीत असे. | मी पत्र लिहीत राहीन. |
| | तू पत्र लिहीत असतोस / असतेस.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत असता. | तू पत्र लिहीत असायचास / असायचीस / अससे.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत असायचात / असा. | तू पत्र लिहीत राहशील.<br>तुम्ही / आपण पत्र लिहीत राहाल. |
| | भाऊ मुलाला पत्र लिहीत असतो. | भाऊ मुलाला पत्र लिहीत असे. | भाऊ मुलाला पत्र लिहीत असेल. |

**अपवाद : खालील क्रियापदे सकर्मक असूनही कर्त्याप्रमाणे चालतात.**

| १. प्रत्यक्ष कर्म | | २. अप्रत्यक्ष कर्म | |
|---|---|---|---|
| शिकणे<br>खेळणे<br>बोलणे<br>विसरणे<br>पिणे, नेसणे | मी मराठी शिकलो.<br>ती कबड्डी खेळली.<br>ते फ्रेंच बोलले.<br>त्या छत्री घरी विसरल्या. | घाबरणे<br>भिणे<br>रागावणे<br>बोलणे | ते सापाला भ्यायले.<br>ती मुलाला रागावली.<br>त्या मुलाला खूप बोलल्या. |

- कर्म निर्जीव वस्तू असेल तर त्याला प्रत्यय लागत नाही.
  उदा॰ मी चित्रपट बघतो.
- कर्म मानव असेल तर त्याला द्वितीयेचा प्रत्यय लागतोच.
  उदा॰ मी अभिनेत्याला बघतो.
- कर्माच्या ठिकाणी मानवेतर सजीव प्राणी असेल तर त्याला द्वितीयेचा प्रत्यय वैकल्पिक असतो.
  उदा॰ मी घोडा / घोड्याला बघतो.

**प्रयोग : कर्म + प्रत्यय**

कर्त्याला आणि कर्माला अशा दोन्ही नामांना प्रत्यय असेल तर क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी आणि एकवचनी असते.

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| सामान्य | शेतकरी बैल / बैलाला बांधतो. | शेतकऱ्याने बैल / बैलाला बांधले. | शेतकरी बैल / बैलाला बांधेल. |
| अपूर्ण | शेतकरी बैल / बैलाला बांधत आहे. | शेतकऱ्याने बैल बांधला / बैलाला बांधत होता. | शेतकरी बैल / बैलाला बांधत असेल. |
| पूर्ण | शेतकऱ्याने बैल बांधला आहे. | शेतकऱ्याने बैल बांधला होता. | शेतकऱ्याने बैल बांधला असेल. |
| | शेतकऱ्याने बैलाला बांधले आहे. | शेतकऱ्याने बैलाला बांधले होते. | शेतकऱ्याने बैलाला बांधले असेल. |
| रीतीकाळ | शेतकरी बैल / बैलाला बांधत असतो. | शेतकरी बैल / बैलाला बांधत असे. | शेतकरी बैल / बैलाला बांधत असेल. |

| टीप : | |
|---|---|
| १. सकर्मक क्रियापदांचा विध्यर्थ (Transitive Potential) | मुलांनी रोज व्यायाम करावा. |
| २. सकर्मक धातू + आयचा | आम्हाला सिनेमा पाहायचा आहे. |
| ३. सकर्मक धातू + आवा + लाग | उसाच्या पिकाला जास्त पाणी द्यावं लागतं. |

## विशेषणे (adjectives)

### १२ (पाठ ४) विशेषणांचा नामांसारखा वापर

| | |
|---|---|
| विशेषण – शहाणा, शहाणी, शहाणे... | नामासारखा उपयोग –<br>ए शहाण्यांनो! आगाऊपणा नको. |

### १३ (पाठ ५) क्रमवाचक संख्याविशेषणे (numeral adjectives)

इ॰ स॰ १९०१ ते २००० – विसावे शतक – विसाव्या शतकात

क्रमवाचक संख्याविशेषणे नामाच्या लिंगाप्रमाणे पुढीलप्रमाणे बदलतात.

| (तो) | (ती) | (ते) |
|---|---|---|
| दुसरा<br>मुलगा | दुसरी<br>गाडी | दुसरे / दुसरं<br>पुस्तक |

### १४ (पाठ ८) विशेष नाम + ई = विशेषण

| प्रांत | शहर / जिल्हा | राज्य | देश | खंड |
|---|---|---|---|---|
| कोकणी, मालवणी, खानदेशी, वऱ्हाडी, मारवाडी, मुलतानी | सातारी, कोल्हापुरी, पण... पुणेरी | केरळी, कर्नाटकी, गुजराथी, पंजाबी, पण.. महाराष्ट्रीय | पाकिस्तानी, चिनी, जपानी, इंग्रजी, पण... भारतीय, जर्मन | अमेरिकी, आफ्रिकी पण... आशियाई आणि युरोपीय |

### १५ (पाठ ८) धातुसाधित विशेषणे (participles)

| | |
|---|---|
| पिक -> पिकलेला | पिकलेला आंबा |
| विरघळ -> विरघळणारी | विरघळणारी साखर |
| पेट -> पेटती | पेटती वात |
| तळ -> तळलेले | तळलेले पापड |

### १६ (पाठ १०) तीव्रतादर्शक विशेषणे (adjectives showing intensity)

एखाद्या विशेषणाची (विशेषत: रंगवाचक विशेषणे) तीव्रता दर्शवण्यासाठी त्यास काही प्रत्यय (suffixes) जोडले जातात. ह्या प्रत्ययांना स्वतंत्रपणे अर्थ असतोच असे नाही.

| | |
|---|---|
| पांढरा | पांढराफटक, पांढरीफटक, पांढरेफटक / पांढरंफटक, पांढरेफटक, पांढऱ्याफटक, पांढरीफटक |
| निळा | निळाशार, निळीशार, निळेशार / निळंशार, निळेशार, निळ्याशार, निळीशार / निळाजर्द |
| काळा | काळाभोर, काळीभोर, काळेभोर / काळंभोर, काळेभोर, काळ्याभोर, काळीभोर |
| | काळाकुट्ट, काळीकुट्ट, काळेकुट्ट / काळंकुट्ट, काळेकुट्ट, काळ्याकुट्ट, काळीकुट्ट |
| | काळाकुळकुळीत, काळीकुळकुळीत, काळेकुळकुळीत / काळंकुळकुळीत, काळेकुळकुळीत, काळ्याकुळकुळीत, काळीकुळकुळीत |
| हिरवा | हिरवागार, हिरवीगार, हिरवेगार / हिरवंगार, हिरवेगार, हिरव्यागार, हिरवीगार / हिरवाजर्द / हिरवाकंच |
| पिवळा | पिवळाधमक, पिवळीधमक, पिवळेधमक / पिवळंधमक, पिवळेधमक, पिवळ्याधमक, पिवळीधमक / पिवळाजर्द |
| लाल | लालभडक, लालबुंद, लालचुटुक |

### १७ (पाठ १०) संख्यावाचक विशेषणे (adjectives of quantity)

| | |
|---|---|
| नामाच्या संख्येचा बोध करून देणारे शब्द | सर्व मुले, एकंदर कारभार, अवघा जनसमुदाय, एकेक वीर, पाचा-पाचांचा गट, दहा-दहाच्या नोटा, अर्धा-अर्धा लाडू, चार-सव्वाचार, दरएक इ. |

अव्यये (indeclinables)

### १८ (पाठ २) 'तर' – विविध उपयोग

| स्पष्टीकरण | उदाहरण |
|---|---|
| अट | वेळ मिळाला तर मी येईन. तू उद्या ये तर खरा, मग बघू.<br>त्याला येऊ दे तर आधी, मग ओरडायचंय तेवढं ओरड. |
| ठासून केलेले विधान | वेळ मिळाला तरच मी येईन. |
| अनिश्चितता | मी आज सिनेमाला आलो तर येईन. |
| अध्याहृत विरोध | तू तर म्हणाला होतास तिकिटं आरामात मिळतील, पण कार्यक्रम तर हाऊसफुल आहे! मी तर येणारच.<br>मी तर नाही येणार.<br>माझी आई तर नाही येणार ह्या मिटिंगला. |
| उद्गार | तर तर! लागून गेलाय मोठा! |
| वाक्यपूरक | हो! आता मी जातो तर! |

### १९ (पाठ २) 'तरी' – विविध उपयोग

| स्पष्टीकरण | उदाहरण |
|---|---|
| जरी – तरी | ढग आले तरी पाऊस पडला नाही. |
| पर्याय | तू तरी जा, नाही तर मी तरी जातो. |
| किमान / कमीत कमी | मला जेवून तरी घेऊ देत. |
| पूर्वसूचना ऐकली असती तर असं झालं नसतं | तरी मी सांगत होतो. |
| म्हणूनच | "तरीच! तो आणि ती सारखे एकत्र फिरत असतात." |

**२०** **(पाठ २) नामसाधित कालवाचक क्रियाविशेषणे (adverbs of time formed from nouns)**

| नाम | विशेषण | क्रियाविशेषण |
|---|---|---|
| प्रात:काळ | प्रातःकाळचा | प्रात:काळी |
| सकाळ | सकाळचा | सकाळी, सकाळला, सकाळचा |
| दुपार | दुपारचा | दुपारी, दुपारचा |
| संध्याकाळ | संध्याकाळचा | संध्याकाळी |
| सायंकाळ | सायंकाळचा | सायंकाळी |

टीप : वरील नामांचे सामान्यरूप होत नाही, म्हणून ते नामसाधित कालवाचक विशेषणात दिसत नाही. पुढील नामांचे सामान्यरूप होते, म्हणून ते विशेषणातही दिसते.

| नाम | विशेषण | क्रियाविशेषण |
|---|---|---|
| पहाट | पहाटेचा | पहाटे, पहाटेस |
| दिवस | दिवसाचा | दिवसा, दिवसाचा, दिवसाउजेडी, दिवसाढवळ्या, दरदिवशी |
| मध्यान्ह | मध्यान्हीचा | मध्यान्ही |
| तिन्हीसांज | तिन्हीसांजेचा | तिन्हीसांजेचा |
| रात्र | रात्रीचा | रात्री, रात्रीस, रात्रीचा |
| मध्यरात्र | मध्यरात्रीचा | मध्यरात्री, मध्यरात्रीस, मध्यरात्रीचा |

**२१** **(पाठ ३) परिणामबोधक उभयान्वयी अव्यये (causal conjunctions)**

| अव्यय | वाक्यात उपयोग |
|---|---|
| म्हणून | वाटेत गाडी बंद पडली **म्हणून** यायला उशीर झाला. |
| त्यामुळे | गर्दीत चुकामूक झाली **त्यामुळे** आमची भेट होऊ शकली नाही. |
| याकरिता | कार्यक्रमाला येऊ शकणार नाही, **याकरिता** क्षमस्व. |
| तेव्हा | वाटेतील गर्दीचा अंदाज घेऊन आम्ही ५ लाच निघालो **तेव्हा** कुठे १० वाजता पोचलो. |
| सबब | येताना गाडी बंद पडली, **सबब** मला उशीर झाला. |
| यास्तव, तस्मात् | (ही अव्यये हल्ली तितकीशी वापरात नाहीत.) |

## २२ (पाठ ३, १०) कालवाचक क्रियाविशेषण अव्यये (adverbs of time)

| | |
|---|---|
| वाक्यातील क्रिया केव्हा, किती वेळ किंवा किती वेळा घडली हे दाखवणारी अव्यये | आता, त्यावेळी, अजूनही, आज, काल, उद्या, परवा, ह्यावेळी, बरेचदा, अधूनमधून, कधी कधी, कधी तरी, वारंवार, नंतर, ताबडतोब, लगेच, एकदम, अचानक |

## २३ (पाठ ४) संकेतदर्शक उभयान्वयी अव्यये (conditional conjunctions)

| | |
|---|---|
| प्रधान वाक्य, त्यातील घटना जेव्हा गौण वाक्यातील संकेतावर अवलंबून असते तेव्हा संकेतदर्शक उभयान्वयी अव्ययांचा वापर केला जातो. | शिकलास **म्हणजे** चांगली नोकरी मिळेल.<br>शिकलास **की** चांगली नोकरी मिळेल.<br>↓ ↓<br>**गौण वाक्य** **प्रधान वाक्य**<br>↑ ↑<br>**जर** अभ्यास केलास, **तर** पास होशील. |
| जेव्हा जरी – तरी या अव्ययांनी दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा त्यातील प्रधान वाक्यात काही अंशी विरोध असतो. म्हणून त्यांना **विरोधी संकेतदर्शक** असेही म्हणतात. | आता **जरी** अभ्यास सुरू केला, **तरी** मी काही पास होत नाही. |

## २४ (पाठ ४) तुलनावाचक शब्द (degree of comparison : comparative and superlative)

| | |
|---|---|
| दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये किंवा वस्तूंमध्ये तुलना करायची असल्यास -पेक्षा, -मध्ये या शब्दयोगी अव्ययांचा, -हून या पंचमीच्या विभक्तिप्रत्ययाचा किंवा सर्वांत, सगळ्यांत या शब्दांचा वापर होतो. | माझ्यापेक्षा माझी बहीण उंच आहे.<br>बरखाहून सिद्धार्थ हुशार आहे.<br>विनू सर्व मुलांमध्ये हुशार आहे.<br>सर्वांत / सगळ्यांत विनू हुशार आहे. |

## २५ (पाठ ५) उद्देशदर्शक उभयान्वयी अव्यये (causal conjunctions)

| | |
|---|---|
| या अव्ययांनी जोडलेल्या वाक्यांच्या पूर्वार्धात उद्देश व उत्तरार्धात परिणाम असतो.<br>म्हणून, यासाठी, याकरता / याकरिता, यास्तव | सगळ्या नातेवाईकांना भेटता यावं म्हणून ही तीन महिन्यांची ट्रीप ठरवलीय. |

## २६ (पाठ ७) शब्दयोगी पदे - आधी, पूर्वी, भर (कालवाचक) (post-positions of time)

| |
|---|
| आधी, पूर्वी आणि भर ही शब्दयोगी पदे जोडून नामांची व क्रियापदांची कालवाचक क्रियाविशेषणे तयार होतात. |

| | |
|---|---|
| नामाला व क्रियापदाला 'आधी' व 'पूर्वी' ही शब्दयोगी पदे जोडताना त्यांचे सामान्य रूप होते. | परकीयांआधी भारताने संपूर्ण जगाला एक मोठी देणगी दिली.<br>आर्थिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीची प्रक्रिया शेकडो वर्षांपूर्वी सुरू झाली. |
| नामाला 'भर' हे शब्दयोगी पद जोडताना नामाचे सामान्य रूप होत नाही. | आज दिवसभर टीव्हीवर निवडणुकीच्या बातम्या येत आहेत. |
| काही ठिकाणी शब्दाचे सामान्य रूप होते | वर्ष + भर + आधी = वर्षभराआधी<br>वर्ष + भर + पूर्वी = वर्षभरापूर्वी |
| आधी, पूर्वी आणि भर या पदांपुढेही षष्ठीचे प्रत्यय लागतात. | परीक्षेआधीचा अभ्यास, वर्षांपूर्वीचे गाव, दिवसभराचा थकवा इ॰ |

### २७ (पाठ ६) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये (conjunctions)

| | |
|---|---|
| दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडली जातात आणि जोडले गेलेले शब्द / वाक्य पहिल्या शब्दात / वाक्यात भर घालतात.<br>व, आणि, शिवाय, अन्, न्, नि, आणखी, आणखीन, आणिक | • उदा॰ समा तिच्या ऑडिशनची तयारी करतेय अन् स्मिता गेटची. |

### २८ (पाठ ७) विरोधसूचक उभयान्वयी अव्यये (coordinatinge conjunctions)

| | |
|---|---|
| दोन एकमेकांविरोधी शब्द किंवा वाक्ये जोडणारी अव्यये.<br>पण, परंतु, परि | मी मागे दोन-तीन ट्रेक केले, **पण** ही नावं मी कधी ऐकली नव्हती.<br>आपल्या तक्रारी मुद्देसूदपणे **परंतु** थोडक्यात सांगाव्यात. |

### २९ (पाठ ७) 'म्हणजे'चे वेगवेगळे उपयोग

| | |
|---|---|
| संकेतदर्शक उभयान्वयी अव्यय | सकाळी ७च्या आत निघा **म्हणजे** १०पर्यंत पुण्यात पोहोचाल. |
| स्वरूपदर्शक उभयान्वयी अव्यय | पाण्याने वेढलेला किल्ला **म्हणजे** जलदुर्ग. |

### ३० (पाठ ७) तृतीयेचा प्रत्यय '-ने', शब्दयोगी पद '-मुळे'

| | -ने / -नं | -मुळे / -मुळं |
|---|---|---|
| **क्रियापद** | गेल्याने, केल्याने इ॰ | गेल्यामुळे, केल्यामुळे इ॰ |

| | | |
|---|---|---|
| **नाम** | कष्टाने, मेहनतीने, आपुलकीने, घाईघाईने इ. | '-ने' ह्या विभक्तिप्रत्ययाचे काम जरी '-मुळे' हे शब्दयोगी पद करत असले, तरी प्रत्येक वेळी त्यांची अदलाबदल करता येतेच असे नाही. |

## ३१ (पाठ ८) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये (conjunctions of option)

| | |
|---|---|
| की | तुम्ही चहा घेणार **की** कॉफी? |
| किंवा | मला सरबत **किंवा** लस्सी, काहीही चालेल. |
| वा | कोल्हापुरी मिसळीची सर पुण्याच्या **वा** मुंबईच्या मिसळीला कशी येणार? |
| अथवा | मी चहा, कॉफी **अथवा** कोणतेही उत्तेजक पेय घेत नाही. |
| अगर | भाजी तिखट झाली तर तीत चिंच **अगर** गूळ घालावा, **अगर** एखादा बटाटा उकडून घालावा. |
| | खाईन तर तुपाशी, **नाही तर** उपाशी! |
| नाही तर | असेल तर दिवाळी, **नाही तर** शिमगा. |
| | गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, **नाही तर** मोडून खाल्ली. |

## ३२ (पाठ ९) पूरक केवलप्रयोगी अव्यये (particles)

या शब्दांचा केवळ उत्स्फूर्त उद्गार केला जातो. ते गाळले तरी वाक्याचे स्वरूप किंवा अर्थ बदलत नाही.

| | |
|---|---|
| **अविकारी अव्यये** | |
| की | जा **की!** / थांब **की!** |
| म्हणून | त्याला एक अक्षर **म्हणून** येत नाही. |
| घ्या | हा **घ्या** मी जातो. |
| मग | राहू द्या तर **मग** आता. |
| **विकारी अव्यये** | |
| आपला | वसुधा **आपली** एकटीच पुढे निघून गेली. |
| | सुधीर **आपला** एकटाच पुढे निघून गेला. |
| बेटा | मन खूप धाव घेते, पण शरीर **बेटे** साथ देत नाही. मन खूप धाव घेते, पण देह **बेटा** साथ देत नाही. |

एकाच केवलप्रयोगी अव्ययाचा वेगवेगळे भाव दर्शवण्यासाठी उपयोग

| | |
|---|---|
| हर्षदर्शक | अ) १. वा:! वा:! बाई, मुलाची मनिऑर्डर आली! |
| प्रशंसादर्शक | २. वा:! वा:! छान निबंध लिहिला आहेस तू! |
| विरोधदर्शक | ३. वा:! वा:! मी कसे हे कबूल करेन? |
| विरोधदर्शक | ब) १. छी:! काही तरीच बोलला तो सभेत! |
| तिरस्कार / घृणादर्शक | २. छी:! किती झुरळे आहेत या घरात! |

### ३३ (पाठ ९) 'की' चे वेगवेगळे उपयोग

- तुम्ही चहा घेणार **की** कॉफी? (विकल्प)
- पंडित नेहरू म्हणत, **की** आराम हराम आहे. (समुच्चय)
- दोन जिने चढले **की** दळवीकाकूंना दम लागतो. (परिणाम)
- अंधारलं **की** घरी ये. (संकेत)
- मला काही समजलं **की** तुला कळवेन. (संकेत)
- बोल **की** रे आता! (केवलप्रयोगी)
- सात **की** आठ सदस्य उपस्थित होते. (विकल्प)

## नाम-सर्वनाम (nouns-pronouns)

### ३४ (पाठ ४) आत्मवाचक सर्वनामे (possessive pronouns)

| | |
|---|---|
| 'आपण' हे पुरुषवाचक सर्वनाम 'स्वत:' या अर्थानेही वापरले जाते. | **आपणच** बोलत सुटलीयेस. |
| सहसा नामांच्या / विशेषनामांच्या / सर्वनामाच्या सोबतीनेच येतात. | ही संस्था मुलांना **स्वत:च्या** पायांवर उभं राहायला शिकवते.<br>मी **स्वत:** गेली दोन वर्षं अशा मुलांना शिकवायला या संस्थेत जातोय. |
| एका वाक्यात दोन आत्मवाचक सर्वनामे | **आपणहून स्वत:चं** कौतुक करणं नाही आवडत मला. |

**आत्मवाचक सर्वनामांची विभक्तिरूपे**

| विभक्ती | आपण | स्वत: |
|---|---|---|
| **प्रथमा** | आपण | स्वत: |
| **द्वितीया** | आपणास, आपणाला, आपल्यास, आपल्याला | स्वत:स, स्वत:ला |
| **तृतीया** | आपणाशी, आपल्याशी | स्वत:, स्वत:शी |
| **चतुर्थी** | आपणास, आपणाला, आपल्यास, आपल्याला | स्वत:स, स्वत:ला |
| **पंचमी** | आपणाहून, आपल्याहून | स्वत:हून, (स्वत:कडून) |
| **षष्ठी** | आपला, आपली, आपले / आपलं, आपले, आपल्या, आपली | स्वत:चा, स्वत:ची, स्वत:चे / स्वत:चं, स्वत:चे, स्वत:च्या, स्वत:ची |
| **सप्तमी** | आपणात / आपल्यात | स्वत:त |

## Marathi Textbook for Level 4

- Creative exercises, tests, glossary and answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

**The set contains:**

1. A Textbook
2. A Workbook
3. DVD (With audio & audio-visual content)

https://mu.ac.in/mymarathi4

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in

मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789353 617264

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR